# शरद् साहित्य



IRBK-0103187

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का०वा०
दा. क्र. 3987

कांत ( भाग २ रा )

3980

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

शरद्-साहित्य माला—६

# श्रीकांत

## भाग तिसरा

[ डॉ. शरच्चन्द्र चतर्जींच्या मूळ बंगालीवरून ]

अनुवादक

**भा. वि. वरेरकर**

IRBK-0103187

प्रकाशक,
नवभारत प्रकाशनसंस्था मुंबइ, ४.

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
६, केळेवाडी, मुंबई ४.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति नोव्हेंबर १९३९
पुनर्मुद्रण आक्टोबर १९४५
पुनर्मुद्रण जानेवारी १९४९

किंमत [redacted] रुपया

२

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई नं. ४

# श्रीकांत

## १

माझ्या या प्रवासाच्या कहाणीवर एके दिवशीं एकदम पडदा ओढून मी निरोप घेतला होता. पुन्हां एके दिवशीं स्वतःच्याच हातानं तो दूर सारण्याची इच्छा नव्हती.

आमच्या खेडेगांवचे ते आजोबा !—माझ्या नाटकी भाषणाला उत्तर देण्यासाठीं म्हणून त्यांनीं नुसतं थोडंसं हंसून दाखवलं, आणि राजलक्ष्मीनं केलेल्या साष्टांग नमस्कारानंतर ते घाईघाईनं दोन्ही पाय मागं घेऊन म्हणाले, ‘ असं का ! वा वा ! छान, छान ? दीर्घजीवी हो ! ’

असं म्हणून डॉक्टरबरोबर जेव्हां ते एकदम निघून गेले तेव्हां राजलक्ष्मीच्या चेहऱ्यावर जो आविर्भाव दिसला तो विसरण्याजोगा नव्हता,—विसरलोंही नाहीं.

पण मला वाटलं होतं, ती माझीच—सर्वस्वी माझीच !—तिनं ही वृत्ति कधींही बाहेर दाखवली नव्हती खरी—पण, आतां असं वाटतं कीं झालं तें बरं झालं ! पुष्कळ दिवसपर्यंत बंद असलेला तो दरवाजा खुला करणं मलाच भाग होतं. ज्या अज्ञात रहस्यामुळं बाहेरचा क्रुद्ध संशय अविचारांत परिणत होऊन दररोज धक्के देत होत होता, तो दूर करण्यासाठीं बंद असलेल्या दरवाजाची कडी स्वतःच्या हातानं काढण्याची संधी आली हें एका अर्थी बरं झालं.

आजोबा निघून गेले. राजलक्ष्मी क्षणभर त्यांच्याकडे पहात स्तब्ध राहिली. त्यानंतर मान वर करून तिनं हंसण्याचा थोडासा प्रयत्न केला. ती म्हणाली, ‘ नमस्कार करतांना मी कांहीं त्यांना शिवलें नसतें. असं भलतंच कांहीं तरी कशाला बोलून गेलां ? कांहीं जरूरी नव्हती असं बोलायची ! केवळ तें—’

खरंच, मी नुसता आपला आपणच अपमान करून घेतला. असं बोलायची

कांहीं जरूरी नव्हती ! बाजारच्या नायकिणीपेक्षां विधवाविवाहाची पत्नी त्यांच्या नजरेनं वरच्या दर्जाची नव्हती !—अर्थात् मी तिला खालींच ढकललं, कुणालाच वरचा दर्जा देऊं शकलों नाहीं, असंच राजलक्ष्मीला बोलायचं होतं. पण तें बोलणं पुरं झालं नाहीं.

मला सारं कांहीं कळून चुकलं ! आधींच तिचा अपमान झालेला, आणखी अधिक चर्चा करून विषय काढण्याची माझी इच्छा नव्हती ! म्हणून जसा होतों तसाच एक शब्दसुद्धां न बोलतां पडून राहिलों. कांहीं वेळपर्यंत राजलक्ष्मीसुद्धां कांहीं बोलली नाहीं. स्वतःच्याच मनाशीं विचार करीत ती कांहीं वेळ तशीच बसून राहिली होती. जवळच कुणी तरी हांक मारावी नी चट्कन उठावं त्याप्रमाणें ती एकदम उठून उभी राहिली. रतनला बोलावून म्हणाली, ‘ गाडी लवकर तयार ठेवायला सांग रतन. नाहींतर रात्रीं अकराच्या गाडीनं जावं लागेल. नी तें कांहीं बरं नव्हे !—रात्रीं थंडी फार असते ! ’

पांच दहा मिनिटांनीं रतन माझी बॅग घेऊन आला. त्यानं ती बॅग गाडीवर ठेवून दिली. माझा बिछाना बांधण्यासाठीं तो माझ्याजवळ येऊन उभा राहिला. तरीही मी कांहीं बोललों नाहीं. कांहींसुद्धां विचारलं नाहीं. कुठं जाणार, कां जाणार, कांहींसुद्धां न विचारतां सरळ जाऊन गाडींत बसलों.

कांहीं दिवसांपूर्वी अशाच एका संध्याकाळीं असाच मीं स्वतःच्या घरीं आलों होतों.—आज पुन्हां तसाच एका संध्याकाळीं बिनबोभाट घराबाहेर निघालों. त्या दिवशींही कुणी माझं स्वागत केलं नव्हतं !—आजही कुणी प्रेमानं मला निरोप द्यायला पुढं आलं नव्हतं ! त्या दिवशींही असेच घरोघर शंख वाजायला सुरवात झाली होती. आतांही बसूमल्लीकाच्या गोपालमंदिरांतून येणारे शंखघंटांचे आवाज अस्पष्ट होऊन हवेंत नाहींसे होत होते. तरीही तो दिवस नी आजचा दिवस याच्यांत केवढं अंतर होतं, तें केवळ स्वर्गस्थ देवताच सांगूं शकतील !

बंगाल्यांतील एका क्षुद्र खेड्यांतील त्या मोडक्यातोडक्या घराची मला कोणत्याच प्रकारची माया ममता कधींच वाटत नव्हती. या घरांतून दूर होणं म्हणजे माझं कांहीं तरी मोठं नुकसान होणं आहे असं केव्हांच मला वाटलं नव्हतं. पण आज सर्व प्रकारें अपमानित होऊन गांव टाकून निघावं लागलं, केव्हां आणि कशा प्रकारें पुन्हां इथं परतून येईन याची कल्पनासुद्धां जेव्हां करतां येईना, तेव्हां हें पडकं-झडकं साम्राज्य, हें खेडं, चारी बाजूनं माझ्या डोळ्यांसमोर असामान्य

झाल्यासारखं दिसूं लागलं. ज्या घरांतून आज हा असा बाहेर पडलों तें माझं वाडवडिलांनीं उभारलेलं मोडकंतोडकं घर मला प्राणापेक्षांही प्रिय वाटूं लागलं.

एक शब्द सुद्धां न बोलतां राजलक्ष्मी येऊन माझ्या समोरच्या बैठकीवर बसली. कुणा परिचित वाटसरूची अभद्र नजर आपल्याकडे जाऊं नये म्हणून गाडीच्या एका कोपऱ्यांत डोकं खुपसून तिनं डोळे मिटले.

स्टेशनावर जाण्यासाठीं ज्यावेळीं आम्ही निघालों त्यावेळीं नुकताच सूर्य मावळला होता. वांकड्या तिकड्या खेडविळ रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आपोआप उगवलेली करवंदी, शेगूळ आणि वेताचीं झाडं त्या अरुंद रस्त्याची रुंदी आणखी कमी करीत होतीं. वरती आंबेफणसाच्या डहाळ्या एकमेकांत मिसळून जागोजाग संध्याकाळच्या काळोखाला आणखी दाटपणा आणीत होत्या.

अशा परिस्थितींत गाडी अगदीं हळुहळू चालत होती. मी दोन्हीं डोळे मिटून घेतले होते. पण त्या अंधारांत सुद्धां मला काय काय दिसत होतं!

असं वाटलं, याच रस्त्यानं माझ्या आजोबांनीं माझ्या आजीला विवाह करून आणली, त्यावेळीं वऱ्हाडी लोकांच्या गलबल्यानं हा रस्ता गजबजून गेला असेल! नंतर एके दिवशीं जेव्हां त्यांनीं देह ठेवला त्यावेळीं याच रस्त्यानं शेजारी पाजाऱ्यांनीं त्यांचं प्रेत खांद्यावर घेऊन नदीकिनारीं नेलं असेल! याच रस्त्यानं माझी आई एके दिवशीं नवी नवरी म्हणून त्या घरांत आली असेल!—आणि पुन्हां ऐके दिवशीं जेव्हां तिची जीवनयात्रा संपली त्यावेळी याचं धुळींतल्या अरुंद रस्त्यानं आम्हीं तिला गंगातटाकीं पोंचवून आलों होतों. त्यावेळीं हा रस्ता इतका निर्जन नव्हता किंवा इतका अडचणीचाही झाला नव्हता. त्यावेळीं इथल्या हवेंतून चोहींकडून मलेरियाचे जंतू उसळून उठले नव्हते किंवा डबक्याडबक्याच्या पाण्यांतल्या चिखलांत एवढं विषही सामावलं नव्हतं. त्यावेळीं या भागांत अन्न होतं, वस्त्र होतं, धर्म होता—त्यावेळीं आनंदरहित आणि भयंकर अशा शून्यतेनं आकाश झांकळून देवाच्या दरवाजापर्यंत जाऊन भिडलं नव्हतं.

माझे दोन्ही डोळे भरून आले. गाडीच्या चाकाची थोडीशी धूळ घेऊन चटकन् कपाळाला लावून मनांतल्या मनांत मी म्हणालों, ‘ माझ्या वाडवडिलांच्या सुखदुःखांत, भल्याबुऱ्या स्थितींत, हंसण्यारडण्यानं भरलेल्या बिचाऱ्या धूळभेटीच्या रस्त्या, मी तुला पुन्हां पुन्हां नमस्कार करतों. ’

काळोखांतून डोकावून जंगलांत पाहिलं नी म्हणालों, ‘ आई जन्मभूमी, तुझी

हजारों पोरंबाळं अशींच माझ्यासारखीं तुला विसरून गेलीं असतील! तुझ्या सेवेसाठीं—तुझ्या कार्यासाठीं पुन्हां कधीं तुझी भेट होईल कीं काय, तें सांगतां यायचं नाहीं! पण आज असा हा घराबाहेर निघालों असतां या अंधारांतून तुझी दुःखी मूर्ति भरलेल्या डोळ्यांनीं जी अस्पष्ट होऊन जी फुलून उठली, ती या जन्मांत मीं कधींही विसरणार नाहीं!

मी पाहिलं राजलक्ष्मी तशीच स्वस्थ बसली होती, त्या काळोखाच्या कोंपऱ्यांत तिचा चेहरा दिसत नव्हता. पण मला वाटलं, डोळे मिटून ती कसलं तरी चिंतन करीत राहिली असावी. मनांतल्या मनांत मी म्हटलं, 'ठीक चाललंय! आज-पासून आपल्या होडीचं सुकाणूं ज्याअर्थी तिच्या हातीं दिलंय् त्याअर्थी या अनोळखी नदीच्या पात्रांत कुठं भोंवरे आहेत, कुठं रेती आहे, याचा तपास तिची तीच करो!'

या माझ्या आयुष्यांत वेगवेगळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या अवस्थेंत मी स्वतःचं मन पारखीत आलों आहें. मला त्याची जात कळली आहे. कुठलाही अतिरेक या माझ्या मनाला सहन होत नाहीं. अत्यंत सुख, अत्यंत स्वास्थ्य, अत्यंत सुस्थिती याला मुळींच पटत नाहीं. कुणी तरी आपल्यावर फार प्रेम करत आहे असं कळलं, कीं तिथून पळावं, पळावं असं सारखं वाटत रहातं!—अशा या माझ्या मनानं आपल्या हातचं सुकाणू केवढ्या कष्टानं सोडलं असेल, तें हें मन ज्यानं निर्माण केलं त्यालाच एक माहीत!

बाहेरच्या काळ्याकुट्ट आकाशाकडे एकवार डोळे ताणून पाहिलं. आंत डोळ्या-आड झालेल्या निश्चल प्रतिमेकडेही एकवार नजर फिरवली—त्यानंतर हात जोडून मी कुणाला नमस्कार केला तें माझं मलाच कळलं नाहीं. पण मनांतल्या मनांत म्हटलं, 'हिच्या आकर्षणाच्या शक्तीनं माझे प्राण कंठाशीं आणले आहेत!—किती तरी वेळ कुठं कुठं म्हणून पळ काढला—कुठल्याही रस्त्यानं गेलों तरी भुलभुलय्याप्रमाणं पुन्हां वारंवार हिच्याच हातीं पडायचा प्रसंग येतो!—आतां विरोध कशासाठीं करूं?—यापुढं जें कांहीं व्हायचं असेल तें होईल!'

आजवर आयुष्याचा लगाम हातीं ठेवून मी काय मिळवलं? कोणतं सार्थक झालं? गळाभर चिखलांत रुतलं तरी माझ्या या जीवनाला बाहेर खेंचून काढ-ण्याची ताकद ज्या हातांत आहे, त्या हातीं जर मीं अडकून राहिलों, तर दुसऱ्या एका जीवनाला मी केव्हांही दुसऱ्या चिखलांत रुतूं देणार नाहीं.

पण ही झाली माझी स्वतःची पहाण्याची दृष्टी! पण दुसऱ्या बाजूची वागणूक पाहिली तर ती पूर्वीसारखीच सुरू होती. वाटेंत ती एक शब्दसुद्धां बोलली नाहीं, किंवा स्टेशनवर पोंचल्यावर मला कांहीं विचारावं असंही तिला वाटलं नाहीं.

थोड्याच वेळांत कलकत्त्याकडे जाणाऱ्या गाडीची घंटा झाली. पण तिकीट घ्यायचं टाकून, धर्मशाळेंतल्या एका कोंपऱ्यांत रतन माझा बिछाना अंथरूं लागला तेव्हां कुठं मला कल्पना आली, कीं आपण कलकत्त्याच्या बाजूनं जाणार नसून पश्चिमेकडे जाणार आहोंत. पण पश्चिमेला म्हणजे पाटण्याला, कीं काशीला, कीं आणखी दुसऱ्या कुठं हें जरी कांहींच कळत नव्हतं, तरी मला एवढं कळून चुकलं, कीं या बाबतींत माझ्या मताची कुणालाच जरूर नव्हती.

दुसरीकडेच पहात राजलक्ष्मी उगीच उभी राहिली होती. हातचं काम संपवून रतन तिच्या जवळ गेला नी म्हणाला, ' खाण्याचे जिन्नस इथं मिळतात. जरा थोडं पलिकडे जावं लागेल असं मला कुणी सांगितलं. '

पदराची गांठ सोडून राजलक्ष्मीनं कांहीं पैसे त्याच्या हातीं दिले नी म्हटलं, ' बरं बरं! घेऊन ये तर. पण दूध जरा पारखून घे. वासबीस नसेलसं पाहून घे. '

' आणि तुमच्यासाठीं कांहीं ? ' रतननं विचारलं.

' मला कांहीं नको ! ' ती म्हणाली.

हें ' नको ' आम्हां सर्वांना चागलं माहीत होतं,—आणि सर्वांपेक्षा रतनला तर चांगलंच माहीत होतं !—तरीही एक दोन पावलं मागं येऊन तो हळुहळू म्हणाला, ' कालपासून मुळींच कांहीं—'

' तुला ऐकूं येत नाहीं रतन ? ' राजलक्ष्मी म्हणाली, ' बहिरा झाला आहेस ?'

एक शब्दसुद्धां न बोलतां रतन निघून गेला. तिनं एकदां नाहीं म्हटलं कीं तिला विरोध करायची ताकद असलेला माणूस मी अजून पाहिला नव्हता.

आणि जरुरी तरी काय होती ? राजलक्ष्मी स्वतः सांगो वा न सांगो, मला माहीत होतं, कीं आगगाडींत किंवा स्टेशनवर मिळणारं कसलंही खाणं ती केव्हांही खात नसे. निष्कारण कडक उपास करण्याची तिची ताकद दुसऱ्या कुणाच्याच ठिकाणीं मला दिसून आली नव्हती. तिच्यासाठीं तिच्या घरीं कितीतरी जिन्नस येऊन पडत असत, नोकर चाकर खात असत, शेजाऱ्यापाजाऱ्यांना दिले जात असत, कुजून सडूनसुद्धां जात असत, पण जिच्यासाठीं तें सारं होतं, ती कांहींसुद्धां तोंडांत टाकीत नसे. विचारलंच कुणी तर हंसत म्हणे, ' मला कसला

हजारों पोरंबाळं अशींच माझ्यासारखीं तुला विसरून गेलीं असतील! तुझ्या सेवेसाठीं—तुझ्या कार्यासाठीं पुन्हां कधीं तुझी भेट होईल कीं काय, तें सांगतां यायचं नाहीं! पण आज असा हा घराबाहेर निघालों असतां या अंधारांतून तुझी दुःखी मूर्ति भरलेल्या डोळ्यांनीं जी अस्पष्ट होऊन जी फुलून उठली, ती या जन्मांत मीं कधींही विसरणार नाहीं!

मी पाहिलं राजलक्ष्मी तशीच स्वस्थ बसली होती, त्या काळोखाच्या कोंपऱ्यांत तिचा चेहरा दिसत नव्हता. पण मला वाटलं, डोळे मिटून ती कसलं तरी चिंतन करीत राहिली असावी. मनांतल्या मनांत मी म्हटलं, 'ठीक चाललंय! आज-पासून आपल्या होडीचं सुकाणूं ज्याअर्थी तिच्या हातीं दिलंय् त्याअर्थी या अनोळखी नदीच्या पात्रांत कुठं भोंवरे आहेत, कुठं रेती आहे, याचा तपास तिची तीच करो!'

या माझ्या आयुष्यांत वेगवेगळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या अवस्थेंत मी स्वतःचं मन पारखीत आलों आहें. मला त्याची जात कळली आहे. कुठलाही अतिरेक या माझ्या मनाला सहन होत नाहीं. अत्यंत सुख, अत्यंत स्वास्थ्य, अत्यंत सुस्थिती याला मुळींच पटत नाहीं. कुणी तरी आपल्यावर फार प्रेम करत आहे असं कळलं, कीं तिथून पळावं, पळावं असं सारखं वाटत रहातं!—अशा या माझ्या मनानं आपल्या हातचं सुकाणू केवढ्या कष्टानं सोडलं असेल, तें हें मन ज्यानं निर्माण केलं त्यालाच एक माहीत!

बाहेरच्या काळ्याकुट्ट आकाशाकडे एकवार डोळे ताणून पाहिलं. आंत डोळ्या-आड झालेल्या निश्चल प्रतिमेकडेही एकवार नजर फिरवली—त्यानंतर हात जोडून मी कुणाला नमस्कार केला तें माझं मलाच कळलं नाहीं. पण मनांतल्या मनांत म्हटलं, 'हिच्या आकर्षणाच्या शक्तीनं माझे प्राण कंठाशीं आणले आहेत!—किती तरी वेळ कुठं कुठं म्हणून पळ काढला—कुठल्याही रस्त्यानं गेलों तरी भुलभुलय्याप्रमाणं पुन्हां वारंवार हिच्याच हातीं पडायचा प्रसंग येतो!—आतां विरोध कशासाठीं करूं?—यापुढं जें कांहीं व्हायचं असेल तें होईल!'

आजवर आयुष्याचा लगाम हातीं ठेवून मी काय मिळवलं? कोणतं सार्थक झालं? गळाभर चिखलांत रुतलं तरी माझ्या या जीवनाला बाहेर खेंचून काढ-ण्याची ताकद ज्या हातांत आहे, त्या हातीं जर मीं अडकून राहिलों, तर दुसऱ्या एका जीवनाला मी केव्हांही दुसऱ्या चिखलांत रुतूं देणार नाहीं.

पण ही झाली माझी स्वतःची पहाण्याची दृष्टी! पण दुसऱ्या बाजूची वागणूक पाहिली तर ती पूर्वीसारखीच सुरू होती. वाटेंत ती एक शब्दसुद्धां बोलली नाहीं, किंवा स्टेशनवर पोंचल्यावर मला कांहीं विचारावं असंही तिला वाटलं नाहीं.

थोड्याच वेळांत कलकत्त्याकडे जाणाऱ्या गाडीची घंटा झाली. पण तिकीट घ्यायचं टाकून, धर्मशाळेंतल्या एका कोंपऱ्यांत रतन माझा बिछाना अंथरूं लागला तेव्हां कुठं मला कल्पना आली, कीं आपण कलकत्त्याच्या बाजूनं जाणार नसून पश्चिमेकडे जाणार आहोंत. पण पश्चिमेला म्हणजे पाटण्याला, कीं काशीला, कीं आणखी दुसऱ्या कुठं हें जरी कांहींच कळत नव्हतं, तरी मला एवढं कळून चुकलं, कीं या बाबतींत माझ्या मताची कुणालाच जरूर नव्हती.

दुसरीकडेच पहात राजलक्ष्मी उगीच उभी राहिली होती. हातचं काम संपवून रतन तिच्या जवळ गेला नी म्हणाला, ‘ खाण्याचे जिन्नस इथं मिळतात. जरा थोडं पलिकडे जावं लागेल असं मला कुणी सांगितलं. ’

पदराची गांठ सोडून राजलक्ष्मीनं कांहीं पैसे त्याच्या हातीं दिले नी म्हटलं, ‘ बरं बरं ! घेऊन ये तर. पण दूध जरा पारखून घे. वासबीस नसेलसं पाहून घे. ’

‘ आणि तुमच्यासाठीं कांहीं ? ’ रतननं विचारलं.

‘ मला कांहीं नको ! ’ ती म्हणाली.

हें ‘ नको ’ आम्हां सर्वांना चागलं माहीत होतं,—आणि सर्वांपेक्षा रतनला तर चांगलंच माहीत होतं !—तरीही एक दोन पावलं मागं येऊन तो हळुहळू म्हणाला, ‘ कालपासून मुळींच कांहीं—’

‘ तुला ऐकूं येत नाहीं रतन ? ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ बहिरा झाला आहेस ?’

एक शब्दसुद्धां न बोलतां रतन निघून गेला. तिनं एकदां नाहीं म्हटलं कीं तिला विरोध करायची ताकद असलेला माणूस मी अजून पाहिला नव्हता.

आणि जरुरी तरी काय होती ? राजलक्ष्मी स्वतः सांगो वा न सांगो, मला माहीत होतं, कीं आगगाडींत किंवा स्टेशनवर मिळणारं कसलंही खाणं ती केव्हांही खात नसे. निष्कारण कडक उपास करण्याची तिची ताकद दुसऱ्या कुणाच्याच ठिकाणीं मला दिसून आली नव्हती. तिच्यासाठीं तिच्या घरीं कितीतरी जिन्नस येऊन पडत असत, नोकर चाकर खात असत, शेजाऱ्यापाजाऱ्यांना दिले जात असत, कुजून सडूनसुद्धां जात असत, पण जिच्यासाठीं तें सारं होतं, ती कांहींसुद्धां तोंडांत टाकीत नसे. विचारलंच कुणी तर हंसत म्हणे, ‘ मला कसला

आलाय आचार विचार? मला कसलं आलंय् सोवळंओवळं? मीं सारं कांहीं खातें. '

' ठीक! तर माझ्या डोळ्यासमोर याचा पुरावा दे पाहूं? '

'पुरावा? यावेळीं? नाहींरे बुवा, अजून जगायचं आहे मला!' असं म्हणून कांहींना कांहीं तरी काम काढून ती घरांत निघून जात असे.

ती मासमासळी, दूध तूप कांहीं खात नसे हें मला हळुहळू कळलें पण हा वर्जावर्जपणा तिच्या दृष्टीनं इतका अभद्र होता, इतका लज्जास्पद होता, कीं त्याचा नुसता उल्लेख केला तर तिला कुठं जावं आणि कुठं जाऊं नये असं होऊन जाई. म्हणूनच अशा वेळीं तिला आग्रह करणं मला योग्य वाटत नसे.

धमक खाऊन रतन वाकडं तोंड करून निघून गेला, तरीही मी कांहीं बोललों नाहीं. नंतर कांहीं वेळानं गरम दूध नी मिठाई घेऊन रतन आला आणि खुद्द राजलक्ष्मीनंच माझ्यापुरती दूध नी मिठाई ठेवून घेऊन बाकीचे सारे जिन्नस जेव्हां परत केले तेव्हांही मी कांहीं बोललों नाहीं. काकुळतीनं रतन माझ्याकडे पहात होता, त्याचा उद्देश मला कळत होता, तरीही मी उगीच राहिलों.

कारण असो वा नसो, उगीच उपास करणं हें तिच्या आंगवळणी पडून गेलं होतं. पण पूर्वी असं नव्हतं. पूर्वी थट्टेथट्टेनं सुरवात करून रागावण्यापर्यंतही मजल जाऊं देतां येई!—पण जसजसा काल जाऊं लागला, तसतशा या तिच्या खोडीच्या कारणाचा मला अंदाज येऊं लागला. रतन निघून गेल्यावरच या सर्व गोष्टी पुन्हां माझ्या ध्यानीं आल्या.

केव्हांपासून नी कोणत्या उद्देशानं तिनं हें उपास करण्याचा कृच्छ्रव्रत आरंभलं तें मला माहीत नाहीं. त्यावेळीं माझा नी तिचा या जीवनांत संबंध आला नव्हता. भरपूर खाण्यापिण्याच्या वस्तू समोर असतां इच्छापूर्वक दिवसामागून दिवस कुणाला नकळत एकदी सुद्धां तक्रार न करतां ती आत्मसंयमन करीत होती. हें केवढं कठीण व्रत होतं! किती दुःसाध्य होतं! सर्व प्रकारच्या कलुषित परिस्थितीच्या मार्गावर ती न बोलतां पाऊल पुढं टाकीत होती! आतां तिला हें व्रत इतकं स्वाभाविक होऊन बसलं आहे, कीं माझ्या दृष्टीनं सुद्धां आतां त्याला मोठंसं महत्त्व राहिलेलं नाहीं. याचं एवढं महत्त्व काय हें कदाचित् तिलाच माहीत नसेल—तरीही मधून मधून मला वाटतं, हीं सारीं कठोर साधनं अगदींच निष्फळ आहेत काय? अगदींच निरर्थक झालीं आहेत काय?

संयम करण्याचं हें जें शिक्षण, हा जो अभ्यास—या अभ्यासामुळं उत्पन्न

झालेली त्यागाची शक्ती, तिला नकळत या जीवनांत संचित होऊन राहिली नसती, तर एवढ्या सहज, एवढ्या स्वाभाविकपणें सर्व प्रकारच्या भोगांपासून अलिप्त होण्याची ताकद तिच्या अंगीं आली असती का ?

कुठंही कोणत्याही बंधनांत ती गुंतून पडत नव्हती. ती प्रेमी होती. किती लोक प्रेमी आहेत ? पण सर्वस्वाच्या त्यागाच्या आधारावर इतकं निष्पाप, इतकं एकांतिक होऊन रहाणं या संसारांत सुलभ आहे का ?

धर्मशाळेंत आणखी कुणी माणसं नव्हतीं. कुठंतरी आडोशाची जागा शोधून काढून रतनही झोंपी गेला असावा. एका मिणमिणत्या दिव्यासमोर राजलक्ष्मी उगीच बसली आहे असं मला दिसून आलं. जवळ जाऊन मी तिच्या माथ्यावर हात ठेवतांच ती दचकून वर पाहून म्हणाली, ' झोपलां नाहींत तुम्हीं ? '

' नाहीं ! पण या धुळींत उगीच बैठक मारून एकटीच बसण्यापेक्षां तिकडे माझ्या बिछान्यावर बैस चल.' असं म्हणून तिला नाहीं म्हणायला अवसर न देतां मी तिचा हात धरून ओढून आणलं. जवळ आणून बसल्यावर बोलायला कांहीं सुचेना. नुसता हळुहळू तिचा हात कुरवाळीत बसलों.

असाच कांहीं वेळ गेला. माझा संशय चुकीचा नव्हता.—तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्याला हात लावतांच मला कळून चुकलं. हळुहळू तिचे डोळे पुसून तिला जवळ ओढण्याचा मी प्रयत्न केला. प्रयत्न करतांच माझ्या पसरलेल्या पायांवर आंग टाकून तिनं ते जोरानं दाबून धरले–तिला जवळ घेणं त्यामुळं मला साधलं नाहीं.

कांहींच न बोलतां क्षणावर क्षण जात होते. एकदम मी म्हणालों, ' एक गोष्ट तुला सांगितली नाहीं लक्ष्मी. '

' कोणती गोष्ट ? ' ती पडल्या पडल्याच म्हणाली.

बोलतां बोलतां पूर्वसंस्कारामुळं पहिल्यानं मला संकोच वाटला. पण मीं थांबलों नाहीं. मी म्हटलं, ' मी स्वतःला तुझ्या हातीं सोपवलं आहे. या पुढं माझ्या बऱ्यावाईटाचा सारा भार तुझ्यावर आहे.'

त्या मंद प्रकाशांत ती माझ्या चेहऱ्याकडे नुसती पहात राहिली होती असं मला दिसून आलं. हळूच हंसून ती म्हणाली, ' तुम्हांला घेऊन मी काय करूं ? तुम्हांला तबलाही वाजवतां येत नाहीं, कीं सारंगीही वाजवतां येत नाहीं ! शिवाय—'

' शिवाय काय ? ' मी म्हटलं, ' पानाचे विडे करून देणं ? नाहीं तें नाहीं बुवा आपल्याला जमायचं ! '

'पण, तबलासारंगी ?'

'तसं सावरून घेतल्यास जमेलही !' मी म्हटलं आणि स्वतःशींच थोडासा हंसलों.

एकदम उठून राजलक्ष्मी मोठ्या उत्साहानं म्हणाली, 'थट्टा नव्हें, खरं सांगा !'

'प्रयत्न करायला तर हरकत नाहीं !' मी म्हटलं.

'नाहीं !' राजलक्ष्मी म्हणाली. कांहीं वेळ कांहींच न बोलतां आश्चर्यचकित मुद्रेनं डोळ्याचं पातंसुद्धां न हालवतां माझ्या डोळ्याला डोळा देऊन ती हळुहळू बोलूं लागली, 'असं पहा, मधून मधून हेंच माझ्या मनांत येत असे. पण पुन्हां वाटे, कीं जें माणूस हातांत बंदूक घेऊन जनावरं मारीत हिंडण्यांतच आनंद मानतं त्याला काय हें म्हणणं पटणार आहे ? अशा या वातावरणांत अंतरींच्या वेदना अनुभवणं त्याला साध्य आहे का ? शिकार करण्यासारखींच दुसऱ्यांचीं मनं दुखवण्याची देखील त्यांतून मोठी आवड ! हेंच सारं मनांत आणून तुम्हीं सारा त्रास मीं सहन करीत आलें.'

आतां उगीच बसायची पाळी माझी होती. तिनं केलेल्या तक्रारीवर मला उत्तर देतां आलं असतं—अगदीं सफाईनं तिचे मुद्दे खोडून काढतां आले असते. पण मला वाटलं, कशाला हें उगीच ढोंग ? तिचा अनुभव खरा होता.—हार मानल्या-खेरीज गत्यंतर नव्हतं. ती फारशी स्पष्टपणें बोलली नव्हती. पण अंतःकरणांत सांठलेली संगीताची मूर्ती केव्हां मनोव्यथेमुळं जी क्वचित बाहेर फुटून पडत असे त्या करुणरसानं ओथंबलेल्या सदा जागृत असलेल्या चैतन्यामुळंच लक्ष्मीच्या तोंडून हे दोन शब्द सूचक रुपानं बाहेर पडले होते, असं मला वाटलं. तिचा संयम, तिचा त्याग, हृदयाचं पावित्र्य जसं कांहीं माझे डोळे उघडून मला तिचं स्वरूप दाखवीत होतं.

तरीही एक गोष्ट मात्र तिला सांगतां आली नाहीं. सांगत आली असती तर मीं म्हटलं असतं—परस्पर विरुद्ध असलेल्या अशा प्रवृत्ती माणसाच्या ठिकाणीं एकाच वेळीं जवळजवळ कशा राहूं शकतात याचा उलगडा कुणाला होत नाहीं. जीव-हत्या करण्यांत मला कांहींच वाटत नाहीं याचं मलाच जितकं आश्चर्य वाटतं तितकं दुसरं कुठलंच नाहीं. मुंगी चिरडलेली देखील ज्याला पहावत नाहीं, बळी दिलेल्या बोकडाचं रक्त पहातांच ज्याची झोंपसुद्धां उडून जाते, गांवच्या वेशी-वरच्या निराश्रित कुत्र्याप्रमाणें देखील ज्यानं बाळपणीं गुपचूप उपास सहन केले, त्याचं लक्ष जंगलांतले पशू नी झाडांवरचीं पांखरं मारण्यांत कसं वेधून जातं याची

११वा॰ १६५८

मला कल्पनाच करतां येत नाहीं. शिवाय मीच का असा एकटा आहें ज्या राजलक्ष्मीचं अंतःकरण झगझगणाऱ्या दिव्यासारखं आज मी स्वच्छ पहातों आहे तीच एवढीं वर्षं प्यारी बाईजीच्या पेशांत कशी वावरत राहिली ?

हें सारं मनांत आलं खरं, पण तोंडांतून बाहेर निघालं नाहीं. तिला वाईट वाटेल म्हणून नव्हे, पण म्हटलं बोलण्यांत काय अर्थ ? देव कीं दैत्य—कोण कुणास ठाऊक—माणसाच्या खांद्याला खांदा भिडवून हरघडीला जे कुठून कुठं येऊन एकसारखे फिरताहेत, त्याचा उलगडा मला कुठं झालाय ? एका काळीं भोगी असलेला एकदम त्यागी होऊन घराबाहेर कसा निघतो, अत्यंत कठोर निर्दय माणूस एका क्षणांत करुणेनं विरघळून जाऊन कसा चूरमार होतो, हें तरी मला कुठं कळलंय् ? कोणत्या अज्ञात सांदीकोपऱ्यांत माणसाचा आत्मा जें गुप्त तप करीत असतो तें अकस्मात एके दिवशीं सिद्धीच्या रूपांत बाहेर कसं येतं याचा तरी मला कुठं पत्ता आहे ?

त्या मिणमिणत्या प्रकाशांत राजलक्ष्मीच्या तोंडाकडे पहात तिला उद्देशून मनांतल्या मनांत म्हणालों,' दुसऱ्याला त्रास देण्याची माझी शक्तीच जर नुसती तुला दिसली नी दुसऱ्यानं दिलेले क्लेश सहन करण्याची ताकद नाहीं हें कळून सुद्धां स्नेहाच्या बळावर इतके दिवस मला क्षमा करीत आलीस, तर आतां राग-रुसवा धरायला मला आधार काय आहे ? '

' बोलत कां नाहीं ? " राजलक्ष्मी म्हणाली.

' जो सर्वस्वाचा त्याग केलास–' मी म्हटलं,' तो काय या निर्दय व्यक्तीसाठीं ?'

' सर्वस्वाचा त्याग कसला ? ' राजलक्ष्मी म्हणाली, ' स्वतःवरचा ताबा सोडून तुम्ही माझ्या आधीन झालांत !—नाहीं म्हणून दूर लोटणं आतां कठीण गेलंय मला ! '

' हां ! ' मीं म्हटलं, ' संपूर्ण ताबा सोडून दिला. पण तुझी तूंच स्वतःला ओळखत नाहींस, तेव्हां आतां मी तो उल्लेख करीत नाही. '

## २

बंगाली मलेरियानं मी अगदीं अर्धमेला झालों होतों. पश्चिमेंतल्या या शहरांत येण्यापूर्वीच मला हें कळून चुकलं. पाटणा स्टेशनवरून राजलक्ष्मीच्या घरीं मला ज्यावेळीं आणण्यांत आलं, त्यावेळीं मी शुद्धींत नव्हतों. या पुढल्या महिन्यांत

ताप, डॉक्टर नी राजलक्ष्मी यांनीं मला घेरून टाकलं होतं.

ज्यावेळीं माझा ताप निघाला त्यावेळी डॉक्टरनीं घरवालीला बजावून सांगितलं, कीं हें शहर जरी पश्चिमेच्या हद्दींत येतं, हवेच्या दृष्टीनं जरी याची प्रख्याती आहे तरीही रोग्याला इथून हवा पालटण्यासाठीं दुसरीकडे नेणें जरूर आहे.

पुन्हां एकदां बांधासांध सुरू झाली—यावेळीं अवडंबर जरा मोठं होतं. रतन एकटा भेटतांच त्याला विचारलं, ' आतां कुठं जाणार आहोंत आपण रतन ? '

रतन या प्रवासाच्या बाबतींत नाराज होता असं मला दिसून आलं. उघड्या दरवाज्याकडे नजर ठेवून खाणाखुणा करीत खालच्या आवाजांत त्यानं जें कांहीं मला सांगितलं त्यामुळं मीही चींत झालों. रतनच्या सांगण्याचा भावार्थ असा होता. बीरभूम जिल्ह्यांत एक छोटासा गांव आहे. त्याचं नांव गंगामाटी ! हें गांव ज्यावेळीं खरेदी केलं त्यावेळींच काय तो, मुखत्यार किसनलाल बरोबर तो एकदां तिकडे गेला होता. बाई तिकडे केव्हांच गेल्या नाहींत. केव्हां गेल्याच तर लगेच तिथून पळून येतील तिथनं. गांवांत पांढरपेशांचीं घरं बहुधा नाहींतच— आहेत तीं हलक्या लोकांचीं ! – त्यांना शिवतांही येत नाहीं नी त्यांच्याकडून कांहीं कामही करून घेतां येत नाहीं.

अशा हलक्या लोकांच्या वस्तींत जाऊन रहावं असं राजलक्ष्मीला कां वाटलं, याची मला थोडीशी कल्पना आली. मी विचारलं, ' बीरभूमच्या कोणत्या भागांत आहे ही गंगामटी ? '

रतन म्हणाला, ' सांईथिया कीं अशाच कायशा नांवाचं एक स्टेशन आहे. तिथनं दहा बारा कोस बैलगाडींतून जावं लागतं. रस्ता जितका बिकट आहे तितकाच भयंकर आहे. चारी बाजूंला माळच माळ आहेत. हिरवळीची एक पात नाहीं कीं पाण्याचा एक थेंब नाहीं. सारी दगडाळ माती !— कुठं तांबडी आहे, तर कुठं अगदी काळीभोर आहे !—' असं म्हणून थोडा वेळ थांबून माझ्या विशेष लक्षांत यावं अशा उद्देशानं तो म्हणाला, ' बाबू, अशा जागीं माणसं सुखासमाधानानं कशीं रहात असतील हेंच मला कळत नाहीं. इथं असं सोन्यासारखं गांव सोडून तिकडे जाणाऱ्या माणसांना काय म्हणावं ! ''

आंतल्या आंत एक सुस्कारा सोडून उगीच राहिलों. असलं सोन्यासारखं गांव सोडून त्या सहारा वाळवंटांत अनोळखी लोकांच्या प्रांतांत राजलक्ष्मी मला कां घेऊन जात होती तें त्याला सांगतां आलं नसतं, कीं समजावतांही आलं नसतं.

शेवटीं मी म्हटलं, ' माझ्या प्रकृतीसाठींच आपण जातों आहोंत तिकडे रतन. इथं राहिलों तर प्रकृती सुधारणार नाहीं, असं डॉक्टरनींच सांगितलं. '

रतन म्हणाला, ' कोण कधीं काय आजारी पडत नाहीं बाबू! बरं व्हायच्यासाठीं सारे लोक गंगामाटीलाच जातात ! '

मी मनांतल्या मनांत म्हटलं, ' कुठल्या मातींत कोण जातात कोण जाणे ! कदाचित् त्यांचं दुखणं साधं असेल !—साध्या मातींत बरं होणारं असेल ! पण माझं दुखणं कांहीं साधंही नाहीं नी सोपंही नाहीं—म्हणून गंगामाटीला जायचं ! ' रतन सांगत होता, ' बाईच्या खर्चाच्या हिशेबठिशेबाची मीं कधीं फारशी काळजी केली नाहीं. त्या तिकडे घरदार नाहीं, कीं दुसरंहीं कांहीं नाहीं. तिथं एक गुमास्ता आहे. त्याच्याकडे घर बांधण्यासाठीं हजार दोन हजार रुपये पाठवले आहेत. आतां तुम्हींच सांगा बाबू, या वेडेपणाला काय म्हणावं ? आम्हीं चाकर माणसं झालों म्हणून काय आम्हांला माणुसकी नाहीं ? '

तो बराच चिडला होता तें पाहून मीं म्हणालों, ' कशाला जातोस अशा जागीं रतन ? सक्तीनं तर तुला कोण नेत नाहीं तिथं ? '

माझ्या बोलण्याचा रतनवर कांहीं परिणाम झाला नाहीं. तो म्हणाला, ' ती नेतेय् ना ? काय सांगूं बाबू, कसली जादु तिला माहीत आहे !–यमाच्या घरीं जायचं असं तिनं म्हटलं तर एवढ्या माणसांपैकीं एकालासुद्धां नाहीं म्हणायची छाती व्हायची नाहीं ! ' असं म्हणून तो आंबट तोंड करून निघून गेला.

रतनला राग आला होता म्हणून तो चिडून तसं म्हणाला खरा, पण त्याच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य आहे याची जाणीव त्यानं मला करून दिली. तर मग मीच ऐकटा नव्हे !—सर्वांची हीच दशा होते तर ? या जादुचाच विचार मी करूं लागलों. मंत्रतंत्रावर माझा विश्वास होता असं नाहीं. पण यमाच्या घरीं जायचं आहे म्हटलं तरी देखील एका घरभर माणसांपैकीं कुणालासुद्धां नाहीं म्हणायचा धीर होत नाहीं, अशी ही शक्ति तरी कसली ?

हिचा संबंध अगदीं तोडून टाकावा म्हणून मी थोडे का प्रयत्न केले ? भांडून निघालों, बैरागी होऊन पाहलं, देशत्याग करून गेलों—म्हटलं आतां तरी यापुढं हिची भेट नको ! पण माझा प्रत्येक प्रयत्न ती सारखी तांबड्या शाईनं खोडून काढून टाकीत होती. हजार प्रकारें मीं स्वतःच्या दुबळेपणाला दोष दिला पण तिच्यापुढं कांहीं चाललं नाहीं असं पाहून शेवटीं जेव्हां स्वतःला

सर्वस्वीं तिच्या हातीं सोंपवून बसलों तेव्हां आतां रतननं मला हा पत्ता लावून दिला,—' राजलक्ष्मी जादुटोणा जाणते ! '

असं तर खरंच ! रतनला जर छेडलं तर तो सुद्धां म्हणेल, कीं आपला विश्वास नाहीं म्हणून !

तितक्यांत पाह्यलं, एका मोठ्या दगडी वाटींत कांहीं तरी घेऊन घाईघाईनं राजलक्ष्मी त्याच बाजूनं खालीं जायला निघाली होती. तिला हांक मारून मी म्हटलं, ' ऐकलंस का, सारे लोक म्हणतात, तुला जादुटोणा माहीत आहे ! '

' काय माहीत आहे ? ' ती धबकून उभी राहून कपाळाला आंठी घालून म्हणाली.

' जादुटोणा ! ' मी म्हटलं.

' हं माहीत आहे. ' तोंड दाबून हंसत राजलक्ष्मी म्हणाली.

ती जायला निघत होती, तोंच तिची नजर माझ्या सदऱ्याकडे गेली. एकदम चिडून तिनं विचारलं, ' हा कालचा बासा सदराच ना ? '

' हो तोच ! ' मी सदऱ्याकडे पहात म्हटलं, ' पण राहूं दे–चांगला पांढरा आहे ! '

राजलक्ष्मी म्हणाली, ' पांढऱ्याचा प्रश्न नाहीं, स्वच्छ आहे का ? '

थोडीशी हंसून ती म्हणाली, ' बाहेरच्या पांढरेपणाला भाळतांना आयुष्य गेलं तुमचं ! मी थट्टा करीत नाहीं, पण आंतून घाम लागून सदरा घाण झाला आहे हें केव्हां कळणार तुम्हांला ? ' असं म्हणून तिनं रतनला हांक मारली.

कुणीच जबाब दिला नाहीं. घरवाली अशा प्रकारें चिडून हांक मारूं लागली, कीं या घरचीं कुणी माणसं उत्तरच देत नसत. चार पांच मिनिटं कशीतरी वेळ मारून न्यायची असा इथला शिरस्ता होता.

हातांतलं भांडं खालीं ठेवून शेजारच्या खोलींतून एक कोरा सदरा आणून माझ्या हातीं देत राजलक्ष्मी म्हणाली, ' तो तुमचा दिवाणजी रतन आहे ना—त्याला म्हणावं, जादुटोणा करायला शिकला नाहींस तोंपर्यंत रोजचीं कामं स्वतः करीत जा म्हणावं ! ' असं म्हणून दगडी वाटी हातीं घेऊन तीं खालीं निघून गेली.

सदरा बदलून पाहिलं तेव्हां तो खरोखरच मळला होता असं मला दिसून आलं. मळणारच होता!—असंच व्हायचं ! असं व्हायचं नाहीं असंही कांही मी म्हणत नव्हतों. पण माझं लक्ष होतं विचार करण्याकडे ! म्हणूनच या यःकश्चित् सदऱ्याच्या आंतल्या नि बाहेरल्या स्वरूपावरून मला एक प्रकारचा धक्का बसला.

राजलक्ष्मीचं हें स्वच्छतेचं वेड मला केव्हां केव्हां निष्कारण त्रासदायक होत असे.—हा अत्याचार चालला आहे असं मला वाटे! ती बोलली तें सारं कांहीं एका घटकेंत मी विसरून गेलों असंही नाहीं, पण शेवटच्या बोलण्यांत तिनं जो श्लेष केला, तो यापूर्वी माझ्या चांगलासा लक्षांत आला नव्हता.

या अद्भुत व्यक्तीच्या व्यक्त नि अव्यक्त जीवनाचे प्रवाह ज्या ठिकाणीं एकमेकांना प्रतिकूल असे होते, त्याच ठिकाणीं आज माझी नजर वेधली. एके दिवशीं मला वाटत होतं—आश्चर्यपूर्वक वाटत होतं, कीं लहानपणीं राजलक्ष्मीचं ज्याच्यावर प्रेम होतं त्यालाच उन्मत्त यौवनांतील प्यारी बाईजीनं अतृप्त लालसेच्या चिखलांतून एका पाते-लवणीच्या आंत अशा रीतींनं सहज ओढून काढलं. आज मला वाटलं, ती प्यारी नव्हती—तीसुद्धां राजलक्ष्मीच! राजलक्ष्मी नि प्यारी या दोन नांवाच्या आड तिच्या स्त्रीजीवनाचं केवढं मोठं रहस्य लपून राहिलं होतं, तें पाहून सुद्धां मला दिसलं नाहीं. संशयानं मला पुन्हां पुन्हां वाटे, एकीच्यामध्यें दुसरी एवढा काळपर्यंत कशी जगून राहिली? पण माणसाचं हें असं आहे! म्हणूनच माणसाला माणूस म्हणायचं!

प्यारीचा सारा इतिहास मला कळला नव्हता—कळायचीही इच्छा नव्हती. राजलक्ष्मीची कहाणीसुद्धां मला पूर्णपणें माहीत होती असं नाहीं. मला एवढंच कळत होतं, कीं या दोघींच्या मधें आचारविचारांत कोणतीच मिळणी नव्हती—एकता नव्हती—सदोदित दोघीही एकमेकींच्या उलट प्रवाहांत वहात जात होत्या. एकीच्या अंतःकरणरूपी सरोवरांत ज्यावेळीं शुद्ध नि सुंदर असं प्रेमाचं कमल हळुहळू पाकळीन् पाकळी उघडत होतं, त्याचवेळीं दुसरीच्या अमर्याद आयुष्यांतील वादळी वाऱ्यांच्या झपाट्याबरोबर प्रवेशाला वाटसुद्धां राहिली नव्हती. म्हणूनच तर त्यांतली एकसुद्धां पाकळी गळली नाहीं--त्यांतल्या धूळमातीचा एक कण सुद्धां तिला चिकटला नाहीं.

संध्याकाळची थंडी वाढूं लागली, तरीही मीं विचार करीत तिथंच बसलों होतों. मी आपल्याशींच म्हटलं, माणूस म्हणजे कांहीं त्याचा देह नव्हे. प्यारी नाहीं--ती मेली. पण केव्हां तरी त्या देहावर जर क्वचित् कुठं काळा डाग पडला असेल तर तोच तेवढा मोठा धरून कां पाहूं? जी राजलक्ष्मी असामान्य दुःख क्लेशाच्या अग्निदिव्यांतून पार होऊन आज निष्कलंक शुभ्रतेनं समोर उभी राहिली आहे तिला तोंड फिरवून निरोप तरी कां देऊं?

माणसाच्यामधें जो एक ‘ पशू ’ जागा असतो, त्याच्याच हातून हे गुन्हे घडतात. त्यानं केलेल्या दिशाभुलीला अनुसरून माणसाबद्दल विचार करायचा का ? नि जी देवता सारीं दुःखं, साऱ्या यातना, सारे अपमान बिनतक्रार सहन करून आज हंसत्या चेहऱ्यानं समोर येऊन उघडी पडली आहे तिला बसायला कुठं जागा सुद्धां देऊं नये ना ? ही का खरी माणुसकी झाली ? मनाची सगळी शक्ति एकवटून त्यानं एकच उत्तर दिलं. ‘ नाहीं–नाहीं—’

‘ कधींच नाहीं–असं कधींच व्हायचं नाहीं ! ’

फार दिवसांची गोष्ट नव्हे. दुबळा, थकलेला नी खचलेला होऊन स्वतःला एके दिवशीं राजलक्ष्मीच्या हातीं सोपवून बसलों खरा पण त्यावेळच्या त्या पराभवांत एक प्रकारची दीनता होती. पण आज माझं बलवान् मन मला पुन्हां हेंच सांगूं लागलं,—त्या प्यारीला तूं ओळखलं नव्हतं !—ती तशीच राहूं दे बाजूला—पण जी राजलक्ष्मी एके दिवशीं तुझी होती; आज सारं अंतःकरण पिळवटून तिचा स्वीकार कर आणि जिच्यामुळं या जगांत सर्व प्रकारची सार्थकता सदोदित वाहते आहे तिचा शेवटचा परिणाम तिच्याच हातीं सोंपवून निश्चिंत हो !

नवा नोकर दिवा लावायला आला होता त्याला घालवून देऊन काळोखांतच बसलों. मी आपल्याशींच बोलत होतों,—साऱ्या बऱ्या वाईटाचा विचार करून आज राजलक्ष्मीचा मी स्वीकार केला एवढंच मी जाणतों—एवढंच काय तें माझ्या हातीं आहे. पण या पलिकडचं जें कांहीं जिच्या हातीं, तिच्याच हातीं तो सगळा बोजा सोपवून मोकळा झालों.

त्या काळोखांत खाटेच्या बाजूवर डोकं टेकून मी उगीच पडलों होतों.

त्या दिवसाप्रमाणेंच दुसऱ्या दिवशींही तशीच गडबड सुरू होती—नी त्याच्या दुसऱ्या दिवशींही सारा दिवसभर सारखी धांदल सुरू होती. त्या दिवशीं दुपारीं एका मोठ्या पेटींत ताटं, वाट्या, तांबे, भांडीं, ग्लासं, तपेलीं पातेलीं, सारीं कांहीं भरून झालीं. खोलींत बसूनच मी सारं कांहीं पहात होतों.

एकदां खूण करून तिला बोलावलं नी विचारलं, ‘ हें सारं काय चाललंय ? तुला काय फिरून यायचं नाहीं वाटतं ? ’

‘ फिरून कुठं येणार सांगा ना ? ’ राजलक्ष्मी म्हणाली.

हें घर तिनें बंकूला बक्षिसपत्र करून दिलं होतं त्याची मला आठवण झाली. मी म्हटलं, ‘ पण समज, तिकडे फार दिवस रहायचं जर जमलं नाहीं तर ? ’

थोडीशी हंसत राजलक्ष्मी म्हणाली, ' माझी काळजी तुम्हीं करूं नका. तुम्हांला नाहीं जमलं तर निघून या. मी नको म्हणणार नाहीं. '

तो चिमटा मला चांगलाच बसला. मी उगीच राहिलों. मी कुठलाही प्रश्न केला तरी सरळपणें तो ध्यानीं घ्यायचा नाहीं, अशीच तिची वृत्ती होती असं मला पुन्हां पुन्हां दिसून येत होतं. माझं तिच्यावर प्रेम निष्कपट होतं खरं, पण सदोदित तिच्या सहवासांत रहावं असं बंधन बांधून घ्यायला माझ्याही मनाची तयारी नव्हती. एका क्षणांत संशयाचा जोर होऊन अविश्वासाचं स्वरूप इतकं उग्र होऊन उठे, कीं त्या जाळाखालीं दोघांचींही अंतःकरणं सारखींच धगधग रहात. ही अविश्वासाची आग केव्हां निवेल, कशी निवेल, याचा मलाही अंदाज नव्हता.

तिही सारखी याच शोधांत होती. गंगामाटीला गेल्यावर हें कोडें सुटेल, कीं काय अशी कल्पना करीत ती देवावर भरिभार टाकून स्वस्थ राहिली होती.

सारी बांधाबांध करायला आणखी तीनचार दिवस गेले. प्रस्थानाचा मुहूर्त पहायला आणखी एक दोन दिवस गेले. एके दिवशीं सकाळीं या अपरिचित अशा गंगामाटी नामक गांवच्या दिशेनं आम्हीं खरोखरच घराबाहेर निघून पडलों.

प्रवास सुखाचा झाला नव्हता—मनांतच मुळीं समाधान नव्हतं—आणि सर्वांत प्रवास कठीण गेला असेल तर तो रतनला ! गाडीच्या बाहेर एवढं मोठं डोकं काढून तो एका कोंपऱ्यांत चुपचाप बसला होता. स्टेशनावर स्टेशनं गेलीं पण त्यानं कांहीं सुद्धां काम केलं नाहीं.

पण माझं लक्ष मात्र तिसरीकडेच होतं. हें गांव ओळखीचं आहे कीं अनोळखी आहे, चांगलं आहे कीं वाईट आहे, हवेशीर आहे कीं रोगट आहे, इकडे माझं मुळींच लक्ष नव्हतं. मी विचार करीत होतों, हें माझं आयुष्य केव्हांही सुखासमाधानांत गेलं नाहीं, अनेक धोके आले, अनेक भुलचुका झाल्या, अनेक दुःख दैन्य सहन केलं पण तीं सारीं मला परिचित होतीं. या भल्यामोठ्या दिवसांत भांडण मिटवून मी मिळतं घेतलं होतं त्याअर्थी मी कुणालाच दोष देत नाहीं.—मलाही कुणी विशेष दोष द्यायच्या भानगडींत पडणार नाहीं—पण हा जो कुठं मी एका अज्ञात अशा जीवनयात्रेच्या दिशेला पाऊल टाकून निघालों आहें, याचीच शंका मला व्याकुळ करून टाकीत होती.

गाडी जसजसी मुक्कामाला जवळ जवळ जात होती, तसतसा या अज्ञात रहस्याचा माझ्या उरावरचा भार वाढून मी चुरडून जात होतों. मनांत काय

काय म्हणून येत होतं त्याला पारच नव्हता. असं वाटलं, लवकरच भविष्य-काळांत माझ्या सभोंवार एक रांगडं दळ उभारलं जाईल. तें घेतांही येणार नाहीं, कीं टाकतांही येणार नाहीं. त्यावेळीं काय होईल नी काय होणार नाहीं याची कल्पना करतां करतां माझं मन अगदीं गारठून गेलं. मी वळून पाहिलं तेव्हां मला दिसून आलं, कीं खिडकीबाहेर तोंड करून राजलक्ष्मी दोन्हीं डोळे मिटून स्वस्थ बसली होती. एकदम वाटलं, कधींच माझं हिच्यावर प्रेम नव्हतं—तरीही हिच्याच प्रेमांत गुंतून रहाणं भाग आहे--कुठून बाहेर पडायला रस्ताच नाहीं.

इतकी विलक्षण परिस्थिती या जगांत कुणाच्या नशिबीं आली होती का ? एकच दिवसापूर्वी जात्याच्या या दोन दगडांमधून स्वतःचा बचाव करण्यासाठीं हिच्या हातीं आत्मसमर्पण करून बसलों. त्यावेळीं मनांतल्या मनांत मी मोठ्या जोरानं म्हटलं होतं, बऱ्यावाईटासकट तूं जशी आहेस तसा तुझा स्वीकार केला लक्ष्मी—नि आतां माझं सारं मन असं खळाळून बंड करायला कां उठलं ? म्हणूनच वाटतं, या जगांत कांहीं करीन म्हणणं आणि तें प्रत्यक्ष घडून येणं, यामधें केवढी तरी मोठी अडचण असते.

## ३

सांईथिया स्टेशनवर येऊन पोचलों तेव्हां दिवस खालीं गेला होता. राजलक्ष्मीचा गुमास्ता काशीराम स्वतः स्टेशनवर आला नव्हता. तिकडची व्यवस्था करण्यांत तो गुंतला असल्यामुळं त्यानं दोन माणसांबरोबर पत्र पाठवलं होतं.

पत्राचा भावार्थ असा होता:—

'ईश्वरकृपेनें 'इकडे' (म्हणजे तो स्वतः) आणि गंगामाटीची सर्व मंडळी कुशल आहे. हुकूमाप्रमाणें चार गाड्या पाठवल्या आहेत--त्यांतील दोन उघड्या असून दोहोंवर छप्पर आहे. एका गाडींत भरपूर गवत आणि खजुरीच्या चटया अंथरल्या आहेत.—ती गाडी स्वतः मालकिणीकरितां. दुसरींत थोडेंसें गवत आहे पण चटया नाहींत.—ती नोकरांसाठीं आहे. उघड्या दोन गाड्या सामानासाठीं आहेत; तरीही यद्यपि रस्त्यांत अडचण झाल्यास नोकरांना सांगितलें तर ते बाजारांतून आणखी एकादी गाडी ठरवून आणतील. ( आणखी असंही लिहिलं होतं कीं, ) खाणं-पिणं उरकून काळोख पडल्यावर प्रवासाला सुरवात करावी. नाहींतर मालकीण-बाईंच्या झोंपेला अडथळा होईल—नी विशेष सांगायचं म्हणजे असें कीं, रस्त्यांत कोणत्याही प्रकारचा धोका नाहीं. गाडींत सुखानें झोंप घेण्यास हरकत नाहीं !'

पत्र वाचून मालकीणबाई नुसती हंसली. जे आले होते त्यांना रस्त्यांतल्या धोक्याबद्दल वगैरे कांहींसुद्धां न विचारतां ती म्हणाली, " कायरे बाबांनो, इथं जवळपास तळं विहीर कांहीं आहे का ? असलं तर एक बुडी मारून घेईन म्हणतें.'

'आहे तर धनीसाहेब, या इथंच पलिकडे.

'चल तर. दाखीव कुठं आहे तें.' असं म्हणून रतनला बरोबर घेऊन ती निघाली. कुठल्या तरी अनोळखी बावडींत स्नान केलं तर प्रकृतीला अपाय होईल अशी सूचना देणं निरर्थक होतं, म्हणून मी कांहींच बोललों नाहीं. विशेषतः आंघोळ केली तरच तिनं कांहीं खाल्लं असतं. नको म्हटलं असतं तर आंघोळ राहिली असती नि खाणंही राहिलं असतं.

दहाच मिनिटांत ती परत आली. बैलगाडींत सामानसुमान भरलं जात होतं. एकदोन बिछाने खोलून गाडींत अंथरून दिले. ती मला म्हणाली, 'तुम्हीं पण थोडं खाऊन घ्या ना ? सारं कांहीं आणलं आहे बरोबर.

'दे तर !' मी म्हटलं.

झाडाखालीं बैठक टाकण्यांत आली. केळीच्या पानावर ती जिन्नस वाढीत होती. मी नुसता तिच्याकडे पहात होतों. इतक्यांत एक मूर्ति समोर येऊन उभी राहिली नि म्हणाली, 'नारायण !'

भिजलेल्या केंसावर डाव्या हातानं पदर वर ओढून घेऊन राजलक्ष्मीनं वर पाहिलं. पहातांच ती म्हणाली, " यावं यावं ! "

अगदीं सरळ सरळ दिलेलं हें निमंत्रण ऐकतांच मी मागें वळून पाहिलं. एक बैरागी उभा होता. मी आश्चर्यचकित झालों. तो फारसा वयस्क नव्हता—वय फार तर २२-२३ होईल !—जितका नाजूक तितकाच देखणा होता. चेहरा जरा वाळल्यासारखा दिसला. साधारणपणें लंबचवडा पुरुष होता. रंगमात्र बावनकशी सोन्यासारखा ! नाक, डोळे, भुवई, कपाळ सारीं कांहीं अगदीं रेखीव दिसत होतीं. असलं सौंदर्य पुरुषाच्या जातींत क्वचितच आढळून येतं. अंगावरची भगवी कफनी ठिकठिकाणीं फाटलेली होती—गांठी मारलेली होती. वर घेतलेलं भगवं उपरणं देखील तसंच जीर्ण झालेलं होतं—तीच स्थिति पायांतल्या पंजाबी चढावाची ! हरवले तरी कांहीं बिघडलं नसतं.

साष्टांग नमस्कार करून राजलक्ष्मीनं त्याला बसायला आसन दिलं. वर पाहून ती म्हणाली, 'फराळाची व्यवस्था करतेंय तोंपर्यंत हातपाय धुवायला पाणी देऊं का ?'

‘ द्या ना. ’ बैरागी म्हणाला, ‘ पण मी आलों आहें तो त्यासाठीं नव्हे. ’

‘ ठीक आहे. ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ आपण आधीं फराळ करून घ्या. दुसरं कांय असेल तें मग पाहूं. घरीं जायला तिकीट हवंय् का ? आणून देतें हवं तर ! ’ असं म्हणून मुद्रेवर येणारं हंसूं लपवण्यासाठीं तिनं तोंड फिरवलं.

‘ नको ! ’ बैरागी गंभीरपणें म्हणाला, ‘ त्याची कांहीं जरुरी नाहीं. आपण गंगामाटीला जाणार आहांत असं कळलं. माझ्याबरोबर एक मोठी पेटी आहे. ती आपल्या गाडींत घ्याल तर बरं होईल. मींही त्याच बाजूला जातोंय् ! ’

‘ एवढंच ना ? ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ नी आपण स्वतः ? ’

‘ मीं चालत येईन, ’ बैरागी म्हणाला, ‘ फार दूर नाहीं. फार तर पांच-सहा कोस आहे. ’

विशेष कांहीं न बोलतां रतनला हांक मारून राजलक्ष्मीनं बुवाजींना पाणी द्यायला सांगितलं नि स्वतः बुवाजींच्या फराळाची व्यवस्था करायला लागली.

या कामीं राजलक्ष्मी मोठी वाकबगार होती. दुसऱ्या कुणाला हें काम तिच्या सारखं साधत नसे.

बुवाजी जेवायला बसले. मींही बसलों. खाण्याच्या जिनसांची हंडी बाजूला घेऊन राजलक्ष्मी बसली होती.

एक दोन मिनिटांनीं राजलक्ष्मीनं विचारलं, ‘ बुवाजी, आपलं नांव ? ’

‘ वज्रानंद. ’ बुवा खात खात म्हणाला.

‘ अरे बाप रे ! ’ राजलक्ष्मी उद्गारली, ‘ नी दुसरं नांव ? ’

मीं पहात होतों, हंसूं आवरतांना राजलक्ष्मीचा चेहरा फुलून उठला होता—पण ती हंसली नाहीं. मीं मुकाट्यानं जेवीत होतों. बुवाजी म्हणाले, ‘ आतां पूर्वीच्या नांवाचा कांहीं संबंध राहिला नाहीं—माझाही नाहीं नी दुसऱ्या कुणाचाही नाहीं. !

‘ तें खरं आहे ! ’ होकार देत राजलक्ष्मी म्हणाली. पण थोड्या वेळानं तिनं पुन्हां प्रश्न केला, ‘ बरं बुवाजी, घरांतून पळून आल्याला किती दिवस झाले ? ’

प्रश्न फार अभद्र होता. मी पाहिलं, राजलक्ष्मी हंसत नव्हती खरी—पण प्यारीचा जो चेहरा मीं विसरलों होतों, तोच यावेळीं राजलक्ष्मीकडे पहातांच चट्दिशीं माझ्या नजरेसमोर उभा राहिला.

पूर्वीच्या काळची ती रसिकता तिच्या नजरेंत नि आवाजांत पुन्हा जिवंत झाली

होती. एक घास गिळून बुवाजी म्हणाला, ' या असल्या चौकशीची कांहीं जरुरी नाहीं. '

राजलक्ष्मी थोडीच हटणार होती! सभ्यपणाचं अवसान आणून मान हालवीत ती म्हणाली, ' तें खरं आहे. पण एका माणसाला या असल्या प्रकारासुळे भारी त्रास सोसावा लागला होता—' असं म्हणून माझ्याकडे नजर फेंकून ती म्हणाली, ' सांगा ना—ती तुमची उंटं, तट्टू नी घोड्याची गोष्ट सांगा ना या बुवाजींना! एकदां ऐकवा ना? अरे, अरे, च्य् च्य्! घरीं कुणी आठवण केली वाटतं! '

हंसतां हंसतां बुवाजींना एकदम ठसका लागला होता.

अजूनपर्यंत तो माझ्याशीं एक शब्दसुद्धां बोलला नव्हता. मालकाआड नोकरा-सारखा मीं त्याच्या दृष्टीआड झालों होतों. ठसका आवरून शक्य तितका गंभीर-पणाचा आव आणून बुवाजीनं मला विचारलं, ' आपण केव्हां तरी एकदां बैरागी झालां होतां वाटतं ? '

माझ्या तोंडांत पुरी होती—बोलायची सोय नव्हती—डाव्या हाताचीं चार बोटं दाखवून मी मानेच्या खुणेनं सांगितलं, ' ऊंहुं, ऊंहुं! एकदां नव्हे, एकदां नव्हे--'

बुवाजीला आतां आपला गंभीरपणा सांवरतां येईना. तो हंसूं लागला—राज-लक्ष्मी हंसूं लागली--दोघंहीं एकदम हंसूं लागलीं! हंसणं थांबल्यावर बुवाजी म्हणाले, ' मग परतलां कां ? '

पुरीचा घांस अजून घशाखालीं उतरला नव्हता, म्हणून मी राजलक्ष्मीकडे नुसतं बोट दाखवलं.

' होय तर काय! ' राजलक्ष्मी तणतणत म्हणाली, ' हो--माझ्यासाठींच फिरलां जसे कांहीं!--हें खरं नाहीं हो!—फार आजारी पडले म्हणून परत आले, हें खरं—पण आणखी तीन वेळ केव्हां ? '

' साधारण त्याच सुमाराला, ' मी म्हटलं, ' डास चावूं लागले या कारा-डीला-तं कठीण गेलं. बरं,—'

' मला आपण वज्रानंद म्हणा. ' बैरागी हंसून म्हणाला, ' आपलं नांव ?—'

मी बोलण्यापूर्वीच राजलक्ष्मीनं उत्तर दिलं. ती म्हणाली, ' नांव कशाला हवं ? वयाकडे पहा ना त्यांच्या! दादा म्हणत जा त्यांना, नि मलाही वहिनी म्हणत जा-समजलं का ? चांगली पांचसहा वर्षांनं वडील असेन मी तुमच्यापेक्षां! '

बुवाजीचा चेहरा गोरामोरा झाला. हें कांहींतरी भलतंच सुरू झालं होतं. मला आश्चर्य वाटलं !—अरे ही तर प्यारी ! तीच निर्मल, निर्विकार, स्नेहमयी नी आनंदी तरुणी.—स्मशानांत जायला मी निघालों होतों त्यावेळीं जाऊं नको म्हणणारी—जहागिरदारांच्या संपर्कात मी राहूं नये म्हणणारी—तीच ही ! हा बिचारा कुणी पोऱ्या मायेच्या माणसांना टाकून आला असावा असं वाटून राजलक्ष्मीचं अंतःकरण त्याच्याकडे ओढलं गेलं होतं. कांहींना कांहीं करून याला परत घरीं पाठवावं असं तिच्या मनांत आलं असावं.

बिचारा बुवाजी शरमला होता. जरा अवसान आणून म्हणाला, ‘ असं पहा, दादा म्हणायला माझी कांहीं हरकत नाहीं. पण बुवाबैराग्यांच्या तोंडीं तो दुसरा शब्द येणं इष्ट नाहीं. ’

राजलक्ष्मी एवढीसुद्धां हटली नाहीं. ती म्हणाली, ‘ नाहीं कां ? दादाच्या बायकोला बुवाबैरागी मावशीही म्हणत नाहींत, कीं आत्याही म्हणत नाहींत. मग मला आतां दुसरं काय म्हणणार तें सांगा ना ? ’

बिचाऱ्याचा नाइलाज झाला. तो अगदीं शरमिंदा झाला होता तरीही हंसून म्हणाला, ‘ ठीक आहे ! पांचसात घंटे तुमच्याबरोबर आहें तोंपर्यंत जरूर पडली तर तशीच हांक मारीन. ’

‘ मग आतां मारा ना एक हांक ! ’ राजलक्ष्मी म्हणाली.

‘ जरूर पडली तर हांक मारीन. ’ बुवाजी हंसून म्हणाला, ‘ उगीच कशाला हांक मारूं ? ’

त्याच्या पानांत चार संदेश नी थोडी बर्फी वाढीत राजलक्ष्मी म्हणाली, ‘ ठीक ! तेव्हांच हांक मारा तर ! पण मला जरूर लागेल तेव्हां तुम्हांला कोणत्या नांवानं हांक मारूं याची मला पंचाईत पडलीय्—’ माझ्याकडे पाहून ती म्हणाली, ‘ यांना बुवामहाराज म्हणत होतें. पण आतां कांहीं तसं म्हणतां येत नाहीं ! चिडतील ना हे ? आतां तुम्हांला मीं बुवाभावोजी म्हणेन—कसं ? ’

‘ ठीक ! होऊन जाऊं दे तसंच ! हं ! ’ बुवाजी मोठ्या गंभीरपणें म्हणाला. वाद घालीत बसायची त्याची तयारी नव्हती.

बाकी कांहीं असो, खाण्याच्या बाबतींत बुवाजी मोठा दर्दी माणूस दिसला. पश्चिमेकडच्या मिठाईची त्यानं योग्य कदर केली. कोणत्याच पदार्थाचा एवढासुद्धां अनादर केला नाहीं. एकजण मोठ्या आग्रहानं

पुन्हां पुन्हां एका मागून एक जिन्नस वाढीत होती नी एक शब्द सुद्धां न बोलतां तो बिनतकार ते जिन्नस घशाखालीं लोटीत होता. मला जरा काळजीच वाटली. या बुवाची पूर्वीची हकीकत कांहीं असो, पण अलिकडे तरी गोडधोड खाणं भरपूर प्रमाणांत बिचाऱ्याला कधीं मिळालेलं नसावं, कित्येक दिवसांची भूक झपाट्यासरशीं दूर करणं कांहीं सोपं नव्हे—पण पहाणाराला मात्र तें मोठं विलक्षण वाटतं. राजलक्ष्मीनं आणखी थोडे पेढे नी बर्फी बुवाजीच्या पानांत वाढले, तें पाहून नकळत माझ्या नाकातोंडांतून एक भला मोठा सुस्कारा बाहेर पडला. राजलक्ष्मी नी तिचा नवा दोस्त दोघंही दचकून पाहूं लागलीं. माझ्याकडे पाहून राजलक्ष्मी एकदम म्हणाली, ‘ तुम्हीं आजारी माणूस!—आतां उठून आचवा पाहूं ! माझ्यासाठीं पानावर बसून रहायला नको कांहीं. ’

बुवानं एक वेळ माझ्याकडे पाहिलं—पुन्हां राजलक्ष्मीकडे पाहिलं—नी मग तिच्या समोरच्या हंडीकडे पहात तो हंसत हंसत म्हणाला ? ‘ वाईट वाटायचंच ! पण आतां त्यांत कांहीं राहिलं नाहीं ? ’

‘ खूप आहे आणखी ! ’ राजलक्ष्मी म्हणाली नी माझ्याकडे रागारागानं पाहूं लागली.

तितक्यांत रतन येऊन हळूच मागं उभा राहून म्हणाला, ‘ पोहे मिळताहेत हवे तितके. पण दूध दहीं कांहीं मिळत नाहीं. ’

बिचारा बुवाजी आणखी शरमिंदा होऊन म्हणाला, ‘ आपल्या आदरातिथ्याचा मी गैरफायदा घेतला ! असं म्हणून तो उठूं लागला असं पहातांच काकुळतीला येऊन राजलक्ष्मी म्हणाली, ‘ माझी शपथ आहे भावजी उठाल तर ! सारी हंडी ओतून फेकून देईन ! ’

बुवाजीला मोठं कोडं पडलं. एवढ्या थोड्या वेळांत ही बाई एवढी आपुलकी कां दाखवते याचा त्याला प्रश्न पडला. राजलक्ष्मीच्या प्यारीची हकिकत माहीत नसलेल्या माणसाला या प्रकाराबद्दल केव्हांही आश्चर्यच वाटलं असतं.

थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ‘ आम्ही गोसावी बैरागी लोक ! खायच्या बाबतींत माघार घेणार नाहीं. पण आपल्यासाठीं कांहीं शिल्लक ठेवलं पाहिजे ना ? ’

‘ मी हें असलं कांहीं खात नाहीं ! ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ हें मला मानवत नाहीं. नोकरांसाठीं तिकडे भरपूर आहे. एवढी रात्रीची बाबत—मूठभर पोहे खाऊन पाणी प्यालें कीं बस्स होईल मला ! पण भूक असतांना तुम्ही जर पाना-

वरून उठलांत तर ते पोहेसुद्धां माझ्या घशाखालीं जायचे नाहींत भावजी ! खोटं वाटत असलं तर त्यांना विचारा ! ' असं म्हणून तिनं माझ्याकडे पाहिलं.

इतक्या वेळानंतर अर्थातच मला तोंड उघडावं लागलं. मी म्हटलं, ' ही सांगते आहे तें अक्षरन् अक्षर खरं आहे हें मी शपथेवर सांगेन! बुवाजी, उगीच बोलाबोली करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आतांपर्यंत जसं चाललं होतं तसंच हुंडी उपडी होईपर्यंत चालूं द्या ! नाहींतर मोठा कठीण प्रसंग येईल! त्यांतलं कांहीं तिला चालायचं नाहीं. हे आगगाडींतून आणलेले जिन्नस—उपाशीं मरायला टेकली तरी सुद्धां ही त्यांतलं एक चिमुटभर सुद्धां खायची नाहीं; सांगून ठेवतों. '

बुवाजी म्हणाला, ' पण हें निर्लेप आहे ! आगगाडींत बाटत नाहीं हें ! '

मी म्हटलं, 'बाबारे, हेंच हिच्या डोक्यांत भरवायाचा मी केव्हांचा प्रयत्न करतों आहें, पण तें कांहीं मला जमलं नाहीं कधीं—तिथं तुझा काय पाड बाबा ? त्यापेक्षां आपल्या मुकाट्यानं खायला लाग ! नाहीं तर सूर्य मावळल्यावर ते पोहेसुद्धां तिच्या मुखीं लागायचे नाहींत! चार घंटे तूं आहेसच ना आमच्या बरोबर? काय 'शास्त्राच्या मर्यादा तुला सांगायच्या असतील त्या तेव्हां सांग ! इथं कांहीं त्याचा उपयोग व्हायचा नाहीं अन् त्यांत कांहीं बिघडायचंही नाहीं ! हें असंच चालायचं !'

' म्हणतां काय ? ' बुवा म्हणाला,' सहा दिवसांत यांनीं कांहीं खाल्लं नाहीं ?'

' नाहीं ! ' मीं म्हटलं, ' शिवाय काल देखील कसली काय पर्वणी होती वाटतं ! कालसुद्धां एक दोन फळांशिवाय तोंडांत कांहीं घातलं नव्हतं तिनं ! '

रतन मागंच उभा होता—तोंड पुढं करून बोलायला येत होता. तोंच धनिणीनं डोळ्यांचा इषारा करतांच तिथल्या तिथंच थांबला.

राजलक्ष्मीला उद्देशून बुवा म्हणाला, ' आपल्याला त्रास होत नाहीं याचा ?'

ती नुसती हंसली. पण मी म्हणालों, ' तें कळायला प्रत्यक्ष किंवा अनुमान हीं दोन्हींही उपयोगी नाहींत. जें डोळ्यांनीं दिसतं, तें सांगितलं. मला वाटतं आणखी एकादा दुसरा दिवस हें असंच चालूं शकेल !—'

' डोळ्यानं दिसतं म्हणे ! ' राजलक्ष्मी मधेंच म्हणाली, ' ऐका तर खरं ! '

यावर मी कांहींच जबाब दिला नाहीं—बुवाजीनंही कांहीं विचारलं नाहीं. काळवेळाकडे लक्ष देऊन भोजन उरकून तो पानावरून उठला.

रतन नी बरोबरचीं दोन माणसं यांचं खाणं होईपर्यंत आणखी कांहीं वेळ गेला. राजलक्ष्मीनं स्वतःच्या खाण्याची काय व्यवस्था केली तें तिचं तिलाच माहीत !

गंगामाटीला जायला आम्हीं निघालों त्यावेळीं अंधार पडूं लागला होता. त्रयोदशीचा चंद्र त्यावेळपर्यंत चांगलासा झळकत नव्हता, तरीही काळोखही फारसा दाट नव्हता. सामानाच्या गाड्या सर्वांत मागं होत्या. राजलक्ष्मीची गाडी मधें होती नि माझी गाडी सर्वांच्या पुढं होती.

बुवाजीला हांक मारून मी म्हटलं, 'भैय्या, तुझ्या पायांत ताकद आहे हें मला कबूल आहे. पण आजच्यापुरतं जरा या आमच्या गाडींत आसन ठोक ना?'

बुवाजी म्हणाला, 'बरोबरच चालतों आहें—दमलों कीं बसेन गाडींत. पण आधीं थोडं चालून घेतों?' गाडींतून तोंड बाहेर काढून राजलक्ष्मी म्हणाली, 'मग माझे बॉडीगार्ड व्हा भावजी. जातां जातां जरा गप्पा गोष्टीही करूं.' असं म्हणून तिनं बुवाजीला आपल्या गाडीजवळ बोलावून घेतलं.

समोरच मी होतों. मधें गाडी, बैल, गाडीवाला या सर्वांच्या गडबडींतून त्यांच्या भाषणाचा कांहीं कांहीं भाग जरी मला ऐकूं आला नाहीं तरी बराचसा भाग मला ऐकूं येत होता.

राजलक्ष्मी म्हणाली, 'तुम्हीं कांहीं इकडचे नव्हे! तुम्हीं बोलल्याबरोबर मला कळून चुकलं, कीं तुम्हीं आमच्या तिकडचे. पण आतां खरं सांगा, कुठं चाललांत?'

'गोपाळपूरला!' बुवा म्हणाला.

'आमच्या गंगामाटीपासून किती दूर आहे हें गांव?' राजलक्ष्मीनं विचारलं.

बुवाजी म्हणाला, 'तुमची गंगामाटी मला माहीत नाहीं नि गोपाळपूरही माहीत नाहीं. पण मला वाटतं, दोन्हीं कुठं तरी जवळपास असावीं. निदान मी असं ऐकलं आहे.'

'मग या एवढ्या रात्रीं तुम्हीं तुमचं मुकाम कसं ओळखणार? जिथं तुम्हांला जायचं आहे त्यांचं घर कसं शोधून काढणार?'

बुवाजी हंसून म्हणाला, 'गांव ओळखणं कठीण नाहीं. रस्त्यावरच एक कोरडा तलाव आहे. त्याच्या उजव्या बाजूनं कोसभर गेलं कीं, माझा गांव सांपडेल! नी घर शोधायची काळजीच नाहीं मला! कारण तिथं कुणीच नाहीं माझ्या ओळखीचं! कुठंतरी झाडाखालीं मुकाम ठोकीन झालं.'

'या असल्या रात्रीच्या थंडींत झाडाखालीं?' राजलक्ष्मी कळवळून म्हणाली, 'आणि ही एवढी नुसती घोंगडी घेऊन? हें असलं कांहीं चालायचं नाहीं बरं भावजी!' तिचं तें भाषण मला सुद्धां जाणवलं. बुवाजी क्षणभर उगीच राहिला.

नंतर हळूच म्हणाला, 'आम्हांला कसलं आलं आहे घरदार! आम्हीं झाडा-खालींच रहातों ताई!'

यावेळीं राजलक्ष्मीही क्षणभर उगीच राहिली आणि नंतर म्हणाली, 'ताईच्या डोळ्यांसमोर हें असलं कांहीं चालायचं नाहीं. उभ्या रात्रीं भावाला जर असा वाऱ्यावर सोडून दिला तर मग ताई कसली? आज माझ्याबरोबर चला, उद्यां तुम्हांला योग्य बरदास्त करून पाठवणी करून देईन.' बुवाजी उगीच राहिला. राजलक्ष्मीनं रतनला बोलावून सांगितलं कीं गाडीतलं सामान तिच्या हुकमाशिवाय कुणी काढून द्यायचं नाहीं—अर्थात् बुवाजींची पेटी रात्रीपुरती तरी अडकून पडली.

'मग उगीच थंडींत कां कांकडतां भाई?' मीं म्हटलं 'या ना माझ्या गाडींत.'

'सध्यां राहूं देत—' बुवाजी क्षणभर विचार करून म्हणाला, 'ताईबरोबर थोडा गप्पा मारीत मारीत चालतों.'

होऊन जाऊं द्या म्हटलं! नवीनच ओळख झालीय् ती दृढ करण्याच्या बाबतींत बुवाजीचं मन मागं पुढं होत होतं हें माझ्या ध्यानीं आलं.

शेवटीं एकदांचा तो कबूल झाला. त्यावेळीं पुन्हां पुन्हां मला वाटलं कीं त्याला सांगावं, 'बाबारे, गेला असतास तर बरं झालं असतं! शेवटीं माझ्या-सारखं नको व्हायला!'

पण शेवटीं मीं कांहीं बोललों नाहीं.

दोघंहीं सारखीं बोलत होतीं. बैलगाडीच्या खडखडाटामुळं नि मधून मधून डोळ्यांवर येणाऱ्या झांपडीमुळं त्यांच्या भाषणांतलं सूत्र तुटत होतं खरं—तरीही कल्पनेनं मधली खूट भरून काढून मीही स्वतःची करमणूक करून घेत होतों.

मला वाटलं, मधें मला झांपड आली होती.—तितक्यांत एक प्रश्न माझ्या कानीं आला, 'बरं आनंद, तुमच्या त्या पेटींत काय आहे?'

उत्तर आलं, 'कांहीं पुस्तकं आहेत नी कांहीं औषधं आहेत ताई?'

'औषधं कशाला? तुम्हीं काय डॉक्टर आहांत?'

'मीं संन्यासी आहें. आपल्या त्या बाजूला कॉलरा सुरू झाला आहे तें कळलं आहे का तुम्हांला?'

'छे, नाहीं. आमच्या दिवाणजीनीं तसं कांहीं कळवलं नाहीं. बरं भावजी, तुम्हीं कॉलरा बरा करतां?'

बुवाजी क्षणभर उगीच राहिला नि म्हणाला, 'औषध देणं आपल्या हातीं

आहे—बरं करणं कांहीं आमच्या हातीं नाहीं ताई. पण तें देखील कुणी तरी केलंच पाहिजे ना ? तिकडलाच हुकूम आहे ना तो ? '

' संन्यासी बैरागी औषध देतात खरे, ' राजलक्ष्मी म्हणाली, ' पण औषध देण्यासाठीं कांहीं संन्यास घ्यायला नको. बरं—आतां मला असं सांगा आनंद, एवढ्याचसाठीं का तुम्हीं संन्यास घेतलात ? '

' तें माझं मलाच ठाऊक नाहीं ताई ! ' बुवाजी म्हणाला, ' देशाची सेवा करावी हें आम्हां लोकांचं व्रत आहे. '

' आम्हां लोकांचं ? म्हणजे तुम्हां लोकांचा एकादा संघ आहे वाटतं भाऊजी ? '

बुवाजीनं कांहींच उत्तर दिलं नाहीं. राजलक्ष्मीनं पुन्हां विचारलं, ' पण सेवा करण्यासाठीं कांहीं संन्यास घ्यायला नको ! ही अक्कल कुणी शिकवली तुम्हांला ? सांगा तर खरं ? '

बुवाजीनं याही प्रश्नाचं उत्तर दिलं नसावं—कारण कांहीं वेळपर्यंत कुणाचंच भाषण मला ऐकूं आलं नाहीं.

आठदहा मिनिटांनीं बुवाजीचा आवाज ऐकूं येऊं आला, ' असं पहा ताई, मी कसला संन्यासी ? असलं मोठं नांव नाहीं घेतलं तरी चालेल ! स्वतःचा भार फेकून देऊन परक्याचा बोजा मी डोक्यावर घेतला आहे एवढंच ! '

राजलक्ष्मी कांहीं बोलली नाहीं. बुवाजी बोलत होता, ' मला पुन्हां घरीं पाठवून द्यावं असा पहिल्यापासूनच तुमचा रोख दिसतो आहे. कां तें मला कळत नाहीं. कदाचित् हाच ताईपणा असेल ! पण ज्या लोकांसाठीं मी घर सोडून बाहेर पडलों आहें, ते लोक किती दुबळे आहेत, कसे रोगानं पछाडलेले आहेत, कसे निराश्रित आहेत, नि त्यांची संख्या केवढी मोठी आहे याची थोडीशी जरी कल्पना कराल तर मला पुन्हां घरीं पाठवून द्यावं असं तुम्हांला वाटायचं नाहीं ! '

राजलक्ष्मीनं याचंही उत्तर दिलं नाहीं. पण मला वाटलं जो विषय निघाला होता, त्या बाबतींत त्या दोघांचंही मत जुळायला फारसा विलंब लागणार नाहीं. बुवाजीनं अगदीं मर्मावर आघात केला होता. देशाची सध्यांची परिस्थिती, देशांतील लोकांचं सुख, त्यांचं दुःख, त्यांच्या गरजा मला स्वतःला देखील कळत नव्हत्या असं नाहीं—पण हा संन्यासी कुणीही असो, एवढ्या अल्पवयांत त्यानं या दीनदुबळ्या लोकांशीं काळीज मोठं करून जें नातं जोडलं होतं, जी आपुलकी उत्पन्न केली होती, तसं कांहीं मला साधलं नव्हतं.

ऐकतां ऐकतां डोळ्यावर आलेल्या झोपेचं पाणी होऊन डोळ्यांवाटे वाहू लागलं. अंतःकरणांतून रागाची लहर उठली. मनाला मोठं लागलं. कांहीं तरी घोर अपराध आपल्या हातून घडतो आहे असं वाटलं.

गाडीच्या कोपऱ्यांत काळोखांत राजलक्ष्मी बसली होती, तिनं नंतर एकसुद्धां प्रश्न केला नाहीं—बोलण्यांत एवढाही भाग घेतला नाहीं. तिच्या या मौना-बद्दल बुवाजीला काय वाटलं तें त्याचं त्यालाच ठाऊक! पण मला मात्र तिच्या अंतरंगांतला भाव पुरेपूर कळून आला.

देशांतले चौदा आणे स्त्री-पुरुष जिथं राहतात, त्या खेड्यांची कुळकथा बुवाजी सांगत होता. तोच त्याचा देश! त्या देशांत पाणी नाहीं, जीव नाहीं, सुखसमाधान नाहीं. वाढलेल्या जंगलामुळं जिथला प्रकाश बंद झालेला, हवा कोंडलेली, वाट अडलेली, जिथं ज्ञान नाहीं, विद्या नाहीं, धर्म जिथं विकृत झालेला—वाट चुकलेल्या—मरायला टेकलेल्या या जन्मभूमीच्या दुःखाची कुळकथा छापलेल्या अक्षरानं मीं वाचली होती खरी, स्वतःच्या डोळ्यानं पाहि-लीही होती, पण ही उणीव केवढी प्रचंड होती याची पूर्ण कल्पना यापूर्वी मला जाणवली नव्हती. हें दैन्य किती भयंकर लाजिरवाणं होतं याची खरी जाणीव यापूर्वी जशी कांहीं मला झालीच नव्हती.

भयाण, भकास माळावरून आम्हीं चाललों होतों. रस्त्यावरची धूळ दवांच्या बिंदूंनीं ओसंडून जड झाली होती. गाडीच्या चाकाच्या आवाजामागून बैलांच्या टापांचा शब्द थोडाफार ऐकूं येत होता. आकाशांतलं चांदणं फिक्कट होत दूर अंतरावर पसरलं जात होतं. निस्तब्ध रात्रींच्या थंडींतून कुठल्यातरी अनोळखी दिशेला आम्हीं हळुहळू सारखे चाललों होतों.

नोकर लोकांतले कोण जागे होते नि कोण नव्हते तें कांहीं कळलं नाहीं. पण सारे घोंगड्या पांघरून स्वस्थ राहिले होते. तेवढा बुवाजीच काय तो बरोबर चालत होता आणि देशांतल्या अज्ञात भाऊबहिणींच्या दुःख क्लेशाचा इतिहास ठिणग्याठिणग्यांनीं जळजळत त्याच्या तोंडून बाहेर निघत असतांना ती अफाट शांतता भंग पावत होती.

ही आमची सुवर्णभूमी हळुहळू कशी सुकून गेली, कशी आटून गेली, कोणत्या मार्गानं देशाची सारी संपत्ती विदेशी लोकांच्या हातीं सांपडून हळूहळू परदेशांत कशी गेली, मातृभूमीच्या साऱ्या मेद—मज्जा—रक्ताचं परदेशीयांनीं कसं शोषण केलं,

यांचा सारा झगझगीत इतिहास तो बुवाजी आमच्या डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभा करीत होता.

राजलक्ष्मीला उद्देशून तो मधेंच म्हणाला, ' ताई मला वाटतं मी तुला ओळखलं आहे. असं वाटतं, माझ्या देशांतल्या या दुःखी भाऊबहिणींची परिस्थिति तुमच्या सारख्यांना एकदां दाखवून दिली पाहिजे !

पहिल्यानं राजलक्ष्मीच्या तोंडून शब्द निघेना पण नंतर सद्‌गदित कंठानं ती म्हणाली, " हें भाग्य माझ्या नशिबीं आहे का आनन्द ? मीं एक बायको माणूस आहें ! पहिल्यानं कोण हें विसरेल ? '

' असं कां म्हणतेस ताई ? ' बुवाजी म्हणाला, " हें सारं तुम्हाला दाखवून द्यायचे श्रम घ्यायचे कशासाठीं ? बायको माणूस म्हणून जर हिशेबांत घ्यायचं नाहीं तर मग हें तुम्हांला दाखवायचं तरी कशाला ? '

# ४

' गंगामाटी काय तुमचं जमीदारीचं गांव आहे ? ' बुवाजीनं विचारलं.

' कळलं ना भाई,' राजलक्ष्मी हंसून म्हणाली,' एक बडी जमिदार आहें मी !'

आतां बुवाजीलाही हंसू आवरतां आलं नाहीं. तो म्हणाला, ' बडी जमीदारी म्हणजे मोठंसं भूषण नसतं ताई ! '

त्याच्या भाषणावरून त्याच्या सांपत्तिक परिस्थितिसंबंधीं मला एक प्रकारें शंका आली पण राजलक्ष्मीचं तिकडे लक्ष नव्हतं. तिनं सरळ सरळ कबुली दिली. ती म्हणाली, ' तें खरं आहे आनंद ! हें सारं जेवढं दूर होईल तेवढं बरं ! '

' बरं ताई ! यांची प्रकृति बरी झाली म्हणजे तुम्हीं पुन्हां शहरांत जाणार वाटतं ? '

' शहरांत जाणार ? फार लांबची गोष्ट आहे ती बाबा ! '

' शक्य असलं तर परत जाऊं नका ताई ! ' बुवाजी म्हणाला, ' या साऱ्या अभागी दरिद्री लोकांना टाकून आम्ही शहरांत जातों आहोंत म्हणूनच त्यांची दुःखं चौपट वाढताहेत ! पूर्वी जेव्हां आपण इथं रहात होतों तेव्हांसुद्धां यांचं दुःख आपण दूर करीत होतों असं कांहीं नाहीं. पण आपण दूर गेलों, कीं त्यांच्या सुखदुःखांची आठवणसुद्धां आपल्याला रहात नाहीं. त्यांनींसुद्धां आपल्याला त्रास दिला आहे—नाहीं असं नाहीं–पण त्या त्रासांत ते सुद्धां वांटेकरी होते. ताई, देशांतलं

राजा जेव्हां देशांतच रहातो तेव्हां देशांतलं दैन्य असं कोनाकोपऱ्यांतून वाढत नाहीं ? नि. हे कोनेकोपरे म्हणजे काय कळलं का ? आपण शहरांत रहातों, सर्व प्रकारें आपली चैनचान चाललेली असते, गरजाही जाणवतात, उधळमाधळ होत असते, पण या इकडे येऊन एकदां डोळे उघडून जर पहाल ताई—'

' होय आनंद—पण तुला घरीं जावं जावंसं वाटत नाहीं ? '

' नाहीं ! ' बुवाजी एकाच शब्दांत म्हणाला. राजलक्ष्मीला विषय बदलायचा होता—तिला तें ऐकवत नव्हतं म्हणून विषयांतर करण्यासाठीं तिनं तसं विचारलं हें त्या बिचाऱ्याच्या लक्षांत आलं नाहीं.

थोड्या वेळानं राजलक्ष्मी बोलूं लागली तेव्हां तिचा आवाज सद्गदित झाला होता. तिनं विचारलं, ' घरीं कोण कोण आहेत तुमचीं ? '

आतां घरदार नाहींच मला ! ' बुवाजी म्हणाला.

राजलक्ष्मी पुन्हां कांहीं वेळ स्तब्ध राहिली. पुन्हां म्हणाली. ' बरं आनंद, या वयांत संन्यास घेतल्यानं तुम्हांला समाधान लाभलं का ? '

' हें काय विचारणं ? ' बुवाजी हंसून म्हणाला, ' संन्याशाला कसला लाभलोभ नसतो ताई ! दुसऱ्याच्या दुःखाचा बोजा आपणं घ्यावा असं मला वाटत असे—तेंच चालवलंय् !

राजलक्ष्मी पुन्हां उगीच राहिली. बुवाजी बोलत होता, ' त्यांना झोंप लागली वाटतं ! आतां जाऊन थोडा त्यांच्या गाडींतच बसतों. पण असं पहा ताई, चार दोन दिवस आपल्या तिकडे जर मी राहिलों तर त्यांना राग नाहीं ना यायचा ?'

' त्यांना कुणाला ? ' राजलक्ष्मी हंसून म्हणाली, ' तुमच्या दादाला ? '

' हो–त्यांनाच ! ' बुवाजी हळूच हंसत उत्तरला.

' आणि मला राग येईल कीं नाहीं तें नाहीं विचारलंत ?' राजलक्ष्मी म्हणाली, ' बरं बरं, आधीं गंगामाटीला तर चला—मग पुढंच पुढं पाहूं ! '

बुवाजी पुढं काय बोलला तें कांहीं मला ऐकूं आलं नाहीं. पण तो कांहीं बोलला नसावा. थोड्या वेळानं तो येऊन माझ्या गाडींत बसला नी हळूच मला हांक मारून म्हणाला, ' आपण जागेच आहांत वाटतं दादा ? '

मी जागाच होतों खरा पण उत्तर दिलं नाहीं.

माझ्या बाजूला थोडीशी जागा पाहून आपली फाटकी घोंगडी अंगावर ओढून बुवाजी झोंपी गेला. मीं जरा बाजूला सरकलों असतों तर त्याला आणखी जागा

झाली असती. पण हालचाल केली तर मीं जागाच होतों असं त्याला वाटेल, किंवा माझी झोंप मोडली असं वाटेल, नी मग त्या तशा मध्यान रात्रीं देशाच्या दु:स्थितीवरचं त्याचं व्याख्यान सुरू होईल या भीतिनं मी दया दाखवायच्या भानगडींत पडलों नाहीं.

गंगामाटीला गाडी केव्हां येऊन पोंचली तें मला कळलं नाहीं. नव्या घराच्या दारांत येऊन गाडी उभी राहिली त्यावेळीं उजाडलं होतं. चारपांच बैलगाड्या आलेल्या पाहून जमलेल्या गांवगर्दीची गडबड चोंहोंबाजूनीं सुरू झाली होती.

गांवची वस्ती हलक्या लोकांची होती असं कालच मला रतननं सांगितलं होतं. प्रत्यक्ष पाहिलं तेव्हां कळलं, कीं उगीच रागाच्या भरांत त्यानं अतिशयोक्ति केली नव्हती. पहांटेची वेळ, चांगली कडक थंडी पडलेली, तरीही कमीजास्त वयाचे मुली, मुलगे--कांहीं नागवे, कांहीं अर्धे नागवे—अशीं पन्नास साठ माणसं, डोळे चोळीत झोंपेंतून नुकतींच उठून गंमत पहायला गोळा झालीं होतीं. त्यांचीं वडील माणसंसुद्धां मागं राहून अदबीनं डोकावत होतीं. त्यांची एकंदर रहाणी नि कपडेलत्ते पाहिल्यावर त्यांचा दर्जा, कुणाला कसाही वाटो, पण रतनच्या संशयाचं मात्र पूर्णपणें निराकरण झालंसं वाटलं.

त्यांची नुकतीच झोंपमोड झाली होती पण त्या साऱ्यांना पहातांच गिरणीच्या चाकासारखा तो सळसळून उठला. कांहीं मुलं मालकिणीला पहाण्यासाठीं आपला दर्जा विसरून जरा जास्तच पुढं आलीं होतीं तें पाहून रतननं असा कांहीं आव आणला, असा कांहीं त्यांच्या अंगावर धावून गेला, कीं ते दोघे गाडीवाले समोर नसते तर तिथं रक्तपातच झाला असता.

रतनला त्याचं कांहींच वाटलं नाहीं. तो माझ्याकडे पाहून म्हणाला, 'हलक्या लोकांचं हें असंच! पाह्यलंत बाबूजी, कमजात लोकांचा दिमाख पाहिलात? जसं काय यात्राच बघायला जमले आहेत! सभ्य माणसानं कसं रहावं या जागीं बाबूजी? या शिवाशिवीनं सारा भ्रष्टाकार माजायचा इथं!'

'शिवाशिवी' चा शब्द सर्वांच्या आधीं राजलक्ष्मीच्या कानीं गेला. तिला एकंदरींत ते आवडलं नसावं.

बुवाजी आपली पेटी उतरून घेण्याच्या गडबडींत होता, तें काम उरकून एक लोटा बाहेर काढून घेऊन तो आला. जवळ मुलं गोळा झालेलीं पाहून त्यांतल्या एकाचा हात धरून तो म्हणाला, 'अरे बाळ, असं पहा, इथं कुठं जवळपास

तळं विहीर असेल तर एक लोटाभर पाणी घेऊन ये. चहा करायला हवा ना!' असं म्हणून त्यानं भांडं त्या मुलाच्या हातीं दिलं. जवळच एक वयस्क माणूस उभा होता त्याला उद्देशून म्हणाला, 'बाळचे बाबा, इथं जवळच कुठं गायबीय असली तर दाखवून द्या ना! एक छटाक दूध हवंय्! गाईचं निरसं दूध फार उत्तम! चहाला असा रंग येईल ताई!' असें म्हणून एकदां त्यानं माझ्या नि ताईच्या तोंडाकडे पाहिलं. पण त्याचा हा उत्साह ताईच्या खिजगणतींत आला नाहीं. थोडीशी नाराजपणें हंसून ती म्हणाली, 'रतन, जा बाबा—तें तेवढं भांडं घासून पाणी भरून घेऊन ये!'

रतनचा दिमाख त्यावेळीं बिघडला होता. तसल्या त्या मनःस्थितींत कुठल्या तरी एका गोसावड्यासाठीं सकाळच्या प्रहरीं, कुठं तरी जाऊन, कुठल्या तरी विहीरीचं पाणी आणायचं संकट आल्यामुळं त्याचा राग अनावर झाला होता. राग आला होता खरा, पण तो काढायचा कुणावर? आजुबाजूला जीं गरीब विचारीं पोरं गोळा झालीं होती त्यांच्यावरच तो तुटून पडला. त्यांच्या अंगावर एकदम धुसून जाऊन तो म्हणाला, 'नष्ट खट्याळ पोरं कुठलीं, भांड्याला कां शिवलांत? चल रे हरामखोरा, हें भांडं घासून घे नी पाण्यांत बुडव!' नुसते डोळ्याच्या इशाऱ्याचे धक्के देत तो त्या पोरांना धमकावीत घेऊन गेला.

तो प्रकार पाहून बुवाजीला हसूं आलं. मींही हंसलों. राजलक्ष्मी देखील गालां-तल्या गालांत हंसत म्हणाली, 'आल्याबरोबरच सारा गांव डोक्यावर घेतलात आनंद. तांबडं फुटतांक्षणींच साधू लोकांना चहा हवा असतो वाटतं?'

बुवाजी म्हणाला, 'गृहस्थांची रात्र संपली नाहीं म्हणून आम्हीं काय जागं होऊं नये? ठीक--ठीक! पण आधीं दुधाची व्यवस्था केली पाहिजे!--बरं, आधीं या घरांत लांकूडफाटं चूलबील कांहीं आहे कीं नाहीं? एकदां पाहून घ्या. चला ना दादा, इथं कुणाकडे गायबीय आहे तर बघूं या. नि ताई, कालच्या त्या हंडींत कांहीं बर्फी होती ना?--नाहीं?--गाडींत बसल्यावर काळोखांत संपवली वाटतं?'

राजलक्ष्मीला हंसूं कोसळलं. आजुबाजूच्या त्या चारदोन बायका दुरून पाहात होत्या त्यांनीं सुद्धां तोंड फिरवलं.

इतक्यांत दिवाणजी काशिराम कुशारी मारे धापा टाकीत येऊन हजर झाले. त्यांच्याबरोबर तीनचार माणसं होतीं. एकाच्या डोक्यावर शाकभाजीची टोपली, एकाच्या हातीं दुधाची चरवी, एकाच्या हातीं दह्यांचं भांडं नि एकाच्या हातीं

ग्रं. क्रमांक १६५९२
दा. दि. १-७-६

रांवस्या—मीसे होते.

राजलक्ष्मीनं त्यांना नमस्कार केला. आशीर्वादाबरोबरचे उद्गार झाल्यावर कैफियत दिवाणजीनीं सुरू केली होती. माणूस एकंदरींत बरा असावासं वाटलं. पन्नाशी उलटलेली असावी. साधारण काटकोळं शरीर, दाढीमिशी काढलेली, वर्ण जरा एकंदरींत गोरटेला.

मीं त्याला नमस्कार केला. त्यानंही उलट मला नमस्कार केला पण गृहस्थांचे हे रीतिरिवाज बुवाजीच्या खिजगणतींत नव्हते. भाजीची टोपली उतरून घेऊन त्यांतली पेंडीन्‌पेंडी तपासून बुवाजीनीं समाधान व्यक्त केलं. दुध अगदीं निर्मळ असल्याची तपासून खात्री दिली नी माशाचं वजन किती असावं याचा अंदाज करून एकंदरींत चवीच्या बाबतींत तो बराच कसोटीला उतरेल असं मत देऊन जमलेल्या लोकांच्या तोंडाला त्यानं पाणी सुटायला लावलं.

हे बुवाजी मालकिणीबरोबर येणार याची दिवाणजींना आधीं दाद नव्हती. अर्थात् त्यांची जिज्ञासा जागी झाली. राजलक्ष्मी म्हणाली, ‘ संन्यासी बघून घाबरूं नका दिवाणजी. ते भाऊ आहेत माझे—’ हंसत हंसत खवचटपणें ती म्हणाली, ‘ माणसाच्या अंगावरचे भगवे कपडे उतरायचं मला एक कामच लागलं आहे म्हणा ना ! ’

ते शब्द बुवाजीच्या कानीं गेले. तो म्हणाला, ‘ हें काम तेवढं सोपं नाहीं बरं ताई ! ’ असं म्हणून माझ्याकडे पाहून तो थोडासा हंसला. त्याचा अर्थ मला कळला—राजलक्ष्मीलाही कळला, उत्तरादाखल ओंठ दाबून हंसत ती म्हणाली. ‘ जाऊं दे ! ’

घरांत प्रवेश करतांच आम्हांला दिसून आलं, कीं कुशारी दिवाणजीनीं एकंदरींत सारी व्यवस्था करण्यांत कसूर केली नव्हती. जुनं घर होतं खरं पण मोठी घाई करून, गिलावाबिलावा करून भिंतीबिंती साऱ्या ठाकठीक करून घेतल्या होत्या.

आंत एक सैंपाकघर नि कोठीशिवाय दोन झोंपायच्या खोल्या होत्या. घर मातीचंच होतं. छपरावर केंमळा घातला होता, पण एकंदरींत घराची उंची नि विस्तार चांगलाच मोठा होता. बाहेरची बसायची ओटी चांगली प्रशस्त होती. आंगणही तसंच प्रशस्त नि स्वच्छ असून त्याच्या सभोंवार मातीचा गडगा घातला होता. एका बाजूला एक छोटीशी विहीर नि त्याच्या पलिकडे दोन तीन तगर नि शेफालीचीं झाडं होतीं. दुसऱ्या बाजूला बऱ्याचशा तुळशी लावलेल्या असून चार

गांच जुई नी मल्लिका फुललेल्या दिसत होत्या. एकंदरींत सारी जागा पाहून मला मोठं समाधान वाटलं.

पण सर्वांत खूष झाला होता आमचा संन्यासीभैय्या ! जें कांहीं डोळ्यांपुढं येई त्या प्रत्येकाची तो बेफाम तारीफ करीत सुटला होता. तसले जिन्नस जसे कांहीं त्यानं पूर्वी पाहिलेच नव्हते. मी जरी त्याच्यासारखा फारसा गाजावाजा केला नाहीं तरीही मनांतल्या मनांत मोठा खूष झालों होतों.

राजलक्ष्मी आपल्या भाईसाठीं सैंपाकघरांत चहा तयार करीत होती. तिच्या चेहऱ्यावरचा आविर्भाव नजरेला जरी दिसून येत नव्हता तरी तिच्या मनाला काय वाटत होतं याची कल्पना कुणालाही आल्यावांचून राहिली नाहीं. यांत सामील झाला नव्हता एक रतन. लांब चेहरा करून तो एका भिंतीला टेकून स्वस्थ बसला होता.

चहा तयार झाला. कालच्या शिल्लक राहिलेल्या मिठाईवर ताव मारून बुवाजीनं मुकाट्यानं चहा घेतला. नंतर तो मला म्हणाला, ' चला या, एकदां गांवावर नजर टाकून येऊं. घाट देखील कांहीं दूर नाहीं—येतां येतां स्नान पण करून येऊं. नि ताई, तुम्हींही चला ना एकदां आपली जमीदारी पहायला. इथं पांढरपेशे कुणी नाहींत—तेव्हां संकोच धरायचं कांहीं कारण नाहीं. एकंदरींत चांगली इस्टेट दिसते—पहातांच तोंडाला पाणी सुटतं ! '

' तें मला माहीत आहे.' राजलक्ष्मी हंसून म्हणाली, ' गोसावीवैराग्यांचा स्वभावच असा ! '

सैंपाक करणारा भटजी आणि एक नोकर आमच्या बरोबरच आला होता. ते सैंपाकाच्या तयारीला लागले. राजलक्ष्मी सैंपाक्याला म्हणाली, ' नाहीं महाराज असले जातीवंत मासे तुमच्या हातीं देणं बरं नाहीं वाटत मला !—आंघोळ करून येऊन मींच सैंपाकाला लागतें.' असं म्हणून ती आमच्याबरोबर निघायच्या तयारीला लागली.

या वेळपर्यंत आमच्या सर्वांच्या भाषणांत रतन एवढासुद्धां भाग घेत नव्हता. आम्हीं बाहेर निघतों आहों असं पाहून तो मोठ्या अदबीनं हळूच म्हणाला, ' हें पहा बाईसाहेब, हें जें कांहीं तळं, घाट कीं बांध कांहीं आहे, तिथं जाऊन स्नान करूं नका. तिथं मोठे पाणसाप आहेत. एक एक साप हा एवढा मोठा ! '

' म्हणतोस काय रतन ? ' राजलक्ष्मी घाबरून जाऊन म्हणाली, ' पाणसाप आहेत तिथं ? '

'जी हां!' रतन मान हलवीत म्हणाला, 'आत्तांच कळलं मला!'

आत्तांच कळलं म्हणे?' बुवाजी वेडावून म्हणाला, 'विचार करकरून या वेड्या हजामानं चांगलं कारण काढलं शोधून!'—रतनची जातगोत वगैरे हकिकत आधल्याच दिवशीं बुवाजीला कळली होती. राजलक्ष्मीकडे वळून तो हंसून म्हणाला, 'त्याचं काय ऐकतां ताई, तुम्हीं चला ना! पाणसाप आहेत कीं मगर आहेत तें आमचं आम्हीं पाहून घेऊं!'

पण त्याची ताई कांहीं जायला निघेना. पाणसापाचं नांव ऐकतांच ती घाबरून गेली होती. ती म्हणाली, "आज राहूं दे आनंद. नवी जागा आहे, चांगलं कळल्यासवरल्याशिवाय उगीच कशाला अविचार करायचा? रतन, तूं ऊठ बाबा जरा. ज़वळपास कुठं विहीर असली तर दोन घागरी पाणी घेऊन ये—' मला हुकूम सुटला, 'आजारी मांणूस तुम्हीं, कुठल्यातरी पाण्यांत उगाच डुंबायला जायचं नाहीं. इथं घरींच दोन तांबे डोक्यावर ओतून घ्या म्हणजे झालं!'

'नि मी मात्र कुणाच्या खिजगणतींत नाहीं ना ताई?' बुवाजी हंसून म्हणाला, 'म्हणून मला तिकडे त्या पाणसापाच्या तळ्यांत पाठवून देतां आहांत?'

अगदीं साधे शब्द!—पण ते राजलक्ष्मीच्या मनाला लागले. तिचे डोळे पाण्यानं भरून आले. क्षणभर त्याच्याकडे वात्सल्यपूर्ण दृष्टीनं पहात ती म्हणाली, 'तुम्हीं काय माणसाच्या आटोक्यांतले आहांत! आईबापाचंसुद्धां न ऐकणारा माणूस जोडलेल्या बहिणीचं थोडंच ऐकणार आहे!'

जायला निघालेला बुवाजी एकदम थांबून म्हणाला, 'कालच जोडलेल्या कुठल्या तरी बहिणीला, असं म्हणू नका ताई! कुठल्या तरी कां? मीं सर्वांना चांगलाच ओळखतों म्हणूनच ना घर सोडून आलोंय! नाहीं तर इतक्या दूर यायची काय जरुरी होती मला?' असं म्हणून तो तसाच बाहेर पडला.—मीही त्याच्या मागोमाग निघालों.

साऱ्या गांवभर फिरून आम्हीं दोघांनींही तें गांव चांगलं पाहून घेतलं. गांव लहानच होतं. आम्हीं ज्यांना 'हलके लोक' म्हणतों त्याच लोकांची सारी वस्ती होती. एक दोन सुतार नि लोहार यांच्याखेरीज स्पृश्य म्हणायला गंगामाटींत कुणीच नव्हता. सारे डोंब नि बुरूड. कुणी वेताच्या टोपल्या करीत, कुणी मजूरी करीत—तसंच डोंब लोक हंडीमडकीं तयार करून शेजारच्या पोडामाटी गांवीं नेऊन विकून उदरनिर्वाह करीत.

गांवच्या उत्तरेला एक नाला वहात होता. त्याच्याच पलिकडे पोडामाटी गांव होतं. त्या गांवांत ब्राह्मण, कायस्थ वगैरे पांढरपेशांची बरीच वस्ती होती असं कळलं. आमच्या कुशारी महाशयाचं घरही पोटामाडीलाच होतं.

सध्यां इतरांच्या गोष्टी कशाला ?—आमच्या या गांवची स्थिति ज्यावेळीं आम्हीं पाहिली त्यावेळीं आमचे डोळे भरून आल्यावांचून राहिले नाहींत. बिचाऱ्यांनीं घरं शक्य तितकीं लहान बांधायचा प्रयत्न केला होता. तरी देखील या सुवर्णभूमींत त्या छोट्या घराचं छप्पर करण्याइतका पुरेसा गवतकेंबळासुद्धां त्यांना मिळत नव्हता. बिच्याऱ्यांची स्वतःची म्हणायला एक टीचभरसुद्धां जमीन नव्हती. टोपल्या, रोवळ्या विणून शेजारच्या गांवांतल्या लोकांना कवडी-मोलानं विकून ते कशा रीतीनं जगूं शकत होते याची मला कल्पना होईना. असल्या परिस्थितींतसुद्धां या अस्पृश्य लोकांचें कसंबसं चालत होतं—कदाचित् अशाच परिस्थितींत त्यांना पुढंही रहावं लागणार होतं—पण कुणीं कधींच त्यांची खबर घेतली नाहीं. गांवठी कुत्रं कुठंतरी रस्त्यांत जन्म घेतं, गटारांतल्या पानं पत्रावळी चाटून कसंबसं कांहीं वर्षं जगून रहातं, शेवटीं एकदां कुठंतरी मरून जातं, कुणी जशी त्याची खिजगणती बाळगीत नाहींत तशीच या हत-भागी मानवी जीवांचीही कुणी पर्वा करीत नाहीं. देशावर त्यांचा कांहींच का हक्क नाहीं ? यांचीं दुःखं, यांचं दैन्य, सर्व प्रकारें आलेला यांचा हीनपणा, आपल्या नि परक्याच्या दृष्टीला एवढा स्वाभाविक होऊन बसला आहे, कीं माणसापाशीं माणसाची इतकी बेकदर केली जात असतां कुठंच कुणालाही एवढीसुद्धां लाज वाटत नाहीं !

बुवाजी माझ्या चेहऱ्याकडे पहात होता, तें माझ्या लक्षांत आलं नव्हतं. तो एकदम म्हणाला, ' दादा, आमच्या या देशाचं खरं चित्र आहे तें हेंच ! पण वाईट वाटून घ्यायचं कांहीं कारण नाहीं. आपल्याला वाटत असेल, कीं या सर्वांना इतर अहर्निष दुःख देतात म्हणून !—पण तसं नाहीं ! '

' हें काय बोलणं झालं बुवाजी ? ' मी आश्चर्यचकित होऊन संतापानं म्हणालों.

बुवाजी म्हणाला, " माझ्यासारखं जर तुम्ही सर्वत्र हिंडून पाहिलं असतं, तर माझं म्हणणं तुम्हाला पटलं असतं. हें दुःख वास्तविक कुणाला जाणवतं दादा ? मनाला ना ? पण तें मन आहे का या लोकांना ? आजपर्यंत या लोकांना दाबून दडपून ठेवण्यांत आलं आहे—नागवं करण्यांत आलं आहे, आहे यापेक्षां ज्यास्त मिळायची अपेक्षा करणं म्हणजे अधर्म आहे, असं या लोकांना

वाटतं. वा रे आमच्या पूर्वजांची काय उत्कृष्ट युक्ती काढून दाखवली आहे ही आमच्या बापजाद्यांनीं ! ' असं म्हणून बुवाजी अत्यंत निर्दयपणें होः होः करून हसूं लागला. मला त्याच्यासारखं हसूं आलं नाहीं त्याचप्रमाणें त्याच्या भाषणांतली खोंचही मला चांगलीशी कळली नाहीं, म्हणून माझा मीच शरमिंदा झालों.

या वर्षी पीक चांगलं आलं नव्हतं. पाण्याच्या अभावीं आठ आणे पीक वाळून गेलं होतं. दुष्काळाचीं चिन्हं दिसूं लागलीं होतीं. बुवाजी म्हणाला, ' दादा, कोणत्याही कारणानं असो, देवानं आपल्याला आपल्या या रयतेकडे पाठवून दिलं आहे. असे मधेंच निघून जाऊं नका. एक वर्षभर तरी इथं काढा. तुम्हांला कांहीं विशेष करतां येईल असं मीं म्हणत नाहीं, तरीपण रयतेचीं दुःखं एकदां उघड्या डोळ्यांनीं पाहून घ्या. बरं असतं तें. जमिनदारी करण्याच्या पापाचा बोजा थोडा तरी हलका होईल ! '

मनांतल्या मनांत सुस्कारा टाकून मीं म्हटलं, ' ही जमिनदारी नी रयत माझी थोडीच आहे ? यापूर्वी जसं कांहींच बोललों नव्हतों, तसा याही वेळीं उगीच राहिलों—कांहीं उत्तर दिलं नाहीं.

त्या छोट्याशा गांवांत एक चक्कर मारून स्नान उरकून ज्यावेळीं घरीं आलों त्यावेळीं बारा वाजून गेले होते. कालच्या प्रमाणेंच आजही आम्हां दोघांनाही वाढून राजलक्ष्मी एक बाजूला बसून राहिली. सारा सैंपाक तिनंच केला होता. अर्थात् माशाची आमटी नी दह्याची कढी बुवाजीच्याच पानावर वाढली गेली. बुवाजी संसारी माणूस नव्हता. पण सात्त्विक असात्त्विक, आमिष-निरामिष असा भेदभाव बाळगण्याची त्याची वृत्ती दिसून आली नाहीं. उलट खाण्याच्या बाबतींत कोणत्याही संसारी माणसापेक्षांही तो जास्त वाकबगार होता असं दिसून आलं.

सैंपाकाच्या बऱ्या-वाईटपणाबद्दल माझी कधींच कांहीं तक्रार नसे. तेव्हां रांधणारीनंही मला वाढण्याच्या बाबतींत विशेष आग्रह धरला नाहीं.

बुवाजीचं जेवण मोठ्या मजेमजेंत चाललं होतं. जेवीत जेवीत तो बोलत होता. तो म्हणाला, ' ताई, एकंदरींत गांव मोठं चांगलं आहे हें—सोडून जाणं जीवावर येतं. '

राजलक्ष्मी म्हणाली, ' सोडून जाण्यासाठीं कांहीं तुम्हांला राहून घेतलं नाहीं भाई ! '

बुवाजी हंसत म्हणाला, ' गोसाव्याबैराग्यांना इतकं जवळ करणं बरं नव्हे

ताई ! तोंडघशीं पडाल ! तें कांहीं असो, गांव छान आहे. एवढं धुंडाळलं पण जन्मांत ज्याला पाण्याचा स्पर्श झाला असेल असा एकसुद्धां माणूस नजरेला आला नाहीं. भरपूर कैंबळा असेल अशा छप्पराचं एकसुद्धां घर दिसलं नाहीं— जशा कांहीं ऋषीच्याच पर्णकुट्या !'

ऋषीच्या पर्णकुट्या आणि अस्पृश्य लोकांचीं घरं यांच्यांत जें एक प्रकारचं साहश्य होतं तें ध्यानीं आल्यावरून राजलक्ष्मी खिन्नपणें हंसून मला म्हणाली, 'ऐकलं, साऱ्या हलक्याच लोकांची वस्ती इथं आहे खरी ! एक तांब्या पाणीसुद्धां कुणाकडून मिळायची आशा नाहीं. इथं फार दिवस रहातां येईल असं वाटत नाहीं.

बुवाजी नुसता हंसला. मी उगीच राहिलों. राजलक्ष्मी स्वभावतः मोठी दयाशील होती. तिच्या तोंडून सुद्धां असे कठोर उद्गार निघावेत याचं आश्चर्य वाटलं असतं—पण संस्काराचा प्रभाव हा असा आहे याची मला कल्पना होती. बुवाजी कां हंसला तें मला कळलं. पण त्याचा परिणाम माझ्यावर झाला नाहीं. म्हणूनच मी कांहीं उत्तर दिलं नाहीं हें जरी खरं होतं, तरीही राजलक्ष्मीला उद्देशून माझं मन आंतल्या आंत बोलत होतं, 'लक्ष्मी, माणसाचं कर्मच केवळ त्याला अस्पृश्य नी अशुची बनवतं—माणूसकी नव्हे ! नाहींतर प्यारी बाईजी आज पुन्हां लक्ष्मीच्या आसनावर येऊन बसली नसती. माणसाचा देह आहे म्हणूनच त्याला माणूस म्हणायचं अशी माझी वृत्ती नाहीं, म्हणूनच हें सारं मी कबूल केलं. लहानपणापासून कितीतरी बाबतींत या कसोटीला मी उतरलोंय ! म्हणूनच तोंड उघडून अंतरींची गोष्ट मला सांगतां येत नाहीं—सांगण्याची इच्छाही नाहीं.'

दोघेही जेवण उरकून उठलों. राजलक्ष्मी माझ्या ताटांत जेवायला बसली. साधारण एका घंट्यानं मी फिरून येऊन पाहिलं तों बुवाजीची निघण्याची तयारी झाल्याचं पाहून माझ्याप्रमाणेंच तिलाही आश्चर्य वाटलं. केव्हां तो बाहेर गेला, केव्हां माणूस गांठला नि औषधाची पेटी त्याच्या डोक्यावर चढवून तो केव्हां जायच्या तयारीला लागला हें आम्हाला कळलंसुद्धां नाहीं.

काल तो जाणार असं म्हणत होता. पण आज आम्हीं तें सारं विसरून गेलों होतों. राजलक्ष्मीनं एवढं स्वागत करून लोभानं आग्रह केल्यावरही इतक्या लवकर तो जायला निघेल असं माझ्या मनांत सुद्धां आलं नाहीं स्नेहाची बेडी इतक्या सहज तोडतां येत नाहीं. राजलक्ष्मीला मनोमन असं वाटलं असावं. ती काकुळतवाणीनं म्हणाली, 'तुम्ही जायला निघालांत का आनंद ?'

‘ हां ताई, निघालों. ’ बुवाजी म्हणाला, ‘ आतां नाहीं निघालों तर मुक्का-माला पोंचायला रात्र होईल. ’

‘ तिथं कुठं जाणार ? कुठं रहाणार ? आपलीं माणसं तिथं तर कोण नाहीं !’

‘ आधीं तिथं जातों तर खरा ! ’

‘ आतां इकडे केव्हां येणार ? ’

‘ तें कांहीं आज सांगतां येणार नाहीं. कामाच्या जरुरीमुळं जर मुक्काम वाढला नाहीं तर एकाद्या दिवशीं येईनही. ’

राजलक्ष्मीचा चेहरा पडला. मानेला रागारागानं एक झटका देऊन ती सद्गदीत वाणीनं म्हणाली, ‘ एखाद्या दिवशीं येईन म्हणे ! नाहीं, तें कांहीं चालायचं नाहीं !’

चालायचं नाहीं म्हणजे काय हें कुणाला सांगतां आलं नसतं. बुवाजी खिन्न-पणं हंसून म्हणाला, ‘ जायचं कारण तुला सांगितलं आहे ना ताई ? ’

“ सांगितलंय् ! बरं आहे—जा तर—’ असं म्हणून राजलक्ष्मी ओंठावर आलेला हुंदका आंवरीत एकदम आंत निघून गेली.

क्षणभर बुवाजी स्तब्ध होऊन राहिला. त्याची स्थिति चमत्कारिक झाली होती. माझ्याकडे पाहून तो म्हणाला, “ मला जाणं भाग आहे. ”

मीं मान हलवून म्हटलं, तें मला माहीत आहे—’ यापेक्षां मीं तरी काय सांगणार होती ? कालाच्या अल्पतेवरून स्नेहाच्या बंधनाची तीव्रता मापतां येत नाहीं हें किती तरी वेळां मला पटलं होतं. याच आधारावर कवी लोक काव्य रचीत आले आहेत. व्यवहारांत हें असंच होत असतं. एकाच्या जाण्याची जरुरी जितकी खरी होती तितकीच नको जाऊं म्हणणाऱ्याची विनवणीही खरी होती कीं नाहीं याबद्दल माझ्या मनांत तिळमात्र संशय नव्हता. हीच गोष्ट घेऊन राजलक्ष्मी स्वतःलाच त्रास करून घेईल याचीही मला चांगलीच कल्पना होती.

‘ मी निघालों !’ बुवाजी म्हणाला, ‘ तिकडचं काम संपलं तर इकडे येईनही पण आजच तें निश्चित सांगतां यायचं नाहीं. ’

‘ ठीक आहे. ’ म्हणून मीं नुसती साथ दिली.

कांहीं तरी बोलण्याच्या उद्देशानं बुवाजीनं आंत पाहिलं—पण एकदम एक सुस्कारा सोडून तो नुसता हंसला मात्र. नंतर हळूच म्हणाला, ‘ हा आमचा बंगाल म्हणजे एक विलक्षण देश आहे. रस्तोरस्तीं मायबहिणी भेटतात. यांना चुकवून जाणं मोठं कठीण !’ असं म्हणून तो हळुहळू बाहेर निघून गेला.

त्याचे उद्गार ऐकून माझ्या तोंडूनही नकळत सुस्कारा निघाला. वाटलं, असं आहे खरं! तरीही देशांतल्या साऱ्या मायबहिणींच्या विरोधाची पर्वा न करतां जो घराबाहेर पडला तो एका बहिणीच्या हातची माशाची आमटी नि दह्याची कढी खाऊन थोडाच अटकून पडणार आहे ?

## ५

बुवाजी यदृच्छया निघून गेला. त्याच्या विरहाची व्यथा रतनला जाणवली कीं नाहीं तें कांहीं मी विचारलं नाहीं. पण एकंदरींत त्याला फारसा धक्का बसला नसावा. एका माणसाला रडं आवरीत घरांत शिरत असतांना मी पाहिलंच होतं. राहता राहिलों तिसरा मी ? उणेपुरे चोवीस घंटेसुद्धां या माणसाचा सहवास जरी झाला नव्हता; तरींहीं मला वाटलं, माझ्या या कोरड्या जीवनावर तो कुठंतरी चांगलीच पाऊलवाट उमटवून गेला असावा. या साऱ्या प्रकाराचा सर्वांनाच विसर पडेल, कीं एके दिवशीं आपली ती भली मोठी औषधाची पेटी माथ्यावर घेऊन तो स्वतःच येऊन हजर होईल, याची कल्पना तो निघायच्या वेळीं कांहीं आली नाहीं. तो निघून गेला म्हणून मला बरंच वाईट असेंही कांहीं नाहीं कोणत्याही कारणानं असो—विशेषतः फार दिवस तापानं बेजार झाल्यामुळं माझा देह नि मन हीं अगदीं दुबळी होऊन पडलीं होतीं. स्वतःच्या सर्वस्वाची गठडी राजलक्ष्मीच्या हातीं सोंपवून बऱ्यावाईटाचा विचार करण्यास मी सोडून दिलं होतं. अर्थात् कोणत्याही गोष्टीची स्वतंत्रपणें काळजी करण्याची मला जरुरी नव्हती नि ताकदही नव्हती.

एवढं खरं, माणसाच्या मनाच्या चळवळीला कधीं विराम नसतो. बाहेरच्या खोलींत तक्याला टेंकून मी एकटा बसलों आहें, मनांत कितीतरी आडव्या-तिडव्या कल्पना येऊन जाताहेत त्यांची गणतीसुद्धां नाहीं, समोर अंगणांतल्या दिव्याची ज्योत हळुहळू निस्तेज होत येत आहे, रात्रींच्या पसाऱ्यामुळं हुरहुरलेल्या मनांत मधून मधून एकादी चमक उठते आहे,—असं वाटतं आहे, आज किती रात्री आल्या नि गेल्या, पण त्यांच्याशीं ताडून पाह्यलं तर आज पुढं येणाऱ्या रात्रींची अनपेक्षित मूर्ती कधीं न पाहिलेल्या एकाद्या स्त्रीच्या बुरखा घेतलेल्या चेहऱ्यासारखीच मला रहस्यमय वाटत होती. त्या अपरिचितेला, ती कशी आहे, कशी वागेल हें माहीत नसतां जसं शेवटच्या मुक्कामाला नेऊन पोंचवलं पाहिजे असतं, अर्ध्या वाटेंत कांहीं विचक्षणा करायची नसते, तसंच कांहींतरी वाटत होतं.

लगेच दुसऱ्या क्षणाला या दुबळ्या काळजीची सारी सांखळी एकदम तुटून खळखळत पडते आहे असंही वाटत होतं. मनाची ही अशी अवस्था झाली असतां शेजारचं दार उघडलं नि राजलक्ष्मी बाहेर आली. तिचे दोन्ही डोळे तांबडे लाल झाले होते—साधारण डोळे आल्यासारखी हळुहळू येत ती माझ्याजवळ येऊन बसली नि म्हणाली, ' मला झोंप लागली होती. '

' त्यांत विशेष काय ? ' मी म्हटलं, ' हे एवढे सारे उपद्व्याप माथीं घेऊन निघाली आहेस—दुसरा कुणी असता तर कोसळूनच पडला असता—नि मी असतों तर साऱ्या दिवसरात्रींत डोळेसुद्धां उघडले नसते—कुंभकर्णाची झोंप घेतली असती. '

' पण कुंभकर्णाला मलेरियानं पछाडलं नव्हतं. ' राजलक्ष्मी हंसून म्हणाली, ' तें कांहीं असो पण आज दिवसा तर झोंप घेतली नव्हती ? '

' नाहीं. ' मी म्हटलं, ' पण आतां झोंप येते आहे. कदाचित् झोंपेनसुद्धां. कुंभकर्णाला मलेरिया लागला होता, कीं नाहीं तें वाल्मिकीनं कांहीं कुठं लिहून ठेवलेलं नाहीं. '

' या अशा अवेळीं झोंपणार ? ' ती रागावून म्हणाली, ' भलतंच कांहीं तरी ! ताप वाढायचा त्यामुळं ! तं कांहीं नाहीं !—बरं जायच्या वेळीं आनंदनं कांहीं सांगितलं का तुम्हांला ? '

मी विचारलं, ' त्यानं काय सांगावं अशी तुझी अपेक्षा होती ? '

' म्हणजे असं—' राजलक्ष्मी म्हणाली, ' म्हणजे कसं जाणार ? कुठं जाणार ?—किंवा—'

अस्सल प्रश्न होता तो या ' किंवा ' चाच. मी म्हटलं, ' कुठं कुठं जाणार याची थोडीशी कल्पना दिली त्यानं पण या ' किंवा ' च्या बाबतींत कांहीं सांगितलं नाहीं. मला नाहीं वाटत कीं तो पुन्हां केव्हां येईल म्हणून ! '

राजलक्ष्मी उगीच राहिली. पण माझी जिज्ञासा जागी झाली होती. मी विचारलं, ' बरं, एक दिवशीं जशी माझी अचूक परिक्षा केली होतीस तसंच या माणसाला तूं वास्तविक ओळखलं आहेस का ? '

क्षणभर माझ्या तोंडाकडे पहात स्वस्थ राहून ती म्हणाली, ' नाहीं. '

' खरं सांग. ' मीं म्हटलं, ' कधींच कांहीं कल्पना आली नाहीं का ? '

आतां मात्र राजलक्ष्मी हंसली. ती म्हणाली, ' तुमच्यासमोर निश्चित सांगतां

येत नाहीं. बऱ्याच वेळ माझा अंदाज चुकतो. असं होत असतं, एकाद्या अपरिचित माणसाला आपण पहातों, त्याला कुठं तरी पाहिलं असावं असं वाटतं, चेहरा जसा कांहीं ओळखीचा असावा—कुठं नि केव्हां पाहिलं तेवढंच काय तें ध्यानांत न यावं—आनंदच्या बाबतींत अगदीं अस्संच वाटलं मला.—'

कांहीं वेळ ती उगीच बसून राहिली होती. थोड्या वेळानं तिनं बोलायला सुरवात केली. ती म्हणाली, ' आज आनंद निघून गेला आहे, पण उद्यां जर तो कधीं परत आला तर त्याला त्याच्या आईबापांकडे नेऊन सुपुर्द केल्याशिवाय रहायची नाहीं एवढं मात्र सांगून ठेवतें. '

' पण ही उठाठेव तुला कशाला ? ' मी म्हटलं.

ती म्हणाली, ' असला मुलगा जन्मभर इकडे तिकडे फिरत असाच आयुष्य कंठीत रहाणार, ही कल्पना मनांत येतांच माझ्या काळजाला बाण बसतो. आतां असं सांगा, तुम्ही स्वतः एकदां संसार टाकला होता—असेच बैरागी झाला होतां —बैरागी होऊन भटकण्यांत खराखुरा आनंद आहे का कांहीं ? '

' मीं बैरागी झालों नव्हतों. ' मी म्हटलं, ' तेव्हां खराखुरा आनंद होतो कीं, नाहीं हें कसं सांगूं तुला ? तोच जर केव्हां आला तर त्यालाच विचारून पहा. '

' आतां असं सांगा, ' राजलक्ष्मी म्हणाली, ' घरीं बसून कांहीं धर्मलाभ होत नाहीं का ? संसार सोडला नाहीं तर काय देव भेटत नाहीं ? '

तिचा हा प्रश्न ऐकून मी हात जोडून म्हटलं, ' ह्या असल्या भानगडी मला नको आहेत लक्ष्मी. असले भयंकर प्रश्न मला विचारूं नकोस ! पुन्हां ताप भरायचा कदाचित् ! '

राजलक्ष्मी हंसली नि मोठ्या कळकळीनं म्हणाली, ' संसारांत या आनंदाला कांहीं कमतरता होती असं कांहीं वाटत नाहीं. तरीही सर्वस्वावर लाथ मारून या एवढ्या वयांत तो घर सोडून निघाला. तुम्हीं तर तसं कांहीं केलं नाहीं ? '

' नाहीं ! ' मी म्हटलं, ' नि पुढं कधीं करीन असं वाटतही नाहीं. '

' कां वाटत नाहीं ? ' राजलक्ष्मी म्हणाली.

मी सांगितलं, ' त्याचं मुख्य कारण असं आहे, संसार ही सोडायची गोष्ट आहे. पण हा संसार कुठं आहे नि कशा प्रकारचा आहे हेंच जिथं मला माहीत नाहीं तिथं सोडायचं काय ? शिवाय ज्या परमात्म्यासाठीं हा संसार सोडायचा त्या परमात्म्याबद्दल मला एवढासुद्धां लाभलोभ नाहीं. एवढे दिवस त्याच्याशिवाय

घालवले, आतां यापुढं जे कांहीं राहिले आहेत ते असेच निघून जातील अशी माझी खात्री आहे, शिवाय हा तुझा आनंदभय्या भगवं चढवून जो घराबाहेर पडला आहे तो ईश्वरप्राप्तीसाठीं असं कांहीं मला वाटत नाहीं, मी या बऱ्याचशा साधुसंतांत बरेच दिवस काढले आहेत. त्यांतले कुणी औषधांची पेटी डोक्यावर घेऊन ईश्वरप्राप्तीसाठीं हिंडावं असं कधींच सांगत नाहींत! आणखी असं आहे, खाण्याजेवणावर तो कसा ताव मारीत होता तें पाहिलंस ना ?'

पुन्हां राजलक्ष्मी बराच वेळ स्वस्थ राहिली नि नंतर म्हणाली, 'तर मग घर-संसार सोडून तो जे एवढे क्लेश सोसतो आहे ते काय सुखासुखीच ? सर्वांनाच काय तुमच्यासारखं वाटतं ?'

'नाहीं' मी म्हटलं, 'फार मोठा फरक आहे. ईश्वराच्या सेवेसाठीं तो बाहेर पडला नाहीं हें खरं असलं, तरी त्याचा उद्देश मात्र जवळजवळ तसाच आहे—आपल्या देशाच्या सेवेसाठीं तो निघालाय्! अर्थात् त्याचं घरदार सोडणं म्हणजे संसार सोडणं होत नाहीं. लहानसा संसार सोडून त्यानं जगाच्या संसारांत प्रवेश केलाय्!'

माझ्या तोंडाकडे पहात राजलक्ष्मी म्हणाली, 'चांगलंसं कळलं नाहीं मला. बरं जातांना कांहीं सांगितलं का त्यानं तुम्हांला ?'

'नाहीं,' मी मान हालवीत म्हटलं, 'तसं कांहीं विशेष नाहीं.'

खरी हकीकत मी कां झांकून ठेवली हें माझं मलाच कळलं नाहीं. पण जातांना त्या बुवाजीनं जे उद्गार काढले होते ते तेव्हांपासून माझ्या कानांत दुमदुमत होते. जायच्या वेळीं एक मोठा सुस्कारा सोडून तो म्हणाला होता, 'हा आमचा बंगाल म्हणजे एक विलक्षण देश आहे. रस्तोरस्तीं मायबहिणी भेटतात. त्यांना चुकवून जाणं मोठं कठीण!'

चेहरा पडून राजलक्ष्मी स्वस्थ बसली होती. अनेक दिवसांपासून विसरलेल्या अनेक घटना हळूच माझ्या मनांत डोकावूं लागल्या होत्या. मनांतल्या मनांत मी म्हटलं, 'खरं आहे, खरं आहे! बुवाजी, तूं कुणीही ऐस! एवढ्या अल्पवयांत तूं या आमच्या दरिद्री देशाला चांगलंच ओळखलंस! एवढ्या चार दोन शब्दांत एरवीं या देशाच्या स्वरूपाची कल्पना तुला देतां आली नसती. अनंत कालापासून घडत आलेल्या अनेक चुका, अनेक अपराधांचे कलंक आमच्या या मातृभूमीच्या अंगावर चढलेले आहेत खरे, पण हें एवढंच सत्य पटायचं भाग्य ज्याला लाभलंय त्यालाच सांगतां येईल कीं हें सत्य फार मोठं आहे!'

दहा पंधरा मिनिटपर्यंत आम्हीं दोघेही उगीच बसून राहिलों होतों. नंतर खालीं घातलेली मान वर करून राजलक्ष्मी म्हणाली, ' एवढ्याच उद्देशानं त्यानं जर घर टाकलं असेल, तर मी सांगून ठेवतें, त्याला पुन्हां घरीं जावं लागेलच लागेल! दुसऱ्याचं बरं करण्याच्या बुद्धीच्या पायीं केवढे कठीण प्रसंग या देशांत येतात तें अजून त्याला कळलेलं नाहीं. याचा मीं अनुभव थोडासा चाखला आहे. संशयानं, विरोधानं, लोकापवादानं माझ्यासारखंच त्याचं मन जेव्हां भंडावून उठेल त्यावेळीं पुन्हां फिरायची वाट त्याला सांपडणार नाहीं. '

' शक्य आहे! ' मी साथ देऊन म्हटलं, ' पण या सर्व प्रसंगाची त्याला चांगली कल्पना आहे असं मला वाटतं. '

' मुळींच नाहीं—मुळींच नाहीं! ' सारखी मान हालवीत राजलक्ष्मी म्हणाली, ' ज्याला माहीत असेल तो असल्या भानगडींत पडणार नाहीं—मी सांगून ठेवतें. '

उत्तर द्यायला कांहीं जागाच नव्हती. बंकूच्या तोंडून मी ऐकलं होतं, कीं सासुरवाडीच्या गांवांत गांवाच्या सेवेसाठीं तिनं कितीतरी परोपकारी योजना केल्या होत्या. त्यापायीं अपमान होण्यापलीकडे दुसरं कोणतंच बक्षिस तिला मिळालं नाहीं. त्या निष्काम परोपकाराच्या पायीं झालेल्या यातना कित्येक दिवस तिच्या मनाला लागून राहिल्या होत्या.

आणखीही एक बाजू लक्षांत घेण्याजोगी होती, पण ती नुकतीच बरी झालेली जखम पुन्हां उकरून काढणं मला बरं वाटलं नाहीं म्हणून मी उगीच राहिलों. राजलक्ष्मी जें म्हणाली तेंही कांहीं खोटं नव्हतं. मी माझ्या मनाशींच म्हटलं, असं कां व्हावं? चांगलं करायचे प्रयत्न दुसऱ्याच्या नजरेला संशयास्पद कां वाटावे? हें सारं फुकट जाऊन माणसाच्या दुःखाचा भार हलका कां होऊं नये? असं वाटलं, बुवाजी इथं असता, किंवा जर तो कधीं फिरून आला तर हें कोडं उलगडण्याचं काम त्याच्यावर सोंपवीन.

त्या दिवशीं सकाळपासून जवळच कुठून तरी मधूनमधून सनईचा आवाज ऐकूं येत होता. अशा वेळीं रतनला पुढं घालून कांहीं लोक येऊन अंगणांत उभे राहिले. रतन पुढं येऊन म्हणाला, ' बाईसाहेब, हे लोक आपल्याला ' राजवरण' द्यायला आले आहेत.—या ना तुम्हीं असे. काय तें होऊन जाऊं दे. ' असं म्हणून त्यानं एका वयस्क माणसाला पुढं यायची खूण केली.

तो गृहस्थ पिवळं धोतर नेसून आला होता. गळ्यांत तुळशीच्या मण्याची माळ

होती. अतिशय संकोचित वृत्तीनं तो पुढं आला नि ओटिच्या खालीं एका ताज्या शालपत्रावर एक रुपया नि एक सुपारी राजलक्ष्मीच्या पायाच्या बाजूला ठेवून जमिनीवर डोकं ठेवून नमस्कार करून म्हणाला, ' आईसाहेब, आज माझ्या मुलीचं लग्न आहे.

राजलक्ष्मीनं उठून त्याचा स्वीकार केला नि मोठ्या उत्साहानं ती म्हणाली, ' मुलीच्या लग्नाच्या वेळीं हें द्यावं लागतं वाटतं ? '

' नाहीं—तसं नाहीं ! ' रतन म्हणाला, ' शक्त्यनुसार प्रत्येकजण जमिनदाराला अशा वेळीं कांहीं तरी देत असतो. हा हलक्या जातीचा आहे—डोंब आहे. बिचाऱ्याला यापेक्षां काय देतां येणार ? त्यांतून हे असले दिवस !—'

त्याचं भाषण संपायच्यापूर्वींच, रुपया डोंबाकडचा आहे असं कळतांच राजलक्ष्मीनं घाईघाईनं तो परत केला—ती म्हणाली, ' तर मग राहूं दे. याची कांहीं जरूरी नाहीं. मुलीच्या लग्नाच्या खर्चाला उपयोगीं पडेल. '

रुपया परत दिल्यामुळं मुलीच्या बापाला फार वाईट वाटलं—त्याहीपेक्षां रतनला जास्त वाईट वाटलं. हा एक मान आहे. ' राजवरण ' केल्याशिवाय कार्यप्रस्थान होत नाहीं, तेव्हां तें घेतलंच पाहिजे असं परोपरीनं विनवून त्यानं सांगितलं. मी आंत खोलींत बसलों होतों. सुपारीसकट रुपया घ्यायचं राजलक्ष्मी कां टाळीत होती, तसंच रतन तो घेण्यासाठीं एवढा आग्रह कां करीत होता हें मला चांगलं माहीत होतं. यापेक्षां जास्त रक्कम दिली पाहिजे होती. कुशारी दिवाणजींनी ती तशी वसूल केली असती म्हणून हा घाट घडवून आणला होता. एवढ्याचसाठीं त्या लोकांची म्होरकेगिरी पत्करून मुद्दाम त्यांचा अर्ज पेश करण्यासाठीं आला होता. त्यानं त्या लोकांना चांगलंच आश्वासन दिलेलं असावं.

या संकटांतून त्याला सोडवण्यासाठीं मी पुढं सरसावलों नि रुपया उचलून घेऊन म्हणालों, ' मला पोंचला. तुम्हीं जाऊन आतां लग्नाच्या तयारीला लागा.

रतनला पूर्णपणें समाधान वाटलं नि अस्पृश्याच्या हातचं दान घेण्याच्या संकटांतून राजलक्ष्मीचीही सुटका झाली. ती खूष होऊन म्हणाली, ' एकंदरींत बरं झालं. ज्यानीं घ्यायचं त्यांनीं आपल्या हातानीं घेतलं ' असं म्हणून ती हंसली.

मधू डोंब कृतकृत्य होऊन हात जोडून म्हणाला, ' हुजूर, प्रहर रात्रीला लग्न आहे. एकवेळ पायधूळ झाडून जायची कृपा व्हावी. ' असं म्हणून त्यानं माझ्याकडे नि राजलक्ष्मीकडे अगदीं काकुळतवाण्या नजरेनं पाहिलं.

मी कबूली दिली. राजलक्ष्मी जरा हंसून म्हणाली, ' हा सनईचा आवाज येतो आहे हेंचं तुझं घर वाटतं मधू ? ठीक आहे, वेळ झाला तर क्षणभर येऊन जाईन. ' रतनकडे वळून ती म्हणाली, ' मोठी ट्रंक उघडून पहा बरं माझ्या नव्या साड्या आणल्यायुत कीं नाहींत ? जा. त्यांतली एक मुलीला देऊन ये जा. इथं कुठं मिठाई मिळत नाहीं ना ? बतासे मिळतात ? बरं बरं. तेच थोडे घेऊन देऊन ये रतन. बरं मधू, तुझ्या मुलीचं वय काय ? वर कुठला आहे ? किती माणसं जेवायला येणार ? तुम्हां लोकांचीं किती घरं आहेत या गावांत ? '

जमिदारबाईसाहेबांनीं एकदम एवढे प्रश्न केल्यामुळें बिचारा मधू घाबरून गेला. मोठ्या अदबीनं त्यानं सारी हकीकत सांगितली. त्याच्या मुलीचं वय नवऱ्याच्या आसपास होतं. वर चांगला तरुण होता. तीस चाळीसापेक्षां जास्त नसावा. उत्तरेच्या बाजूला पांच एक कोसांवरच्या गांवीं त्याचं घर! या गांवांत त्याच्या जातीचीं माणसं खूप होतीं. जातीचा धंदा कुणी करीत नव्हते. बहुतेक सारे शेतकरी होते. मुलगी सुखाला लागेल. पण भीति होती काय ती त्याच रात्रीची वराकडचीं वऱ्हाडीमाणसं किती येतील नि कुठं काय भानगडी उपस्थित करतील तें आजच्या दिवशीं कांहीं सांगतां आलं नसतं. तीं माणसं चांगलीं सुखी होतीं—तेव्हां मानापमानाच्या सगळ्या बाबी ठीकठाक होऊन कार्य निर्विघ्नपणें कसं पार पडणार या भीतीनं मधू अर्धमेला झाला होता.

ही सर्व हकीकत विस्तारपूर्वक वर्णन करून तो काकुळतीला येऊन म्हणाला, ' गूळ, काकवी, दहीं वगैरे सारं मिळवलंय्. आयत्यावेळीं पानीं दोन बतासेसुद्धां वाढतां यायची तजवीज ठेवली आहे. पण आयत्यावेळीं कांहीं भानगड उपस्थित झाली तर त्यावेळीं कुणाचा तरी पाठिंबा हवा. '

त्याला आश्वासन देऊन राजलक्ष्मी म्हणाली, ' कांहींसुद्धां भानगड व्हायची नाहीं मधू. माझा आशिर्वाद आहे, तुझ्या मुलीचं लग्न निर्विघ्न पार पडेल. एवढी सारी तयारी केली आहेस—वऱ्हाडी लोक खूष होऊन घरीं जातील.

साष्टांग नमस्कार करून बरोबरच्या माणसांना घेऊन मधू निघून गेला. पण या आशिर्वादामुळं त्याला फारसं आश्वासन मिळाल्याचं त्याच्या मुद्रेवरून दिसून आलं नाहीं. मुलीचा बाप या नात्यानं तो घाबरून गेला होता. रात्र उलटल्याशिवाय त्याचं समाधान झालं नसतं.

लग्नघरीं पायधूळ झाडायची,कबूली दिली होती खरी, पण खरोखरच जायचं

आम्हां कुणाच्याच मनांत नव्हतं. संध्याकाळ उलटल्यावर दिव्याजवळ बसून राजलक्ष्मी कच्चा जमाखर्च मला सुनावीत होती, मीही बिछान्यावर आडवा होऊन कांहीं ऐकत होतों, कांहीं नव्हतों. तितक्यांत लग्नघरीं गडबडीचा आवाज जरा मोठ्याच प्रमाणांत वाढलेला ऐकूं आला. राजलक्ष्मी मधेंच हंसून म्हणाली, 'डोंबाघरचं लग्न—मारामारी तर झाली नाहीं ?'

मी म्हटलं, 'उच्च वर्णाच्या लोकांची नक्कल चालली असेल झालं. ती पूर्वीची हकिकत आठवते ना ?'

राजलक्ष्मीनं नुसता हुंकार दिला. क्षणभर ती कान देऊन ऐकत होती. नंतर एक सुस्कारा सोडून म्हणाली, 'या आमच्या जळ्ळ्या मेल्या देशांत भानगडी होतात त्या मुलीच्या लग्नाच्या वेळीं. या कामीं हलके-मोठे सारेच सारखे. सकाळीं आलेले हे लोक गेले त्यावेळीं मी चौकशी केली. नऊ वर्षाच्या या एवढ्याशा पोरीला कुठल्या तरी अनोळख्या घरांत जे एकदां घेऊन जातील ते पुन्हां येऊं देतील, कीं काय याचीच शंका ? यांचा दस्तुरच असा आहे मुळीं ! बापानं सहा रुपयाला मुलगी विकली असंच समजायचं ! चार दिवस मुलीला माहेरीं पाठवा म्हणायचा अधिकार नाहीं बापाला ! बिचारी पोरगी रडत राहील तिकडे ! तिला बिचारीला लग्न काय होय ?'

जन्मभर याच भानगडी पहात आलों होतों. थोडंसं या प्रकरणीं मला जाणवलंही होतं. असा मात्र राग करायच्या पलीकडे माझी वृत्ती गेली होती. अर्थात् कांहींच उत्तर न देतां उगीच राहिलों.

मी उत्तर देत नाहीं असं पाहून ती म्हणाली, 'उच्च असो कीं नीच असो, आमच्या या देशांत लग्न म्हणजे नुसतं लग्नच नव्हे—तें एक धर्मकार्य आहे.' असं आहे म्हणून, नाहींतर—मीं म्हणणार होतों, 'हें जर धर्मकार्य आहे असं आपल्याला पटतं तर मग तक्रार कसली करायची ? धर्मकार्य करतांना मनाला उत्साह यायच्या ऐवजीं जर संकट वाटूं लागलं, तर त्या कार्याला धर्मकार्य म्हणायचं कोणत्या आधारावर ?' मीं बोलायच्या पूर्वी राजलक्ष्मी स्वतःच म्हणाली, 'पण ज्यानीं हे सारे नियम लावून दिले आहेत, ते होते त्रिकालदर्शी ऋषि. शास्त्र वाक्य खोटंही नव्हे, अमंगलही नव्हे. आम्हांला तरी कुठं काय समजतंय अन् कुठं काय उमजतंय ?'

झालं. जें बोलणार होतों तें बोलायचं राहिलं. या संसारांत जें काय म्हणून

करायचं तें सारं या त्रिकाल ऋषींनीं भूत, भविष्य नि वर्तमान अशा तिन्ही कालांचा आढावा घेऊन प्राचीन कालापासून निश्चित ठरवून टाकलंय. कांहीं तरी स्वतंत्र नि नवीन विचार करायला या दुनियेंत त्यांनीं अवकाशच ठेवला नाहीं.

हा सिद्धांत कांहीं राजलक्ष्मीनं सांगितला असं नव्हे—पूर्वी पुष्कळांच्या तोंडून हेंच ऐकत आलों होतों नि असाच उगाच राहिलों होतों. या प्रकाराबद्दल चर्चा करायला गेलों तर आधीं वाद माजतो नि पुढं व्यक्तिगत कलहांत त्याचं रूपांतर होतं हें मला माहित होतं. त्रिकालदर्शी ऋषींची मीं थट्टा करीत नाहीं. राजलक्ष्मी-प्रमाणेंच माझीही त्यांच्यावर मोठी भक्ती आहे. मला वाटतं तें एवढंच, या त्रिका-लदर्शी लोकांनीं आम्हींही पुढं इंग्रजी अंमलाखालीं येणार आहोंत हें ध्यानीं घेऊन जर सारे नियम आंखले असते तर आज येणाऱ्या पुष्कळशा अडचणींतून आमची मोकळीक झाली असती—आम्हींही कदाचित् खरोखरच जगलेवांचलेले राहिलों असतों. माझ्या मनांतले विचार राजलक्ष्मीला आरशांत पाहिल्याप्रमाणें स्पष्ट दिसत हें मीं पूर्वीच सांगितलं आहे. त्या दिव्याच्या अंधुक प्रकाशांत तिनं माझ्या चेहऱ्या-कडे जरी पाहिलं नाहीं तरीही, कोण जाणे कशा रीतीनं, तिनं अगदीं माझ्या अंत-रंगांतल्या विचारांना अचूक ठाव घेतला. ती म्हणाली, ‘ पुढं काय होईल याची कल्पना करून कुणी हे आचारविचार ठरवलेले नाहींत--मग ही उगाच उठाठेव कशाला, असं तुम्हांला वाटतंय्—पण मीं म्हणतें, हें असंच व्हायचं. माझे गुरुजी म्हणत होते, कीं भविष्यकालाचा जर त्यांना अंदाज करतां आला नसता तर हे जिवंत मंत्र त्यांनीं घडवलेच नसते. आमच्या शास्त्रांतल्या मंत्रांत कांहीं तथ्य आहे एवढं तरी कबूल आहे का? ते जिवंत आहेत असं तरी वाटतं का तुम्हांला? ’

‘ होय. ’ मीं म्हटलं.

राजलक्ष्मी म्हणाली, ‘ कबूल करा, कीं करूं नका पण ते खरे आहेत यांत शंका नाहीं. तसं नसतं तर आमच्या देशांतली ही बाहुलाबाहुलींचीं लग्नं साऱ्या जगांतलीं सर्वांपेक्षां श्रेष्ठ अशीं विवाहबंधनं ठरलींच नसतीं. हें जें चाललंय् तें सारं त्या सजीव मंत्रांच्या जोरावर. त्या ऋषींच्या कृपेनं! अनाचार-पाप कुठं नाहीं? सर्व ठिकाणीं आहेच—पण आमच्या देशांतील सतीचं मोठेपण दुसऱ्या कुठं दिसून येतंय् तें दाखवा पाहूं? ’

‘ नाहीं! ’ मी म्हटलं, ‘ पण हा त्या आचाराचा परिणाम नव्हे. हा नुसता अंधविश्वास! ’ इतिहासाचाच प्रश्न असता तर, सजीवमंत्रहीन असलेलीं अशा

अनेक देशांतील सतींचीं आदर्श उदाहरणं मीं दाखवून दिलीं असतीं. अभयेचा उल्लेख केला असता तर हाच प्रश्न विचारतां आला असता. तुमच्या जिवंत मंत्रांनीं जर स्त्रीपुरुषांना बांधून ठेवतां येतें तर ती कशी मोकळी सुटली ?

पण या साऱ्या उदाहरणांची कांहीं जरुरी नव्हती. अलिकडे तिच्या मनाचा ओढा कोणत्या बाजूला झुकतो आहे याचा मला अंदाज होता. दुष्कृतीच्या वेदना तिला चांगल्या जाणवत होत्या. अंतःकरणापासून ज्याच्यावर प्रेम असतें त्याला कोणत्याही प्रकारें कलुषित न करतां हें जीवन कसं सार्थकीं लावावं एवढंच काय तें तिला कळत नव्हतं. सहजीं लोभांत न पडणारं तिचं अंतःकरण नि तिची प्रौढ धर्मवृत्ती, या दोन्ही प्रतिकूल मार्गानं वाहणाऱ्या प्रचंड प्रवाहांना कशा रीतीनं एका जागीं आणावं नि त्यामुळं आपल्या दुःखी जीवनांत पवित्रतेचा लाभ करून घ्यावा, हें कळणं तिला फार कठीण जात होतं.

पण मला तें कळलं होतं. दुसऱ्याच्या हातीं स्वतःचं आत्मार्पण करीपर्यंत दुसऱ्याचे अंतर्गत आक्षेप रोज माझ्या नजरेला पडत होते—चांगले स्पष्टपणं नव्हेत पण जेवढं माझ्या नजरेला येई तेवढ्यावरून मला असं वाटे, कीं जी अनावर कामना एकाद्या बेफाम कैफाप्रमाणं तिच्या साऱ्या मनाला उन्मत्त करून ठेवीत होती, ती आज स्थिरस्थावर होऊन तिच्या भाग्याचा हिशेब आतां दाखवून देत होती. या हिशेबाची आंकडेमोड कशी होती तें मला माहीत नव्हतं. तरीही कशा रीतीनं आणि कुठं माझं स्वतःचं हजार ठिकाणीं फाटलेलं जीवन, ती कशा रीतीनं गांठवीत होती याचा वारंवार मला विचार पडत होता.

हा विचार करून कांहीं फायदा झाला नाहीं. आजवर ज्या मार्गानं जात आलों, जरूर पडली तर पुन्हां त्याच मार्गानं प्रवास करावा एवढाच विचार माझ्या अंतःकरणांत जागा राहिला होता. स्वतःच्या सुखासमाधानासाठीं दुसऱ्या कुणाचं जीवन अटीतटीचं व्हावं असं मला वाटत नव्हतं.

आश्चर्याची गोष्ट ही होती, कीं ज्या मंत्राच्या सजीवपणाबद्दल चर्चा करतांना एका घटकेला आमच्यांत मतभेद उत्पन्न झाला होता, त्याच प्रसंगामुळें शेजारच्या घरीं त्याच वेळीं मल्लयुद्ध सुरू झालं होतं, हें आम्हां दोघांनाही माहीत नव्हतं.

अकस्मात पांच सात असामी घाबऱ्याघुबऱ्या दोन दिवट्या घेऊन आमच्या अंगणांत येऊन हजर झाले नि ' हुजूर ! बाबू महाशय ! ' म्हणत केंविलवाण्या हांका मारूं लागले.

मी घाबरून बाहेर आलों. आश्चर्यचकित झालेली राजलक्ष्मीही बाहेर येऊन माझ्या शेजारीं उभी राहिली. सगळेच एकदम एकाच शब्दांत बोलायचा प्रयत्न करीत होते.

रतन सारखा त्यांच्या अंगावर ओरडत होता, पण शेवटपर्यंत कुणीच माघार घेईना. त्यांच्या त्या बडबडींतून झाल्या प्रकाराबद्दल मी अटकळ बांधली. कन्या-दान तहकूब झालं होतं. लग्नाचे मंत्र भलतेच म्हटले म्हणून वरपक्षाच्या पुरोहि-तानं कन्यापक्षाच्या पुरोहिताच्या हातून पूजेचं सामान काढून घेऊन फेकून दिलं नि त्याचं तोंड बंद केलं. खरं पाहिलं तर हा शुद्ध गाढवपणा होता. पुरोहिताची जात किती तरी भानगडी करीत असते. पण म्हणून दुसऱ्या गांवच्या माणसानं येऊन या गांवच्या माणसाच्या हातून सामान काढून घ्यावं, नि जबरदस्तीनं त्याचं तोंड बंद करावं—नि या स्वतंत्र नि सजीव अशा मंत्राच्या उच्चारणाला विरोध करावा–असा प्रकार यापूर्वी कधींच झाला नव्हता.

काय बोलावं तें राजलक्ष्मीला सुचेना. रतन खोलींत जाऊन कांहींतरी गडबड करीत होता. बाहेर येऊन तो त्यांच्या अंगावर खेकसून ओरडला नि म्हणाला, " तुम्हांला कशाला रे हवा पुरोहित ? डोंबधेडांना आधीं लग्न कशाला ?—त्यांतून आणखी म्हणे पुरोहित ! हें काय ब्राह्मणकायस्थाच्या घरचं कार्य आहे, तो ब्राह्मण पुरोहित येऊन तुमचं लग्न लावणार आहे ? ' असं म्हणून तो मोठ्या अभिमानानं माझ्या नि राजलक्ष्मीच्या चेहऱ्याकडे पुन्हां पुन्हां पाहूं लागला. रतन जातीचा न्हावी होता हें इथं सांगून ठेवणं अवश्य आहे.

मधू डोंब तिथं आला नव्हता. तो कन्यादानाला बसला होता. त्याचा कुणी नातेवाईक आला होता. त्याच्या सांगण्यावरून कळून आलं, कीं त्यांच्या लग्न-कार्याला ब्राह्मण लागत नाहीं. ते स्वतःच स्वतःची पुरोहितगिरी करतात. तरीपण त्यांचा पुरोहित राखाल पंडीत होता. कारण त्याच्या गळ्यांत जानवं होतं नि तो षट्-कर्म करीत असे—त्यांनीं शिवलेलं पाणीसुद्धां घेत नसे. अर्थात् एवढ्या मोठ्या सात्त्विक माणसाच्या विरुद्ध तक्रार करणं योग्य नव्हतं. अस्सल ब्राह्मणाशीं तुलना करतांना जरी जो सत्पात्र ठरला नसता तरीही तो एकप्रकारें ब्राह्मणच होता. त्याच्या काकुळतीमुळें नि लग्नघरांतून ऐकूं येणाऱ्या आरडाओरडीमुळं मला तिकडे जावं लागलं. मी राजलक्ष्मीला म्हटलं. 'तूं ही ये ना ! इथं एकटी घरीं काय करणार ?'

पहिल्यानं ती नाहीं म्हणत होती. पण जिज्ञासा जागी झाल्यामुळें तीही

ग्रा. क्र. ३७५ ........ नों. दि ............
वि. .......... क्र. ............


माझ्या बरोबर आली. मधूच्या नातेवाईकानं अतिशयोक्ती केली नाहीं, हें मला तिथं जातांच दिसून आलं. भांडण विकोपाला जाऊं लागलं होतं. एका बाजूला वरपक्षाचे तीसबत्तीस वऱ्हाडी नि दुसऱ्या बाजूला कन्यापक्षाचेही तितकेच होते. दोघांच्यामधें मला लठ्ठ शिबू पंडीत गरीब बिचाऱ्या राखाल पंडीताचा हात धरून उभा होता. आम्हांला पहातांच त्याचा हात सोडून तो बाजूला झाला. आम्हांला मोठ्या आदरानं एक चटई अंथरून बसवण्यांत आलं. या अचानक तंट्याचं कारण काय असं शिबू पंडीताला ज्यावेळीं विचारलं त्यावेळीं तो म्हणाला, 'मंत्रांतला 'म'—देखील ज्याला ठाऊक नाहीं, तो आपल्याला पंडीत म्हणवतो! सारा लग्नविधी फुकट गेला असता.'

'हो, हो गेला असता.' तोंड वेंगाडून राखाल म्हणाला, 'पांच गांवांत शिष्य आहेत माझे—रोज लग्न लावतोंय्—नि म्हणे मला मंत्र येत नाहीं!'

इथं देखील पुन्हां मंत्रच! घरीं राजलक्ष्मीशीं बोलतांना मौनानंच उत्तर दिलं होतं. पण इथं मध्यस्ती करायला गेलों तर बाजू अंगावर यायची भीति होती. बराच वादविवाद झाला. शेवटीं असं ठरलं, कीं राखाल पंडीतानंच मंत्र म्हणावेत पण त्याची कुठं चूक झाली तर शिबूसाठीं त्यानं आसन खालीं करावं.

राखालनं कबूली दिली. तो पुरोहिताच्या आसनावर बसला. वधूच्या बापानं हातीं फुलं घेऊन वरवधूचे दोन्हीं हात एकत्र धरून ज्यावेळीं वैदिक मंत्रपठन सुरू झालं—तें अजूनही मला आठवतं. ते मंत्र सजीव होते कीं नव्हते हें कांहीं सांगतां आलं नसतं. मीं पढलेला नसल्यामुळं ऋषींनीं वेदांत असले कांहीं मंत्र रचून ठेवले होते कीं नव्हते हें मला सांगतां आलं नसतं.

राखाल पंडीत वराला म्हणाला, 'हं म्हणा. मधू डोमाय कन्याय नमः।'

वरानं म्हटलं, 'मधू डोमाय कन्याय नमः।'

राखाल वधूला म्हणाला, 'आतां म्हण' 'भगवती डोमाय पुत्राय नमः।'

मुलीला मंत्र चांगल्या रीतीनं उच्चारतां येणार नाहीं असं वाटून, मधू डोंब ते स्वतः म्हणत होता—तोंच शिबू पंडीत एकदम दोन्ही हात वर करून वाघासारखा वर उठला, 'हे मुळीं मंत्रच नव्हत. हें लग्न झालं नाहीं.'

मीं मागं वळून पाहिलं तों राजलक्ष्मी तोंडाला पदर लावून हंसूं आवरण्याचा प्रयत्न करीत होती. जमलेले सारे लोक एकमेकांना मागं सारीत झाला प्रकार पहायचा प्रयत्न करीत होते. शरमिंदा झालेला राखाल पंडीत कांहीं तरी बोला-

यचा प्रयत्न करीत होता पण त्याचं भाषण कुणीच कानीं घेतलं नाहीं. सारेच शिबूच्या पायां पडणीला लागले होतें. कुणी म्हणाला, ' पंडित महाराज, आतां मंत्र आपणच म्हणा ? नाहीं तर हें लग्न कांहीं व्हायचं नाहीं. चौथा हिस्सा त्याला देऊन दक्षिणेंतले बाकीचे बारा आणे तुम्हींच घ्या पंडीतमहाराज. '

शिबू पंडीताचा उदारपणा जागा झाला होता, तो म्हणाला, ' राखालचा दोष नाहीं. या इकडल्या भागांत अस्सल मंत्र माझ्याखेरीज कुणालाच येत नाहींत. मला जास्त दक्षणा नको आहे. मीं इकडले मंत्र म्हणतों. राखालनं तिकडले म्हणावे. ' असं म्हणून हा महाशास्त्रज्ञ पुरोहित मोठ्या अवडंबरानं मंत्र म्हणूं लागला, नि त्यानं सांगितलेले मंत्र राखालपंडीत वरवधूकडून म्हणवून घेऊं लागला.

शिबूनं म्हटलं, ' म्हणा. मधू डोंबाय कन्याय भूज्यपत्रम् नमः

वरानं उच्चारण केलं, ' मधू डोंबाय कन्याय भूज्यपत्रम् नमः। '

शिबू म्हणाला, ' मधू आतां तूं म्हण, भगवती डोंबायपुत्राय संप्रदानम् नमः।'

मधूनं मुलीसह त्या मंत्राचा उच्चार केला. सारे तटस्थ-स्तब्ध झाले होते. शिबूच्यासारखी शास्त्रज्ञ व्यक्ती यापूर्वी या भागांत कधीं दिसलीच नाहीं असं सर्वांना वाटलं असावं.

वराच्या हातांत फुलं देऊन शिबू म्हणाला, ' विपिन, आतां तूं म्हण. जोंपर्यंत जीवत्तम् तोंपर्यंत भात कापड प्रदानम् स्वाहाः। '—

विपिननं थांबून थांबून मोठ्या कष्टानं किती तरी वेळ लागत एकदांचा मंत्राचा उच्चार केला.

शिबू म्हणाला, ' आतां वरवधू दोघेंही म्हणा. युगल मिलनम् नमः। '

वर वधूच्या तर्फेनं मधूनं हा मंत्र म्हटला. चोंहोकडून ' हरीबोल 'चा उच्चार सर्वत्रांनीं सुरू करून वरवधूला उचलून घरांत नेण्यांत आलं. माझ्या चोंहोंबाजूनं सारेच मोठमोठ्यानं कुजबुजत होते, ' हां. शास्त्र जाणणारा म्हणतात तो हा ! आणि मंत्र म्हणतात ते पण हेंच ! राखाल पंडीत इतके दिवस आम्हांला नुसता ठकवीत होता. ' अशी सर्वांनीं एकमतानं कबूली दिली.

तिथं असेपर्यंत गंभीरपणा दाखवीत तसंच गांभीर्य कायम ठेवून राजलक्ष्मीला हाताशीं घेऊन मीं घरीं परत आलों. आतांपर्यंत तिनं कसं आत्मसंयमन केलं होतं कोण जाणे, घरीं येऊन पोंचतांच जें तिला हंसूं लोटलं त्यानं जीव कासावीस होईल कीं काय असं वाटलं. बिछान्यावर गडबडां लोळत म्हणाली, ' हां, हा

मात्र महामहोपाध्याय खरा! राखाल इतके दिवस सर्वांना ठकवीत होता नुसता.'

आधीं मी हंसं आवरून घेतलं नि नंतर म्हणालों, ' दोघेही महामहोपाध्यायच! आजपर्यंत यांच्या मुलीची आई अन् आजी या साऱ्याचीं लग्नं यानीं अशींच लावलीं. राखालचं एक असो पण शिबू पंडिताचे मंत्र देखील ऋषीरुवाच कांहीं वाटले नाहींत. पण यांतला कुठलाच मंत्र आजवर कांहीं फुकट गेला नाहीं. याच मंत्रानीं लावलेल्या विवाहाची गांठ आजवर तेवढीच बळकट नि अभेद्य राहिली आहे.'

हंसूं आवरून राजलक्ष्मी उठून सरळ बसली नि सारखी टक लावून माझ्या तोंडाकडे पाहूं लागली. तिला काय वाटलं असेल यावेळीं ?

## ६

सकाळींच उठलों तो मला कळून आलं, कीं कुशारी महाशय दुपारच्या जेवणाचं आमंत्रण देऊन गेले. मला हीच शंका आली होती. मी विचारलं, ' मी एकटाच जायचा का ?'

' नाहीं,' राजलक्ष्मी हंसून म्हणाली, ' मलाही बोलावलंय !'

' मग जाणार का ?'

' जाणार तर काय !'

तिचं हें सरळ सरळ उत्तर ऐकून मी आश्चर्यचकित झालों. हिंदूधर्मांत ' जेवण ' हा प्रसंग केवढा महत्त्वाचा आहे नि समाजांतल्या कित्येक अडचणी त्या जेवणापायीं कशा उत्पन्न होतात हें राजलक्ष्मीला माहीत होतं. हे सारे निर्बंध ती अत्यंत निष्ठेनं पाळते हेंही मला माहीत होतं. मग तिनं असं उत्तर कसं दिलं ?

कुशारी महाशयासंबंधें मला फारसं कांहीं माहीत नव्हतं पण बाहेरून जेवढा अंदाज करतां येत होता तेवढ्यावरून मला वाटलं, कीं तो मोठा कर्मठ ब्राह्मण असावा. राजलक्ष्मीचा पूर्वेतिहास त्याला माहीत नसावा हें अगदीं निश्चित ! केवळ मालकीण म्हणून त्यानं आमंत्रण दिलं असावं पण राजलक्ष्मी आज तिथं जाऊन काम करतांना शेवटीं काय करील याची मला कल्पना करतां येईना. माझ्या प्रश्नाचा उद्देश कळला असूनही ती कांहीं बोलली नाहीं, त्यामुळंच तिच्या या निःसंकोच वृत्तीचं मला आश्चर्य वाटलं.

योग्य वेळीं गाडी येऊन हजर झाली. मी जाण्याच्या तयारीनं बाहेर आलों नि पाह्यलं तों राजलक्ष्मी गाडीजवळ उभी होती.

मी म्हटलं, ‘ येणार ना ? ’

‘ म्हणूनच तर उभी आहें ना ? ’ असं म्हणून ती गाडींत जाऊन बसली. रतन बरोबर येत होता. तो माझ्या मागं होता. मालकिणीचा एकंदर थाटमाट पाहून त्याला वाटलेलं कौतुक त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं. मलाही आश्चर्य वाटलं. पण तो जसा बोलला नाहीं तसाच मींही उगीच राहिलों.

हल्लीं बरेच दिवस घरीं असतांना ती अंगावर फारसे दागिने घालीत नसे. घालीत असे तेही बहुतेक कमी होत आले होते, पण आज तिच्या अंगावर दागिने नव्हतेच म्हटलं तरी चालेल. गळ्यांत अखंड असणारा एक हार नि हातांतली बांगड्यांची जोडी. मला चांगलंसं ध्यानांत नाहीं—तरीही वाटलं, काल रात्रीपर्यंत ज्या बऱ्याचशा बांगड्या हातांत होत्या त्या तिनं आज मुद्दाम काढून टाकल्या असाव्या. नेसलेली साडीही अगदीं साधीच होती. सकाळीं स्नान केल्यानंतर बदललेली तीच ती साडी असावी, गाडींत बसल्यानंतर मीं हळूच विचारलं, ‘ हळुहळू एक एक सारं टाकून देते आहेस वाटतं. आतां मीच काय तो एक बाकी राहिलोंय्.

माझ्या तोंडाकडे पहात थोडंसं हंसून ती म्हणाली. ‘ कुणी सांगावं ? या एकांतच साऱ्याचा समावेश होत असेल ! उगीच वाढ होत होती, त्यांतील एकएक आपोआप गळत गेलं, ’ असं म्हणून तिनं रतन जवळपास आहे कीं काय तें मागं वळून पाह्यलं. गाडीवाल्याला सुद्धां ऐकूं न येईल इतक्या आवाजांत ती म्हणाली, ‘ बरं, बरं !—आतां तेवढाच आशिर्वाद द्या ना तुम्ही ! तुमच्याहून मोठं या जगांत मला कांहीं नाहीं. त्या तुम्हालाही सहज बदल करून देतां येईल आशिर्वाद आतां तुम्हींच द्या मला.

मीं गप्प बसलों. विषय भलतीचकडे झुकला. या प्रश्नाचं उत्तर देणं मला मुळींच शक्य नव्हतं. तीही कांहींच न बोलतां मोठा तक्क्या ओढून घेऊन कुरघुशी मारून माझ्या पायांजवळ झोंपली.

आमच्या या गंगामाटीपासून पोडामाटीला जायचा रस्ता फार सुंदर होता. समोरच्या कोरड्या नाल्यावर जो एक लहानसा कळकीचा सांकव आहे त्यावरून गेलं तर दहाबारा मिनिटांत जाऊन पोंचायला होई पण बैलगाडीनं जायला मोठं वळण घ्यावं लागत असल्यामुळं पोंचायला दोन तास लागले.

५५ ... २१४५८ ... दि. १-५-५

एवढ्या लांबीच्या प्रवासांत आम्हां दोघांत नंतर कांहींच बोलणं निघालं नाहीं. माझा हात आपल्या गळ्याजवळ ओढून घेऊन झोपेचं मिष करून ती उगीच पडून राहिली होती.

कुशारी महाशयांच्या दाराजवळ येऊन जेव्हां गाडी थांबली तेव्हां दोनप्रहर उलटून गेले होते. घरच्या मालकमालकिणींनीं येऊन आमचं स्वागत केलं. आम्हीं फार मोठे पाहुणे असल्यामुळं आम्हांला ओटीवर न बसवतां एकदम आंत माजघरांत नेण्यांत आलं. थोड्याच वेळांत मला दिसून आलं, कीं शहरापासून दूर असणाऱ्या या खेड्याच्या भागांत शहरासारखे शिष्टाचाराचे कडक नियम नाहींत. आमचं आगमन झालं असं कळतांच शेजारचे काका, दादा, आत्त्या, मावशा येऊन एकदम गोळ्या झाल्या. अगदीं सलगीच्या संबोधनानं कुशारी नि त्यांच्या बायकोला हांका मारीत येऊन एकएक दोन दोन असे घरांत प्रवेश करून तमाशा पाहूं लागले. त्यांतल्या साऱ्याच बायका कांहीं अबला नव्हत्या.

राजलक्ष्मी पदर फार पुढं ओढून घेत नसे. तिही माझ्याचसारखी ओटीवरच्या आसनावर येऊन बसली होती. कुणी अपरिचित बाई आली आहे, याची या अनाहुत शेजाऱ्यांना मुळींच खातरजमा वाटत नव्हती. कुणींही कसलाही संकोच धरीत नव्हते. भाग्य एवढंच, कीं ज्यांना बोलायची घाई झाली होती ते तिच्याकडे न जातां माझ्यावरच आपल्या प्रश्नाचा मारा करीत होते. घरमालक फार गडबडींत होते. गृहिणीही तशीच कामांत गुंतून राहिली होती. घरची एक विधवा मुलगी राजलक्ष्मीच्या शेजारीं बसून ताडाच्या पंख्यानं मुकाट्यानं वारा घालीत होती.

माझी प्रकृती कशी काय आहे, दुखणं कसलं होतं, किती दिवस रहाणार, गांव आवडलं कीं नाहीं, जमिदारीची व्यवस्था स्वतः पाहिली नाहीं तर घोटाळा होतो कीं काय, कांहीं नवीन व्यवस्था करण्याची जरूरी वाटली कीं काय वगैरे वगैरे सार्थ नि निरर्थक प्रश्न मला केले जात होते—नि त्यांतूनच मीही कुशारीमहाशयांची एकंदर परिस्थिती कशी काय आहे याचाही अंदाज घेत होतों.

या घराला बऱ्याच खोल्या होत्या. भिंती मातीच्याच होत्या. तरीही मला वाटलं कीं काशीनाथ कुशारी यांची परिस्थिती एकंदरींत बरीच समृद्ध—नव्हे एकंदरींत चांगलीच संपन्नतेची होती. घरांत प्रवेश करतांनाच चंडीमंडपाजवळ धान्याचं एक मोठं पेव दिसलं. आंत आलों त्यावेळीं अंगणांतही आणखी दोन पेवं दिसून आलीं. समोरच मला वाटतं, सैंपाकघर असावं. त्याच्या उत्तरेला

पडवींत जवळ जवळ दोन लाटी होत्या. नुकतंच धान्य कांडायचं काम संपलं असावं असं वाटलं. समोरच मोठ्या वडाखालीं धान्य भरण्याच्या दोन घिरटी चांगल्या झाडून पुसून ठेवलेल्या दिसून आल्या. त्या सारवलेल्या अंगणांत झाडाच्या सावलीखालीं दोन लठ्ठ वासरं मान मुडपून झोंप घेत होतीं. त्यांच्या आया मला कुठं दिसल्या नाहींत खऱ्या, पण एकंदरींत अंदाज आला, कीं कुशारी कुटुंबांत अन्नाप्रमाणंच दुधाचाही तुटवडा नव्हता. उजवीकडच्या ओटीवर भिंतीला टेकून सहासात मोठे मातीचें रांजण निवण्यावर ठेवलेले होते. त्यांत बहुधा गूळ असावा. ज्या व्यवस्थेंत ते रांजण होते. त्यावरून ते मोकळे असतील असं वाटलं नाहीं. खुंटीवर ताग नि सणाचे धागे भरगच्च बांधून ठेवलेले होते. घरांत लागणारीं दोऱ्यादोरखंडं तिथंच तयार केलीं जात असावीं असं मी अनुमान केलं.

कुशारीची बायको जेवणाच्या तयारींत गढलेली असावी. घरमालकसुद्धां एकदां स्वागत करून गेले ते पुन्हां दिसले नाहींत. मधेंच ते घाईघाईनं आले नि गेल्याबद्दल राजलक्ष्मीची माफी मागून म्हणाले, ‘ आतां असाच जाऊन येतों आईसाहेब. अजून रोजचं आन्हीक व्हायचं आहे. ’

पंधरासोळा वर्षांचा एक धष्टपुष्ट मुलगा ओटीच्या खालीं उभा राहून लक्ष लावून आमचं बोलणं ऐकत होता. कुशारी महाशयांची नजर त्याच्याकडे जातांच ते म्हणाले, बाळ हरिपद, देवाचा सैंपाक इतक्यांत तयार झाला असेल. एवढ्यांत नैवेद्य दाखवून ये बाबा. तितक्यांत बाकीचं आन्हीक उरकून मी हा अस्साच येतों. ’ माझ्याकडे पाहून म्हणाले, ‘ आपल्याला उगीच फार त्रास झाला, फारच उशीर झाला. ’ असं म्हणून माझ्या प्रत्युत्तराची अपेक्षा न करतां ते पहातां पहातां दिसेनासे झाले.

आतां योग्यवेळीं—अर्थात् योग्यवेळ बराच उलटून गेल्यावर आमच्या दुपारच्या जेवणाचीं ताटं मांडल्याची खबर आली. सुटलों एकदांचा ! म्हणजे जेवायला उशीर झाला म्हणून नव्हे, तर गोळा झालेल्या लोकांच्या प्रश्नाच्या भडीमारानं जो बेजार झालों होतों त्यांतून एकदांचा सुटलों. जेवणाची तयारी झाली असं कळतांच—कदाचित् तेवढ्या वेळापुरतेच—जमलेले लोक एकदांचे घरोघर निघून गेले.

पण जेवायला बसलों तो मी एकटाच ! कुशारी महाशय माझ्याबरोबर जेवायला बसले नाहींत. नुसते समोर येऊन बसले. त्याचं कारण त्यांनीं मोठ्या मिनतवारीनं सांगितलं. मुंज झाल्यापासून जेवणाच्या वेळीं बोलायचं नाहीं असा त्यांचा

नेम होता. तें व्रत त्यांनीं आजवर कधीं मोडलं नाहीं. अर्थात् खोलींत एकट्या-नंच न बोलतां जेवायचा त्यांचा परिपाठ होता.

मी बरं वाईट कांहींच बोललों नाहीं. पण राजलक्ष्मीचंही एक कसलं तरी व्रत आहे, ती परान्न ग्रहण करीत नाहीं, असं कळलं तेव्हां मला आश्चर्य वाटलं नाहीं खरं, पण तिच्या त्या ढोंगाचा फार राग आला. काय जरुरी होती असं करायची ?

माझं मनोगत तिच्या चट्कन् लक्षांत आलं. ती म्हणाली, 'वाईट वाटून घ्यायचं नाहीं, अगदीं स्वस्थ चालूं द्या जेवण. मीं जेवणार नाहीं हें त्यांना माहीत आहे'

'पण मला माहीत नव्हतं! जेवायचं नव्हतं तर एवढा त्रास घेऊन आलीस कशाला ?'

राजलक्ष्मीनं याचं उत्तर दिलं नाहीं—उत्तर दिलं कुशारी बाईनीं. ती म्हणाली, "त्यांनीं एवढा त्रास घेतला माझ्यासाठीं बाबा. त्या इथं जेवणार नाहींत तें मला माहीत होतं. पण ज्यांच्या कृपेनं आम्हीं दोन घांस खातों त्यांची पायधूळ आमच्या घरीं लागावी एवढ्यासाठीं त्यांना त्रास दिला. नाहीं का आईसाहेब ?' असं म्हणून ती राजलक्ष्मीच्या तोंडाकडे पहात राहिली.

'याचं उत्तर आज देत नाहीं,' राजलक्ष्मी म्हणाली, 'देईन केव्हां तरी.' असं म्हणून ती हंसली,

मी आश्चर्यचकित झालों होतों. डोळे वर करून मीं कुशारीबाईकडे पाहिलं. तसल्या खबदंडींतल्या खेड्यांत इतक्या सुंदर रीतीनं कुणी खेडवळबाई बोलेल अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. पण खेड्यांतल्या खेडवळ बायकांच्या बाबतींत आणखीही कित्येक चमत्कार मला दिसून येणार होते याची त्यावेळीं मला कल्पना नव्हती.

मला वाढायचं काम विधवा मुलीवर सोंपवून कुशारीबाई विंझणा घेऊन मला वारा घालीत बसली. ती माझ्यापेक्षां वयानं बरीच मोठी असल्यामुळं माझ्या समोर डोक्यावर पदर पुढं ओढून घेण्याची तिला जरुरी भासली नाहीं. ती सुंदर होती कीं कुरुप होती याची कल्पना सुद्धां मला मला मनांत आली नाहीं, जातिवंत बंगाली आईची स्नेहशील नि दयाशील मूर्ति माझ्यासमोर दिसली. दाराजवळ घरवाले उभे होते. बाहेरून त्यांची मुलगी हांक मारून सांगत होती, 'तुमचं पान वाढलं आहे बाबा.'

फार उशीर झाल्यामुळं माझी बरदास्त राखण्यासाठीं मला वाटलं ते मुद्दाम

थांबून राहिले होते. तरीही एकदां बाहेर पाहून नंतर माझ्याकडे पहात ते म्हणाले ' एव्हां थांब म्हणावं. पाहुण्याचं जेवण—'

' नाहीं. तुम्हीं जा आतां ! ' गृहिणी त्यांना उद्देशून म्हणाली, ' जेवण थंड होतंय्. थंड झालेलं जेवण तुम्हांला जात नाहीं तें मला माहीत आहे. '

' थंड कसलं व्हायचं ! ' ते म्हणाले, त्यांना संकोच वाटत होता, ' पाहुण्याचं जेवण होऊन जाऊं दे आधीं. '

गृहिणी म्हणाली, ' मी स्वतः इथं बसलेली असतांना जर पाहुण्याची सरबराई व्यवस्थित व्हायची नाहीं तर तुम्हीं इथं उभं राहून तरी काय होणार ? तुम्हीं जा आतां. आतां तुम्हींच सांगा—' असं म्हणून ती माझ्याकडे पाहून हंसली.

मींही हंसलों नि म्हणालों, ' कदाचित् तुम्हीं इथं राहिल्यानंच गैरसोय होईल. आपण जा आतां कुशारी महाशय. तुम्हीं असे उपासपोटी उभे राहिलेले पाहून मलाहि बरं वाटत नाहीं. '

विशेष कांहीं न बोलतांच ते हळुहळू निघून गेले. पण सन्मान्य पाहुणे जेवीत असतां आपण गैरहजर असल्याचा संकोच त्यांना दूर करतां आला नसावा.

पण थोड्याच वेळानं कळून आलं, कीं हा माझा गैरसमज होता. ते निघून जातांच गृहिणी म्हणाली, ' ते कांहीं मांसमच्छर खात नाहींत. तशी कांहीं शिवा शिव झाली तर तें जेवणं चालत नाहीं त्यांना. म्हणून असं सक्तीनं पाठवून द्यावं लागलं. आपले अन्नदाते घरीं आलेले, ते जेवायच्या पूर्वी जेवायचं कसं ? '

तिचं भाषण ऐकून मला चमत्कारिक वाटलं. मी म्हटलं, ' अन्नदाता मी नव्हे. अन् असतों तरी कांहीं हरकत नव्हती. एवढ्या शुल्लक गोष्टीसाठीं एवढं कशाला मनाला लावून घ्यायचं ? '

कुशारीबाई क्षणभर उगीच राहिली. तिचा चेहरा उतरला असावा असं मला वाटलं. ती म्हणाली, ' तुम्हीं म्हणतां तें कांहीं खोटं नाहीं. देवदयेनं सारं कांहीं भरपूर आहे. पण असं वाटतं, देवानं एवढं दिलं नसतं तरी कांहीं वाईट झालं नसतं ! देवाची दयाच वाटली असती ती ! घरांत एकटी एक विधवा मुलगी ! पेवभर धान्य, घडाभर दूध, नि रांजण भर गूळ घेऊन काय करायचंय् आम्हांला ? हें सारं ज्यांच्यासाठीं तीं तर आम्हांला सोडून गेलेलीं ?—'

गोष्ट विशेष महत्त्वाची नव्हती खरी पण बोलतां बोलतां तिचे दोन्ही डोळे भरून आले. ओंठ थरथर कांपू लागले. या थोड्याशा भाषणांत कितीतरी व्याकुळना भरलेली असावी असं मला वाटलं. कदाचित् हातातोंडाला आलेला मुलगा

मरणं पावलेला असेल—किंवा जो मुलगा आत्तांच दिसला होता, तो चांगला कर्तासवरता होईल असं वाटत नसल्यामुळंही असे उद्गार निघाले असतील. मी उगीच राहिलों होतों. हातांत हात घालून राजलक्ष्मी देखील कांहींच न बोलतां बसून राहिली होती.

पुढल्या भाषणानं माझा गैरसमज दूर झाला. मनाचा आवेग सावरून ती पुन्हां म्हणाली, ‘ आमच्यासारखे त्यांचेही तुम्हीं अन्नदातेच ! यांना मीं म्हटलं, घरचं दुःख मालकांना सांगायला लाज कसली ? ही संधी साधून त्या नवराबायकोला घरीं आणलं असतं तर ? सदा रडूनकढून सांगून पहात असतें. म्हटलं एकदां कांहीं तरी मिटवामिटव करून टाका. ’ असं म्हणून तिनं पदरानं आपले डोळे पुसून घेतले.

प्रसंग फार चमत्कारिक झाला होता. माझ्याप्रमाणेंच राजलक्ष्मीलाही संशय पडल्याचं तिच्या मुद्रेवरून दिसून आलं. पण पूर्वीप्रमाणेंच आम्हीं दोघंजणं कांहीं बोललों नाहीं.

कुशारीबाई हळुहळू आपली दुःखाची कहाणी उघड करून सांगूं लागली. शेवटपर्यंत ती हकीकत ऐकल्यानंतर कुणाच्याच तोंडून एक शब्दसुद्धां निघाला नाहीं

पण ही सर्व हकिकत सांगण्यापूर्वी आधीं प्रस्तावनेची आवश्यकता आहे. राजलक्ष्मी परान्न घेत नाहीं हें कळल्यानंतर दुपारच्या जेवणाचं जें आमंत्रण देण्यांत आलं तिथपासून, घरमालकांना दुसरीकडे पाठवून देण्याची जी व्यवस्था करण्यांत आली तिथपर्यंत, सर्व हकिकती हिशोबांत घेतल्यावांचून करणार नाहीं. डोळ्यांत पाणी आणीत सद्गदीत वाणीनं कुशारीबाईनं जी जी कांहीं हकिकत सांगितली तींतील खरी किती नि खोटी किती होती हें एकपक्षी भाषण ऐकून ठरवणं कठीण होतं. मला मध्यस्ती घालून तिनं या प्रकरणाची मिटवामिटव करण्याबद्दल जी विनवणी केली ती जितकी आश्चर्यकारक होती तितकीच मधूर नि कठोर होती.

कुशाबाईनं जो इतिहास सांगितला तो असा होता.—

घरीं खायला प्यायला भरपूर होतं; कोणत्या प्रकारची कमतरता नव्हती. पण साऱ्या संसारांत नुसती माती कालवीत गेली होती, एवढंच नव्हे, तर साऱ्या जगांत उजळपणं तोंड दाखविण्याची देखील त्यांना चोरी झाली होती.

या साऱ्या भानगडीच्या मुळाशीं तिची धाकटी जाऊ सुनंदा हीच होती. तिचा दीर यदुनाथ न्यायरत्न—त्यानं त्यांच्याशीं कमी झगडे केले असं नाहीं—पण तिची मूळ तक्रार होती ती सुनंदेविरुद्ध.

ही भांडखोर सुनंदा नि तिचा नवरा हीं दोघंही आमचीच रयत होतीं. तेव्हां त्यांना कसंही करून ताळ्यावर आणून मिटवामिटव करावी अशी आमच्याकडे तिची मागणी होती.

थोडक्यांत सांगायचं म्हणंजे—तिचे सासुसासरे जेव्हां कैलासवासी झाले तेव्हां तीच काय ती घरची कर्ती सून होती. यदू त्या वेळीं सहा सात वर्षांचा बच्चा होता. यदूच्या संगोपनाचा सारा भार अर्थातच तिच्यावर पडला नि तेव्हांपासून आतांपर्यंत तिनं आपलं कर्तव्य योग्य रीतीनं बजावलं. वडिलोपार्जित इस्टेट म्हणंजे एक मातीचं घर, दोन तीन बिघे ब्रह्मोत्तर जमीन नि यजमानांचीं कांहीं घरं! एवढ्या तुटपुंज्या आधारावर तिच्या नवऱ्यानं या संसारसमुद्रांत उडी घेतली. आज जो कांहीं सांपत्तिक सुस्थिती आली आहे ती सारी त्याची स्वसंपादीत मिळकत. दीराची त्या कामीं कोणंतीही मदत नव्हती. किंवा त्याच्या मदतीची अपेक्षाही कुणी केली नव्हती.

‘आतां तो हक्क सांगायला आला आहे वाटतं?’ मी म्हटलं.

‘हक्क कसला बाबा!’ कुशारीबाई मान हालवून म्हणाली, ‘हें सारं त्याचंच आहे. सुनंदा मधें पडली नसती, असल्या सोन्याच्या संसाराची तिनं वाताहात केली नसती, तर हें सारं त्यांचंच होतं.’

मला चांगलासा अंदाज आला नाहीं म्हणून मी विचारलं, ‘आणि हा आपला मुलगा?’

पहिल्यानं तिला माझा प्रश्न कळला नाहीं. पण तितक्यांत अंदाज येऊन ती म्हणाली, ‘तो विजय होय? तो आमचा मुलगा नव्हे बाबा! तो एक विद्यार्थी आहे. भावोजींच्या शाळेंत अध्ययन करतोय्. अजूनही तो शिकतो तिथंच—मात्र रहातो आमच्याकडे—’ अशा प्रकारें त्या मुलासंबंधीं झालेला आमचा गैरसमज दूर करून ती म्हणाली, या माझ्या भावोजीला लहानाचा मोठा करायला मला किती कष्ट पडले ते एक देवालाच माहीत! बाजूच्या लोकांना नुसती चुटपुटती कल्पना आहे. पण आज तो सारं कांहीं विसरून गेला आहे. विसरतां आलं नाहीं काय तें आम्हांला!’ असं म्हणून तिनं डोळ्यांत आलेलीं आसवं हातानं पुसून टाकून म्हटलं, ‘जाऊं देत त्या गोष्टी. किती सांगितलं तरी थोडंच! आम्हीं त्याची मुंज केली. शिक्षणासाठीं त्याला मिहिपूरच्या शिबू तर्कालंकारच्या पाठशाळेंत यांनींच नेऊन ठेवलं. काय सांगूं तुम्हांला? तो मला मुलासारखा वाटत

होता त्याला टाकून रहावेना म्हणून मीसुद्धां मिहीरपूरला जाऊन राहिलें—त्याची-सुद्धां त्याला आज आठवण नाहीं ! जाऊं द्या—अशीं कित्येक वर्षें गेलीं. भावजींचं शिक्षण पुरं झालं. हे त्याच्या लग्नासाठीं मुलगी शोधायला लागले. इत-क्यांत कुणाला न कळतां न सवरतां एकदम एक दिवस ही स्वारी शिबु तर्कालंका-रची मुलगी सुनंदा हिच्याबरोबर लग्न करून आपली घरीं हजर झाली. मला तर विचारलं नाहींच—पण आपल्या वडील भावाचंसुद्धां मत घेतलं नाहीं. '

' कां विचारलं नाहीं. ? ' मी हळूच प्रश्न केला, " तसं कांहीं विशेष कारण होतं का ? '

' कारण होतं तर ! ' ती म्हणाली, ' तसं पाह्यलं तर ते कांहीं आमच्या ह्यांतले नव्हत. कुलशीलानं आमच्यापेक्षां फार कमी ! यांना मोठा राग आला. महिनाभर कुणाशीं बोललेसुद्धां नाहींत एवढं त्यांना दुःख झालं होतं—पण मी कांहीं राग केला नाहीं. सुनंदेकडे पाहिलं मात्र, नि तेव्हांपासून माझं मन तिच्या-कडे ओढूं लागलं. पण पुढं मला कळलं, तिची आई मेली होती. भावाच्या हातीं तिला सोपवून तिचा बाप संन्यास घेऊन निघून गेला होता. ही असली मुलगी गळीं पडल्यामुळं आम्हांला काय वाटलं असेल हें कांहीं तुम्हांला सांगतां यायचं नाहीं. तरीही तिला जवळ केली. पण पुढं ही आमचे असे उपकार फेडणार होती हें तेव्हां आम्हांला कुठं कळलं होतें ! ' असं म्हणून ती ओक्साबोक्सीं रडूं लागली. ही बाब तिला मोठी मनाला लागून राहिली होती असं मला वाटलं. तरीही मी कांहीं बोललों नाहीं.

राजलक्ष्मीही तोंवर कांहीं बोलली नाहीं. तिनं हळूच विचारलं, ' आतां कुठं असतात तीं ? '

उत्तरादाखल तिनं नुसनं खुणेनंच दाखवून दिलं. तीं याच गांवीं असावीं असा मीं अंदाज केला.

बराच वेळपर्यंत तिच्या तोंडून शब्द बाहेर फुटेना. अवसान यायला तिला किती तरी वेळ लागला. पण मूळ तक्रार काय होती हें अद्याप मला चांगलंसं उमजलं नव्हतं.

माझं जेवण संपत आलं होतं. या रड्यारुसव्यामुळं माझ्या जेवणांत कांहीं व्यत्यय आला नाहीं. तितक्यांत चट्कन् डोळे पुसून स्वतःला सावरून घेऊन माझ्या ताटाकडे पहात ती म्हणाली, ' राहुं दे ! त्या गोष्टी कांहीं सांगून संपायच्या

नाहींत. तुम्हांलाही ऐकवणार नाहींत. ज्यांनीं आमचा हा सोन्यासारखा संसार पूर्वी डोळ्यांनीं पाहिला होता त्यांनाच कळून येईल, कीं आमच्या ह्या धाकट्या सूनबाईनं कसा आमचा सत्यानाश केला तो ! तें सारं रामायण तुम्हांला थोडक्यांत सांगतें.

' त्या इस्टेटीवर आमचं सारं कांहीं चालत होतं ती इस्टेट पूर्वी एका तांती माणसाची होती. वर्षमन्यापूर्वी एके दिवशीं सकाळीं अचानक त्याची विधवा आपल्या अज्ञान मुलाला घेऊन इथं हजर झाली. रागारागानं ती काय बोलली नि काय नाहीं त्याचा ठिकाणा नाहीं. त्या बोलण्यांत खरंखोटं कांहीं होतं—की सारंच खोटं होतं कोण जाणे—पण ही आमची धाकटी सून स्नान करून सैंपाकघरांत जायला निघाली होती तिच्या तें कानीं पडलं. तिथल्या तिथं ती एकदम ताठ होऊन राहिली. ती माणसं निघून गेलीं तरी कांहीं जागची हालेना. मीं तिला हांक मारली नि म्हटलं, ' सुनंदा, उभी कां राहिली आहेस ? उशीर होतो आहे ना ? ' उत्तर देईना तेव्हां तिच्या तोंडाकडे पाहिलं तेव्हां मला भय वाटलं. तिच्या डोळ्यांत अशी कांहीं आग धगधगत होती. तिचा काळा सांवळा चेहरा पांढरा फटक पडला होता. त्या तांती विधवेनं शब्दागणिक तिच्या अंगचं रक्त जसं कांहीं शोषण करून टाकलं होतं. त्याचवेळीं ती कांहीं बोलली नाहीं. थोड्या वेळानं माझ्याजवळ येऊन म्हणाली, ' जाऊबाई, त्या विधवेच्या नवऱ्याची इस्टेट तिला देणार अहांत कीं नाहीं ? त्याचं सर्वस्व छिनावून घेतलंत—त्या एवढ्याशा पोराला आतां जन्मभर भिकारी करून का ठेवणार आहांत ? '

' मी आश्चर्यचकित झालें. म्हटलं, 'माझं आधीं ऐकून घे. कानाई बसाकांची सारी इस्टेट विक्रीला काढली होती देण्यापायीं. यानीं ती विकत घेतली. विकत घेतलेला विषय कधीं कुणी उगीच दुसऱ्याला देऊन टाकला आहे का ? ' ती म्हणाली, ' तर मग भावजींनीं एवढी ही रक्कम आणली कुठून ? ' मी रागारागानं उत्तर दिलं, 'तें काय तें तुझ्या भावजीनांच विचार. इस्टेट त्यानीं विकत घेतली आहे—' असं म्हणून मी या कामाला निघून गेलें. '

' खरं आहे तें ! ' राजलक्ष्मी म्हणाली, लिलावांत विकत घेतलेली इस्टेट फिरून त्यांना द्यावी असं तुमची जाऊबाई म्हणाली तरी कशी ? '

' आतां तुम्हींच पहाना ! ' कुशारीबाई म्हणाली—पण तसं बोलत असतांना तिची मुद्रा शरमल्यासारखी दिसत होती. ती पुढं म्हणाली, ' लिलांव होऊनच विक्री झाली कीं काय कोण जाणे ! आम्हीं त्यांचे पुरोहित ! मरायच्या

वेळीं कानाई बसाकनं सारा भार यांच्यावर सोंपवला होता—पण तो बरंच देणं मागं ठेवून गेला होता हें यांना कुठं माहीत होतं ? '

तिचं भाषण ऐकून राजलक्ष्मी व मी दोघंही चकित होऊन गेलों. या एकंदर प्रकरणांत कुठंतरी कांहीं तरी भानगड आहे असं आम्हांला वाटल्यावांचून राहिलं नाहीं. कुशारीबाईच्या तें लक्षांत आलं नाहीं. ती म्हणाली, 'रोजचा जप-पूजा पुरी करून दोन घंट्यांनीं मी परत आलें नि पाहिलं, तों सुनंदा तिथल्या तिथं तशीच बसून राहिली होती. एक पाऊलभर सुद्धां हलली नव्हती. कचेरींतून त्यांची यायची वेळ झाली होती. भावजी विनूला घेऊन गेले होते तेही यायला झाले होते. विजय स्नान करायला गेला होता, आत्तां येऊन पुजेला बसणार होता. मला अगदीं संताप आला. मीं म्हटलं, 'तूं आज सैंपाकघरांत जाणार नाहींस का ? त्या मेल्या भिकारड्या तांतणीची बडबड ऐकून घेऊन अशीच बसून रहाणार आहेस का ? '

'सुनंदा माझ्याकडे पहात म्हणाली, 'नाहीं जाऊबाई, ही संपत्ती आमची नव्हे. हें सारं कांहीं ज्याचं त्याला तुम्हीं परत केलं नाहीं तोंपर्यंत मीं सैंपाकघरांत पाऊल टाकणार नाहीं. त्या अज्ञान पोराच्या तोंडचा घास काढून घेऊन मी तो माझ्या मुलानवऱ्याच्या तोंडी घालणार नाहीं—त्याचा नैवेद्य देवाला दाखवणार नाहीं.' असं म्हणून ती आपल्या खोलींत निघून गेली.

सुनंदाला मी चांगलीच ओळखत होतें. ती जें बोलली तें खरं केल्याशिवाय राहिली नसती. तिचा बाप मोठा गुरुजी होता—संन्यासी होता. त्यानं तिला वेद-शास्त्र चांगलं पढवलं होतं तेंही मला चांगलं माहीत होतं. पण बायकांच्या जातींत जन्म घेऊन ती असला निर्दयपणा करील हें मात्र त्या वेळपर्यंत मला कळलं नव्हतं. मीं घाईघाईनं सैंपाकघरांत गेलें. पुरुष मंडळी घरीं आली. ते जेवायला बसले होते तेव्हां सुनंदा दाराजवळ येऊन उभी राहिली. दुरून हात जोडून मी तिला म्हटलं, 'सुनंदा, क्षमा कर बाई. त्यांचं जेवण होऊन जाऊं दे.'

'तिनं माझं म्हणणं हिशेबांत घेतलं नाहीं. आचमन करून त्यांनीं जेवायला सुरवात केली तोंच तिनं विचारलं, 'त्या विधवेची इस्टेट तुम्हीं पैसे देऊनच विकत घेतली का ? आपणच रोज सांगतां, कीं मामंजी मागं कांहीं ठेवून गेले नाहींत. मग हे पैसे आले कुठून ? '

'समोर उभी राहून जी कधीं एक शब्द सुद्धां बोलली नव्हती ती असे प्रश्न

करूं लागली. हें पाहून हे अगदीं थक्कच झाले. ते म्हणाले, ' या बोलण्याचा अर्थ काय मुली ? '

' सुनंदेनं उत्तर दिलं, ' याचा अर्थ कुणाला माहीत असेल तर तो तुम्हांलाच! आज ती विधवा आपल्या पोराला घेऊन आली होती. ती जें जें काय बोलली तें पुन्हां कशाला सांगायला हवं ? आपल्याला सारं कांहीं माहीत आहे ! ज्याची इस्टेट त्याला परत दिली नाहींत तर माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी हें पापाचं अन्न माझ्या पतीच्या नी मुलाच्या तोंडीं जाऊं द्यायची नाहीं. ' मला मीं स्वप्नांत आहें कीं या सुनंदेला भुतानं झपाटलं आहे ? आजवर दीराला जी देवासारखी मानीत होती तिचीच का ही भाषा ? त्यांच्याही मनाला तें फार लागलं. क्षणभर ते उगीच बसले होते पण एकदम संतापून उठून म्हणाले, ' पापाची असो कीं पुण्याची असो इस्टेट माझी आहे. तुझ्या नवऱ्याची नव्हे नि मुलाचीही नव्हे. तुम्हांला पटत नसेल तर तुम्हीं आपला रस्ता सुधारा. इतके दिवस मोठी गुणी मुलगी म्हणून समजत होतों. कधींच मला असं वाटलं नव्हतं. ' असं म्हणून ते पाटावरून उठून निघून गेले.

' त्या साऱ्या दिवसांत कुणाच्याच तोंडीं अन्नपाणी गेलं नाहीं. मी रडत रडत भावजींकडे गेलें नि म्हणालें, ' भावजी, मूल समजून मी तुम्हांला लहानाचं मोठं केलं त्याचं हेंच का बक्षीस ? ' भावजींचेही डोळे भरून आले. ते म्हणाले, ' वहिनी, तूंच माझी आई. दादादेखील मला पित्यासारखे. तुम्ही दोघंही मोठीं खरीं पण धर्म त्याहूनही मोठा आहे. सुनंदेचा एक शब्दसुद्धां अयोग्य नाहीं. संन्यास घ्यायच्या दिवशीं माझ्या सासऱ्यानं तिला आशिर्वाद दिला होता नि म्हटलं होतं, कीं पोरी, जगांत धर्मच सत्य आहे. धर्म दाखवील त्याच मार्गानं जा. ती एवढीशी होती तेव्हांपासून मी तिला ओळखतोंय. ती कधींसुद्धां अयोग्य वागली नाहीं. '

' काय सांगूं माझं कपाळ ! मेलीनं इतक्यांत नवऱ्याला आंतून भुरळ घातली. आज माझे डोळे उघडले. भाद्रपदांतील संक्रांतीचा दिवस होता तो. मळभ भरून आलं होतं. पाऊस सारखा शिवरत होता. रात्रीची वेळ पण मेलीनं माझा शब्द मानला नाहीं. मुलाला हातीं धरून घराबाहेर निघाली. माझ्या सासऱ्याच्या वेळच्या एका कुळाचं घर तो गेल्यापासून रिकामं पडलं होतं मोडकं तोडकं घर—पण कसंबसं उभं होतं एवढंच ! कोल्हेकुत्रे, सापकिरडूं त्या पावसाच्या वेळीं तिथं जाऊन राहायचीं ! अंगणांत चिखल झालेला पण तिथं आडवी पडून रडत मीं

म्हटलं, 'अग भद्रकपाळे, असं जर करायचं होतं तर या आमच्या घरांत शिर-लीस कशाला ? विनूला देखील घेऊन निघालीस ! सासऱ्याचं नांवसुद्धां जगांतून नाहींसं करायची प्रतिज्ञा का केली आहेस ?'

'तिनं कांहींसुद्धां उत्तर दिलं नाहीं. मी म्हटलं, 'काय खाणार आहेस ?'

'तिनं उत्तर दिलं 'मामंजींनीं तीन विघे ब्रह्मोत्तर जमीन ठेवली आहे त्यांतली अर्धी आमची आहे.' तिचं तें उत्तर ऐकतांच असं वाटलं, कीं डोकं आपटून जीव द्यावा. मीं म्हटलं, 'अग दळभद्रे, एक दिवस तरी निघेल का त्याच्यावर? वाटलं तर तूं उपाशी मर. पण माझ्या विनूचे हाल नकोत !'

'ती म्हणाली,'कनाई बसाकाच्या मुलाची दया आली का तुम्हांला जाऊबाई? त्याच्याच सारखा माझा विनू अर्धपोटीं राहून जगला तरी पुष्कळ झालं.'

'ती निघून गेली. सारं घर जसं कांहीं खायला येऊं लागलं. त्या रात्रीं घरांत दिवा लागला नाहीं—चुलीवर हंडी चढली नाहीं. मोठ्या रात्रीं हे जे घरीं आले ते सारी रात्र इथं लोडाला टेकून बसले होते. वाटलं रात्रीं माझा विनू झोंपला नसेल—बाळ कदाचित् भुकेनं कळवळला असेल. भल्या पहांटे राखण्याबरोबर गायवासरूं पाठवून दिलं. पण मेल्या राक्षसणीनं तें परत पाठवलं नि निरोप पाठवला, 'माझ्या विनूला दूध नको आहे. तो दुधाशिवाय जगेल असा आशिर्वाद द्या.'

राजलक्ष्मीच्या तोंडून एक गंभीर निश्वास बाहेर पडला. कुशारीबाईच्या हृदयाच्या वेदना आणि अपमान आठवून तिचा कंठ भरून आला होता. माझ्या हातावरचा डाळभात सुकून काष्ठ झाला होता. घरमालकाच्या खडावाचा शब्द ऐकूं आला. त्याचं जेवण झालं होतं. मौनव्रत अखंड ठेवून त्यांचा सात्विक आहार यथास्थित परिपूर्ण झाला असावा. इकडे झालेल्या प्रकाराची कल्पना असल्यामुळं ते पुन्हां आमची खबर घ्यायला आले नाहींत.

डोळे पुसून, नाक शिंकरून खाकरून, कुशारीबाई म्हणाली, 'त्यां दिवसापासून गांवोंगांव, गल्लोगल्लीं, रस्तोरस्तीं लोकांनीं कशी कशी आमची विटंबना केली तें कोणत्या शब्दांनीं सांगूं बाबा ? हे म्हणत होते, चार दिवस जाऊं देत इंगा फिरला कीं आपणच परत येतील.'

'मी म्हटलं तुम्हीं ओळखत नाहीं त्यांना—तुटतील पण वांकणार नाहींत. नि तेंच झालं.

बोलतां बोलतां आठ महिने निघून गेले पण त्यांना कांहीं वाकवतां आलं

नाहीं. आझून रडत रडत झुरतांना यांच्या देहाचं काष्ठ झालं. मुलावर त्यांचा भारी जीव होता नि त्या मुलांपेक्षांही भावोजींची माया भारीच होती. त्यांना सहन करणं कठीण गेलं तेव्हां त्यांनीं सांगून पाठवलं, कीं तांती कुटुंबाची कांहींतरी सोय करतों—पण त्या चांडाळणीनं उलट सांगून पाठवलं कीं त्यांची सारी इस्टेट त्यांना परत देऊन टाकाल तेव्हांच आम्हीं घरीं परत येऊं. एक छटाकसुद्धां कुठं बाकी रहातां कामा नये.' म्हणजे काय? सारं कांहीं देऊन टाकून मरून का जायचं ?'

पाण्याच्या पेल्यांत हात बुडवून ओला करून घेत मी विचारलं, 'हल्लीं त्यांचं कशावर चालतं ?'

'एवढं मला विचारूं नका बाबा !' कुशारीबाई कळवळून म्हणाली, 'असला प्रश्न कुणी विचारला कीं कानांत बोटं घालून मी पळून जातें. असं वाटतं कीं फट्कन् प्राण निघून जायचा. आज आठ महिने या घरांत मासे आणले नाहींत. दुधातुपाचा शिटकावसुद्धां झाला नाहीं. घर जसं कांहीं शापानं ओसाड पडल्या-प्रमाणं झालं आहे. असं म्हणून ती उगीच राहिली.

आम्हीं तिघंही कित्येक वेळपर्यंत तटस्थ होऊन बसलों होतों.

तासभऱ्यानं जेव्हां आम्हीं गाडींत बसून जायला निघालों तेव्हां सद्गदित वाणीनं कुशारीबाई राजलक्ष्मीच्या कानांत म्हणाली, 'तुमचींच रयत आहेत ती आईसाहेब. मामंजींनीं ठेवलेल्या थोड्याशा जमिनीवर आज त्यांचा निर्वाह चालला आहे. ती जमीन तुमच्या गंगामाटींतच आहे—'

'ठीक आहे.' राजलक्ष्मी होकार देत म्हणाली. गाडी सुटतां सुटतां ती पुन्हां बोलूं लागली, 'तुमच्या घरांतूनच दिसतं तें घर. नाल्याच्या या बाजूला जें एक मोडकंसं घर दिसतं तेंच तें.'

नुसती मान हालवूनच राजलक्ष्मीनं संमती दिली.

गाडी हळुहळू चालली होती. बराच वेळपर्यंत मी कांहींच बोललों नाहीं. राज-लक्ष्मी आपल्याशींच कांहीं विचार करीत असावी. तिला डिवचून मी म्हणालों, 'लक्ष्मी ज्याला लोभ नाहीं, ज्याला कशाची जरूरी नाहीं, त्याला मदत करायला जाण्यासारखा दुसरा मूर्खपणा नाहीं.'

माझ्या तोंडाकडे पहात हंसल्यासं करून राजलक्ष्मी म्हणाली, 'तें मला माहीत आहे. इतर कांहीं नसलं तरी तुमच्यापासून मीं एवढं शिकलें आहें खास.'

## ७

मीं सिंहावलोकन करून जेव्हां पहातों, तेव्हां मला असं दिसून येतं, कीं ज्या कांहीं स्त्रियांच्या चरित्रामुळं माझ्या मनावर गंभीर परिणाम झाला आहे, त्यापैकीं एक ही कुशारी महाशयांची बंडखोर भावजय ! एवढं वय झालं तरीही मीं अजून सुनंदेला विसरलों नाहीं.

माणसाला केव्हांच आपलंसं करून घेण्यांत राजलक्ष्मीचा हातखंडा असे. सुनंदा एक दिवशीं मला 'दादा' म्हणून हांक मारीत आली याचं मला मुळींच आश्चर्य वाटलं नाहीं. एरवीं या विलक्षण पोरीची ओळख व्हायचा सुयोग जमून आला नसता.

अध्यापक यदू तर्कालंकार रहात असलेल्या मोडक्या घराच्या दोनतीन खोल्या आमच्या घराच्या पश्चिमेला असलेल्या सज्ज्याकडे पाहिलं म्हणजे सहज दिसून येत. या पूर्वीही ती जागा माझ्या नजरेला आली होती. पण त्या जागीं एक बंडखोर बाई आपल्या मुलानवऱ्यासह रहात होती याची मला कल्पना नव्हती. कळकीच्या सांकवावरून पलिकडे गेलं म्हणजे सज्ज्यावरून दहा मिनिटांच्या वाटेला हें घर होतं. मधल्या रस्त्याला एकसुद्धां झाडझुडूप नव्हतं. त्यामुळं सहज दूरवर नजर पोचत असे. आज सकाळीं झोपेंतून उठतांच मी खिडकींतून पाहिलं, तें मोडकं तोडकं घर माझ्या डोळ्यांना दिसलं. विलक्षण मनःस्थितींत मी किती वेळ तरी त्या घराकडे व्यथित दृष्टीनं पहात होतों. पुष्कळ वेळ पुष्कळ प्रकारें अनुभव आला असतांही मी विसरून जातों—या जगांत बाहेरच्या स्वरूपावरून कांहींसुद्धां सांगतां येत नाहीं हेंच खरं ! कोण म्हणेल कीं त्या मोडक्या घरांत कोल्हेकुत्रे रहात नाहींत म्हणून ! त्या मोडक्या भिंतीआड कुमार, रघू, शाकुंतल, मेघदूत शिकवलीं जात आहेत, कदाचित् स्मृती नि न्यायाची मीमांसा करीत एक नवीन अध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना शिकवण्यांत दंग होऊन गेला आहे, असं कुणाला वाटलं असतं का ? याच मोडक्या भिंतीआड एक बंगालदेशाची तरुणी धर्म नि न्यायाच्या मर्यादा राखण्यासाठीं स्वेच्छेनं क्लेश सहन करते आहे याचा कुणाला अंदाज तरी झाला असता का ?

उजवीकडच्या खिडकींतून मीं डोकावून पाहिलं तेव्हां ओटीवर कांहींतरी गडबड चालली असावी असं मला वाटलं—रतन हरकत घेत होता नि राजलक्ष्मी त्याला

खोडून काढीत होती—अर्थात् तिचा आवाजही जरा चढा लागला होता.

मी बाहेर येऊन उभा राहिलों असं पहातांच ती ओशाळली. म्हणाली, ‘ झोंप मोडली वाटतं ? कशी मोडणार नाहीं ! रतन, आपला आवाज जरा ताब्यांत ठेव बाबा ! माझा नाइलाज होतो अगदीं. ’

असल्या तक्रारी आणि काकुळती ऐकण्याची मलाच काय पण घरांतील सान्याच लोकांना संवय होऊन गेली होती. अर्थात् तोही तसा उगीच राहिला नि मींही कांहीं बोललों नाहीं.

एका मोठ्या टोपलींत तांदूळ, डाळ, तूप, तेल वगैरे बरेच जिन्नस आणि एका लहान भांड्यांत कांहीं खायच्या वस्तू तयार ठेवल्याचं मला दिसून आलं. एवढं जड वजन उचलून घेऊन जाण्याच्या बाबतींत रतन तक्रार करीत असावा असं मला वाटलं.

माझा अंदाज बरोबर होता. मला मध्यस्थीला घालून राजलक्ष्मी म्हणाली, ‘ऐका हा काय म्हणतो तें. हे एवढेसे डाळ तांदूळ उचलतां येत नाहींत का ? मी सुद्धां घेऊन जाईन. ’ असं म्हणून तिनं वांकून अगदीं सहज ती टोपली उचलून धरली.

खरं पाहिलं तर त्यांत जड असं कांहीं नव्हतं. तेवढं ओझं नेणं रतनला कठीण होतं असं नाहीं—कठीण होती ती निराळीच बाब ! ओझं उचलून नेण्यांत त्याचा दर्जा बिघडत होता—पण धनिणीपुढं हें बोलून दाखवायचं त्याला कठीण जात होतं. मी त्याच्या तोंडाकडं पाहिलं तेव्हांच मला ही अटकळ आली. मी हंसून म्हटलं, ‘ इथं एवढीं गडीमाणसं आहेत—माणसाचा कांहीं तोटा नाहीं—त्यांतला कुणी तरी घेऊन जाईल. रतन निरोप घेऊन जाईल बरोबर. ’

मान खालीं घालून रतन उगीच राहिला. एकदां माझ्याकडे नि नंतर त्याच्याकडे पहातांच तिला हंसूं लोटलं. ती म्हणाली, ‘ मेला अर्धा तास हुज्जत घालीत बसला आहे, पण असं म्हणाला नाहीं, कीं बाईग, हें असलं हलकं काम रतनबाबूला सांगूं नकोस. दुसऱ्या कुणाला तरी बोलावून आण. ’

तो निघून जातांच मीं विचारलं, ‘ सकाळींच उठून हें काय चाललंय ? ’

राजलक्ष्मी म्हणाली, ‘ खाण्याचे जिन्नस पाठवायचे ते सकाळींच ना ? ’

‘ पण कुठं जाताहेत हे जिन्नस ? नि कुणासाठीं ? ’

‘ कुणासाठीं काय ? ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ माणसांसाठीं पाठवायचे आहेत. ब्राह्मणाच्या घरीं. ’

'कुठल्या ब्राह्मणाच्या घरीं ?' मी विचारलं.

राजलक्ष्मी हंसली— क्षणभर उगीच राहिली—मला वाटलं, नांव सांगावं कीं नाहीं याचा ती विचार करीत होती. पण लगेच म्हणाली, 'त्याचा उल्लेख करूं नये. पुण्य कमी होतं. तुम्हीं हातपाय धुवून कपडे बदलून या—-जा पाहूं. तुमचा चहा तयार आहे.' कांहींच न विचारतां मी बाहेर निघून गेलों. त्यावेळीं साधारण दहा वाजले होते. कांहींच काम नव्हतं म्हणून बाहेरच्या बांकावर बसून एका साप्ताहिकांतल्या जाहिराती वाचीत होतों. इतक्यांत कुणा अपरिचिताचा आवाज कानीं आला. वर पाहिलं तों येणारा अपरिचितच होता खरा. तो म्हणाला, 'नमस्कार बाबूमहाशय.'

मीही हात जोडून उलट नमस्कार केल्यावर म्हटलं, 'बसा.'

ब्राह्मणाचा पोषाख फार गरीबीचा होता. पायांत कांहीं नव्हतं. अंगांत सदरा कोट नव्हता. नुसतं एक मळकं उपरणं अंगावर टाकलेलं होतं. तें मळकं होतंच— शिवाय दोनतीन जागीं गांठीं मारलेल्या होत्या. खेडेगांवांत पांढरपेशा माणसाच्या अंगावर मळके कपडे असण्यांत कांहीं विशेष नव्हतं. तेवढ्यावरून त्याची सांसारिक अवस्था सांगतां आली असती. समोरच्या कळकीच्या हांतरीवर बसून तो म्हणाला, 'मी आपलीच रयत आहें.—गरीबी आहे—पूर्वीच आलं पाहिजे होतं भेटायला—मोठी चूक झाली आहे माझी.'

मला जमीनदार समजून कुणी बोलायला आला, कीं माझी मलाच लाज वाटत असे—रागही येत असे. विशेषतः या त्या सगळ्या अर्ज्या तक्रारी घेऊन ते येत असत नि त्याचं निराकरण करण्याबद्दल विनंती करीत असत, त्या बाबतींत माझा कांहींच हात नसे. अर्थात् या माणसाचं भाषण ऐकून मला विशेष वाटलं नाहीं. मी म्हटलं, 'यायला उशीर झाला म्हणून वाईट वाटून घ्यायचं कारण नाहीं. मुळींच आलां नसतां, तरीसुद्धां चाललं असतं-माझा तसा स्वभाव नाहीं. काय काम आहे आपलं ?'

ब्राह्मण शरमिंदा होऊन म्हणाला, 'अवेळीं येऊन आपल्या कामांत मीं व्यत्यय आणला. पुन्हां केव्हां तरी येईन !' असं म्हणून तो उठून उभा राहिला.

मीं त्रासून म्हटलं 'आपलं काय काम आहे माझ्याजवळ ?'

माझा त्रासीकपणा त्याच्या ध्यानीं आला. क्षणभर थांबून तो शांतपणें म्हणाला, 'मी सामान्य माणूस आहें. कामही सामान्यच आहे. बाईसाहेबांनीं माझी आठ-

वण केली होती, कदाचित् त्यांचंच कांहीं काम असेल. माझं स्वतःचं कांहीं काम नाहीं.'

त्याचं उत्तर कठोर होतं पण तें खरं होतं. माझ्या प्रश्नाच्या धोरणाशीं विसंगत नव्हतं. अशा प्रकारें उत्तर देणारा माणूस इथं आल्यावर अजून पावेतों आढळला नव्हता. म्हणून त्याच्या भाषणाचं मला नुसतं आश्चर्यच वाटलं, एवढंच नव्हे तर मला एकदम राग आला. स्वभावतः माझी वृत्ती रुक्षपणाची नसे. दुसऱ्या कुठं अशा बोलण्याची कदर केली नसती. पण श्रीमंतीची ताकद अशी कांहीं विलक्षण असते, कीं दुसऱ्याच्या कामाच्या बाबतींत अव्यवहारीपणानं वागण्याचा मोह माणसाला सहज टाळतां येत नाहीं. अर्थात्च माझ्या तोंडीं यापेक्षांही जास्त कठोर उत्तर येऊं लागलं होतं. पण माझं तोंड उघडण्यापूर्वीच शेजारचा दरवाजा उघडला गेला, नि पूजा अर्धीच टाकून उठलेली राजलक्ष्मी बाहेर आली. दुरूनच मोठ्या विनयानं नमस्कार करून ती म्हणाली, 'इतक्यांत जाऊं नका. जरा थांबा. मला बरंच बोलायचं आहे.'

ब्राह्मण पुन्हां खालीं बसून म्हणाला, 'आपण जी व्यवस्था केली त्यामुळं आमची काळजी बरीच निवारण झाली. पंधरा दिवसांची तरी अन्नाची ददात मिटली गेली. सध्यां दुष्काळ पडला आहे. व्रतंवैकल्यं कुणी करीत नाहींत म्हणूनच ब्राह्मणीनं विचारलं आहे—'

राजलक्ष्मी हंसून म्हणाली, 'आपली ब्राह्मणी नुसती व्रतंवैकल्यं केव्हां करावीं एवढंच काय ती शिकलेली दिसते. पण शेजारधर्म कसा राखायचा तें माझ्याकडे येऊन शीक म्हणावं.'

ब्राह्मण म्हणाला, 'पण एवढा मोठा जो शिधा पाठवलात—'

त्याला आपलं बोलणं पुरं करतां आलं नाहीं—कदाचित् जाणून बुजूनच तो पुढं बोलला नाहीं. पण त्या दांभिक ब्राह्मणाला काय बोलायचं होतं याची कल्पना मला पुरेपूर आली. पण नकळत माझ्याप्रमाणंच राजलक्ष्मीसुद्धां कांहीं तरी कडक बोलून जाईल अशी मला भीति वाटली. त्या माणसाचा अर्ध्या बाजूचा परिचय जरी झाला नव्हता तरी दुसऱ्या बाजूची कल्पना यापूर्वीच मला आली होती. म्हणून झाल्या गोष्टीची पुनरुक्ती माझ्या समोरच व्हावी असं मला वाटलं नाहीं. उत्तर देण्याच्या बाबतींत राजलक्ष्मी कुणालाही हार जाणारी नव्हती. अगदीं तसं झालं. या चमत्कारिक प्रश्नाला बगल देऊन ती हंसून म्हणाली, 'तर्कालंकार

महाशय, आपली ब्राह्मणी मोठी चिडखोर आहे असं मी ऐकलं आहे. बोलावल्याशिवाय तिला भेटायला गेलं तर ती कदाचित् उखडेल. नाहींतर या प्रश्नाचं चांगलंच उत्तर देऊन आलें असतं.'

आतां मला कळलं—हाच यदुनाथ कुशारी. शिक्षक माणूस, आपल्या प्रियतमेच्या वृत्तीचा उल्लेख ऐकून स्वतःची वृत्ती विसरून तो मोठमोठ्यानं हंसला. मोठ्या खुषींत येऊन तो म्हणाला, 'नाहीं आईसाहेब, चिडखोर कसली—ती अगदीं साधी आहे. आम्हीं गरीब माणसं–आपण आमच्याकडे आला तर आपला मान राखण्याची आम्हांला ताकद नाहीं. तीच येईल इथं. वेळ झाली म्हणजे मीच तिला बरोबर घेऊन इथं येईल.'

राजलक्ष्मीनं विचारलं, 'तर्कालंकार महाराज, आपले किती शिष्य आहेत?"

'पांच!' कुशारी म्हणाला, 'या भागांत जास्त शिष्य मिळायची कांहीं आशा नाहीं. नुसतं नांवाचं अध्यापन चाललं आहे एवढंच!"

'सर्वांच्या अन्नवस्त्राचा भार तुमच्यावरच का आहे?'

'नाहीं. विजय तर इकडे दादाकडे रहातो, एकाचं घर गांवांतच आहे. बाकीचे तीन आमच्याकडे रहातात.'

गहिंवरल्या आवाजांत राजलक्ष्मी म्हणाली, 'या असल्या दुष्काळांत हें काम सोपं नाहीं तर्कालंकार!'

याचवेळीं अशा गहिंवरलेल्या आवाजाची जरुरी होती. नाहीं तर हा मानी अध्यापक रागावून जाणं अगदीं सहाजिक होतं. यावेळीं त्याचं मन निराळ्या दिशेला झुकलं. घरचं दुःखदैन्य अगदीं सहजगत्या कबूल करून तो म्हणाला, 'आमचं कसं काय चालतं हें आम्हां दोघांनाच माहीत. पण सूर्य उगवायचा मावळायचा रहात नाहीं ना? मग काय करायचं? अध्ययन-अध्यापन हेंच ब्राह्मणाचं काम! माझ्या गुरुजीकडून जें कांहीं मला मिळालं आहे ती केवळ एक ठेव आहे. एक दिवशीं ती देऊन टाकली पाहिजे.'

क्षणभर थांबून तो पुन्हां म्हणाला, 'जमिनीच्या मालकाचं हें काम, असं एकाकाळीं समजलं जात असे. पण आतां सारेच दिवस बदलले आहेत. आतां तो अधिकारही त्यांना नाहीं नि ती जबाबदारीही संपली आहे. रयतेचं रक्त शोषण करण्यापलिकडे आतां त्यांना करायचं कांहीं राहिलेलं नाहीं. अशा लोकांना जमिनीचे मालक म्हणून समजणं सुद्धां अयोग्य वाटतं.'

राजलक्ष्मी हंसून म्हणाली, 'पण यापैकीं कुणा एकाद्याला कृतकर्माचं प्रायश्चित्त करावंसं वाटलं तर तुम्हीं त्याच्या आड येऊं नका.'

शरमिंदा होऊन कुशारी म्हणाला, 'असल्याला मीं अगदींच विसरलों होतों. आड कशाला येऊं. तुम्हीं आपलं कर्तव्य करताहांत.'

राजलक्ष्मी म्हणाली, 'आम्हीं पूजाअर्चा करतों. मंत्रसुद्धां शुद्ध म्हणतां येत नाहींत आम्हांला—याची जबाबदारी आपल्यावरच आहे—त्याची आठवण देतें आहे.'

'तें माझ्या ध्यानांत आलं.' कुशारी हंसून म्हणाला.

उशीर झालासा वाटून तो जायला निघाला. राजलक्ष्मीनं त्याला साष्टांग नमस्कार केला. तो जात असतांना मींही कसाबसा नमस्कार करून मोकळा झालों.

तो निघून गेल्यानंतर राजलक्ष्मी म्हणाली, 'आज तुम्हाला खाणं जेवणं जरा लवकरच उरकून घेतलं पाहिजे.'

'कां बरं ?'

'दुपारीं सुनंदेच्या घरीं जायचं आहे.'

'मग मीं कशाला ?' मीं आश्चर्यचकित होऊन विचारलं, 'बरोबर यायला रतन आहे ना ?'

'त्याच्या सोबतीनं आज भागायचं नाहीं.' राजलक्ष्मी मान हालवून म्हणाली, 'तुम्हाला बरोबर घेतल्याशिवाय मीं कुठं एक पाऊलसुद्धां टाकणार नाहीं.'

'ठीक आहे.' मीं म्हटलं, 'होऊन जाऊं दे.'

## ८

सुनंदेनं मला एकदां 'दादा' म्हणून म्हटल्याचा मी पूर्वीं उल्लेख केला आहे, एक प्रकारचं जिव्हाळ्याचं नातं तिथं जडलं गेलं होतं. पण हा प्रसंग कसा घडून आला याची सारी हकिकत विस्तारानं सांगितली नाहीं; तरीही तसं करण्यांत माझा कांहीं विशेष उद्देश नाहीं, पण माझा जो पहिला परिचय झाला त्याचा इतिहास थोडा चमत्कारिक आहे. तो अद्भुत आहे असं कित्येक-जण मान हालवून म्हणतील, 'या साऱ्या थापा आहेत.' ते म्हणतील, 'आम्हींही बंगाली आहोंत—या बंगाल देशचेच रहिवाशी आहोंत. पण साधारण गृहस्थाच्या घरीं असं कांहीं घडल्याचं आम्हीं पाहिलं नाहीं.'

खरं आहे. पण प्रत्युत्तरादाखल मला एवढं सांगतां येईल, 'मीही याच देशचा रहिवासी. पण सुनंदेसारखी दुसरी कुणी या देशांत मला आढळली नाहीं.' हेंही तितकंच खरं आहे.

राजलक्ष्मी आंत आली. मोडक्या भिंतीच्या बाजूला राहून मीं सावलीची जागा शोधीत होतों. तोंच एक सतरा अठरा वर्षांचा मुलगा येऊन म्हणाला. 'यावं. आंत यावं.'

'तर्कालंकार कुठं आहेत? आराम करताहेत वाटतं?'

'नाहीं. ते बाजारांत गेले आहेत. बाई आहेत आंत. यावं आपण.' असं म्हणून तो पुढं झाला नि फारशी चौकशी न करतां आम्हींही त्याच्या मागोमाग निघालों.

या घराला केव्हांतरी एकदां सदर दरवाजा असावा—पण आतां त्याचा कुठं मागमूससुद्धां नव्हता. कांडणघराच्या बाजूनं आम्हीं आंत प्रवेश केला त्याअर्थी आम्हीं सदर दरवाजांतून आंत आलों असं ठरवलं, अंगणांत येतांच सुनंदा दिसली. एकोणीस वीस वर्षांची एक काळीसांवळी मुलगी–या घरासारखीच कसलंच लेणं नसलेली—समोरच्या ओटीवर बसून पोहे भाजीत होती. वाटलं, राजलक्ष्मी आलेली पहातांच ती उठून उभी राहिली. एक फाटकी घोंगडी अंथरून मला नमस्कार करून ती म्हणाली, 'बसावं. अजय, चुलींत विस्तव आहे—गुडगुडी भरून आण पाहूं.'

राजलक्ष्मी आधींच जमिनीवर बसली होती. तिच्याकडे पाहून थोडासा हंसून ती म्हणाली, 'आपल्याला पान दिलं पाहिजे होतं पण आमच्या घरीं पान नाहीं.'

आम्हीं कोण याची अजयला कल्पना असावी. गुरुपत्नीचें हें भाषण ऐकून तो एकदम पुढं सरसावून म्हणाला, 'नाहीं! आज इतक्यांत पानं कशीं संपलीं?'

एक क्षणभर त्याच्या चेहऱ्याकडे पहात सुनंदा म्हणाली, 'आज इतक्यांत संपलीं कीं कधीं केव्हांतरी आलीं होतीं का घरीं?' असं म्हणून ती हंसूं लागली.

राजलक्ष्मीकडे पाहून ती म्हणाली,'गेल्या रविवारीं छोटे महंतमहाराज येणार होते तेव्हां एक पैशाची पानं आणलीं होतीं. त्याला आज चांगले दहा दिवस झाले. हेंच तें! एकदम पानं कशीं संपलीं असं आमच्या अजयला वाटलं तें एवढ्यामुळंच!' असं म्हणून ती पुन्हां हंसूं लागली.

अजय अगदीं ओशाळून गेला. तो म्हणाला, 'वा! असंच कां? घर तर होतीं म्हणा—आतां संपलीं म्हणा!'

राजलक्ष्मी हंसत हंसत म्हणाली, ‘ खरं आहे त्याचं म्हणणं ! तो पुरुष माणूस —घरांत काय संपलं आहे हं त्याला कसं कळणार ?

आपल्या बाजूला कुणीतरी एक आहे असं पाहून अजय म्हणाला, ‘ पहा तर खरं ! आणि बाईंनां वाटतं—’

‘ बाईंना काय वाटतं ! ’ सुनंदा तशीच हंसत म्हणाली, ‘ नाहीं अका, वरची गृहिणी अजयच आहे. त्याला सारं कांहीं माहीत आहे. इथं आम्हीं कष्ट काढतों तें त्याला कबूल करायचं नसतं. बाबूगिरी—खोटा मोठेपणा आहे ना ? ’

‘ कां कबूल करणार नाहीं ? वा: ! बाबूगिरी काय चांगली ? आमचं हें असं —’ असं म्हणत म्हणंत माझ्यासाठीं तंबाखू भरून आणण्यासाठीं तो बाहेर निघून गेला.

सुनंदा म्हणाली, ‘ शास्त्रीपंडितांच्या घरीं उणीवच फार असते. शोधलं तर कदाचित् एकादी सुपारी सांपडेल—या, मीं पहातें हं–’ असं म्हणून ती जायला निघत होती तोंच तिचा पदर धरून थांबवीत राजलक्ष्मी म्हणाली, ‘ सुपारी पान कांहीं नको. मला तें आवडत नाहीं. तुम्ही इथं माझ्याजवळ बसा नि घटकाभर बोला. ’

असं म्हणून तिनं सक्तीनं तिला जवळ बसवून घेतलं.

आदरसत्काराच्या संकटांतून अशा प्रकारें सुटणूक मिळाल्यावर त्या दोघींही क्षणभर स्तब्ध बसल्या. तेवढ्या अवधींत मीं सुनंदेला पुन्हां एकदां चांगलं पाहून घेतलं.

खरं पाहिलं, तर दारिद्र्य म्हणजे अशी कांहीं चीज आहे, कीं जो त्याची पर्वा करीत नाहीं त्याला तें जाणवत नाहीं, हें पहिल्यानं माझ्या ध्यानीं आलं. आमच्या साधारण बंगाली घरांतील ही एक सामान्य मुलगी—बाहेरून पाहिलं तर कांहीं वैशिष्ट्य नसलेली—नाहीं रूप, नाहीं दागदागिने; या मोडक्या घराकडे कुठंही नजर टाकली तर जाणवतं काय ती अभावाची छाया !–पण ती नुसतीच छाया—त्यापेक्षां कांहीं जास्त नाहीं !—हें मुद्दां त्याचवेळीं नजरेला आल्यावांचून रहात नव्हतं. अभावाच्या दु:खाला ही मुलगी नुसती डोळ्याच्या पालवणींनं उघडून लावीत होती. मुद्दाम होऊन ती जाणीव उत्पन्न करून घेण्याइतकं धाडस तिच्या ठायीं नसावं. तसं पाहिलं तर, कांहीं महिन्यापूर्वी तिला कशाचीच उणीव नव्हती. घरदार, आप्त स्वकीय, नोकर चाकर, चांगला थाटलेला संसार—कशाचीच

कांहीं उणीव नव्हती. एका कठोर अन्यायाच्या प्रतिकारासाठीं ती भरलं घर टाकून बाहेर पडली होती. एकादं फाटकं वस्त्र फेकून द्यायच्या कल्पनेपलिकडे तें सारं टाकायला तिला एवढासुद्धां वेळ लागला नाहीं. नि तसं पाहिलं तर कठोरपणाचं कोणतंच लक्षण तिच्या अंगीं दिसत नव्हतं.

राजलक्ष्मी एकदम मला उद्देशून म्हणाली, ‘ मला वाटलं होतं, कीं सुनंदा म्हणजे कुणीतरी मोठी बाई असेल, अन् आतां पहातें तो ही एवढीशी मुलगी ! ’

गुरुजीच्या गुडगुडींत तंबाखू भरून अजय घेऊन आला. त्याच्याकडे बोट करून सुनंदा म्हणाली, ‘ एवढे मोठे मुलगे जिला आहेत, ती एवढीशी मुलगी कशी ? ’ असं म्हणून ती हांसत सुटली. तिचं हंसणं मोठं सरळ, मोठं निर्मळ, रसभरीत होतं. चुलींतले निखारे आपण घेतले तर चालतील कीं काय असं अजयनं विचारलं त्यावेळीं ती थट्टेनं म्हणाली, ‘ कुठल्या जातीचा आहेस तूं बाबा कुणाला ठाऊक ! तूं माझ्या चुलीला शिवूं नकोस. ’

खरं कारण असं होतं कीं, धगधगत्या चुलींतला निखारा त्याला काढून घेतां आला नसता. ती स्वतः गेली नि निखारा ठेवून चिलीम तिनं अजयच्या हातीं दिली. पुन्हां तशीच हंसत येऊन ती आपल्या जागीं बसली.

साधारण खेडेगांवच्या बायका गोळा झाल्या म्हणजे जशा गप्पागोष्टी करतात तशीच ती बोलत होती. तिच्यांत तसं कांहीं वैशिष्ट्य दिसून आलं नाहीं, पण तिच्याबद्दल जी हकिकत ऐकली होती त्यामुळें ती असामान्य असावी असे आम्हाला वाटलं होतं.

थोड्याच वेळांत तें तिचं वैशिष्ट्य आम्हां दोघांसमोर उघडकीला आलं. गुडगुडी माझ्या हातीं देऊन अजय म्हणाला, ‘ मग ती गुंडाळून ठेवूं का बाई ? ’

सुनंदेनं खुणेनंच होय म्हटलं. तिच्या नजरेच्या अनुरोधानं मी पाहिलं तेव्हां मला असं दिसून आलं, कीं एका लांकडी चौरंगावर एक भली मोठी पोथी अस्ताव्यस्त उघडी पडली होती. आतांपर्यंत आमचं तिकडे लक्ष गेलं नव्हतं. त्या पोथीचीं पानं जुळवून घेऊन पोथी गुंडाळून ठेवीत असतां अजय निराशापूर्वक म्हणाला, “ उत्पत्ती प्रकरण ” तर आज संपलं नाहीं. केव्हां संपणार ? केव्हांच संपायचं नाहीं वाटतं ! ’

‘ ती कसली पोथी अजय ? ’ राजलक्ष्मीनं विचारलं.

‘ योगवासिष्ठ ! ’

'अस्सं! म्हणजे बाई पोहे भाजीत होती नि तूं तिला ऐकवीत होतास?'

'नाहीं—आई शिकवतात मला.'

अजयच्या या सरळ नि संक्षिप्त उत्तरामुळं सुनंदेचा चेहरा लाजेनं लाल झाला. ती एकदम म्हणाली, 'बाई काय त्याला शिकवणार कपाळ! एवढी कुठं विद्या आहे मला!

'नाहीं अक्का. दुपारीं एकटीच घरकाम करीत असतें, यावेळीं कुठंतरी बाहेर जाणं होतं, मुलं पोथी घेऊन कांहीं तरी बडबडतात--त्यांतलं बारा आणे माझ्या कानींसुद्धां पडत नाहीं. त्याचं काय ऐकतां?--कांहीं तरी बोलतो आहे झालं!' योगवासिष्ठ घेऊन अजय निघून गेला. मुद्रा गंभीर करून राजलक्ष्मी तशीच बसली होती. घटकाभऱ्यानं सहसा एक मोठा सुस्कारा टाकून ती म्हणाली, 'घर जवळ असतं तर मीं देखील झालें असतें तुझी शिष्या. तसं कांहींच येत नाहीं मला. नुसती पुजा जरी धडपणं करतां आली असती तरी पुष्कळ झालं असतं.'

मंत्राचा उच्चार करण्याच्या बाबतींत तिचा संदिग्ध आक्षेप मीं पुष्कळदां ऐकला होता--ती तक्रार माझ्या संवयीची झाली होती--सुनंदेनं तें पहिल्यानंच ऐकलं पण ती कांहीं बोलली नाहीं. नुसती खुद्कन् हंसली मात्र, तिला काय वाटलं कुणाला ठाऊक! ज्याला मंत्राचा अर्थ कळत नाहीं, प्रयोग माहीत, त्यानं अर्थहीन मंत्र पाठ करण्याच्या बाबतींत शुद्धाशुद्धीची एवढी उठाठेव कशाला करावी असं कदाचित् तिला वाटलं असेल. कदाचित् हा प्रकार तिला नवीनच नसेल. सर्वसाधारण बंगाली घरच्या स्त्रीच्या तोंडून तिनं ही तक्रार वारंवार ऐकलीही असेल. म्हणूनच त्या गोष्टीचं निराकरण करण्याची जरुरी नाहीं असंही तिला वाटलं असेल. कदाचित् यांतलं कांहींच नसेल. नुसत्या विजयामुळं स्वभाविकरीत्या ती उगीच राहिली असेल.

पण मला असं वाटलं, या अपरिचित् अतिथी स्त्रीला सर्वसाधारण स्त्रीसारखीच सामान्य नजरेनं जर ही पहात असेल तर पुढं तिला पश्चात्ताप होईल, शिवाय मत बदलणं भाग पडेल, असा विचार माझ्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

चटकन् राजलक्ष्मीनं आपली बाजू सावरून घेतली. कुणी नुसतं हुं म्हटलं तरी नेवढ्यावरूनच त्याच्या मनांतील गोष्ट तिला अजमावतां येई हें मला माहीत होतं. तिनं मंत्रतंत्राचा विचार सोडून दिला नि नुसती सैंपाकपाणी घरकामाची कथा सुरु केली. ती हलक्या आवाजांत बोलत होती त्यामुळं तिचं भाषण माझ्या कानीं

२९.५.६६
बा७७आ
७६५८

आलं नाहीं—ऐकायचा मी प्रयत्नही केला नाहीं. तक्ल्याकरची गुडगुडी हातीं घेऊन अजयनं दिलेल्या कोरड्या तंबाखूचं भस्म करण्याच्या कामाला लागलों.

संसारांतल्या कोणत्या भयंकर भानगडीबद्दल या दोन्ही बायका हळुहळू चर्चा करीत होत्या तें त्यांचं त्यांनाच माहीत ! मी मात्र जवळच हातीं गुडगुडी घेऊन उगीच बसलों होतों. त्यावेळीं एकाएकीं मला वाटलं, कीं एका मोठ्या कठीण प्रश्नाचं उत्तर मला मिळालं. बायकांना आम्हीं कमी लेखतों असा आमच्यावर एक घाणेरडा आरोप आहे. असा आरोप कां करण्यांत येत असतो नि त्याचा प्रतिकार कसा करायचा याजबद्दल मी निरनिराळ्या बाजूंनीं यापूर्वी विचार करून पाहिला होता. पण आज सुनंदेला स्वतःच्या नजरेनं अशी पहाण्याचा योग आला नसता तर मला वाटतं हा संशय तसाच कायम राहिला असता.

देशांत नि परदेशांत निरनिराळ्या प्रकारचे स्त्रीस्वातंत्र्याचे नमुने मीं पाहिले आहेत. ब्रह्मदेशांत याचा जो एक नमुना टिच्चून दिसला तो काय विसरतां येईल ? तीन ब्रह्मी स्त्रिया भर रस्त्यावर उभ्या राहून एका चांगल्या धडधाकट पुरुषाची ज्या प्रकारची खबर घेत असतां मीं पाहिलं होतं त्यावेळीं अंगावर कांटा येऊन मीं घामाघूम झालों होतों. तें दृश्य पहात असतांना अभया म्हणाली होती, 'श्रीकांतबाबू, आमच्या बंगाली बायका जर अशा असत्या—'

आमचे काका एकदां दोघां मारवाडी बायकांच्याबद्दल तक्रार करीत होते. त्या बायांनीं आगगाडींत आमच्या काकांचे नाक नि कान सडकून पिरगळले होते. काकानीं ती हकिकत सांगितली तेव्हां आमची काकू सुस्कारा टाकून म्हणाली, 'आम्हां बंगाल्यांच्या घरांघरांत जर असं झालं असतं तर—'

असं झालं असतं तर निदान आमच्या काकांनीं तरी जबरदस्त विरोध केला असता पण एवढ्यावरूनच जर स्त्रीजातीवरील हीनत्वाच्या आरोपाचं निराकारण होईल असं म्हणतां आलं नसतं हें निराकारण कसं व्हावं नि कुठं होत आहे याचा प्रत्यक्ष पुरावा सुनंदेच्या त्या मोडक्या घरांतल्या फाटक्या बैठकीवर बसून आज मी अनुभवीत होतों.

'यावं,' म्हणून नुसतं माझं स्वागत करण्यापलिकडे ती माझ्याशीं एक शब्द सुद्धां बोलली नव्हती. राजलक्ष्मीबरोबर सुद्धां तिनं अशी विशेष कांहीं चर्चाही केली नव्हती, पण या घरांत खायचं पान नाहीं—विकत घ्यायचं सामर्थ्य नाहीं—हें सांगतांना तिनं खोटं अवडंबर न आणतां अगदीं मोकळेपणानं हंसत मुखानं

सांगितलं, तसली वृत्ती मात्र दुर्लभ आहे यांत शंका नाहीं. तिच्या साऱ्या भाषणांतलं हें एवढंच भाषण माझ्या कानांत घुमत होतं. निःसंकोचित वृत्तीनं आपल्या दारिद्र्याची तिनं जी थट्टा करून उडवली त्यामुळं साऱ्या लाजेलाच लाज वाटली कीं काय असं दिसून आलं. साधारणपक्षीं या प्रसंगाला तोड नव्हती.

एका वटकेच्या बैठकींत मला दिसून आलं कीं हें मोडकं घर, घरचं हें जीर्ण सामानसुमान, दुःख, दैन्य, अभाव या सर्वांच्या पलिकडे ही भूषणहीन स्त्री वस्ती करून राहिली होती. अध्यापक असलेल्या तिच्या बापानं सासरीं पाठवतांना मुलीला स्त्रीधन म्हणून जें काय दिलं होतं तें हेंच--कीं धर्म नि विद्येचं शिक्षण. शिक्षण दिल्यानंतर ती बूटमोजे घालून हिंडेल कीं बुरखा घेऊन राहील, किंवा अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं मुलानवऱ्याला घेऊन मोडक्या घरांत वस्ती करील, तिथं पोहे भाजील कीं योगवासिष्ठ शिकवील याची काळजी कशाला करायची ! आम्हींच बायकांना हीन ठरवलंय ना ? तिथं आतां वाद कसला करायचा ? पण एवढ्या शिक्षणाच्या बाबतींत जर आपण दुर्लक्ष केलं तर त्या कर्माचं फळ मात्र मिळाल्यावांचून रहाणार नाहीं.

'उत्पत्ती प्रकरणा' ची गोष्ट निघाली नसती तर सुनंदेच्या विद्वत्तेचा आम्हांला पत्ताही लागला नसता. पोहे भाजायला बसल्यापासून आमच्या बरोबर हंसत खेळत भाषण करीपर्यंत योगवासिष्ठाची शिकवण कुठंच बाहेर डोकावली नव्हती. त्याच प्रमाणं नवरा गैरहजर असतांना अपरिचित पाहुण्याची सरबराई करण्यांतही तिनं मुळींच कसूर केली नव्हती-या भयाण घरांत अगदीं सहज लीलेनं सतरा अठरा वर्षं वयाच्या मुलाची आई होऊन बसण्याचा जो अधिकार तिनं मिळवला होता, तो विशेष होय ! तिच्या नवऱ्यानं संशयाच्या दोरीनं तिला बांधून ठेवण्याची कधीं कल्पनासुद्धां केली नाहीं किंवा शिक्षेची जरुरी त्याला भासली नाहीं याच पहाऱ्यांतून घरोघर किती पहारेवाले तयार झाले होते !

तर्कालंकार महाशय मुलाला घेऊन बाजारांत गेले होते. त्यांची भेट झाली असती तर बरं झालं असतं. पण वेळ बराच होत चालला होता. या दरिद्री गृहलक्ष्मीचं कितीतरी घरकाम शिल्लक राहीलं असेल हें ध्यानीं येऊन राजलक्ष्मी उठली नि निरोप घेत म्हणाली, 'आज आतां जातें. तुमची हरकत नसेल तर पुन्हां येईन.'

मींही उठून उभा राहिलों नि म्हणालों, 'मलाही इथं बोलायला कोण नाहीं. या म्हटलं तर येईन मधून मधून.'

सुनंदा बोलली नाहीं. नुसतं हंसून तिनं संमती दाखवली.

परत येतांना राजलक्ष्मी म्हणाली, 'मोठी विलक्षण मुलगी आहे. जसा नवरा तशी बायको. देवानं छान जोडा जमवला आहे.'

मी नुसतं 'हूँ' म्हटलं.

राजलक्ष्मी म्हणाली, 'त्यांच्या मूळ घरची खबर आज मुद्दामच काढली नाहीं. कुशारी बाबूचा अजून चांगलासा परिचय झाला नाहीं. पण हीं दोन माणसं मात्र, कांहीं म्हणा, मोठीं विलक्षण आहेत.'

'असं वाटतं खरं' मी म्हटलं, 'माणसं वागवायची तुझी हातोटी मोठी अजब आहे. या दोघांतलं वैष्यम्य मोडून एकदां कांहीं मिटवतां आलं तर पहा!'

तोंड दाबून हंसत राजलक्ष्मी म्हणाली, 'कसली आली आहे हातोटी? मला कांहीं तुम्हांला मात्र आवरतां आलं नाहीं. इतर बायकांनीं सहज तुम्हांला मुठींत ठेवलं असतं.'

'तसंही झालं असतं.' मी म्हटलं. 'पण योगच जर तसा आला नाहीं तर त्याची चर्चा करण्यांत हाशील काय?'

'जाऊंद्या हो.' राजलक्ष्मी तशीच हंसत म्हणाली, 'इतक्यांतच कांहीं हातचं गेलं नाहीं म्हणावं.'

आज सारा दिवस वर आभाळ भरून आलं होतं. तिन्हीसांजांना सूर्य ढगाआड झाकून गेल्यामुळं समोरचं आकाश तांबडं लाल झालं होतं. त्याची गुलाबी छाया समोरच्या पठारावर पडली होती. बाजूच्या एका वेळूच्या बेटावर आणि दोन तीन चिंचेच्या झाडावर झांकल्या सूर्याच्या किरणांनीं सोन्याचा सडा पसरला होता.

राजलक्ष्मीच्या शेवटच्या उद्गाराचं मी उत्तर दिलं नाहीं. बाहेरच्या दशदिशां-प्रमाणं अंतरांतलं मन सुद्धां तांबडं लाल झालं होतं. तिची दृष्टि दुसरीकडे होती. मी सहज तिच्याकडे पाहिलं, तिच्या ओठावरचं हास्य अजून पुरं मावळलं नव्हतं. तें चिरपरिचित हास्यमुख त्या कोंवळ्या किरणामुळं उजळलेलं दिसल्याचं पाहून हृदय भरून आलं. मला वाटलं, ही नुसती आकाशांतल्या रंगाची पडछाया नव्हे. आत्तांच एका स्त्रीहृदयांतला जो प्रकाश मीं संपादन करून आणला होता त्याचीच झळक तिच्या अंतःकरणांत खेळूं बागडूं लागली होती.

आमच्याखेरीज रस्त्यावर दुसरं कुणीच नव्हतं. समोर बोट दाखवून ती म्हणाली, 'तुमची सावली पडलेली कां दिसत नाहीं, सांगा ना?'

मी पाहिलं-उजव्या बाजूनं माझी अस्पष्ट छाया तिच्या सावलींत मिसळली होती. मी म्हटलं, 'वस्तू असली तर छाया पडणार ना? इथं कांहीं नाहींच मुळीं!'

'पूर्वीं होतं?'

'चांगलंस आठवत नाहीं--नीट पाहिलं नव्हतं.'

'मला आठवतं.' राजलक्ष्मी हंसून म्हणाली, 'नव्हतं कां? एवढीशी होतें तेव्हांपासून पहातें आहे.'

तृप्तीचा एक मोठा निश्वास सोडून ती म्हणाली, 'आजचा दिवस मोठा मजेंत गेला. इतक्या दिवसांनीं एक मैत्रीण लाभलीशी वाटली.' असं म्हणून ती माझ्याकडे पहात राहिली.

मीं कांहीं बोललों नाहीं. पण मला मात्र निश्चयपूर्वक वाटलं, कीं तिचे उद्गार अगदीं यथार्थ होते.

घरीं येऊन पोंचलों. धूळ माखलेले पाय धुवायची देखील संधी मिळाली नाहीं. मिळवलेलं सारं समाधान कुठल्याकुठं नाहींसं झालं. बाहेरच्या अंगणांत दहापंधरा लोक येऊन बसले होते. आम्हांला पहातांच ते एकदम उठून उभे राहिले. वाटलं रतन त्यांना व्याख्यान देत होता. त्याचा चेहरा आनंदानं फुलून उठला होता. तो जवळ येऊन म्हणाला, 'पाहिलंत, मीं म्हणत होतों तसंच शेवटीं झालं.'

उतावीळपणं राजलक्ष्मी म्हणाली, 'काय म्हणत होतास? मला नाहीं आठवत. पुन्हां सांग पाहूं?'

रतन म्हणाला, 'पोलिसांनीं हातकड्या घालून नवीनला पकडून नेला.'

'पकडून नेला? केव्हां? काय केलं त्यानं?'

'मालतीचा मुडदा पाडला त्यानं!'

'म्हणतोस काय?'

त्याचा चेहरा एकदम पांढरा फटक पडला.

पण तो बोलायच्या पूर्वींच सारे एकदम बोलत उठले, 'नाहीं, नाहीं आई-साहेब, एकदम मुडदा पाडला नाहीं—खूप मारलं आहे खरं पण ठार मारलं नाहीं.'

डोळे वटारून रतन म्हणाला, 'कशावरून? तुम्हांला काय माहीत आहे? तिला इस्पितळांत पाठवलं पाहिजे होतं पण अजून कुठं सांपडत नाहीं.'

'कुठं गेली ती? तुमच्या सुद्धां हातांत हातकड्या पडतील—माहीत आहे?' सर्वांची तोंडं सुकून गेली. कुणी कुणी काढता पाय घेऊं लागले. रतनवर डोळे

वरून राजलक्ष्मी म्हणाली, ' तूं त्या तिकडे जाऊन उभा रहा पाहूं ? जेव्हां मी विचारीन तेव्हां बोलत जा. '

मालतीचा म्हातारा बाप रडव्या तोंडानं गर्दींत उभा होता. आम्ही सारे त्याला ओळखत होतों. खूण करून त्याला बोलावलं नि विचारलं, ' खरी हकिकत काय आहे विश्वनाथ ? खोटं सांगितलंस किंवा कांहीं लपवून ठेवलंस तर कंबख्ती भरेल तुझी ! '

विश्वनाथनं हकिकत सांगितली ती अशी—गेल्या रात्रीं मालती बापाच्या घरीं आली होती. आज दुपारीं ती पाणी आणायला विहीरीवर गेली होती. तिचा नवरा नवीन तिथंच कुठं तरी लपून बसला होता. ती एकटी आहे असं पाहून त्यानं तिला एक फटका लगावला. डोकं फुटून रक्त वाहूं लागलं. मालती रडत रडत पहिल्यानं इथं आली. आम्ही इथं नव्हतों. असं पाहून कुशारी महाशयांना शोधण्यासाठीं त्यांच्या ऑफिसांत गेली, तिथं जेव्हां तेही भेटले नाहींत तेव्हां सरळ पोलीस ठाण्यावर गेली, पोलीसांना जखम दाखवून देतांच पोलीस तिच्या बरोबर आले नि तिनं नवीनला त्यांच्या ताब्यांत दिलं. तितक्यांतच तो घरीं आला होता, स्वतः थोडासा भात रांधून जेवायला बसला होता, त्यामुळं त्याला पळून जातां आलं नाहीं. फौजदारांनीं लाथ मारून भात उडवून दिला नि त्याला पकडून नेलं.

हकिकत ऐकतांच राजलक्ष्मी भडकून उठली. मालतीबद्दल आधींच तिचा राग होता—नवीनबद्दलही फारशी सहानुभूती नव्हती. पण तिनं तो सारा राग काढला तो माझ्यावर. ती संतापून म्हणाली, ' शंभर वेळ मी तुम्हांला सांगितलं, कीं हलक्या लोकांच्या भानगडींत तुम्हीं पडूं नका म्हणून. आतां तुम्हींच काय तें पाहून घ्या—जा. '

' या भानगडी मला नकोत ! ' असं म्हणून ती कुठंसुद्धां न पहातां तशीच तडक घरांत निघून गेली. जातां जातां म्हणाली, ' फासावर चढवावयाला हवा त्या नवऱ्याला ! अन् ती हरामजादी मेली असेल तर ब्याद गेली म्हणावं ! '

घटकाभर आम्हीं सारेच ताठ होऊन राहिलों. काल याच वेळीं मध्यस्ती करायच्या भानगडींत पडलों त्यामुळं हें बोलून घ्यावं लागलं. कालची खटपट केली नसती तर आज हा प्रसंग आला नसता. पण मीं जें कांहीं केलं तें चांगल्या उद्देशानं. मला वाटलं होतं कीं प्रेमलीलेचा हा झांकला प्रवाह अंतराळांतून वाहून

साऱ्या वाडीला बुडवून टाकतो आहे त्याला पाट फोडावा. तसं केलं तर सर्वांचंच कल्याण होईल! पण आतां कळलं, ती माझी चूक झाली.

ही एकंदर हकिकत काय झाली होती तें आधीं सविस्तर सांगितलं पाहिजे.

मालती ही नवीन डोंबाची बायको होती खरी पण इथं आल्यानंतर मला दिसून आलं, कीं या डोंबवस्तींत ती ठिणगीसारखी चमकत होती. कुणाच्या घरांत तिच्या मुळं कसा भडका उडेल हें कांहीं सांगतां आलं नसतं. त्यामुळं तिथल्या साऱ्या बायका अस्वस्थ होत्या. मालती जशी देखणी होती तशी चपळही होती. ती चमकीचे डूल कानांत घालीत असे. वासांचं तेल लावून बुचडा बांधी. नेसायला काळ्या कांठाची मीलची तलम साडी नेसत असे. उघड्या रस्त्यांतून फिरतांना पडलेला डोक्यावरचा पदर कधीं सांवरीत नसे.

ती मोठी तोंडाळ होती. त्यामुळं तिच्याबरोबर बोलायला कुणी धजत नसे. दृष्टीआड गांवचीं लोकं तिला कशा प्रकारें नांवं ठेवीत असत तें लिहून सांगतां यायचं नाहीं.

पहिल्यानं मालती नवीनच्या घरीं रहायलाच तयार नव्हती—माहेरींच रहात असे. ती म्हणे, ‘ हा मेला मला काय खायला घालणार ? ’ तिच्या रागानं तो गांव सोडून गेला. कुठल्या तरीं शहरीं जाऊन तिथं पट्टेवाला झाला होता वाटतं! वर्षभरानं तो परत गांवीं आला. येतांना मालतीसाठीं चांदीचे पेंच, चिनी सुताची साडी, रेशमी फिती, एक बाटली गुलाबपाणी नि एक मोठी ट्रंक घेऊन आला होता. या देणगीच्या जोरावर तिला नुसतं घरीं आणायचं इतकंच नव्हे तर तिला आपलीशी करून टाकायची अशी त्याला आशा होती.

या साऱ्या ऐकलेल्या गोष्टी. पण केव्हांपासून त्याच्या अंतःकरणांत संशयाचं भूत जागं झालं नि आडआडोशाला राहून तो तिच्यावर नजर ठेवूं लागला—नि या उप्पर आणखीं जें कांहीं झालं तें केव्हांपासून, त्याचा पत्ता मला लागला नाहीं. त्या दोघांचं वाग्युद्ध नि मुष्टीयुद्ध चालत असल्याचं मी आल्यापासून पहात होतों. ही डोकेफोडी पहिलीच नव्हती—यापूर्वीही एक दोन दिवस असंच झालं होतं—त्यामुळंच त्याला आजची ही मारामारी केल्यावर कांहीं विशेष वाटलं नाहीं. रोजचाच प्रकार समजून तो निश्चिंतपणें जेवायला बसला होता. पोलिसांना घेऊन येऊन मालती आपल्याला पकडून देईल याची त्याला कल्पनासुद्धां नव्हती.

कालच सकाळीं पहाटेच्या भूपाळीसारखा आवाज चढवून मालती जेव्हां

आरडाओरडा करूं लागली होती, तेव्हां हातचं काम टाकून देऊन राजलक्ष्मीनं येऊन मला सांगितलं होतं, ' आमच्या घराशेजारीं रोज असला दंगा झालेला मला खपायचा नाहीं. पटत नसेल तिचं, तर चार दमड्या तिच्या दांतावर मारून तिला घालवून द्या म्हणावं ! '

' तो नवीन तरी काय कमी पाजी आहे ? ' मी म्हटलं होतं, ' कामधाम कांहीं करीत नाहीं नुसते मासे धरीत फिरत असतो. हातीं पैसे पडतांच ताडी पिऊन मारहाण सुरू करतो. हें सारं शहरांत शिकून आला आहे हें काय सांगायला हवं ?'

' दोघंही सारखींच ! ' असं म्हणून राजलक्ष्मी आंत जायला निघाली. बोलतां बोलतां म्हणाली, ' कामधाम करील केव्हां ? हरामजादी त्याला फुरसद देईल तेव्हांना ? '

खरं पाहिलं तर या त्यांच्या शिवीगाळी नि मारामारी सर्वांनाच असह्य झाल्या होत्या. एक दोन वेळ प्रयत्न करून पाहिला पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालं नाहीं. जेवणखाण उरकल्यावर आज त्याला बोलावून आणून शेवटचा निकाल लावून टाकायचा असं मीं ठरवलं होतं.

पण त्याला बोलवावं लागलं नाहीं. दुपारींच गांवच्या बायापाप्यानीं घर भरून निघालं. नवीन म्हणाला ' बाबूजी, आतां हें पुरे झालं ! ही बिघडलेली बायको आहे. यापुढं तिचा संबंध नको. हिला एकदां माझ्या घरांतून बाहेर काढा ! '

तोंडाळ मालती पदराआडून म्हणाली, ' आणि माझ्या बांगड्या मंगळसूत्र एकदां तोडून टाका ! '

' माझे चांदीचे पेंच आधीं परत दे. ' नवीन म्हणाला.

मालतीनं त्याचक्षणीं हातांतले पेंच काढून दूर भिरकावून दिले.

ते उचलून घेऊन नवीन म्हणाला, ' माझी ट्रंक तुला न्यायला देणार नाहीं.'

' मला नकोच आहे ती. ' असं म्हणून मालतीनं पदराला बांधलेली चावी सोडून त्याच्या पायाकडे फेकली.

वीराचं अवसान आणून नवीन पुढं सरसावला. त्यानं मालतीच्या हातांतल्या बांगड्या पटापट फोडून टाकल्या. गळ्यातलं मंगळसूत्र ओढून भिंतीवरून दूर फेंकून दिलें.

' जा—तुला विधवा करून टाकली आतां ! ' तो म्हणाला.

मीं तर थक्कच झालों. एका म्हाताऱ्यानं माझी समजूत घातली—हें सारं

झाल्याशिवाय तिला म्होतूर लावतां आलं नसतं—झालं तें योग्यच झालं.

शब्दोशब्दीं प्रकरणावर प्रकाश पडत गेला. विश्वेश्वराच्या मोठ्या जांवयाचा भाऊ आज सहा महिने ये जा करूं लागला होता. तो घरचा बरा होता. विशूला रोख वीस रुपये द्यायचे त्यानं कबूल केलं होतं. मालतीला पायांत पैंजण, हातांत चांदीच्या बांगड्या नी नाकांत सोन्याची नथ घालीन असं तो म्हणत होता—नव्हे, एवढे जिन्नस त्यानं आणून विशूच्या ताब्यांत दिले होते.

एकंदरींत जो प्रकार झाला तो खराब झाला असं मला वाटलं. बरेच दिवसांपासून हा घाणेरडा कट सुरू झाला असावा नी नकळत मीं त्या कटाला मदत केल्याचं पाप माझ्या पदरीं आलं.

नवीन म्हणाला, 'मला हेंच पाहिजे होतं. आतां शहरांत जाऊन चाकरी करतों—मजा करतों. तुझ्यासारख्या दहाजणींशीं लग्न करून दाखवतों. गंगामाटी गांवचा हरी मोडल आपल्या मुलीसाठीं मला गळ घालतो आहे. तिच्या नखाची सुद्धां तुला सर नाहीं.' असं म्हणून चांदीचे पैंच नी ट्रंकेची चावी खिशांत टाकून तो निघून गेला. त्यानं एवढी बढाई मारून दाखवली खरी, पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं तर, शहरची चाकरी किंवा हरी मोडलची मुलगी त्यांना पटकावली असती असं कुणालाच वाटलं नसतं.

रतन येऊन म्हणाला, 'बाबूजी, बाई म्हणताहेत या सगळ्या भानगडी आपल्या घरीं नकोत. यांना घालवून द्या!'

मला सांगावं लागलं नाहीं. विश्वेश्वर मोडल मुलीला घेऊन जायला निघाला. जातांना तो माझ्या पायांवर डोकं ठेवायला येईल म्हणून मीं चटकन् आंत निघून गेलों.

मनाची ताटातूट झालेली—दुसरा मार्ग आहे–मग निष्कारण रोज रोज आरडा ओरडा, शिवीगाळ, मारामारी करीत रहाण्यापेक्षां हेंच बरं नाहीं का? पण सुनंदेच्या घराकडून परत येतांच कळून आलं कीं कालच्या प्रकरणांतून कांहीं बरं निपजलं नाहीं, मालतीला विधवा बनवून नवऱ्याचा सारा हक्क टाकून दिल्यावर सुद्धां मारामारीचा हक्क तेवढा त्यानं सोडला नव्हता. या वाडींतून त्या वाडींत हिंडत साऱ्या सकाळभर तो लपून छपून संधी पहात होता—संधी मिळतांच शेवटीं हें असं झालं. पण ती पोर गेली कुठं?

सूर्य अस्ताला गेला. पश्चिमेकडच्या खिडकींतून बाहेर पहात मी विचार करीत

होतों. पोलीसच्या भीतिनं मालती कुठंतरी लपून राहिली असावी—पण नवीनला तिनं जें पोलीसच्या ताब्यांत दिलं तें एका अर्थी बरं केलं. बेट्याला योग्य शिक्षा झाली. बिचारी कटकटींतून सुटली एकदांची !

सांजवात लावण्यासाठीं आलेली लक्ष्मी क्षणभर थांबून उभी राहिली पण कांहीं बोलली नाहीं ! ती बाहेर जात असतां पलिकडच्या खोलींत पाऊल टाकल्याबरोबर कसलातरी जड पदार्थ पडल्याचा आवाज ऐकून घाबरून ओरडली. धांवत जाऊन मी पहातों तर एक मोठी थोरली कापडाची मोटली दोन्ही हातांनीं तिचे पाय पकडून त्यांवर डोकं ठेवीत होती. राजलक्ष्मीच्या हातचा दिवा खालीं पडला होता तरी विझाला नव्हता. मीं दिवा उचलून पाहिलं तों काळ्या काठांची तलम साडी माझ्या नजरेला पडली. 'कोण मालती ?' मी उद्गारलों, 'चांडाळणी, राजलक्ष्मी म्हणाली, 'संध्याकाळच्या वेळीं येऊन मला शिवलीस ? काय झालंय ?'

दिव्याच्या प्रकाशांत मला दिसून आलं कीं तिच्या डोक्याच्या जखमेंतून सुरू झालेल्या रक्ताच्या धारांनीं राजलक्ष्मीचे पाय रंगले होते. बिचारी घसा फोडून सारखी रडत होती.

ती म्हणत होती. 'मला वांचवा आईसाहेब.'

राजलक्ष्मी चिडून म्हणाली, 'कां ? काय झालं आतां !'

ती रडत रडत म्हणाली, 'फौजदार म्हणाले, उद्यां त्यांच्यावर चार्ज ठेवतील. पांच वर्षांची शिक्षा होईल.'

मीं म्हटलं, 'त्यांत काय ? करावं तसं भरावं !'

राजलक्ष्मी म्हणाली, 'जाईना का तुरुंगांत ? आतां तुला काय त्याचं ?' पोरटी काळीज फुटल्यागत रडूं लागली. ती म्हणाली, 'बाबूजी म्हणत असले तर म्हणूं देत. पण आईसाहेब तुम्हीं असं म्हणूं नका. त्यांचा तोंडचा घास मीं पोटांत जाऊं दिला नाहीं.'

ती पुन्हां तसंच डोकं आपटून घेऊं लागली. ती म्हणाली, 'आईसाहेब, एवढ्या संकटांतून मला सोडवा—कुठं तरी परदेशीं जाऊन भीक मागून आम्ही पोट भरूं. नाहींतर आतां जाऊन तुमच्या विहिरींत उडी घेऊन जीव देतें.'

चट्कन राजलक्ष्मीच्या दोन्ही डोळ्यांतून आसवांच्या धारा झरझर वहात खालीं पडूं लागल्या. रक्तानं माखलेल्या तिच्या केसांवर हात फिरवीत ती म्हणाली, 'बरं बरं ! तूं उगी रहा. काय होतं तें मी पहातें.'

पहावंच लागलं ! राजलक्ष्मीच्या पेटींतले शेंदोनशें रुपये त्या रात्रीं कोणत्या ठिकाणीं जाऊन गडप झाले तें सांगायची जरूरी नाहीं.

नवीन मोडल किंवा मालती दुसऱ्या दिवशीं सकाळपासून गंगामाटी गांवांत कुणाच्याही नजरेला पडलीं नाहींत.

## ९

या बाबतींत सर्वांना वाटलं—गेलीं, बरं झालं. असल्या क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष द्यायला राजलक्ष्मीला वेळ नव्हता. दोनचार दिवसांत ती सारं कांहीं विसरून गेली. आठवण असती तरी तिनं काय केलं असतं, तें तिचं तिलाच माहीत. एकंदरींत सर्वांनाच वाटलं कीं गावचं एक पाप नाहींसं झालं.

बरं वाटलं नाहीं काय तें रतनला. तो मोठा धूर्त होता. मनांतली गोष्ट सहज बाहेर सांगत नसे. पण त्याची मुद्रा पाहिल्यावर असं वाटे, कीं झाला प्रकार त्याला मुळींच पसंत पडला नाहीं. मध्यस्ती करण्याची त्याची संधी गेली, कर्तब-गारीचा सुयोग गेला, घरचा पैसा गेला—एवढी जबरदस्त उलथापालथ होऊन एका रात्रींत कुठंच नाहींशी झाली—त्यामुळं सर्वांना जमेला धरून तो आपला अपमान झाला, आपला पराजय झाला, असं वाटून घेऊं लागला. तरीही तो कांहींच बोलत नव्हता. स्वतः घरची मालकीण या बाबतींत कांहींच लक्ष घालीत नव्हती. ती रोज सुनंदेकडे जाऊन मंत्रतंत्रांचं विशुद्ध उच्चारण करायला शिका-यच्या कामाला लागली होती. एक दिवस देखील तिचं तिथं जाणं चुकत नसे. तिथं जाऊन ती कितीसं धर्मतत्त्वाचं ज्ञान संपादन करीत होती हें मला तरी कसं कळणार होतं ? तिच्यांत होत असणारा बदल मात्र दिसून येत होता. तो जितका झपाट्यानं होत होता तितकाच अनपेक्षित होता.

दिवसा माझं जेवण सदोदीत उशीरांच होत असे. राजलक्ष्मी या बाबतींत सदोदीत तक्रार करी—तिला तें मुळींच पसंत नव्हतं खरं—पण ही चूक दुरुस्त करण्याच्या बाबतींत मला कधींच जरुरी वाटली नाहीं. पण आजकाल क्वचित् एखाद्या दिवशीं फार उशीर झाला तर माझी मलाच लाज वाटे. कारण घड्याळा-कडे बोट करून राजलक्ष्मी कठोरपणानं म्हणे, ' तुम्ही आजारी माणूस ! एवढा उशीर कां करतां ? स्वतःची काळजी तुम्हांला नसेल—पण नोकरचाकरांची तरी काळजी हवी ना ? तुमच्या या उशीरामुळें ते बिचारे टेकीला येतात. '

तो पूर्वीचाच प्रकार--तरीपण अगदीं तसाच नव्हे. पूर्वीचा राग लोभाचा होता--जिव्हाळ्याचा होता. त्यावेळीं तें बोलणं लागत नसे. आत्तांच्या रागांत असा एक कांहीं कडवेपणा होता, कीं तो जरी नोकरांच्या लक्षांत येत नव्हता--मलाही जाणवत नव्हता--तरीही देवाच्या कानाला कदाचित् कठोर लागला असता तर कोण जाणे!

एवढ्यासाठींच भूक लागली नाहीं तरीही नोकरचाकरांना त्रास पडूं नये म्हणून घाईघाईनं स्नान भोजन आटोपून मी त्यांची मोकळीक करीत असें. माझ्या या कळकळीबद्दल नोकर लोकांचा आग्रह होता कीं उपेक्षा होती हें त्यानांच माहीत! पण मीं पहात होतों, यानंतर दहापंधरा मिनिटांत राजलक्ष्मी बाहेर निघून जात असे. केव्हां रतनला तर केव्हां दरवानाला बरोबर घेत असे. केव्हां केव्हां तर एकटीच जात असे. कुणासाठीं थांबून रहायला तिला जशी कांहीं सवड नसे.

पहिल्यानं दोन चार दिवस तिच्याबरोबर जायचं जमलं होतं. पण या दोन चार दिवसांतच मला दिसून आलं, कीं त्यामुळं कुणाचीच कसली सोय नव्हती--सोय झालीही नव्हती. अर्थात् मी माझ्या स्वतंत्र खोलींत आळसावून पडलेला नि ती आपल्या धर्मकर्म नि मंत्रतंत्राच्या नव्या उठाठेवींत गुंतलेली--अशा रीतीनं आम्ही दोघंही दुरावत चाललों.

माळावरच्या तापलेल्या रुक्ष रस्त्यावरून ती घाईघाईनं जात असलेली मला माझ्या खिडकींतून दिसत असे. सारी दुपार मी एकट्यानं काय करावं इकडे लक्ष द्यायला तिला अवसर नव्हता हें मी पहात होतों. ती जात असतांना जोंपर्यंत नजर पोंचेतोंपर्यंत मी नुसता पहात रहात असें. चढउताराच्या त्या रस्त्यानं पायीं जात असतां हळुहळू तिची मूर्ति दूरदूर होत शेवटीं माझ्या नजरेआड होई. कित्येक दिवस ती जाण्याच्या वेळीं माझ्या नजरेआड होत असे असं वाटे. हा तिचा प्रवास--एकाकी प्रवास अजूनही पुरा झाला नव्हता. ती जशी कांहीं चालतच राहिली होती.

चट्कन् मी भानावर येत असें. डोळे पुसून पुन्हां एकदां डोकावून पाहून वेऊन बिछान्यावर पडत असें. कांहींच काम नसल्यामुळं ग्लानी येई नि केव्हां केव्हां माझा डोळा लागे--केव्हां केव्हां डोळे मिटून मीं उगीच पडून रहात असें. जवळच एका छोट्याशा बाभळीच्या झाडावर बसलेलं घुबड ओरडे नि त्याच्याच बरोबर माळावरच्या वाऱ्याच्या झळीमुळं डोंबांच्या वेळूच्या बेटांतून

असा कांहीं केविलवाणा आवाज निघे—मला वाटे तो जसा कांहीं माझ्याच अंतःकरणांतून निघतो आहे. मला असं वाटलं, फार दिवस हें कांहीं सहन होणार नाहीं. रतन घरीं असला तर पाऊल न वाजवतां हळूच येऊन मला हळूच विचारी, 'तंबाखू भरून आणूं का बाबू?' किती वेळ तरी त्यानं असं विचारावं. जागा असलों तरी मीं उत्तर देऊं नये—झोपेचं सोंग करून पडावं. मी बोलायला गेलों तर माझ्या अंतःकरणांतली वेदना माझ्या मुद्रेवरून तो चटकन् ओळखील याचं मला भय वाटे.

रोजच्या प्रमाणेंच त्या दिवशीं दुपारीं राजलक्ष्मी सुनंदेच्या घरीं निघून गेल्यावर सहसा मला ब्रह्मदेशाची आठवण झाली. फार दिवसांनीं अभयेला पत्र ल्याहावं म्हणून मी बसलों. ज्या फर्ममधें मीं नोकरीला होतों तिथल्या बड्या साहेबालाही एक पत्र ल्याहावं, त्याची खबर घ्यावी, असंही वाटलं. कसली खबर घ्यायची, कां खबर घ्यायची, खबर घेऊन करायचं काय या कशाचाच मी विचार केला नव्हता. —इतक्यांत खिडकीच्या समोरून कुणीतरी एक बाई तोंडावर बुरखा ओढून घाईघाईनं निघून गेलीशी वाटली. वाटलं, ती ओळखीची असावी—मालती तर नव्हे? उठून डोकावून पहायचा प्रयत्न केला पण दिसली नाहीं. मी पहात होतों तेव्हांच तिच्या पदराचा तांबडा कांठ भिंतीच्या कोनामागं दिसेनासा झाला.

या महिनाभऱ्याच्या अवधींत डोंबाच्या या सैतानी पोरीला एकप्रकारें सारे विसरून गेले होते. विसरलों नव्हतों काय तो मींच! का कोण जाणें, पण या उच्छृंखल पोरीच्या डोळ्यांतल्या एक अश्रूबिंदूचा डाग त्या संध्याकाळीं जो माझ्या मनाच्या कोंपऱ्यांत पडला होता तो अजून पुसून गेला नव्हता. मला पुन्हां पुन्हां वाटे. ती कुठं तरी आसपास असावी. गंगामाटीच्या खोट्या आमिषाच्या नि भलत्या भानगडीच्या आटोक्याबाहेर राहून ही पोर आपल्या नवऱ्याबरोबर कशा प्रकारचे दिवस काढते आहे हें कळून घेण्याची मला जिज्ञासा होई. एवढ्या लवकर त्यांनीं पुन्हां इकडे यावं असं मला वाटत नसे. पुन्हां पत्र पुरं करायला बसलों. दहापांच ओळी लिहून झाल्यावर कुणाची तरी चाहूल लागली म्हणून वर पाहिलं, तो रतन हातांत चिलीम घेऊन उभा! चिलीम गुडगुडीच्यावर बसवून माझ्या हातीं देत तो म्हणाला, "गुडगुडी ओढा ना बाबू!' मी मानेनंच होकार दिला.

रतन एकदम गेला नाहीं. क्षणभर तो उगीच उभा राहिला होता. कांहीं वेळानें तो मोठ्या गंभीरपणं म्हणाला, 'बाबू हा रतन न्हावी केव्हां मरणार आहे तें त्याला कुणी सांगेल का?'

त्याची वृत्ती मला परिचित होती. राजलक्ष्मी असती तर तिनं म्हटलं असतं; ' कळायचं तेव्हां कळेल पण तुला आतां काय सांगायचंय् ? '

पण मी नुसता त्याच्याकडे पाहून हंसलों. रतनच्या मुद्रेवरचा गंभीरपणा त्यामुळं एवढासुद्धां हटला नाहीं. तो म्हणाला, ' बाईंना मी त्या दिवशीं सांगितलं, कीं ह्या हलक्या लोकांच्या भानगडींत पडूं नका ! आतां त्या पोरीच्या आसवांतून दोनशें रुपये वाहून गेलेच कीं नाहीं ? आतां तुम्हींच सांगा मी असं सांगितलं होतं कीं नाहीं ? '

तो कांहींच बोलला नव्हता हें मला माहीत होतं. तसं बोलावं असं त्याच्या मनांत त्यावेळीं आलं असेल—पण त्यावेळीं तसं बोलायची त्याचीच काय, माझी सुद्धां छाती झाली नसती. मी म्हटलं, ' काय भानगड आहे रतन ? '

रतन म्हणाला, ' जें काय व्हायचं तेंच झालं ! '

मी म्हटलं, ' पण तें काय झालं हें जर मला कळलं नाहीं, तर जरा उघड करून सांगशील कीं नाहीं ? '

रतननं सारी हकीकत सांगितली—ती ऐकून मला काय वाटलं तें सांगतां येत नाहीं. एवढंच आठवतं, कीं ती त्या हकिकतीच्या सर्वसामान्य घाणेरडेपणामुळं माझ्या मनावर अगदीं फार वाईट परिणाम झाला. हा सारा प्रकार घडला कसा त्याचा संपूर्ण इतिहास रतनला अजूनही मिळाला नव्हता. त्याला एवढंच कळलं होतं, कीं नवीन मोडल तुरुंगांत पडला होता नि मालती आपल्या मेहुण्याच्या धाकट्या भावाबरोबर म्होतूर लावून दोघंही गंगामाटीला कालच परत आलीं होतीं. मालती एक प्रकारें मी प्रत्यक्ष पाहिली नसती तर राजलक्ष्मीच्या पैशाची ही जी बरबाद झाली ती मला खरी वाटली नसती.

रात्रीं जेवणाच्यावेळीं राजलक्ष्मीला ही हकिकत कळली. ऐकतांच ती आश्चर्यचकित होऊन म्हणाली, ' म्हणतोस काय रतन ? अगदीं खरं का हें ? मेलीनं त्या दिवशीं काय बेमालूम ढोंग केलं. पैशापरी पैसे गेले—अवेळीं मला आंघोळ करावी लागली—हें काय ? इतक्यांत झालं तुमचं जेवण ? मग जेवायला बसलां तरी कशाला ? '

असल्या प्रश्नाचं उत्तर द्यायच्या भानगडींत मी केव्हांच पडत नसे. आजही तसाच ढगीच राहिलों. तरीपण एक गोष्ट माझ्या ध्यानीं आली—हजार कारणांनीं आज माझी भूक मरून गेली होती—कांहीं खाल्लंच नव्हतं मी—पण आज तें

तिच्या नजरेला आलं. हें नजरेला आलं खरं पण दिवसेंदिवस माझा आहार तुटत येत होता हें कांहीं तिच्या नजरेला येत नव्हतं. यापूर्वी असल्या बाबतींत तिची नजर इतकी तिखट असे, कीं एवढं कुठं कमीजास्त झालं तर ती सारं घर डोक्यावर घेत असे. कोणत्याही कारणानं का असेना पण तिची ही ससाण्याची नजर भुरकट होऊन गेली होती. म्हणून दुसऱ्याच्या यातना उघड करून तिनं दाखवाव्या काय म्हणून ? नि मी तरी कां म्हणून बोलावं ? येणारा सुस्कारा दाबून कांहीं न बोलतां मी उगी राहिलों.

माझा सारा दिवस एकच प्रकारें सुरू होई, एकच प्रकारें त्याचा शेवट होई. आनंद नाहीं, वैचित्र्य नाहीं, तशीच विशेष कांहीं दुःखकष्टाची तक्रारही नाहीं. प्रकृती एकंदरींत ठीक होती.

दुसरे दिवशीं सकाळीं बऱ्याच उशीरां जेवणखाण आटोपून आपल्या खोलींत येऊन बसलों. समोरची खिडकी तशीच उघडी होती— तसंच समोरचं दृश्य होतं—उघडा कोरडा माळ ! आज पंचांगांतला कसला तरी उपास होता. अर्थातच राजलक्ष्मी त्या घाईत होती. म्हणूनच रोजच्यापेक्षां बऱ्याच लवकर ती सुनंदेकडे निघून गेली. नित्याप्रमाणें कितीतरी वेळ तसाच पहात राहिलों होतों. चट्कन् आठवण झाली. कालची दोन्हींही अपुरीं पत्रं पुरीं करून तीनांच्यापूर्वी पोष्टांत टाकलीं पाहिजे होतीं.

उगीच वेळ न घालवतां त्या कामाला लागलों. दोन्हीं पत्रं पुरीं करून वाचून पाहूं लागलों कुठं तरी अडखळल्यासारखं वाटलं. कांहीं कांहीं गोष्टी लिहिल्या नसत्या तर बरं झालं असतं असंही वाटलं. तसं पत्रांत विशेष कांहीं लिहिलं नव्हतं. ही उणीव कुठं जाणवत होती, तें पुन्हां पुन्हां वाचूनही ध्यानीं येईना.

एक गोष्ट आठवते. अभयेच्या पत्रांत रोहिणीदादाला नमस्कार सांगावें असं लिहिल्यावर शेवटीं लिहिलं होतं, ‘फार दिवस तुमच्याकडची खबर कळली नाहीं. तुम्हीं कसे अहांत, तुमचं कसं काय चाललंय्, याची नुसती कल्पना करण्यापलिकडे मीं जास्त कांहीं केलं नाहीं. कदाचित् तुम्हीं सुखांत असाल—कदाचित् नसाल, पण तुमचा संसार देवाच्या हातीं सोपवून एके दिवशीं त्या सर्वांवर पडदा टाकून जो आलों तो पडदा तसाच पडून राहिला आहे. तो दूर करून पहावा असं मनांत सुद्धां आलं नाहीं. तुमचा माझा फार दिवसांचा परिचय नव्हता हें खरं ! पण ज्या संकटाच्या काळांत आपल्या परिचयाची सुरवात झाली नि एके दिवशीं त्याचा शेवट

झाला, तो वेळेच्या मापानं मोजण्याचा प्रयत्न केव्हांच केला नाहीं. आजारीपणाच्या त्या दिवसांत, परमुलखांत तुझ्याखेरीज आश्रयाला मला कुठंच थारा नव्हता. त्यावेळीं तूं एक क्षणभरसुद्धां मागं पुढं पाहिलं नाहींस. जीव टाकून रोगी माणसाचा अंगिकार केलास. अशाच आजारीपणांत, अशीच सेवा करून मला दुसऱ्या कुणी कधीं वांचवलं नाहीं असं मीं म्हणत नाहीं. पण आज दूरवर असतांना त्या दोन्ही परिस्थितींतला फरक ताडून पहात आहें. दोघांच्याही सेवेंत, दोघांच्याही जाणिवेंत, अंतःकरणाच्या निष्कपट कळकळींत नि निकटच्या आपुलकींत केवढंतरी मोठं साम्य आहे. पण तुझ्या निःस्वार्थी नि जिव्हाळ्याच्या असामान्य वैराग्यांत जें कांहीं वैशिष्ट्य मला दिसलं, नुसत्या सेवेनंच जें आपलं आपलेपण पूर्ण केलं, मीं बरा झाल्यानंतर त्या पूर्वीच्या भावनेची एवढीसुद्धां खूण कुठं राहू दिली नाहीं, त्याची आज मला पुन्हां पुन्हां आठवण होत आहे. कदाचित् स्नेहाची आत्यंतिकता मला सहन होत नसावी, कदाचित् स्नेहाचं जें चित्र तुझ्या मुद्रेंत नि नजरेंत त्यावेळीं दिसलं होतं तें पुन्हा पहायची मला हुरहूर लागली असावी. प्रत्यक्ष नजरानजर झाल्याशिवाय या भावनेचं निदान मला करतां यायचं नाहीं. '

साहेबालाही लिहिलेलं पत्र पुरं केलं. एके काळीं खरोखरच त्यानं माझ्यावर मोठे उपकार केले होते. त्याबद्दल त्याला धन्यवाद दिले. मीं त्याच्याकडे कांहीं मागितलं नव्हतं खरं, पण इतके जास्त दिवस निघून गेल्यानंतर अशा प्रकारें धन्यवाद देण्याचं अवडंबर मीं माजवलं याची माझी मलाच लाज वाटली.

पत्ता लिहून पाकीट बंद करून पाहिलं तो डाकेची वेळ टळून गेली होती. एवढी घाई करूनही शेवटीं पत्र गेलं नाहीं. पण त्याबद्दल मनांत कांहीं विशेष न वाटतां उलट एकंदरींत बरंच वाटलं. असं वाटलं, झालं तें बरं झालं. पुन्हां एकदां उद्यां पत्र वाचून पहायची संधी मिळाली.

कुशारीची बायको येते आहे असं सांगायला रतन आंत आला. त्याच्या पाठोपाठ ती स्वतःच आंत येऊन हजर झाली. मीं जरा अस्वस्थ झालों. मीं म्हटलं, ' ती घरीं नाहीं. परत यायला संध्याकाळ होईल. '

' तें मला माहीत आहे.' असं म्हणून तिनं वरची एक बैठक ओढून घेऊन जमिनीवर टाकून बसत म्हणाली, ' संध्याकाळच काय, चांगली रात्र होईल त्यांना परत यायला. '

लोकांच्या तोंडून मीं ऐकलं होतं, कीं या बाईला संपत्तीचा फार गर्व होता.

सहसा ती कोणाच्या घरीं जात नसे. या घरासंबंधींसुद्धां तिचं असंच धोरण होतं—निदान विशेष लोभ जडवून घेण्याची उत्सुकता तिनं कधींच दाखविली नव्हती. इतक्या दिवसांत ती एक दोन वेळांच आली होती. मालकिणीच्या घरीं म्हणून एकदां स्वतः आली होती, तशीच एकदां बोलावणं गेलं होतं म्हणून आली होती. पण आज ती न बोलावतां अचानक कां आली नि घरीं कुणी नाहीं हें माहीत असूनही कां आली याची मला कल्पना होईना.

बैठकीवर बसल्यावर म्हणाली, आजकाल आमच्या जाऊबाईचं अगदीं सूत जुळलं आहे म्हणायचं ! '

न कळत तिनं मर्मावर आघात केला, तरीही मीं म्हटलं, ' हो, मधून मधून जाते तिकडे. '

कुशारीबाई म्हणाली. ' मधून मधून कां ? रोज—अगदीं दररोज. पण 'ती' येते आहे का कधीं इकडे ? एक दिवससुद्धां नाहीं ! धन्याचा मान राखणारी बाई नव्हे ती सुनंदा ! ' असं म्हणून ती माझ्या तोंडाकडे पहात राहिली.

दररोज जाणाऱ्या व्यक्तीबद्दलची गोष्ट माझ्या मनांत आली होती. पण दुसरी व्यक्ति येण्याची गोष्ट माझ्या लक्षांत आली नव्हती. अर्थात् तिचं भाषण माझ्या मनाला लागलं. पण या प्रश्नाचं उत्तर मी काय देणार होतों ? ही बाई कां आली याचं कारण मला आतां कळलं. एकदां असंही वाटलं, कीं उगीच खोटा संकोच टाकून देऊन, आपल्याला ह्या बाबतींत कांहीं करतां येत नाहीं. अशा असहाय व्यक्तीला शत्रूपक्षाच्या विरुद्ध उत्तेजित करण्यांत कसलाच फायदा नाहीं, असंही तिला सांगावसं वाटलं. मी तसं बोललों असतों तर काय झालं असतं कोण जाणे. पण बोललों नाहीं त्याचा परिणाम झाला. तिचा सारा राग एका क्षणार्धांत उसळून उठला, नि कधीं कुणाचं काय झालं, कोणत्या कारणामुळं तसं घडून आलं, या सर्वांबद्दलची सविस्तर हकिकत सांगतांना आपल्या सासुरवाडीचा दहा वर्षांचा इतिहास रोजनिशीप्रमाणें ती एकसारखी सांगूं लागली. तिच्या थोड्याशा बोलण्यानंतर माझं तिच्या भाषणावरचं लक्ष उडालं. त्याला कारणही तसंच होतं. एका बाजूला आपल्या पक्षाचा स्तुतीपाठ दया, दाक्षिण्य, तितिक्षा, प्रभृति, जे कांहीं शास्त्रोक्त सद्गुण मनुष्याच्या ठायीं असतात त्याचं सविस्तर विवरण आणि दुसऱ्या बाजूनं केवढं कांहीं विपरीत तेवढ्याची केलेली फोड, प्रतिपक्षाच्या विरुद्ध केलेल्या आरोपाचा सन, तारीख, महिना, शेजारीं साक्षीदारांचीं नांवं गांवं वगैरेची जंत्री

सांगण्याखेरीज दुसरं कांहींच नसणार याची मला कल्पना होती.

प्रथम तसं कांहीं नव्हतंही. पण तितक्यांत कुशारी बाईचा आवाज एकदम बदलल्याचं पाहून माझं लक्ष तिच्या भाषणाकडे वळलं. आश्चर्यचकित होउन मी विचारलं, ' काय झालंय ? ' ती क्षणभर टक लावून माझ्याकडे पहात राहिली नि नंतर गहिंवरून म्हणाली, ' आतां काय व्हायचं राहिलंय् बाबू! काल म्हणे भावोजी बाजारांत जाऊन स्वतः वांगी विकीत होते! '

तिचं भाषण मला चमत्कारिक वाटलं. तसा मी खुषींत असतों तर त्यावेळीं हंसलों सुद्धां असतों. मी म्हटलं, ' अध्यापक माणूस—त्याला एकदम वांगी मिळालीं कुठून नि तीं विकायला तो गेला तरी कां ? '

कुशारी बाई म्हणाली, ' त्या मेलीच्या कटकटीनं! परसवांत चार वांगीं लागलीं होतीं वाटतं! तीं देऊन त्याला तिनं बाजारांत विकायला पाठवलं. असं जर आमचं वैर साधूं लागले तर आतां गांवांत रहायचं तरी कसं ? '

' यांत वैर साधलं कसलं ? ' मी म्हटलं, ' तीं माणसं तुमच्या भानगडींत पडत नाहींत. गरज पडली म्हणून स्वतःचे जिन्नस त्यांनीं स्वतः विकले! त्यांत तुम्हांला दोष कसला ? '

माझं उत्तर ऐकून कुशारीबाई अगदीं अस्वस्थ होऊन माझ्याकडे पहात म्हणाली, ' तुम्हींच असं म्हणूं लागलां तर जायचं कुणाकडे नि सांगायचं काय ? मालकांनींच जर दूर लोटलं तर तक्रार न्यायची कुणाकडे ? मीं चाललें—'

शेवटचे शब्द बोलतांना तिला गंहिवर आलेला पाहून मी हळूच म्हटलं, ' असं पहा, यापेक्षां तुम्हीं ही हकिकत तुमच्या मालकिणीलाच सांगा. तुमचा उद्देश तिलाच बरोबर कळेल नि जें कांहीं करायचं तें तिलाच करतां येईल. '

मान वेळावीत ती म्हणाली, ' मला कुणाला कांहीं सांगायचंही नाहीं अन् कुणी माझ्यासाठीं कांहीं करायलाही नको—'

असं म्हणून पदरानं डोळे पुसून ती म्हणाली, ' पूर्वीं घरांतून म्हणायचं होत असे, दोन महिने जाऊं दे — आपोआप घरीं येतील. पुन्हां म्हणत असत, जाऊं देत आणखी दोन महिने, सारं कांहीं ठीकठाक होईल. अशी वाट पहात पहात आज वर्ष लोटलं. पण काल जेव्हां ऐकलं, कीं परसवांतलीं दोन वांगीं विकायला बाजारांत नेलीं म्हणून, तेव्हांपासून माझा सर्वांवरचा विश्वास उडाला. मेली साऱ्या संसाराची धूळधाण उडवील! पण बायकांच्या जातींत अशी दगडाच्या काळजाची

कुणी निपजेल असं मला स्वप्नींसुद्धां वाटलं नव्हतं !'

ती आणखी सांगत होती, 'त्यांना कांहीं हिची ओळख पटली नव्हती. पण मीं तेव्हांच तिला ओळखलं. पहिल्या पहिल्यानं त्याच्या याच्या कुणाच्या तरी नांवानं लपून छपून कांहीं ना कांहीं पाठवीत असें. तिकडून म्हणायचं होई, कीं कळून सवरून सुनंदा घेते आहे. पण अशानं कांहीं त्याचे डोळे उघडायचे नाहींत. मीं म्हणत असे, असेना का! पण एके दिवशीं माझे डोळें खाड्कन् उघडले. जिन्नस मीच पाठवतें आहे. हें तिला कसं कळलं कोण जाणे, एके दिवशीं सारी चिजवस्त टोपलींत भरून गड्याकडून पाठवून माझ्या दारीं आणून टाकली. तरीही इकडच्यांचे डोळे उघडले नाहींत—जाग आली काय ती मला!'

तिचा उद्देश आतां कुठं माझ्या ध्यानीं येऊं लागला. मी सहानुभूतीपूर्वक म्हणालों, 'आतां काय आहे उद्देश आपला? आपल्या विरुद्ध त्या लोकांनीं कांहीं हेवादावा चालवला आहे का?'

कुशारीबाई एकदम रडूं लागली. एकदम कपाळावर हात मारून घेऊन ती म्हणाली 'जळलं माझं कपाळ! तसं तरी कांहीं केलं असतं त्यांनीं एकदां! जी घर टाकून बाहेर निघाली तेव्हांपासून आजवर दृष्टभेट सुद्धां नाहीं—नांव नाहीं, ग्रहण नाहीं—अशी निष्ठूर पाषाणहृदयी पोर कुठं पाहिली नाहीं. आईबापांपेक्षां देखील ही सुनंदा आम्हां उभयतांना मानीत असे. पण ज्या दिवशीं त्यांना कळून आलं, कीं दीराचं वैभव पापाचं आहे, त्या दिवसापासून तिचं मन दगडासारखं कठीण झालंय. मुलाला नवऱ्याला घेऊन एक एक दिवस सुकून मरेल. पण एक कवडीला सुद्धां शिवायची नाहीं. एवढी मोठी दौलत काय लाथेनं उडवायची आहे. बाबू? तिला एक दयामाया नाहीं, पोरांबाळांसकट मरायची तयारी आहे तिची, पण आम्हांला का तसं करतां येतं?'

काय उत्तर द्यावं हें मला सुचेना. मी नुसता उद्गारलों, 'मोठी विलक्षण बाई आहे!'

दिवस खालीं जात होता. कुशारीबाई नुसती मानेनंच होय म्हणून उठून उभी राहिली. चट्कन् हात जोडून ती बोलूं लागली, 'खरं सांगतें बाबू, या सगळ्या भानगडीमुळं माझं काळीज फाटून जातंय्! पण मी ऐकलं, कीं मालकीण-बाईचं नि तिचं हल्लीं चांगलं जमलंय—कांहीं सांगून व्हायचं नाहीं का? यापुढं सहन करायची ताकद मला राहिली नाहीं!'

मी तरी काय बोलणार होतों ? तिच्यानेंही कांहीं बोलवेना. डोळे पुशीत पुशीत ती तशीच निघून गेली.

## १०

माणूस परलोकच्या विचाराला लागलं कीं परक्याची आठवण त्याला रहात नाहीं. माझ्या खाण्यापिण्याची तजवीज करायचं राजलक्ष्मी विसरून जाईल असं कधीं कुणाला वाटलं तरी असतं का ? गंगामटीला येऊन फार दिवस झाले नाहींत. पण या थोड्याच दिवसांत ती माझ्यापासून एकदम किती दुरावली ! माझ्या जेवणाची चौकशी हल्लीं करतो सैंपाकी—नि जेवायची व्यवस्था करतो रतन ! एका अर्थी वाटतं, झालं तें बरं झालं, तिच्या कटकटींतून सुटलों. आजारी असलों तरीहि अकराच्या आंत जेवण झालं नाहीं तरी प्रकृति बिघडत नाहीं. जेव्हां वाटतं तेव्हां जेवतों. रतनच्या आग्रहामुळं नि सैंपाक्याच्या कुरकुरीमुळं थोडक्यांत जेवण उरकायचं जमत नाहीं. थोडं, जेवलों तर त्या बिचाऱ्याला वाटतं, कीं आपला सैंपाकच बिघडला—नी मग तो एवढंसं तोंड करतो. कसंबसं त्यांचं समाधान करून बिछान्यावर जाऊन पडतों. समोर तीच उघडी खुर्ची नी तीच माळावरची सळसळणारी गरम हवा ! दुपारची वेळ कशी खायला येते. झाड झाडोरा नसलेल्या त्या कोरड्या माळाकडे पाहातां पाहतां जेव्हां जीव कंटाळून जातो तेव्हां एकच प्रश्न माझ्यासमोर उभा रहातो—माझं कसं होईल ! अजूनही तिचा लोभ आहे तसाच आहे—इहलोकीं माझ्या-खेरीज तिला दुसरं कुणी मोठं नाहीं.—पण परलोकाची गोष्ट निघाली कीं मीं परका ठरतों. तिच्या धार्मिक जीवनांतला मी तिचा सौंगडी नाहीं. तिथं माझ्यावर अधिकार सांगायला तिला कांहीं पुरावा नाहीं. इथं तिचा हिंदुपणा जागा होतो. या लोकाच्यां वस्तीचा प्रश्न नाहीं—पण या लोकाच्या पलिकडे जें स्थान आहे तिथं जायला माझ्या सोबतीचा आपल्याला कांहींच उपयोग नाहीं, अशी शंका तिच्या मनांत हल्लीं जागृत झाली होती.

ती हेंच घेऊन बसली होती आणि माझे दिवस हे असे चालले होते. कर्म-हीन, उद्देशहीन जीवनाच्या दिवसाचा आरंभ होतो शांतीनं नी शेवट होतो थकल्या ग्लानीनं ! स्वतःच्या आयुष्याच्या क्षणांची स्वतःच्या हातानं दररोज हत्त्या करण्यापलीकडे या संसारांत मला दुसरं कोणतंच काम राहिलं नव्हतं. मधून मधून

रतन येऊन तंबाखू भरून देत असे, वेळ झाली कीं चहा आणून देत असे, पण कांहीं बोलत नसे–पण त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं कीं मला वाटे, कीं हल्लीं त्यानं माझ्याकडे कृपेच्या दृष्टीनं पहायची सुरवात केली होती. केव्हां केव्हां एकदम येऊन तो म्हणे, " बाबू, खिडकी बंद करून घ्या. उन्हाची झळ येतेय्. '

मीं म्हणे, " राहूंदे. ' असं वाटे, किती लोकांच्या अंगाला स्पर्श करून, किती अपरिचित लोकांच्या उष्ण निश्वासांचा मीं अनुभव घेतों आहे. माझा बाळमित्र इंद्रनाथ अजूनही कुठंतरी जिवंत असेल. त्याच्या हृदयांतला उष्ण निश्वास यावेळीं मला स्पर्श करून गेला असेल. कदाचित् तो सुद्धां आपल्या बाळमित्राच्या संगतींत घालवलेल्या सुखदुःखाच्या दिवसाची अशीच आठवण करीत असेल. नी आम्हां दोघांची ती अन्नदाअक्का–कदाचित् तिच्या साऱ्याच दुःखाचा शेवटही झाला असेल. केव्हां केव्हां वाटे, ब्रह्मदेश याच बाजूला आहे– हवेला तर अडथळा नाहीं !—कुणी सांगावं— समुद्रापार होऊन अभयेच्या अंगावरून वाहून येणारा वारा मला वेरून टाकीत असेल.

अभयेची एकदां आठवण झाली कीं मग ती माझ्या मनाची पकड घेऊन बसे. रोहिणीदादा यावेळीं नोकरीवर गेला असेल. आपल्या छोट्या बिऱ्हाडाचा सदर दरवाजा बंद करून अभया शिलाईकाम करीत बसलेली असेल. ती माझ्यासारखी दिवसा झोंपत नसे. कदाचित् यावेळीं ती एकादं मुलाचं झबलं किंवा तसाच एकादा उशीचा अभ्रा किंवा असंच कांहीं तरी एकादं छोटसं घरकाम करीत बसलेली असेल.

हृदयाला त्राण लागून गेल्यासारखं वाटे. अनादिकालापासून जडलेले संस्कार, अनादिकालापासून ठरलेला बरेवाईटपणाचा अभिमान या माझ्याही रक्तांतून वहात होता. निष्कपटपणानं तिला ' दीर्घायु हो ' असा आशिर्वाद कसा देऊं ? लाजेनं, संकोचानं मन कसं अगदीं एवढंसं होऊन जातं आहे असं वाटे.

घर कामांत गुंतलेल्या अभयेची शांत नि प्रसन्न मुद्रा माझ्या मनःचक्षूपुढं उभी राहिली. तिच्या कुशीला झोंपलेलं तें गोजिरवाणं बाळ,—नुकत्याच उमललेल्या कमळाच्या शोभेनं नि सुवासानं जसं कांहीं सळसळत होतं. असल्या अमर वस्तूची या जगांत खरोखरच का जरुरी नव्हती ? मानव समाजांत मानवी बालकाला मर्यादा नाहीं—निमंत्रण नाहीं—स्थान नाहीं म्हणून तिरस्कारानं काय त्याला दूर लोटून द्यावं ? चिरंतन अशा स्वरूपांत कल्याण रूपसंपत्ती नाहींशी करून टाकण्यापेक्षां मानवी हृदयाचा दुसरा मोठा धर्मच नाहीं का ?

अभयेला मी ओळखीत होतों. एवढंच मिळवण्यासाठीं तिनं आपल्या जिवाची केवढी कुरवंडी केली होती हें दुसऱ्या कुणाला कळलं नाहीं तरी मला कळलं होतं. नुसत्या अश्रद्धा नि उपहासाच्या द्वारें हृदयाच्या जंगलीपणांतून कांहीं साऱ्या प्रश्नाचीं उत्तरं मिळत नाहींत. भोग! केवढा तरी मोठा लाजिरवाणा हा देहभोग! एवढ्याचसाठीं! एवढ्याचसाठीं का अभयेला धिक्कारायचं ?

माझ्या डोळ्यांतून वाहणारीं उष्ण आसवं बाहेरच्या गरम हवेनं चटकन् वाळत होतीं. ब्रह्मदेशांतून निघालों तेव्हांची हकिकत मला आठवली. अगदीं तेव्हांच रंगूनमध्यें मरणाच्या भयानं भाऊ बहिणीला, मुलगा आईबापालासुद्धां आश्रय द्यायला तयार नव्हता. साऱ्या शहरांत मृत्यूनं थैमान मांडलं होतं—अगदीं त्याच-वेळीं मृत्यूच्या दूताच्या खांद्यावर बसून मी ज्यावेळीं तिच्या घरीं पोंचलों त्यावेळीं नवीनच थाटलेल्या घरसंसाराच्या मोहांनं तिचं मन एक क्षणभरही द्विधा झालं नाहीं. मी लिहिलेल्या दहापांच ओळीवरून तिच्या स्वभावाची कल्पना कुणाला येणार नाहीं. ती म्हणजे काय तें मीच जाणतों.

मला आणखीही पुष्कळ माहीत आहे. मला माहीत आहे, अभयेला कठीण असं कांहींच नाहीं. मृत्यू तिच्या खिजगणतींत सुद्धां नाहीं. देहाची भूक, यौव-नाची तहान, असल्या साऱ्या पुराण्या मामुली शब्दांनीं अभयेची गोष्ट सांगतां यायची नाहीं. नुसत्या बाहेर दिसणाऱ्या घटना जवळपास ओढून खेंचून सज-वल्या म्हणजे साऱ्याच हृदयांतल्या खोल पाण्याचा ठाव घेतां येत नाहीं.

म्हणूनच जुन्या धन्याला अर्ज केला—बहुतेक नामंजूर होणार नाहीं असं वाटतं. अर्थात् पुन्हां आम्हां दोघांची भेट होईल. मधल्या काळांत उभयपक्षीं कितीतरी अघटित गोष्टी घडून आल्या आहेत. त्यांचा बोजाही कांहीं सामान्य नव्हे. पण तो बोजा आपल्या असामान्य सरळपणानं नि स्वेच्छेनं तिनं गोळा केला आहे— नि तितक्याच असाधारण दुबळेपणानं नि इच्छाशक्तीच्या अभावानं मी गोळा करतोंय. प्रत्यक्ष भेटीवेळीं त्यांची रंगमुद्रा कशी काय दिसेल कोण जाणे!

एकटा बसल्यानं सारा दिवस जसा कांहीं खायला येत असे, म्हणून संध्या-काळीं थोडा फिरायला जात असें. पांच सात दिवस गेल्यामुळें आतां ती संवय झाली होती. ज्या धुळकट रस्त्यांत एके दिवशीं आम्हीं गंगामाटीला आलों त्याच रस्त्यानं केव्हां केव्हां मी खूप लांब चालत जात असें. आज देखील तसाच जात होतों. तितक्यांत दिसून आलं, कीं धूळ उधळीत कुणाचा तरी घोडा समो-

रूनच येतो आहे. घाबरून मी रस्त्याच्या बाजूला झालों. घोडेस्वारानं येतां येतां घोडा थांबवला. घोडा फिरवून घेऊन माझ्यासमोर येऊन तो म्हणाला, 'आपण श्रीकांतबाबू ना? मला ओळखलंत?'

मीं म्हटलं, 'तोच मीं, पण आपल्याला मी ओळखलं नाहीं.'

तो गृहस्थ घोड्यावरून उतरला. त्याचा पोषाख साहेबी थाटाचा असला तरी तो जितका फाटका तितकाच मळका होता. डोक्यावरची जुनीपुराणी सोला हॅट काढून हातीं घेत तो म्हणाला, 'मी सतीश भरद्वाज, थर्ड क्लासांत नापास झालों म्हणून सर्व्हे स्कूलमध्यें शिकायला गेलों होतों—आठवतं ना?'

मला आठवलं. मीं खूष होऊन म्हणालों, 'अरेच्चा, तूं आमचा बेडूक होय? साहेब बनून कुठं चालला आहेस?'

बेडूकं हंसून म्हणाला, 'उगीच का कुणी साहेब होत असतो बाबा? रेल्वे कंस्ट्रक्शनमध्यें सबओव्हरसीयरच्या जागीं नोकरी करतोंय्. कुली हांकवण्यांत जन्म जातोय्, तिथं हॅट कोट घातल्याशिवाय कसं काम होणार? पूर्वी तेच लोक मला बडवीत होते. सोलापूर इथून एक काम उरकून आलों. इथून मैलापलिकडे माझा तंबू आहे. साईथिया इथून जी नवी रेल्वे लाइन घालताहेत तिथंच मला काम करावं लागतंय्. येतां आमच्या तिकडे? चहा घेऊन येऊं.'

'आज नको!' मीं म्हटलं, 'मग केव्हांतरी येईन.'

बेडूक माझी चौकशी करूं लागला. प्रकृती कशी आहे, कुठं असतों, इथं कशासाठीं आलों आहे, मुलंबाळं काय आहेत, कशीं काय आहेत वगैरे वगैरे मी उत्तर दिलं, 'प्रकृती ठीक नाहीं, राहातों गंगामाटीला, इथं ज्या कामासाठीं आलों तें मोठं भानगडीचं आहे. मुलंबाळं कांहीं नाहींत.—अर्थात् तीं कशीं आहेत हा प्रश्नच उरला नाहीं.'

बेडूक एक साधा भोळा माणूस होता. मीं काय उत्तर दिलं, त्याचा अर्थ काय, नि त्याचा अर्थ कळला नाहीं तर तो कळून घ्यावयाचा हट्ट धरायचा, अशी त्याची वृत्तीच नव्हती. तो आपलीच हकिकत सांगूं लागला.

'जागा मोठी छान होती. भाजीपाला मिळत होता. प्रयत्न केला तर मासे नि दूधसुद्धां मिळे. तसे कुणी लोकही तिथं नव्हते. सोबत कुणाचीच नव्हती.

'पण कामाचा त्रास नव्हता, संध्याकाळीं थोडी भांग चढवली कीं ठीकठाक होऊन जाई. बंगाली लोकांपेक्षां साहेब लोक हजारपटीनं चांगले—एक टेंपररी

२८...९९

ताडीची शेड उघडली होती. वाटेल तितकी प्यावी—पदरचा पैसा एकही द्यायला नको. सारं कांहीं ठीक होतं. ' कंस्ट्रक्शन खात्यांत दोन पैसे सहज मिळत. तसं म्हटलं तर मोठ्या साहेबाला सांगून माझ्यासाठीं त्यानं एकादी नोकरीही मिळवून दिली असती—अशा प्रकारें आपल्या वैभवाच्या लहान मोठ्या गोष्टी तो सांगत होता.

घोड्याचा लगाम हातीं धरून बेडूक बोलत बोलत माझ्याबरोबर निघाला. त्याच्या छावणींत मीं नक्की केव्हां येणार तें तो पुन्हां पुन्हां विचारीत होता. पोडामाटीला येऊन भेटण्याचं वचन देऊन तो निघून गेला.

त्या दिवशीं घरीं यायला मला जरा रात्र झाली. जेवण तयार आहे असं आचाऱ्यानं सांगितलं. हातपाय धुवून, धोतर बदलून जेवायला बसलों तोंच बाहेर राजलक्ष्मीचा आवाज ऐकूं आला. ती आंत येऊन चौरंगावर बसली, नि हंसत हंसत म्हणाली,'आतां तुम्हीं कोणत्याही प्रकारें नाहीं म्हणायचं नाहीं. बरं का ? '

' नाहीं ! ' मीं म्हटलं, ' कबूल आहे मला, '

' पण काय तें कळल्याशिवायच ? '

' वाटलं तर सांग मला केव्हां तरी ! ' मीं म्हटलं.

राजलक्ष्मी हंसणं विसरून गंभीर झाली नि म्हणाली, ' बरं आहे—'तितक्यांत तिची दृष्टि माझ्या ताटाकडे गेली. ती म्हणाली, ' भात फारसा घेतलाय् ? रात्रीं भात तुम्हांला मानवत नाहीं त्याची आहे का आठवण ? प्रकृति बरी होऊं द्यायची नाहीं—बरं केल्याचं श्रेय मला द्यायचं नाहीं—असंच का ठरवलंय् ? '

मला अलीकडे भात चांगला मानवत होता. पण तसं सांगण्यांत कांहीं अर्थ नव्हता.

राजलक्ष्मी चिडून ओरडली, ' महाराज ! ' सैंपाकी दाराजवळ येतो न येतो तोंच माझ्या ताटाकडे बोट दाखवून पूर्वीपेक्षांही रागाच्या आवाजांत म्हणाली, ' हें काय ? तुम्हांला हजार वेळां सांगितलंय कीं रात्रीं बाबूंना भात घेऊं द्यायचा नाहीं. तुम्हांला एक महिन्याचा पगार दंड ! '

पैशाच्या हिशेबानं पाहिलं, तर दंड करण्याच्या या धमकावणींत कांहीच अर्थ नव्हता हें साऱ्या नोकरांना माहित होतं. पण तिला राग आला आहे एवढं समजायचा मात्र तो पुरावा होता. महाराज रागारागानं म्हणाला, ' तूप नाहीं घरांत, मीं काय करूं ? '

' तूप नाहीं म्हणजे काय ? '

तो म्हणाला, ' आज दोन तीन दिवस मीं आपल्याला सांगितलं, कीं तूप संपलय् ! कुणीतरी पाठवून आणवा. आपण कुणाला पाठवलंच नाहीं त्यांत माझा काय दोष ? '

रोज खर्चाला लागणारं मामुली तूप गांवांतच मिळत असे. पण माझ्यासाठीं साईंथियाजवळच्या एका गांवांतून साजुक तूप आणवण्यांत येत असे. तें आणण्यासाठीं कुणीतरी माणूस पाठवावा लागे. राजलक्ष्मीच्या कानीं ती बाब पोंचली नाहीं तरी एक, किंवा ती विसरून गेली तरी एक ! तिनं विचारलं, ' केव्हांपासून तूप संपलं महाराज ? '

' होतील पांच सात दिवस ! '

' नि हे पांच सात दिवस यांना तुम्हीं भात खायला घालतांहांत ? ' रतनला हांक मारून ती म्हणाली, ' मीं एक विसरलें. पण तुला काय झालं होतं तूप आणून द्यायला ? सर्वांनीं मिळून माझं डोकं उठवायचं ठरवलंय् वाटतं ! '

रतन अलिकडे आपल्या मालकिणीवर जरा नाराजच होता. रात्रंदिवस घर टाकून ती कुणीकडे तरी जाते, विशेषतः माझ्याकडे द्यावं तेवढं लक्ष देत नाहीं, याबद्दल त्याला फार वाईट वाटत होतं. मालकिणीनं प्रश्न करतांच सभ्यपणाचा आव आणून तो म्हणाला, ' मला काय माहीत ? तुम्हीं लक्ष दिलं नाहीं तेव्हां मला वाटलं, कीं भारी किंमतीचं तूप यापुढं आणायचं नसेल. नाहींतर पांच सात दिवसपर्यंत आजारी माणसाला काय मी भात खाऊं दिला असता ? '

यावर बिचारी राजलक्ष्मी काय बोलणार होती ? नोकरानं घेतलेला हा चिमटा मुकाट्यानं सहन करून ती थोड्या वेळानं तिथून उठून निघून गेली.

रात्रीं बिछान्यांत या कुशीवरून त्या कुशीवर लोळत पडलों होतों. तितक्यांत कुठं डोळा लागला, राजलक्ष्मी दार उघडून आंत आली आणि माझ्या पायागत बसली. बराच वेळपर्यंत ती मुकाट्यानं बसून राहिली होती. नंतर मला हांक मारून म्हणाली, ' झोंप आली वाटतं ? '

' नाहीं. ' मीं म्हटलं.

राजलक्ष्मी म्हणाली, ' तुमच्या प्राप्तीसाठीं म्हणून मी जेवढं कांहीं केलं, त्याच्या अर्ध्यानं केलं असतं तर प्रत्यक्ष ईश्वर माझ्यासमोर उभा राहिला असता. पण तुम्हीं कांहीं हातीं लागत नाहीं माझ्या ! '

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 3160 ......... नों. दि ... .........
वि. ..................... क्र. ....................
ट्ठा


'शक्य आहे!' मीं म्हटलं, 'माणूस मिळवणं फार कठीण!'

'माणूस मिळवणं?' राजलक्ष्मी क्षणभर उगीच राहून म्हणाली, 'कसंही असो—प्रेम म्हणजे देखील एक प्रकारचं बंधनच आहे. मला वाटतं तुम्हांला मानवत नाहीं तें—अंगाला खुपतं!'

या प्रश्नाचं काय उत्तर देणार? हा प्रश्न शाश्वत आहे—सनातन आहे. आदि पुरुष नि आदि स्त्री यांच्यापासून वारसा हक्कानं मिळवलेल्या या भांडणाची मीमांसा अजून कुणाला करतां आली नाहीं. हें भांडण ज्या दिवशीं मिटेल त्या दिवशीं संसारांतली सारी रसिकता, सारं माधुर्य, नीरस होईल—विषारी होईल. अर्थात् मींही उत्तर देण्याचा प्रयत्न न करतां उगीच राहिलों.

विशेष आश्चर्य हें, कीं उत्तर मिळण्यासाठीं राजलक्ष्मीनेंही आग्रह धरला नाहीं. जीवनांतला एवढा मोठा सर्वव्यापी प्रश्न एका क्षणांत ती आपोआप विसरून गेली. ती म्हणाली, 'न्यायरत्न ठाकूर एका व्रताबद्दल सांगत होते—व्रत जरा कठीण आहे, तेव्हां सारेच कुणी तें घेत नाहींत—शिवाय तशी सोय साऱ्यांनाच कुठं मिळतेय?—' ती बोलायची थांबली तरी मी उगीच राहिलों. ती सांगू लागली, 'तीन दिवस उपास करावा लागतो. सुनंदेची देखील फार इच्छा आहे. कीं दोघींनीही एकदम सुरवात केली तर होऊन जाईल. पण—' असं म्हणून ती स्वतःच थोडीशी हंसली नि म्हणाली, 'पण तुम्हीं नाहीं म्हटलं तर मग—'

'मी नाहीं म्हटलं तर काय होणार?' मी विचारलं.

'तर मग कांहींच व्हायचं नाहीं.!' राजलक्ष्मी म्हणाली.

'ठीक आहे!' मी म्हटलं, 'तर मग हा बेत बंद. माझी संमती नाहीं.'

'चला, थट्टा करूं नका!'

'थट्टा नव्हे—खरोखरच माझी संमती नाहीं. माझा निषेध आहे.'

माझं भाषण ऐकतांच राजलक्ष्मीचा चेहरा काळवंडून गेला. क्षणभर स्वस्थ राहून ती म्हणाली, 'पण मीं तर सारं ठरवून टाकलं होतं. सामानसुमान आणायला माणसं पाठवलीं आहेत. उद्यां होम करून परवांपासून—वाः! आतां नाहीं म्हणून कसं चालेल? सुनंदेसमोर तोंड दाखवायला तरी जागा राहील का मला? छोटे ठाकूर देखील—वाः—! नुसती थट्टा चालवली आहे वाटतं—उगीच मला चिडवावं म्हणून—नाहीं, हें नाहीं चालायचं! म्हणा, संमती आहे म्हणून!'

'बरं, संमती आहे!' मीं म्हटलं, 'माझ्या होकार नकाराची तूं कधींच अपेक्षा

करीत नाहींस लक्ष्मी ! मग आजच कशाला हा तमाशा केलास ? प्रत्येक बाबतींत माझी संमती घेतली पाहिजे असा आग्रह मीं कधींच धरला नाहीं. '

माझ्या पायांवर हात ठेवून राजलक्ष्मी म्हणाली, ' आतां यापुढं असं करणार नाहीं. एवढ्या वेळीं आनंदानं मला हुकूम द्या ! '

' ठीक आहे ! ' मी म्हटलं, ' पहाटे उठून जायचं असेल तुला ! रात्र फार झाली, आतां झोंप घे जा. ' राजलक्ष्मी गेली नाहीं. हळुहळु माझे पाय चेपीत बसली. झोंप येईपर्यंत मी सारखा विचार करीत होतों—मला वाटलं, त्या हस्तस्पर्शांत तो पूर्वीचा जिव्हाळा नव्हता. फार दिवसांची गोष्ट नव्हे, आरा रेल्वे स्टेशनवरून ज्यावेळीं ती मला आपल्या घरीं घेऊन गेली त्यावेळीं असेच माझे पाय चेपून मला झोप आणणं तिला आवडे. अगदीं अशीच मुकाट्यानं—पण त्या वेळीं असं वाटे, दहा बोटांतून दश इन्द्रियांच्या साऱ्या कळवळ्यामधून स्त्रीहृदयाचं म्हणून जें कांहीं आहे तें सारं पिळवटून माझ्या दोन्हीं पायावर ती उजाड करून देते आहे–त्यावेळीं मला असं वाटे. अर्थात् मला त्याची गरज नव्हती. तें घेऊन मी काय करूं ?—काय करणार तेंही मला कळत नव्हतं—पुराच्या पाण्यासारखं—आल्यावेळीं बोलावलं नव्हतं, तसंच जायच्या वेळींही तोंड वाकडं केलं नाहीं.

माझे डोळे सहसा पाझरत नाहींत. प्रेमाचा भिकारी होण्याची वृत्ति माझ्या ठायीं नाहीं. जगांत मला कसलीच अपेक्षा नाहीं—कुणाकडून मला कांहीं मिळालं नाहीं–दे दे म्हणून हात पसरायला मला शरम वाटते. पुस्तकांत कुठंसं वाचलं आहे, या बाबतींत किती विरोध, किती झगडे, मानापमानाच्या जोरावर झालेले केवढे मोठे आक्षेप—स्नेहाच्या अमृताचं विष होरून गेल्याच्या कितीतरी विक्षुब्ध गोष्टी ! हें सारंच कांहीं खोटं नाहीं हें मी जाणतों—पण माझ्या अंतरंगांत झोपीं गेलेलं वैराग्य चट्कन् दचकून जागं झालं नि म्हणालं, 'छे, छे, छे ! '

मला झोंप आली असं समजून बऱ्याच वेळानं राजलक्ष्मी जेव्हां हलक्या पावलीं उठून निघून गेली, त्यावेळीं तिला हें दिसून आलं नाहीं, कीं माझ्या निद्राविहीन झांकलेल्या डोळ्याच्या कोपऱ्यांत अश्रू पाझरले होते.

अश्रू सारखे पाझरत होते. पण आज आटोक्यापलीकडे गेलेलं वैभव एका काळीं माझंच होतें म्हणून निष्कारण आक्रोश करून अशांती निर्माण करण्याची प्रवृत्ती मला झाली नाहीं.

## ११

सकाळीं उठलों तेव्हां कळलं, कीं भल्या पहांटे उठून स्नान करून राजलक्ष्मी रतनला घेऊन निघून गेली होती. तीन दिवस तिला घरीं येतां येणार नव्हतं हेंही मला कळलं. नि झालंही तसंच. त्या ठिकाणीं मोठं कांहींतरी औडंबर माजवलं होतं असं नाहीं, तरीही आठ दहा ब्राह्मणांची सेवा होत असावी, खाण्यापिण्याची व्यवस्था होत असावी, याचा आभास मला खिडकींत बसून अनुभवतां आला. व्रत कोणतं, त्याचं अनुष्ठान कोणत्या प्रकारचं, तें पुरं झाल्यावर स्वर्गाचा मार्ग कितीसा सुलभ व्हायचा हें मला कांहींच माहीत नव्हतं—माहीत करून घ्यायची इच्छाही नव्हती. रोज संध्याकाळीं रतन घरीं येई त्यावेळीं मला विचारी, ‘ आपण एकदां गेलांत नाहीं बाबू ? ’

मीं विचारीत असें, ‘ तशी जरुरी आहे का जाण्याची ? ’

रतनला मोठं संकट पडे. मीं गेलों नाहीं तर लोकदृष्ट्या तें कसंसंच दिसेल—कदाचित् होणाऱ्या गोष्टी माझ्या मनाविरुद्ध होत आहेत असं कुणाला वाटेल—कुणी सांगावं ?—अशा अर्थानं तो कांहीं तरी उत्तर देई. अर्थातूच नाहीं. कोण काय बोलेल काय सांगावं ? मीं विचारीत असें, ‘ तुझी मालकीण काय म्हणते ? ’

रतन म्हणत असे, ‘ आपल्याला माहीतच आहे, आपण नसलांत तर तिला मुळींच बरं वाटत नाहीं. पण काय करणार ? कुणी विचारलं तर म्हणते; प्रकृति बरी नाहीं. इतक्या दूर चालत आलं तर त्रास होईल. अन् यायचं तरी कशाला ? ’

‘ तें बरोबर आहे. ’ मीं म्हणत असें, ‘ त्याशिवाय तुला माहीतच आहे रतन, या साऱ्या पूजाअर्चा, धर्मकर्माच्या भानगडींत माझा जीव कासावीस होतो. या यज्ञयागाच्या उलाढालीपासून थोडं दूर राहिलेलंच बरं. खरं कीं नाहीं ? ’

‘ खरं आहे. ’ रतन म्हणत असे. पण राजलक्ष्मीच्या दृष्टीनं विचार केला तर मीं तिथं हजर असणं, मला वाटे, एकाअर्थी—

पण जाऊं देत. एक आनंदाची बातमी कानीं आली. मालकिणबाईच्या सरबराईसाठीं दिवाणजी काशिनाथ कुशारीमहाशय तिथं सपत्नीक उपस्थित झाले होते.

‘ म्हणतोस काय रतन--अगदीं सपत्नीक ? ’

‘ जी होय. अन् तेंही आमंत्रण नसतांना. ’

मला वाटलं, यांत राजलक्ष्मीचाच कांहीं तरी हात असावा. असंही वाटलं,

स्वतःच्या घरीं हें प्रयोजन न करतां त्यांच्या घरीं केलं तें सुद्धां याच उद्देशानं असावं. रतन सांगूं लागला, ' विनूला कवटाळून कुशारीबाई मारे रडायला लागली. छोट्या बाईनं आपल्या हातानीं तिचे पाय धुतले. जेवायचं नाहीं म्हणून म्हणाली तेव्हां ताटपाट मांडून तिच्या जवळ बसून आपल्या हातांनीं तिला भरवलं. मालकीण-बाईच्या डोळ्यांतून आसवं वाहूं लागलीं. तें सारं पाहून म्हातारे कुशारीबाबा ढसाढसा रडूं लागले. मला तर असं वाटतं बाबू, ही सारी भानगड संपली म्हणजे छोटी ब्राह्मणी या मोडक्या घराची माया सोडून स्वतःच्या घरीं जाऊन रहाणार. असं जर कांहीं झालं, तर गांवांतलं माणसन् माणूस नुसतं खूष होऊन जाईल ! त्याचं सारं श्रेय मात्र केवळ आमच्या मालकिणबाईनांच, एवढं तुम्हांला सांगून ठेवतों बाबू. '

सुनंदेच्या स्वभावाची मला जी कल्पना होती त्यावरून असं कांहीं होईल अशी माझी खात्री नव्हती. पण या एकंदर प्रकारामुळं राजलक्ष्मीच्या बाबतींत मला जो राग आला होता तो गेला. शरदृतुंतल्या ढगाळलेल्या आकाशाप्रमाणें पहातां पहातां ढग दूर होऊन माझ्या नजरेसमोर सारं निराकरण झाल्यासारखं वाटलं. हे दोन भाऊ नि जावा यांच्यामधें जो विरोध आला होता तो तितका खरा नव्हता, स्वाभाविकही नव्हता. दोघांनींही चिर्डाला पेटून उगीच वैमनस्य धरलं होतं. या फाटक्या जोड्याला टाके मारण्याइतकं कौशल्य नि सहृदयता लक्ष्मीखेरीज दुसऱ्या कुणाच्या ठायीं होती ? केव्हांपासून तरी मनांतल्या मनांत तिनं हा उद्योग आरंभलेला असावा. तिची ही सदीच्छा पूर्ण होवो, असा मीं मनोमन आशीर्वाद दिला.

बऱ्याच दिवसांपासून माझ्या मनावर जो एक प्रकारचा बोजा येऊन पडला होता तो हलका झाल्यामुळं माझा आजचा दिवस मोठा आनंदांत गेला. कोणत्या शास्त्रांतलं कोणतं व्रत राजलक्ष्मीनं घेतलं होतं तें मला माहीत नव्हतं, पण आज तीन दिवस पुरे होतांच उद्यां तिची भेट होईल या कल्पनेनं फार दिवसांनीं माझ्या मनोभावनांना नवी पालवी फुटली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं राजलक्ष्मीचं येणं झालं नाहीं. मोठ्या कष्टानं तिनं रतनकरवीं निरोप पाठवला, कीं साऱ्याच वेळीं सुयोग येत नाहींत, भाग्यानंच संधि येते, दिवस घटका निघून जात असतात, जवळच वक्रेश्वर नांवाचं एक तीर्थ आहे, तिथली देवता जागृत आहे, गरम पाण्याचं एक कुंड आहे, त्या कुंडांत उतरून स्नान केलं, तर स्वतःचाच नव्हे, तर पितृकुल नि श्वशुरकुलांतील जो कुणी जीव जिथं कुठं असेल त्या सर्वांचा उद्धार होईल.

सोबत मिळाली होती. दारीं बैलगाडी आली होती. निघायची वेळ झाली होती. चार दोन जरूर असलेल्या जिनसा दरवानाच्या हातीं माझ्याकडे पाठवून देऊन बिचारा रतन धापा टाकीत पळत गेला. असं कळलं, कीं यायला आणखी पांच सात दिवस लागतील.

आणखी पांच सात दिवस! नित्याच्या संवयीमुळं असो की कसंही असो, तिची भेट होण्यासाठीं मन कसं उतावीळ झालं होतं; पण ती दूर तीर्थयात्रेला जायला निघाली ही बातमी रतनच्या तोंडून कळतांच रागसंताप येण्या ऐवजीं माझं हृदय सहसा व्याकुळ होऊन उठलं. खरोखरच प्यारीचा शेवट झाला होता—ती मरून गेली होती. कृतकर्माच्या दुःसह भारामुळं राजलक्ष्मीचं देह नि मन ज्या यातनांच्या केविलवाण्या किंकाळीनं खडबडून उठलं होतं त्या यातना असहनीय झाल्यामुळं ती गांगरून गेली असावी. हा मनाचा पश्चात्ताप असाच जळतजळत ठेवून जीवनापासून दूर पळण्यासाठीं मार्गभ्रष्ठ झालेली तिची व्याकुलता केव्हांच का संपणार नाहीं? पिंजऱ्यांत अडकलेल्या पक्षाप्रमाणें रात्रंदिवस डोकं फोडून घेतच का ती मरणार आहे? त्या पिंजऱ्याच्या लोखंडी ताड्यांप्रमाणें तिच्या मुक्तीपथाच्या दारावर मीही असाच आडसर होऊन का राहाणार आहें? संसारानं ज्याला कधीं कांहीं तरी देऊन केव्हांही बांधून ठेवलं नाहीं, त्या माझ्या भाग्यांत शेवटीं विधात्यानं एवढं मोठं अरिष्ठच का लिहून ठेवलं आहे? अंतःकरणापासून तिचं माझ्यावर प्रेम!—माझा मोह तोडून टाकणं तिला कठीण जातं. तिच्या साऱ्या भविष्यकालांतील सत्कृती तिच्या पायांत बेड्या होऊन पडून का रहाणार आहेत? हेंच का सत्कृत्याचं बक्षिस?

मी मनांत ठरवलं, आतां रामराम ठोकायचा—पूर्वीप्रमाणें नव्हे, यावेळीं अगदीं अंतःकरणापासून, प्रामाणिकपणानं तिला पूर्ण आशिर्वाद देऊन शेवटचा रामराम ठोकायचा! शक्य तर ती यायच्यापूर्वीच हा देश सोडून जायचं. कोणत्याही कारणासाठीं, कोणत्याही परिस्थितींत, संपत्तींत किंवा विपत्तींत, कोणत्याही भ्रमाच्या भोंवऱ्यांत पुन्हां तिच्यासमोर यायचं नाहीं. पण नशिबानं आजवर माझा कोणताच संकल्प टिकूं दिला नाहीं. पण या नशिबापुढं मी आतां पराजय स्वीकारणार नाहीं.

मीं आपल्याशींच म्हटलं, नशीब तर खरंच! एके दिवशीं पाटण्याहून ज्यावेळीं निरोप घ्यायला गेलों त्यावेळीं प्यारी कांहींच न बोलतां माडीच्या कठड्याजवळ उभी होती. त्यावेळीं तिच्या तोंडी शब्द नव्हता खरा, पण त्या झांकल्या अंतः-

करणाखालची आंसवांनीं ओलावलेली हांक साऱ्या रस्त्यांत पुन्हां पुन्हां माझ्या कानीं नव्हती कां पोंचत ?

पण मीं मागं फिरलों नाहीं. देश टाकून लांब परदेशीं निघून गेलों. पण तें रूपहीन, भाषाहीन, अमोघ आकर्षण मला सारखं खेंचीत होतं. देश परदेशाचं बंधन तिथं कितीसं आड आलं होतं ?

पुन्हां एके दिवशीं फिरून परत आलों. बाहेरच्या लोकांनीं माझा पराजयाचा थकवा तेवढा पाहिला—माझ्यावर झळकणारी सदा टवटवीत जयमाला कुणाच्या नजरेस आली नाहीं.

असंच व्हायचं ! मला माहीत आहे, अगदीं लवकरच पुन्हां निरोप घेण्याची संधी येणार. त्यावेळीं कदाचित् ती अशीच मुकाट्यानं उगीच राहील. पण माझ्या प्रवासाच्या वाटेवरून त्या घेतलेल्या निरोपाची अश्रुतपूर्व हांक कदाचित् माझ्या कानीं येणार नाहीं.

मीं आपल्याशींच म्हटलं, राहायचं आमंत्रण संपून ज्या अर्थी आतां जायचंच तेवढं बाकी राहिलं आहे तर वाईट कशाला वाटून घ्यायचं ? शिवाय या दुःखाला भागीदार कोण आहे ? माझ्याच हृदयांत खड्डा खणून ही वेदना गाडून टाकल्याखेरीज दुसरा उपाय नाहीं. राजलक्ष्मीवर प्रेम करण्याचा अधिकार जगानं मला दिला नाहीं. तें एकाग्र प्रेम, तें हंसणं रडणं, राग रुसवा, तो त्याग, ती पुन्हां भेट—सारीं कांहीं लोकदृष्ट्या जशीं व्यर्थ होतीं त्याचप्रमाणं समोर दिसणाऱ्या विरहाचा असह्य मनःस्ताप बाहेरच्या दृष्टीला आज तेवढाच अर्थहीन होता.

हीच गोष्ट आज सर्वांपेक्षां माझ्या मनाला लागून राहीली होती. एकाचं मर्मांतिक दुःख ज्यावेळीं दुसऱ्याच्या दृष्टीनं थट्टेचा विषय होऊन बसतं, त्यावेळीं त्यापेक्षां मोठी ट्रेजेडी या पृथ्वीवर आहे का ?

शिवाय असं ही खरं, संसारांत राहून जो लोकाचार मानीत नाहीं, बंडखोर बनला आहे, त्यानं फिर्याद न्यायची कुणापाशीं ? हें कोडं जसं शाश्वत आहे तसं प्राचीनही आहे. सृष्टीच्या प्रारंभापासून आजपर्यंत वारंवार हाच प्रश्न सारखा सुरू आहे. नि भविष्यकालाच्या गर्भांत जितक्या दूर दृष्टि पोंचते तिथपर्यंत या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर नजरेला येत नाहीं. केवढं मोठं दुर्दैव हें ? कां असं व्हावं ?

तरीही एवढी मोठी दौलत, एवढं मोठं ऐश्वर्य, माणसानं कधीं मिळवलं आहे का एकमेकांना डोईजड होणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या या नावडत्या हृदयावेगाच्या

कितीतरी अबोल वेदनानीं, युगयुगांतरांतून किती पुराणं, किती प्रेमकथा नि किती काव्यांच्या राशींनीं मेघमंडल भेदून टाकलं आहे ?

पण आज हें सारं थांबलं तर ? मी स्वतःला म्हटलं, जाऊंद्या. राजलक्ष्मीची धर्मश्रद्धा वाढो, तिची वक्रेश्वराची यात्रा सफल होवो, तिचं मंत्रोच्चारण निर्दोष होवो, माझा आशिर्वाद आहे, पुण्यसंपादनाचा तिचा मार्ग सदोदित निर्विघ्न नि निष्कंटक होवो—माझ्या दुःखाचा भार मी एकटाच वहात राहीन.

दुसरे दिवशीं जागा झालों त्याचवेळीं वाटलं, कीं गंगामटी, तिथलं हें घर, रस्ते, उघडा माळ, सारीं बंधनं ढिलीं होऊन पडलीं आहेत. राजलक्ष्मी केव्हां येईल तेव्हां येवो, पण यापुढं एक क्षणभरही इथं रहायचं नाहीं.

आंघोळीला निघण्यासाठीं रतनची जिकीर सुरू झाली होती. निघायच्या वेळीं राजलक्ष्मी नुसता कडक हुकूम देऊनच थांबली नव्हती, तर तिच्या गैरहजिरींत माझी एवढीसुद्धां गैरसोय होऊं द्यायची नाहीं अशी तिच्या पायाला हात लावून रतनकडून तिनं शपथ घेवविली होती. दुपारचं जेवण अकरा वाजतां नि रात्रीं आठापूर्वी व्हायचं, असं ठरलं होतं. घड्याळ पाहून रतन रोज वेळ लिहून ठेवायची. परत आल्यावर प्रत्येकाला एक एक महिन्याचा पगार बक्षीस मिळणार होता.

सैंपाक तयार करून भटजी आंत/ बाहेर करीत होता. सकाळींच नोकराच्या डोक्यावर टोपली देऊन भाजीपाला दूध, मासे वगैरे कुशारी महाशयांनीं स्वतः आणून पोचवल्याचं मी बिछान्यावर पडल्या पडल्याच पाहिलं होतं. मला कसलीच उत्सुकता नव्हती. ठीक आहे—अकरा नि आठ—होऊन जाऊं दे. माझ्यामुळें कुणाचं एक महीना पगाराचं बक्षीस बुडूं द्यायचं नाहीं हें निश्चित !

गेल्या रात्रीं झोंप चांगलीशी आली नव्हती. ठरल्या वेळापूर्वीच स्नान भोजन आटोपून मी जो बिछान्यावर पडलों तोंच मला चांगली झोंप लागली. चाराच्या सुमारास जागा झालों. आज कित्येक दिवस नियमानं बाहेर फिरायला जात असें—आजही तोंड धुवून चहा घेऊन बाहेर निघालों. दाराबाहेर एक माणूस बसला होता. त्यानं माझ्या हातीं एक पत्र दिलं. सतीश भरद्वाजचं पत्र ! कुणीतरी मोठ्या कष्टानं चार ओळी लिहिल्या होत्या, तो भयंकर आजारी पडला होता. मीं गेलों नाहीं तर जगायची आशा नव्हती.

‘ काय झालय् त्याला ? ’ मी विचारलं.

‘ कॉलरा. ’ तो माणूस म्हणाला.

'चल तर !' मी खूष होऊन म्हणालों. मी खूष झालों तों त्याला पाहून नव्हें कीं कॉलरा झाला म्हणून नव्हे. हा घरठाव सोडून थोडा वेळ तरी दूर जायचा सुयोग लाभला हीच गोष्ट मला भाग्याची वाटली. रतनला बोलावून सांगावं असं एकदां वाटलं होतं. पण अवधी नव्हता म्हणून तें तसंच राहिलं. जसा होतों तसाच निघालों. घरांतल्या कुणालाच कांहीं पत्ता दिला नाहीं.

तीनएक कोस पायीं चालल्यावर सतीशच्या छावणींत पोंचलों. रेल्वे कंस्ट्रक्शनचा 'इन्चार्ज मि. एस्. सी. बरदाज' याचं मोठं ऐश्वर्य पहायला मिळेल अशी माझी अपेक्षा होती. पण जाऊन पहातों तों त्याचा मत्सर वाटण्याजोगं कांहींच दिसलं नाहीं. एक लहानसा राहुटीवजा तंबू होता. त्याच्या बाजूला पालापाचोळ्याची सल्दी लावून केलेली सैंपाकघराची झोंपडी होती. एक भली लठ्ठ बाऊरी बाइ चूल पेटवून कांहींतरी शिजवीत होती. मला बरोबर घेऊन ती तंबूंत आली. हीच सतीशची प्रणयिनी !

तितक्यांत रामपूरहाट येथून एक पोरगेलासा पंजाबी डॉक्टर आला होता. मी एक सतीचा बाळमित्र आलेला पाहून त्याचा जीव खालीं पडला. रोग्याच्या बाबतींत तो म्हणाला 'केस सिरियस नाहीं. तेवढीशी भीति नाहीं' त्याची ट्रॉली तयार होती. आत्तांच गेलं नाहीं तर हेडक्वार्टर्सला पोचायला अतिशय रात्र होईल.—त्रासाला पारावार रहाणार नाहीं.

माझं काय होईल याची काळजी त्याला कशाला ? केव्हां काय केलं पाहिजे तें त्यानं मला समजावून दिलं. ट्रॉलींत बसतां बसतां बॅग उघडून त्यानं दोन तीन डबे नि एक बाटली माझ्या हातीं देऊन म्हटलं, 'कॉलरा म्हणजे साथीचा रोग आहे. डबक्याचं पाणी कुणाला वापरायला देऊं नका.' असं म्हणून त्यानं पाण्याच्या खालीं असलेला चिखल काढून दाखवला नि म्हटलं, 'कुली लोकांत कुणाला जर कॉलरा झाला—होणं शक्य आहे, तर या औषधांचा उपयोग करा.' असं म्हणून त्यानं रोगाच्या कोणत्या अवस्थेंत कोणतं औषध द्यायचं तें मला समजावून सांगितलं. माणूस एकंदरींत बरा होता. त्याला दयामाया होती. माझ्या बाळमित्राची प्रकृती कशी आहे हें कळवायला त्यानं मला सांगितलं, कुली लोकांवर नजर ठेवण्याबद्दल सूचना देऊन पुन्हां पुन्हां मला सावध करून तो निघून गेला.

हें असं झालं. राजलक्ष्मी वक्रेश्वरच्या यात्रेला गेली आणि रागारागानं मीं

असा बाहेर रस्त्यावर आलों. रस्त्यावर एका माणसाची भेट झाली. लहानपणा-पासूनची ओळख—त्यांतून शाळासोबती ! चांगलीं पंधरा वर्षं कुणाचा कुणाला पत्ता नव्हता. सहसा ओळखतांसुद्धां आलं नव्हतं.

पण दोनच दिवसांत अकस्मात ही काय भयंकर घडामोड झाली ? कॉलऱ्यांत त्याला औषध देण्याचा भार, त्याच्या शुश्रुषेचा भार, नाहीं म्हटलं तर शेंदीडशें दगडफोड्या कुलींची व्यवस्था करायचा भार येऊन माझ्या माथीं पडला. बाकी राहिली त्याची सोला हॅट नि स्वारीचा तट्टू. आणखी, वाटतं, ती कुली-बाई. मानभूम जिल्ह्यांतली तिची विलक्षण बाहादुरी भाषा मला चांगलीशी उकलेना. पण दहा पंधरा मिनिटांतच मीं आल्यामुळं तिला बराचसा धीर आला एवढंच तिच्या बोलण्यांतलं तथ्य मला कळलं. आतां एकदां घोड्याकडे बघून यावं. तेवढी तरी चूक कां करा ?

मला वाटलं, माझं नशिबच हें असं. नाहींतर राजलक्ष्मी ही अशी कां भेटावी ? अभयेनं सुद्धां आपल्या दुःखाचा बोजा माझ्या माथीं कां चढवावा ? आतां हा बेडूक नि त्याचं कुलींचं टोळकं ! दुसरा कुणी असता तर हे सारे बोजे फेकून द्यायला त्याला वेळ लागला नसता. पण कां म्हणून हीं ओझीं माथीं घेऊन मीं सारा जन्म असाच फिरतोंय् ? तंबू रेल्वे कंपनीचा होता. सतीशची स्वतःची इस्टेट काय याचा साधारण आढावा घेऊन पाहिला. ऐनेमेलची भांडीं एक स्टोव्ह, एक लोखंडी ट्रंक, एक केरोसीन तेलाची पेटी, नि एक फार दिवस वापरल्यामुळं झोळणा झालेली त्याची झोपायची कॅनव्हासची खाट ! सतीश मोठा हुशार माणूस—या खाटेवर बिछान्याची जरुरी नव्हती, कांहींतरी अंथरायला असलं म्हणजे पुरे असं समजून एक फाटक्या सतरंजीखेरीज त्यानं कांहींच घेतलं नव्हतं. पुढं कॉलरा होईल याची जाणीव नसल्यामुळं त्यानं कोणतीच व्यवस्था केली नव्हती. कॅनव्हासच्या खाटेवर पडलेल्या रोग्याची सुश्रुशा करणं मोठं गैरसोईचं होतं. एकुलती एक सतरंजी घाण होऊन गेली होती. आतां त्याला खालीं उतरून निजवण्याखेरीज दुसरा उपाय नव्हता.

काय करावं हें मला सुचेनासं झालं. त्या बाईचं नांव कालिदासी. मीं तिला विचारलं, ‘ एकादा दुसरा बिछाना मिळेल का इथं ?

ती ‘ नाहीं ’ म्हणाली.

मीं म्हटलं, ‘ थोडं गवत गोळा करून आणतां येईल कां तुला ? ’

ती खिस् करून हंसली नि जें कांही बोलली त्याचा अर्थ एवढाच, ' इथं काय गाई आहेत ? '

' तर मग बाबूंना निजावयाचं कुठं ? ' मी विचारलं.

तिनं अगदीं सरळ सरळ जमिनीकडे बोट दाखवलं नि विचारलं, ' जगतील का हे ? '

तिच्या चेहऱ्याकडे पहातांच असं वाटलं, असलं निर्विकल्प प्रेम जगांत महादुर्लभ ! मी मनांतल्या मनांत म्हणालों, ' काली, खरोखरच तूं भक्तीला योग्य आहेस. तुझं भाषण ऐकलं कीं शंकराचार्यांचा मोहमुद्गर वाचायची जरूरी नाहीं. पण मी अजून एवढा तत्त्वज्ञानी बनलों नाही. हा माणूस अजून जिवंत आहे. नुसतं त्याला अंथरायला कांहीं तरी पाहिजे. ' मीं विचारलं, ' बाबूंचे वापरायचे कांहीं कपडेबिपडे आहेत का ? '

कालीनं नुसती मान हालवली. तिच्या बोलण्यांत मागंपुढं कांहीं नसे. कांहीं 'असेल नसेल' असलं कांहीं नसे. ती म्हणाली, 'कपडे नाहींत. पाटलोण आहे.'

पाटलोण साहेबी वस्तू— त्यांतून भारी किंमतीची. पाटलोणीचा बिछाना करतां येईल कीं नाहीं याचा मला अंदाज येईना. चट्कन् मला आठवण झाली— जवळच एक फाटकी जुनी ताडपत्री दिसली होती. मी म्हटलं, ' चल ना बाई, दोघं मिळून ती ताडपत्री घेऊन येऊं. पाटलोण अंथरण्यापेक्षां ती बरी. '

काली कबूल झाली. अजूनपर्यंत ती ताडपत्री तिथंच होती हेंच भाग्य म्हणायचं, तिचा बिछाना करून सतीशला निजवलं. त्याच्या एका कोपऱ्याला थोड्या अंतरावर थोडीशी जागा पटकावून पहातां पहातां ती झोंपी गेली. मला वाटलं होतं, कीं बायका घोरत नाहींत. पण या कालीनं माझा समज खोटा पाडला. मीं एकटाच त्या केरोसीनच्या पेटीवर बसून होतों. तिकडे सतीशचे हातपाय आंखडत येत होते. शेक देण्याची जरूरी होती. बरंच आरडून ओरडून कालीला जागी केली. ती या कुशीवरून त्या कुशीवर वळत म्हणाली, ' लांकुडफाटं कांहींच नाहीं. आग कशी पेटवायची ? '

मीं स्वतः तपास करून पाहिलं. नाहीं म्हणायला एक हरिकेन कंदिल होता. तरीही एकवेळ जेवणघरांत तपास करून पाहिलं—कालीनं खोटं सांगितलं नव्हतं. आग पेटवायला या झोपडीखेरीज दुसरी कोणतीच वस्तू नव्हती. पण मला छाती झाली नाहीं—प्राण निघून जायच्या पूर्वींच कदाचित् सतीशचा दहनविधी होऊन

२९४८६
१११
प्रा.वा
१६५८

गेला असता !

कॅम्प कॉट नि केरोसिनची पेटी बाहेर आणून पेटवून विस्तव केला. अंगांतला सदरा काढून त्याची मोटली करून शेक द्यायचा प्रयत्न केला. पण नुसतं माझ्या मनाचं समाधान होण्यापलिकडे रोग्याला त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. रात्रीं दोनच्या सुमाराला बातमी आली, कीं दोघां कुलींना उलटी जुलाब सुरू झाले. मींच डॉक्टर आहें असं समजून त्यानीं मला बोलावलं होतं. त्यानीं आणलेला दिवा घेऊन डब्या बाटल्या शोधून काढल्या नि कुलीलाइनींत गेलों.

मालगाडीच्या डब्यांतच त्यांची वस्ती होती. त्या डब्यावर छप्पर नव्हतं. या उघड्या ट्रक बाजूच्या लाइनीवर उभ्या केल्या होत्या. जरूर लागेल तेव्हां त्यांना इंजिन जोडून त्या नेल्या जात असत.

कळकीच्या आधारानं ट्रकवर चढलों. एका बाजूला एक म्हातारा माणूस निजला होता. त्याच्या तोंडाजवळ दिवा धरून पाहिलं तेव्हां वाटलं, कीं अवस्था ठीक नाहीं. रोग्याची मजल फार पुढं गेली होती. त्यांत बायकाही होत्या. कांहीं माणसं जागीं झालीं होतीं, आणि कांहींची झोंप तेव्हांपर्यंत मोडली नव्हती.

त्यांचा जमादार येऊन हजर झाला. त्याला बंगाली चांगलं बोलतां येत होतं. त्याला विचारलं, ' दुसरा रोगी कुठंय् ? '

काळोखांत बोट दाखवून त्यानं मला दुसरा एक ट्रक दाखवून दिला.

पुन्हां एकदां कळकीला धरून वर चढलों. इथं ती बाई होती. पंचवीसतीस वर्षांची असावी. दोन छोटीं मुलं तिच्या कडेला झोपलीं होतीं. नवरा तिथं नव्हता. गेल्या वर्षी दुष्काळाच्या वेळीं दुसऱ्या एका अल्पवयी मुलीला बगलेला मारून तो आसामात चहाच्या मळ्यांत गेला होता. या गाडींत आणखी पांच सहा स्त्रीपुरुष होते. तिच्या हलकट नवऱ्याची निंदा करण्यापलिकडे मला किंवा त्या रोग्याला त्यांनीं कसलीच मदत केली नाहीं. पंजाबी डॉक्टरना सांगितल्या-प्रमाणं दोघांनाही औषध दिलं, दोन्ही मुलांना बाजूला काढावयाचा प्रयत्न केला. पण त्यांची जबाबदारी घ्यायला कुणीच तयार होईना.

सकाळपर्यंत आणखी एका मुलाला उलटी जुलाब सुरू झाले. इकडे सतीश भरद्वाज हळुहळु थकत चालला होता. फार प्रयत्नानं एक माणूस मिळवला नि त्याला साईंथिया स्टेशनवरच्या पंजाबी डॉक्टरला आणण्यासाठीं पाठवलं. संध्या-काळच्या सुमारास तो परत आला. डॉक्टर दुसरे रोगी पहायला कुठंतरी

गेल्याचं त्यानं सांगितलं.

मला मोठी पंचाईत होती ती हीच, कीं माझ्यापाशीं पैसा नव्हता. स्वतः कालपासून उपाशीं होतों. झोंप नाहीं, विश्रांती नाहीं—ती एक नसूं दे—पण पाणी प्याल्याशिवाय जगायचं कसं ? समोरच्या डबक्यांतलं पाणी प्यायचं नाहीं म्हणून बजावून सांगितलं तरी कुणी माझं ऐकलं नाहीं. बायका म्हणूं लागल्या, ' याशिवाय दुसरं पाणी आहे कुठं डॉक्टर ? दुसऱ्या गांवांत पाणी आहे म्हणतात. पण जाणार कोण ? मेलों तरी परवडेल पण मजुरी मिळाल्याशिवाय हें काम कुणीं करायचा नाहीं. '

दोन दिवस तीन रात्री त्या लोकांबरोबरच त्या ट्रकवर काढल्या. कुणालाच वांचवतां आलं नाहीं. जो लागला तो मेला—पण नुसतं मरून जाणं म्हणजेच कांहीं शेवट होत नव्हता. जन्माला आला तो मरायचाच. चार दिवस आगे चार दिवस मागें—हें मला अगदीं सहज सहज कळून चुकलं होतं. ही एवढी साधी गोष्ट समजावून देण्यासाठीं शास्त्रालोचन नि वैराग्यसाधन कशाला ? माणूस एवढ्या साऱ्या तत्त्वांची चर्चा करीत कशासाठीं बसतो ? अर्थात् ' माणूस मेल्याचा ' माझ्यावर परिणाम होत नसे. पण 'माणुसकीचं मरण' मात्र माझ्यानं पहावत नसे.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं भरद्वाजनं देह ठेवला. कुणी माणसंच नसल्यामुळं अग्निसंस्कार करतां आला नाहीं. धरित्री मातेच्या पोटांत त्याला जागा मिळाली.

इकडचा उद्योग संपवून तिकडे ट्रकमधें गेलों. गेलों नसतों तर बरं झालं असतं. पण आल्यानंतर राहावेना, या माणसांच्या जंगलांत त्या रोग्यांसह मी अगदीं एकटा पडलों होतों. श्रीमंताची धनलोभी वृत्ती सभ्यतेच्या नावांखालीं माणसाला कसा मोठा हृदयशून्य पशू बनवते, याचा पुरावा या दोन दिवसांत मला मिळाला. तो अनुभव साऱ्या जन्माला पुरेसा होता.

आधीं चोंहीकडे जळजळीत उन्हानं तापून ज्वाळा निघत होत्या. ताडपत्रीच्या खालीं मीं रोग्यांना घेऊन तिथं एकटाच बसलों होतों. लहान पोरांचं दुःख अनिवार झालं होतं. त्यांच्या तोंडांत चार थेंब पाणी टाकायला सुद्धां तिथं कुणी नव्हतं, सरकारी काम—माती खणणं बंद करतां येत नव्हतं, आठवड्याच्या शेवटीं दिवस कापून मजूरी मिळाली असती. सारे एका जातीचे, त्यांच्याच जातवाल्यांचीं मुलं ! गांवांतून पाहिलं आहे, तिथं एकमेकांना असं वागवीत नाहींत, पण समाजापासून—घरादाराचं सर्व प्रकारचं स्वाभाविक बंधन तोडून नुसतीं माती खणण्या-

साठीं जीं हीं माणसं गोळा करून आणून या ट्रकवर जमा केलीं गेलीं होतीं, तीं इथं येतांच माणुसकीची ओळख मुळींच विसरून गेलीं होतीं. नुसतं माती खणणं— नुसती मजुरी! माणसाला पशू बनवल्याखेरीज पशूचं काम त्याच्याकडून करून घेतां येत नाहीं हें सभ्य माणसाला फार उत्तम रीतीनं कळून चुकलंय्.

भरद्वाज गेला खरा पण त्याची अमरकीर्ती ताडीच्या दुकानांत विद्यमान होती. संध्याकाळीं बायका पुरुष सरसकट दारू पिऊन मेळ्यामेळ्यानं येत होतीं. दुपारच्या वेळीं रांधलेल्या भाताच्या हंडींत पाणी टाकलं होतं. दुसऱ्या वेळेची बायकांनासुद्धां जिथं पर्वा नाहीं, त्या स्थितींत कोणं कुणाचं ऐकून घेतो? जमादाराच्या गाडींत ढोल करताल वाजत होते. भजनाचा दंगा चालला होता. कुणी सांगावं, तो केव्हां थांबेल?

कुणालाच त्यापासून त्रास होत नव्हता.

माझ्या जवळच्या ट्रकवर एक दोन पोरींनीं एक दोन दोस्त मिळवले होते. साऱ्या रात्रभर सारख्या त्यांच्या प्रेमलीला चालल्या होत्या. इकडे या ट्रकवर एकजण भारीच ताडी प्यायला. तो एवढ्या निर्मळ मनानं आरडून ओरडून आपल्या बायकोजवळ प्रणयभिक्षा मागूं लागला, कीं तें पाहून मीं शरमेनं चूरमार होऊन गेलों.

दूर एका गाडीवर एक बाई मोठमोठ्यानं विव्हळत होती. तिची आई औषध मागायाला आली त्यावेळीं मला कळलं, कीं ती बाळंतीण व्हायच्या बेतांत होती. लाज नाहीं, शरम नाहीं, लपवण्याजोगं कुठंच कांहीं नाहीं—सारं—मोकळं—सारं उघडंनागडं! जीवनयात्रेची गती अबाधित वेगानं बीभत्स स्वरूपांत सारखी सुरू होती.

मीच काय तो या सगळ्यांत परका. मरायला टेकलेल्या एका आईशेजारीं असलेल्या तिच्या मुलांना घेऊन त्या घनघोर अंधारांत एकटाच बसून राहिलों होतों.

मुलगा म्हणाला 'पाणी!'

त्याच्याकडे वांकून मी म्हटलं, 'आतां पाणी नाहीं बाळ. सकाळ होऊं दे.'

मुलगा म्हणाला, 'बरं.' आणि डोळे मिटून तो मुकाट्यानं पडून राहिला.

तहानेसाठीं पाणी नव्हतं पण माझे डोळे फुटून पाणी वहात होतं. काय हें? माणसाच्या कोमल मनोवृत्ती राहूं देत—पण स्वतःच्या भयंकर यातनांच्या बाबतींत सुद्धां केवढं हें विलक्षण औदासीन्य! हे पशू नव्हत तर कोण? हें धैर्य म्हणजे शक्ती नव्हे, जडता! ही सहनशीलता म्हणजे माणुसकीच्या अगदीं शेवटच्या

थरांतली वृत्ती ! आमच्या ट्रकवरचे बाकीचे लोक डाराडूर झोंपले होते. काळ्या पडलेल्या कंदीलाच्या अंधुक प्रकाशांत मला दिसून आलं, कीं त्या आईमुलांचं अंग थंड पडत आलं होतं. पण मी तरी काय करणार होतों ?

समोर काळ्या आकाशांत केवढी तरी जागा व्यापून सप्तर्षीमंडळ झळकत होतं. तिकडे पहात असतां, वेदनेनं, संतापानं नि निष्फळ आक्षेपानं मी मनाचा जळफळाट करून घेत होतों. आधुनिक सभ्यतेचीं वहानं तुम्हीं,—आतां तुम्हींच मरा एकदांचीं ! पण ही असली निर्दय सभ्यता जर तुम्हांला दिसून येत असेल तर मुळींच गय करूं नका. तसंच वाटलं, तर या साऱ्या सभ्यतेला एकदांची रसातळांत नेऊन गाडून टाका.

## १२

आणखी दोघेजण लागल्याची बातमी सकाळींच आली. मी त्यांना औषध दिलं. जमादारानं सांईथियाला खबर दिली. आतां तरी वरिष्ठ लोक जागे होतील असं मला वाटत होतं.

नऊ वाजायच्या सुमाराला मुलगा मेला. बरं झालं. हेंच या लोकांचं आयुष्य !

समोरच्या माळावरच्या रस्त्यानं दोघे पांढरपेशे छत्री घेऊन जात होते. मी त्यांच्याजवळ जाऊन त्यांना विचारलं, 'इथून गांव किती दूर आहे ?'

'हा इथं !' त्यांतल्या म्हाताऱ्यानं मानेनं खूण करून सांगितलं.

'खायचे जिन्नस कांहीं मिळतील का तिथं ?' मीं त्यांना विचारलं.

माझ्या प्रश्नाचं त्या दुसऱ्या माणसाला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, 'मिळतील म्हणजे काय ? पांढरपेशांची वस्ती—डाळ तांदूळ, तूपतेल, भाजी, तरकारी काय हवं तें मिळेल. कुठून आलांत आपण ? आपण कुठले राहणारे ?'

थोडक्यांत मीं त्यांना सारी हकिकत सांगितली. सतीश भरद्वाजचं नांव ऐकतांच ते रागावून उठले. म्हातारा उद्गारला, 'दारुड्या, बदमाश, हरामखोर !' तो कुठल्या तरी हायस्कूलचा हेडमास्तर होता वाटतं. त्यांचा सोबती म्हणाला, 'रेल्वेचे लोक ! ते आणखी कसे असणार ? कंपनीचा पैसा हातांत खेळत असतो ना ?'

काल सतीशाची उत्तरक्रिया कशी केली त्याची हकिकत मी त्यांना सांगितली नि म्हटलं, 'आतां कशाला हव्यात त्या गोष्टी ? काल तो मयत झाला. कोण

माणूस नसल्यामुळं अग्नी देतां आला नाहीं. तसाच मातींत गाडला. '

'म्हणतां काय? ब्राह्मणाच्या मुलाला—'

'मग करायचं काय?'

दोघांनाही फार वाईट वाटलंसं दिसलं. ते म्हणाले, 'पांढरपेशांचा गांव, नुसती बातमी कळली असती तर कांहीं ना कांहीं करतां आलं असतं?'

'आपण त्यांचे कोण?' एकानं विचारलं.

मी सांगितलं, 'कुणीच नाहीं—साधारण परिचय होता एवढंच!' असं म्हणून मीं इथं कसा आलों याची सारी हकीगत त्यांना थोडक्यांत सांगितली. दोन दिवस जेवायलासुद्धां मिळालं नाहीं. त्यांतून मजूर लोकांत कॉलरा सुरू झाल्यामुळं त्यांना सोडून जातां येत नव्हतं.

दोन दिवसांत मला जेवण नाहीं हें ऐकून ते फार उद्विग्न झाले आणि आपल्याबरोबर येण्याबद्दल मला फार आग्रह करूं लागले. या भयंकर साथींत रिकाम्या पोटीं रहाणं धोक्याचं असतं, असंही त्यांतल्या एकानं सांगितलं.

जास्त बोलावं लागलं नाहीं—बोलायची जरूरीही पडली नाहीं. भुकेतहानेनं माझे प्राण कंठाशीं आले होते. मी त्यांच्याबरोबर निघालों.

रस्त्यांत याच विषयावर बोलणं सुरू झालं. खेडेगांवचे लोक, शहरी शिक्षण म्हणून जें म्हणतात तें जरी त्यांना मिळालं नव्हतं, तरी गंमत ही, कीं इंग्रजी राजवटीचं अस्सल पॉलिटिक्स् त्यांना अपरिचित नव्हतं, हें ज्ञान त्यांनीं याच देशाच्या लोकांकडून, त्याच देशाच्या मातींतून, पाण्यांतून, आकाशांतून हवेंतून संग्रह करून घेऊन नसानसांत भिनवून घेतलं होतं. दोघेही म्हणाले, 'सतीष भरद्वाजचा हा कांहीं दोष नव्हे. आम्हीं असतों तर असेच झालों असतों. कंपनी बहादूरचा (इंग्रज सरकारचा) ज्याला संपर्क लागेल, तो चोर झाल्यावांचून रहाणार नाहीं. हा त्यांच्या अन्नाचाच गुण आहे.'

भुकेनं जीव व्याकुळ झालेला असल्यामुळं फारसं बोलायची ताकद त्यावेळीं मला नव्हती म्हणून मी उगीच राहिलों. ते म्हणूं लागले, 'देशाचं काळीज चिरून तिथं एक रेल्वेची लाईन ठोकायची काय जरूरी होती महाशय? कुणी कधीं मागणी केली होती का? कुणीच नाहीं. तरीही मागताहेत म्हणून ठरवलं. विहीर नाहीं, तळं नाहीं, कुवा नाहीं, प्यायला एक थेंब पाणी नाहीं—उन्हाळ्यांत गाईवासरं पाण्याच्या अभावीं धडपड करीत मरताहेत. प्यायला जर पेलाभर

स्वच्छ पाणी कुठं मिळालं असतं तर हा सतीशबाबू काय मेला असता ? मुळींच नाहीं. मलेरिआ, कॉलऱ्यासारख्या साथींनीं गांवं उजाड पडलीं आहेत पण का कस्य परिवेदना. मोठीं माणसं—मालकलोक नुसते रेल्वेंतून फिरताहेत, ते कुणाच्या घरीं किती धान्य पिकतं नि तें कसं आपल्या घशाखालीं घालतां येईल एवढं पहाण्यासाठीं. असंच कीं नाहीं ? '

चर्चा करण्याइतकं त्राण आवाजांत नसल्यामुळं नुसती मान हालवून मीं मुकाट्यानं होकार दिला. हजार वेळां मी मनांतल्या मनांत म्हटलं, हेंच, हेंच, हेंच ! केवळ एवढ्यासाठींच तेहतीस कोटी नरनारी तोंडाला कुलूप घालून विदेशी लोकांच्या राजवटीची भारतवर्षांत प्रतिष्ठा करताहेत. केवळ अगदीं एवढ्याच कारणासाठीं भारतवर्षांत चारी दिशांनीं, गल्लीकुचींतून सारखा रेल्वेचा विस्तार वाढतोय्. श्रीमंतांची भरपूर तिजोरी आणखी भरगच्च करण्यासाठीं व्यापाराच्या नांवाखालीं जे प्रयत्न चालले आहेत त्यांपायीं दुबळ्यांचं सूख गेलं, शांती गेली, अन्न गेलं, धर्म गेला—त्यांचा जगायचा मार्ग दिवसेंदिवस चिंचोळा होत चालला, रोज उचलायचा बोजा दिवसेंदिवस डोईजड होत चालला—ही सत्यकथा आतां कुणालाही कळायची राहिली नाहीं

त्या गृहस्थाचे विचारही असेच चालले असावे. याच धोरणानं तो म्हणत होता. ' ऐकलंत महाशय, लहानपणीं मी मामाच्या घरीं वाढलों. वीस कोसांत आगगाडी नव्हती. त्यावेळीं सारे जिन्नसपान्नस स्वस्त नि भरपूर मिळत होते. त्यावेळीं घरीं कांहीं असलं म्हणजे तें शेजाऱ्यापाजाऱ्यांना वांटून टाकायची बुद्धि होत होती. आतां परसवांत पिकणाऱ्या भाजीचे दोन देंठसुद्धां कोण कुणाला देत नाहीं. साडेआठाच्या गाडीला ठेकेदाराच्या हातीं भाजी दिली तर चार पैसे मिळतात ना ? आतां देण्याला म्हणतात अपव्यय करणं म्हणून ! काय सांगावं महाशय पैसा मिळायच्या कैफामुळं सारे स्त्रीपुरुष एकजात एकमेकांना पारखे झाले आहेत. मोठं दुःख होतं या गोष्टीचं !

' बरं, आपण तरी पोटभर खातों का ? तेंही नाहीं. आप्तेष्टांना, शेजाऱ्यापाजाऱ्यांना द्यायची गोष्ट दूरच राहो, चारी बाजूनं स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन चार पैसे मिळवायचे, हाच झालाय हल्लींचा परमार्थ.

' आणि या साऱ्या अनिष्टाचं मूळ म्हणजे ही रेल्वे. देशाच्या रंध्रारंध्रांत शिरेसारखा हा रेल्वेचा रस्ता जर घुसला नसता, खायचे जिन्नस विकून पैसारोजगार

करायचा सुयोग जर निर्माण झाला नसता, या अविचारी लोभानं माणूस जर पागल होऊन उठला नसता तर देशाची एवढी दुर्दशा झाली नसती.'

रेल्वेच्या विरुद्ध माझीसुद्धां जबरदस्त तक्रार होती. वस्तुतः माणसाच्या भरण-पोषणाला अत्यंत अवश्य असलेल्या वस्तू रोज छिनावून घेऊन चैनीच्या वस्तूंच्या राशींनीं जो देश भरपूर होऊन उठला आहे, तें पाहून मला देखील मोठी चीड येत असे. विशेषतः दरिद्री माणसाचं जें दुःख, जी हीनता, स्वतःच्या डोळ्यांनीं नुकतीच पाहिली होती तिचं मूळ कोणत्याच चर्चेंतून कळण्याजोगं नव्हतं. तरी मी म्हटलं, 'जरुरीपेक्षां जास्त उत्पन्न होणाऱ्या वस्तू फुकट न घालवतां विकून जर पैसे मिळवले तर तें अगदींच वाईट का ?'

'हो. अगदीं वाईट !' तो गृहस्थ एवढासुद्धां विचार न करतां एकदम म्हणाला, 'अकल्याणाचा मार्ग आहे तो.'

या बाबतींत त्याचा राग नि चीड माझ्यापेक्षां किती तरी मोठी होती. तो म्हणाला, 'या नाशाचं सारं मूळ विलायतेंतून आलं आहे. भारतवर्षाच्या मातींत हा कोंब उगवला नाहीं.—उगवणं शक्य नाहीं. स्वतःची जेवढी जरूरी तेवढीच का हिशेबी धरून चालायचं ? दुसऱ्याच्या अभावाची भरपाई करण्यांत कांहींच का किंमत नाहीं ? जें असेल तें बाहेर नेऊन विकायचं नि पैसे मिळवायचे, हाच खरा नाश—हाच खरा सर्वनाश ! असलं कठोर भाषण उगीच नाहीं माझ्या तोंडून बाहेर निघत. परदेशांतून येऊन दीनदुबळ्यांच्या तोंडचा घास काढून घेण्याचं देशव्यापी जाळं पसरून त्यांत जे सर्वांना पकडताहेत, तें पाहूनच मीं असं बोलतोंय.'

मीं म्हटलं, 'असं पहा, देशातलं अन्न परदेशांत जावं असं कांहीं मी म्हणत नाहीं. पण एकाचं शिलकी अन्न दुसऱ्याच्या भुकेसाठीं रोज खर्ची पडावं हें बरं का ? शिवाय परदेशांतून जे कुणी येताहेत तें कांहीं दरोडा घालून इथले जिन्नस नेत नाहींत. पैसे देऊनच विकत घेताहेत ना ?'

तो गृहस्थ लागलेच म्हणाला, 'हो, खरेदी करताहेत खरे. गळाला किडा अडकवून माशांना आमंत्रण देण्यासारखंच आहे तें.'

या व्यंगोक्तीचं उत्तर मी दिलं नाहीं. कारण, एक तर भुकेतहानेनं थकवा आल्यामुळं वाद करायचा हुरूप नव्हता—शिवाय या बाबतींत त्यांचा माझा विशेषसा मतभेदही नव्हता.

पण मीं कांहींच बोलत नाहीं असं पाहून तो आणखी चिरडीला आला. मी

विरोध करतो आहें असा संशय घेऊन तो गरम होऊन म्हणाला, ' महाशय, त्यांच्या बेफाम व्यापारीवृत्तीच्या तत्त्वकथा ऐकून, तेवढ्याच खऱ्या असं तुम्हांला वाटतं. पण खरं पाहिलं तर तें म्हणजे अगदीं खोट्यांतलं खोटं आहे. सोळा आण्याच्या बदल्यांत चौसष्ठ पैसे टिच्चून मोजून घेणं एवढंच ते जाणतात, विकणं नि विकत घेणं एवढीच त्यांची दृष्टि. नुसता उपभोग घेणं हाच काय तो माणसाचा एकमात्र धर्म, एवढंच ते शिकले आहेत. म्हणूनच अधाशीपणानं जगांत काय असेल नसेल त्याचा अपहार करण्याच्या आणि संचय करण्याच्या व्यसनानं त्यांनीं साऱ्या जगाचं अकल्याण केलं आहे. महाशय, ही रेल्वे, हीं यंत्रं, हा लोखंडी रस्ता, ही सारीं झालीं पवित्र vested interest—यांच्या या बोजाखालीं या जगांत गरीब माणसाला श्वास सोडायलासुद्धां जागा राहिलेली नाहीं!'

थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ' आपण म्हणालांत, एकाच्या जरूरीपेक्षां जास्त उत्पन्न होणारे जिन्नस विकायचा सुयोग नसता तर त्यांचा नाश झाला असता, किंवा ज्यांना जरूरी त्यांनीं फुकट खाल्ला असता, यालाच आपण नाश म्हटलंत ना ? '

' हो ! ' मी म्हटलं, ' याखेरीज नाश म्हणायचं कशाला ? '

म्हातारा अधिकच भडकून उठला नि म्हणाला, ' ही सारी विलायती बोली. आधुनिक अधार्मिकतेचं लक्षण आहे हें ! दुसऱ्याला फुकट देणं म्हणजे नाश कीं देशांतली पैदास परदेशीं विकून बँकेंत पैसे भरणं हा नाश, याचा एकदां विचार करून पहा. असं पहा महाशय, पूर्वीपासून आमच्या प्रत्येक गांवांत कितीतरी निरुद्योगी, कांहींसुद्धां न मिळणारे लोक होते. वाण्याच्या दुकानांत हलवाई फांसे खेळत बसत. मोठ्या लोकांच्या अड्डयावर गाणं बजावणं करायचं किंवा असेच कांहीं तरी उपद्याप करायचे—असे निरुद्योगांत आयुष्य कंठीत असत. त्या सर्वांच्याच घरीं खावयास अन्न होतं असं नाहीं, तरीही इतर पुष्कळांच्या शिलकीच्या अंशांत त्यांचं कसंबसं भागत असे. आपलं म्हणणं—म्हणजे इंग्रजी शिकलेल्यांची ओरड आहे ती याच बाबतींत ना ? बरं झालं, ब्याद गेली. हे सारे आळशी निष्कर्मे पराश्रित लोक आज नाहींसे झाले. कारण कुठं कुणाकडे कांहीं शिल्लकच रहात नाहीं. अर्थात् अन्नाभावीं मेले किंवा कुठं तरी नोकरी चाकरींत भरती करून घेऊन जिवंत असून मेल्यासारखें होऊन राहिले ! छान झालं ! परिश्रम करण्याचं महत्त्व शाबीत झालं. जीवनसंग्रामाच्या बोलीची सभ्यता शाबीत झाली. पण

माझ्या सारखा जो वयस्क झाला आहे त्यालाच कळतं, कीं गेलं काय ? या जीवन संग्रामांत तें नाहींसं झालं खरं पण त्याबरोबरच गांवांतल्या साऱ्या आनंदानं त्यांच्याबरोबर सहगमन केलं !'

त्याचे हे शेवटचे शब्द ऐकून मी चकीत होऊन त्याच्याकडे पहात राहिलों, अगदीं निरखून पाहिलं तरीही तो अल्पशिक्षित असा साधारण खेडवळ गृहस्थ माणूस असावा असं वाटे; पण त्याचं भाषण ऐकल्याबरोबर त्याच्या विचाराची मजल फार पुढं गेली असावी असं वाटलं. त्याचं सारंच भाषण निर्दोष होतं असं कांहीं मी म्हणत नाहीं-पण नाहीं म्हणणं देखील मोठं जीवावर येत होतं. काय असेल तें असो, मला शंका आली, ही सारी भाषा त्याची स्वतःची नव्हे. दुसऱ्याच्या विचारांची ती पोपटपंची असावी.

मीं अगदीं अदबीनं प्रश्न केला, 'आपल्याला जर राग यायचा नाहीं—'

'छे, छे, मुळींच नाहीं. विचारा ना काय वाटेल तें.'

'बरं.' मीं म्हणालों, हे सारे आपलेच विचार आहेत का ? स्वतःचेच आहेत का ?'

तो गृहस्थ रागावला नि म्हणाला, 'कां बरं, खोटं आहे का हें ? यातलं एक अक्षरसुद्धां कुणाला खोटं पाडतां यायचं नाहीं.'

'नाहीं नाहीं, मी तें खोटं म्हणत नाहीं पण—'

'आणखी पण काय ? आमचे स्वामीजी एक शब्दसुद्धां खोटं सांगणार नाहींत. कोण आहे त्यांच्याइतका दुसरा ज्ञानी ?'

'कुठले स्वामीजी ?' मी विचारलं.

दुसऱ्या गृहस्थानं उत्तर दिलं. तो म्हणाला, 'स्वामी वज्रानंद. वय तसं फारसं नाहीं, पण जाडा पंडीत—जाडा विद्वान्—'

'आपण ओळखतां का त्यांना ?'

'त्यांना ओळखतों ? वाः ते अगदीं आमच्यांतलेच आहेत म्हणाना. यांच्याच घरीं त्यांचा मुख्य अड्डा आहे !' असं म्हणून त्यानं बरोबरच्या म्हाताऱ्या गृहस्थाकडे बोट दाखवलं. म्हाताऱ्यानं तेव्हांच त्याची चूक दुरुस्त केली नि म्हटलं, 'अड्डा म्हणू नको नरेन, आश्रम म्हण. महाशय, आम्हीं गरीब माणसं-हातून होईल तेवढी सेवा करतों. पण ते म्हणजे विदुराच्या घरीं कृष्ण माणूस तर नव्हेच—माणूसरूपी देवता !'

मीं विचारलं, ' हल्लीं किती दिवस ते तुमच्या गांवीं आहेत ? '

नरेन म्हणाला, ' अंदाजीं दोन महिने होतील. या भागांत नाहीं कुणी डॉक्टर-वैद्य कीं नाहीं एकादी शाळा—म्हणूनच त्यांनीं एवढी खटपट चालवली आहे. शिवाय ते स्वतःच एक बडे डॉक्टर आहेत. '

एवढ्या वेळानं सारी भानगड उलगडली. ह्याच तो आनन्द ! सांईथिया स्टेशनवर आमच्याबरोबर त्यानं फराळ केला, राजलक्ष्मीनं ज्याला मोठ्या आग्रहानं गंगामाटीला आणला होता, तोच ह्या ! ती निरोप द्यायची वेळ मला आठवली. किती रडली राजलक्ष्मी त्यावेळीं ! सारी दोन दिवसांची ओळख, पण किती किती दिवसाच्या लोभाचं माणूस डोळ्याआड होतांना मोठ्या कष्टानं जसा निरोप देतात तशाच यातना झाल्या तिला त्यावेळीं. पुन्हां येण्यासाठीं केवढी काकुळती करीत होती ती ! पण आनंद संन्यासी—त्याला मोह नव्हता—ममता नव्हती. स्त्रीहृदयाच्या वात्सल्याचं रहस्य त्याच्या दृष्टीनं खोटं होतं. म्हणूनच इतक्या जवळ असूनसुद्धां इतक्या दिवसांत एक दिवस भेटून जावं असं कांहीं त्याला वाटलं नाहीं—कदाचित् यापुढंही भेटीचा योग यायचा संभव नाहीं. पण हें कळलं तर राजलक्ष्मीला केवढं दुःख होईल याची कल्पना फक्त मलाच होती.

स्वतःची गोष्ट आठवली. मी सुद्धां जाणार होतों. निरोप घ्यायची वेळ जवळ आली होती.—गेल्याखेरीज गत्यंतर नाहीं असं रोज वाटत होतं. राजलक्ष्मीला आतां माझी जरूरी नाहीं असंही वाटत होतं. त्या दिवसाचा शेवट राजलक्ष्मीच्या दृष्टीनं कुठून नि कशा प्रकारं होईल याची कल्पना मात्र मला करतां येत नाहीं.

गांवीं पोंचलों. गांवाचं नांव मासुदपूर. मोठ्या अभिमानानं आपल्या गांवाचं नांव सांगतांना म्हातारा यादव चक्रवर्ती म्हणाला, ' नांव ऐकून चमकूं नका महाशय. आमच्या गांवच्या चतुःसीमेंत मुसलमानाची सांवलीसुद्धां दिसायची नाहीं. जिकडे पहाल तिकडे ब्राह्मण, कायस्थ वगैरे जातीवंत लोक. हलक्या जातीची वस्तीसुद्धां नाहीं. काय नरेन, खरं कीं नाहीं ? '

जोरजोरानं मान हलवीत नरेन म्हणाला, ' एक सुद्धां नाहीं. तसल्या गांवांत आम्हीं रहाणार नाहीं कधीं ! '

असेलही, पण यांत एवढं खूष होण्याजोगं काय होतं तें मला कळलं नाहीं.

चक्रवर्तीच्या घरीं वज्रानंद भेटला. तोच तो. मला पाहतांच त्याला जितकं आश्चर्य वाटलं तितकाच आनंद झाला.

'अरे आमचे दादा! इकडे कुठं?' असं म्हणून त्यानं हात जोडून नमस्कार केला. या नरदेहधारी देवतेनं एवढ्या विनयानं मला नमस्कार केलेला पाहून म्हातारा चक्रवर्ती अगदीं थंड पडला. आजूबाजूला आणखी बरेच भक्त जमले होते, तेही उठून उभे राहिले. कुणीही असो, पण मी सामान्य माणूस नाहीं, असंच सर्वांना वाटलं असावं.

'फार थकलेले दिसतां दादा.' आनंद म्हणाला.

उत्तर दिलं म्हाताऱ्या चक्रवर्तीनं. मला दोन दिवस जेवणखाण मिळालं नाहीं, झोंप मिळाली नाहीं, पूर्वजन्मींच्या पुण्याईनंच मीं जिवंत राहिलों आहें वगैरे हकिकत सांगून मजूर लोकांत उत्पन्न झालेल्या सांथीची हकिकत त्यांनीं इतक्या तपशीलवार रितीनं सांगितली, कीं, मीं सुद्धां थक्क होऊन गेलों.

त्या हकिकतीचा आनंदाच्या मनावर फारसा परिणाम झाल्याचं दिसलं नाहीं. थोडंसं हंसून तो शेजारच्या माणसाकडे पाहून मला म्हणाला, 'दोन दिवसांच्या उपवासानं माणूस एवढा थकत नाहीं दादा. बऱ्याच दिवसांची व्याधी असली पाहिजे. काय झालं होतं? ताप?'

'असेल.' मी म्हटलं, 'मलेरिया तर आहेच.'

चक्रवर्तींनीं आतिथ्यांत मुळींच कमतरता केली नाहीं. जेवणखाण उत्तम प्रकारें झालं. जेवण होतांच मी जायला निघालों तेव्हां आनंदनं विचारलं, 'मधेंच या मजूर लोकांत कुठं घुसलां तुम्हीं?'

'नशिबाचा फेरा.' मी म्हटलं.

आनंद हंसून म्हणाला, 'फेरा खरा, रागारागांत निघतांना घरीं कळवलं सुद्धां नाहीं वाटतं.'

'नाहीं.' मी म्हटलं, 'पण तें रागावून नव्हे. जरूरी वाटली नाहीं कळवायची शिवाय जवळ माणूस कुठं कोण होतं?'

'तें खरंय्.' आनंद म्हणाला, 'पण वहिनीला आपल्या बऱ्यावाईटाची काळजी नाहींशी झाली केव्हांपासून? मला वाटतं, ती भीतीनं अर्धमेली झाली असेल.'

जास्त बोलण्यांत अर्थ नाहीं असं पाहून मी त्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाहीं. मला जेरीला आणायचं असं आनंदनं जसं कांहीं ठरवलंच होतं. आपला आपल्यावरच खूष झाल्याप्रमाणं हंसून तो म्हणाला, 'आपली गाडी तयार आहे. काळोख व्हायच्यापूर्वीच घरीं जाऊन पोंहोचाल. चला, मी आपल्याला पोंचवायला येतों.'

मीं म्हटलं, 'पण घरीं जायच्या पूर्वी आधीं त्या मजुरांची खबर घेतली पाहिजे मला.'

आश्चर्यचकित होउन आनंद म्हणाला, 'म्हणजे ? अजून राग गेला नाहीं ? पण मी म्हणतों, नशिबाच्या चक्रांत जें कांहीं भोगायचं होतं तें भोगून गेलं. आपण डॉक्टरही नाहीं कीं साधूसंन्यासीही नाहीं. आतां जर कांहीं खबर घेण्याजोगं असेल तर त्या कामाचा भार माझ्यावर सोपवून आपण निश्चिंतपणें घरीं जा. तिथं गेल्यावर माझा नमस्कार सांगा वहिनीला—नि म्हणावं आनंद खुशाल आहे.'

दारांत बैलगाडी उभी होती. घरचे मालक चक्रवर्ती मोठ्या मिनतवारीनं म्हणाले, 'या बाजूला केव्हां आलांत तर या घरीं पायधूळ झाडून जा.' त्यांनीं केलेल्या आदरसत्काराबद्दल मीं त्यांना हजार धन्यवाद दिले. पण पायधूळ झाडण्याची आशा देणं शक्य नव्हतं. बंगाल देश सोडून लवकरच मला जायचं होतं हें त्यावेळीं मला आठवलं—अर्थात् केव्हांही कोणत्याही कारणानं या भागांत पुन्हां यायचा मुळींच संभव नव्हता.

मी गाडींत बसलों तेव्हां छपराच्या आंत डोकावून आनंद हळूच म्हणाला, 'दादा, या बाजूची हवा तुम्हांला मानवत नाहीं. वहिनीला माझा निरोप सांगा, पश्चिमेकडची माणसं आपण—त्या तिकडेच तुम्हांला घेऊन जायला मी सांगितलं आहे म्हणावं.'

मी म्हटलं, 'या भागांतलीं माणसं काय जगतच नाहींत आनंद ?'

एवढंसुद्धां मागंपुढं न पहातां आनंदनं उत्तर दिलं, 'नाहीं, पण याची वाच्यता कशाला हवी दादा ? माझा निरोप सक्तीचा आहे असं त्यांना सांगा. त्यांना म्हणावं, आनंद संन्याशाच्या नजरेनं पाहिल्याशिवाय ही गोष्ट पटायची नाहीं.'

मी उगीच राहिलों. राजलक्ष्मीला हा निरोप मी सांगणं किती कठीण होतं याची आनंदला कुठं कल्पना होती ?

गाडी चालू होतांच तो पुन्हां म्हणाला, 'हें काय ?—मला एकदांसुद्धां बोलावलं नाहींत दा दा ?'

मी नुसतं म्हटलं, 'कामाचीं माणसं तुम्हीं, तुम्हांला आमंत्रण देणं सोपं का आहे ?'

मला वाटलं, बहुतेक ही स्वारी इतक्यांत स्वतःच तिथं उपस्थित व्हायची. या बुद्धिवान् संन्याशाच्या डोळ्यांत धूळ टाकणं मोठं कठीण होतं. असा एक काल

होता, कीं त्यांत कांहीं माझं खर्चत नव्हतं. मी आपल्याशींच हंसून म्हणत होतों, आनंदानं या जीवनांत केवढा तरी मोठा त्याग केला आहे हें मी नाकबूल करीत नाहीं. पण माझ्या नुकसानीचा सरळ हिशेब कुणी नुसता पाहिला असता तर कुणालाही नकळत माझ्या संचयाचा आंकडा एकदम संख्यातीत होऊन बसला आहे असं दिसून आलं असतं. मृत्यूच्या पलिकडच्या प्रवासाची ती शिदोरी जर माझ्या जमेच्या सदरांत पडेल, तर तिथं होणारी कोणतीच नुकसानी मी हिशेबांत धरणार नाहीं.

पण आज ? बोलायला काय होतं आज ? म्हणून कांहींच न बोलतां खालीं मान घालून बसलों होतों. असं वाटलं, ऐश्वर्याचा तो अवास्तव गौरव जर खरो-खरच आज खोट्या मायेंत विरघळून गेला तर या अजागळ, आजारी, अवांच्छित गृहस्वामीच्या भाग्यीं, अतिथीला आमंत्रण देण्याचं ढोंग न आलेलं बरं.

मीं कांहीं बोलत नाहीं असं पाहून तसाच हंसून आनंद म्हणाला, ' ठीक आहे. नवं आमंत्रण कशाला हवं ? पूर्वीच्या सर्वांच्या आमंत्रणाची जी पुंजी आहे, तिच्याच जोरावर हजर होईन झालं. '

मीं विचारलं, ' पण ही गोष्ट केव्हां अमलांत येणार आहे ? '

' भिऊं नका दादा. ' आनंद हंसून म्हणाला, ' आपला राग जाण्यापूर्वीं कांहीं मीं त्रास देणार नाहीं—त्यानंतर येईन. '

मीं उगीच राहिलों. मीं रागावून आलों नाहीं म्हणून सांगावं असंसुद्धां वाटलं नाहीं.

मजल मोठी होती. गाडीवाला घाई करीत होता. गाडी चालू होतांच पुन्हां एकदां नमस्कार करून त्यानं तोंड फिरवलं.

या भागांत गाडीघोड्याची वर्दळ नव्हती—म्हणून त्या दृष्टीनं कुणी रस्ताच तयार केला नव्हता. बैलगाडी बांधावरून, खेड्यांतून, जसा रस्ता मिळेल तशीं धडाके मारीत चालली होती. मीं अर्धवट आडवा झालों होतों. आनंद संन्या-शाच्या भाषणाचा सूर माझ्या कानांत घुमत होता. रागावून आलों नव्हतों—तो लाभासाठीं नव्हे—लोभासाठीं तर नव्हेच—पण केवळ असं वाटलं, हे खरं असतं तर ?

पण तें खरं नव्हतं—खरं होण्याची संधीही नव्हती. मीं आपल्याशींच म्हटलं, कुणावर राग करायचा ? कशासाठीं ? तिचा काय दोष ? झऱ्याचं पाणी वाहू

लागलं तर त्याबाबत कांहींतरी बोलतां येतं, पण पूर येऊन ओसरून गेला तर कोरड्या नाल्याच्या विरुद्ध माथेफोड करून मरायचं कशाला?

विचार करतां करतां किती वेळ गेला याचा हिशेब केला नाहीं. एकदम गाडी खड्ड्यांत जाऊन पडून धक्का बसला तेव्हां उठून बसलों. समोरचा चटईचा पडदा लोटून बाहेर पाहिलं तों दिवस मावळत होता. गाडीवान अगदींच पोऱ्या होता. साधारण पंधरा वर्षांचा होता.

मीं म्हटलं, 'अरे, एवढी जागा असतांना गाडी खड्ड्यांत कां घातलीस?'

राढ देशाच्या भाषेत त्यानं चटकन् उत्तर दिलं, 'मी कुठं घातली? बैलांनींच नेली ती.'

'नेली म्हणजे काय रे? बैल आवरत नाहींत तुला?'

'नाहीं. नवे आहेत हे बैल.'

'फार छान! पण हा काळोख पडत आला, गंगामाटी अजून किती दूर आहे?'

'मला काय ठाऊक? मीं कधीं कुठं आलों होतों गंगामाटीला?'

मीं म्हटलं, 'कधीं जर आला नव्हतास बाबा, तर माझ्यावरच कां एवढा प्रसन्न झालास? गंगामाटी किती दूर आहे तें कुणाला तरी विचार ना!'

तो म्हणाला, 'इथं आहेत का कुणी माणसं? नाहींत वाटतं.'

या पोराचा दुसरा कोणताही दोष असो, पण जबाब मात्र अगदीं थोडक्यांत—अगदीं सरळ.

मीं विचारलं, गंगामाटीचा रस्ता माहीत आहे का तुला?'

अगदीं तसंच सरळ उत्तर. तो म्हणाला, नाहीं.'

'मग आलास कशाला?'

'मामा म्हणाले, बाबूंना घेऊन जा. सरळ उजव्या बाजूला जाऊन पूर्वेच्या वांकणाला गेलं कीं गंगामाटी. जसं जायचं तसं यायचं.'

समोर अंधेरी रात्र—फारसा अवकाशही राहिला नव्हता. आतांपर्यंत डोळे झांकून स्वतःचाच विचार करीत होतों पण या पोराच्या भाषणानं घाबरून उठून बसलों नि म्हणालों, 'या सरळ उजवीला जायच्या ऐवजीं डावीला जाऊन पश्चिमेच्या वांकणानं तर आला नाहींस?

पोऱ्या म्हणाला, 'कुणाला ठाऊक?'

मी म्हटलं, 'ठाऊक नाहीं तर आतां काय करणार? या काळोखांतून चल

आतां दोघेही यमाच्या घरी जाऊं. भद्रकपाळ्या, रस्ता माहीत नव्हता तर आलास कशाला ?—तुझा बाप आहे जिवंत ? '

'नाहीं.'

'आई आहे ?'

'नाहीं—मेली ती.'

'ब्याद गेली. चल आतां आपणही जाऊं तिला भेटायला ! तुझ्या मामाला अक्कल नाहीं—नुसती दयामायाच आहे वाटतं ! '

आणखी थोडासा रस्ता गाडी चालल्यावर पोऱ्या रडायला लागला. पुढं जायची ताकद नाहीं म्हणाला. मी विचारलं, 'मग रहायचं कुठं ?'

त्यानं उत्तर दिलं, 'मीं घरीं जाईन परत.

'पण यावेळीं या अंधारांत मी काय करूं ?'

मुलगा मोठा स्पष्टवक्ता होता. तो म्हणाल, 'तुम्हीं उतरून जा. मामानं सांगितलंय्, भाडं सव्वा रुपया. कमी दिलेत तर मामा मला मारील.'

'माझ्यासाठीं तुला मार कशाला बाबा ?' मी म्हटलं.

एकदां वाटलं, कीं याच गाडीनं पुन्हां परत जावं. पण जायला मन घेईना. रात्र पडत होती, जागा अपरिचित, माणसांची वस्ती कुठं नि किती दूर तें कळायला मार्ग नव्हता. समोर एक मोठी आंबेफणसाची बाग दिसत होतीं. त्यावरून मी अंदाज् केला की वस्ती फार दूर नसावी. कुठं तरी आसरा मिळेल. नि नाहीं मिळाला तर नाहीं, या वेळचा प्रवास हा असाच चालू ठेवायचा.

खालीं उतरून भाडं चुकतं केलं. पोऱ्या नुसता बोलण्यांतच नव्हे तर वागण्यांत देखील मोठा सरळ. गाडी त्यानं फिरविली मात्र, घरची ओढ धरून बैल पहातां पहातां पळत डोळयाआड झाले.

## १३

संध्याकाळ झाला, पण रात्रीचा दाट काळोख पडायला अजून बराच अवकाश होता. तितक्यांत कांहीं ना कांहीं करून कुठंतरी आसऱ्याची जागा शोधून काढणं भाग होतं. मला हा प्रसंग कांहीं पहिलाच नव्हता किंवा तो कठीण म्हणून मला कधीं भयही वाटलं नव्हतं. पण आज त्या आंबराईच्या बाजूल्या पायवाटेची रेषा शोधून ज्यावेळीं मी हळुहळू पुढं जाऊं लागलों त्यावेळीं उद्विग्नतेनं नि शरमेनं

माझं मन मरून जाऊं लागलं. भारतवर्षातील वेगवेगळ्या प्रदेशांचा मला एकदां चांगलाच परिचय होता, पण आज ज्या रस्त्यावरून मी चाललों होतों त्या बंगाल्यांतल्या राढ देशाची मला अजूनपर्यंत कोणतीच माहिती झाली नव्हती. पण सान्याच देशाच्यासंबंधीं केव्हांतरी एकदां मी अजाणच होतों हेंही मला आठवलं. जी कांहीं माहिती झाली ती अशाच रीतीनं धक्के खाऊन मी स्वतः मिळवली होती--दुसऱ्या कुणी दिली नव्हती. त्या काळीं सर्वत्र मला चारी वाटा मोकळ्या वाटत होत्या कां, नि आज संकोचामुळं मन मागंपुढं होऊन त्या बंद झाल्याशा वाटतात कां याचा ठलगडा मला होईना. त्या काळांत जाण्यांत कृत्रिमता नव्हती, पण आज हें जें कांहीं चाललं आहे ती त्या काळाची नुसती नक्कल होती. त्या काळांत बाहेरचे अपरिचित लोक ते अगदीं आपलेसे वाटत असत. त्यांच्यावर आपला भार टाकायला त्यावेळीं मनाला कांहींच वाटत नसे पण तोच भार आतां एका व्यक्ती-विशेषावर सर्व प्रकारें टाकला गेल्यामुळं सान्या भाराचं केंद्र एकाच बाजुला वळून गेलेलं होतं. म्हणूनच आज या अपरिचित रस्त्यावर चालतांना माझीं पावलं प्रत्येक खेपेला जड होत होतीं.

त्या काळच्या त्या सुखदुःखाच्या सान्या कल्पनांत नि आजच्या कल्पनांत केवढा फरक होता! तरीही मीं चालत होतों. सारी रात्र या जंगलांत काढण्याचं साहसही नव्हतं—शक्तीही नव्हती. आजच्या पुरता कुठंतरी आसरा मिळवलाच पाहिजे होता.

माझं नशीब शिकंदर--मला फार दूर चालावं लागलं नाहीं. दाट पालवीनं झांकलेल्या एका मोठ्या वृक्षाच्या फांद्यांतून पलिकडे एक बंगला दिसत होता. वळणावळणांनीं जातां जातां त्या बंगल्यासमोर येऊन हजर झालों.

बंगला मोठा होता खरा पण आंत वस्ती नसाविशी वाटलं. समोर लोखंडी फाटक होतं, पण तें मोडलं होतं. त्या फाटकाची लोखंडी बारं कुणीतरी काढून नेलीं असावीं.

आंत गेलों. उघडा व्हरांडा, त्याच्या बाजूला दोन मोठ्या खोल्या, त्यांतली एक बंद होती, नि जी उघडी होती तिच्या दारीं मीं जाऊन उभा रहातों तोंच एक अस्थिपंजर झालेला माणूस येऊन बाहेर उभा राहिला. खोलीच्या चार कोपऱ्यांत चार लोखंडी खाटा होत्या—केव्हांतरी त्यांच्यावर गाद्या असाव्या—पण कालक्रमानं त्यांतला बराच भाग नाहींसा झालेला दिसला–थोडा थोडा कापूस असलेल्या पिशव्या अजून शिल्लक होत्या. एक तिपाई, कांहीं टीनचीं नि एनेमलचीं भांडीं,

तिथं होतीं. पण त्यांच्या अवस्थेचं वर्णन करणं अशक्य होतं.

माझा अंदाज बरोबर ठरला. हें एक इस्पितळ होतं. लांबून आलेला हा कुणी गृहस्थ नोकरीवर असतांना आजारी पडल्यामुळं दहा पंधरा दिवसांपूर्वी इन्डोअर पेशन्ट म्हणून इथं आला होता, त्याचा माझा संवाद झाला तो असाः—

'बाबुमहाशय, चार पैसे द्याल का ?'

'कशाला रे बाबा ?'

'भुकेनं मरतोंय्. मुठभर चणेकुरमुरे घेऊन खाईन.'

'तूं रोगी माणूस, पथ्य पाळायचं नाहीं का तुला ?'

'जी—नाहीं.'

'इथं खायला घालीत नाहींत तुला ?'

'सकाळीं वाटीभर साबुदाणे दिले होते ते तेव्हांच संपले. तेव्हांपासून या दरवाजाजवळ बसून रहात आलोंय्. कुणी भीक घातली तर एक वेळ खायला मिळतं, नाहीं तर उपास काढावा लागत होता. एक डॉक्टर आहे. साधारण हातखर्चाची कांहीं तरी व्यवस्था आहे वाटतं—सकाळीं येऊन तो एकदां पाहून जातो आणखी एक नोकर आहे तो कंपाऊंडरीपासून कंदील साफ करण्यापर्यंतचीं सारीं कामं करतो. पूर्वी आणखी एक नोकर होता. पण सहा महिनेपर्यंत त्याला पगार मिळाला नाहीं म्हणून तो रागावून निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या कुणाची नेमणूक झाली नाहीं.'

मी विचारलं, 'इथं झाडलोट कोण करतो ?'

तो माणूस म्हणाला, 'आजकाल मीच करतों तें काम. मी गेलों म्हणजे जो रोगी येईल तोच करील झाडलोट.'

'छान व्यवस्था !' मी म्हटलं, 'हें कुणाचं इस्पितळ ?'

त्या माणसानं मला दुसऱ्या बाजुच्या व्हरंड्यावर नेलं. तिथं कडीला एक टीनचा कंदील टांगला होता. जायच्या वेळीं कंपाऊंडरबाबूनं तो कंदील शिलगावला होता. काम उरकून तो घरीं गेला होता.

भिंतींत एक भला मोठा संगमरवरी फलक बसविलेला होता. त्याच्यावर इंग्रजी अक्षरांत सन तारीख खोदून अक्षरं सोनेरी शाईनं भरलीं होतीं. जिल्ह्याच्या ज्या मॅजिस्ट्रेटसाहेबाच्या हस्तें हें हॉस्पिटल खुलं करण्यांत आलं होतं त्याचं नांव सर्वांच्या वर होतं. खालीं इतर हकिकत होती. कुणी एका रायबहादूरांनीं आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ जननीजन्मभूमीला हें हॉस्पिटल दान केलं होतं. नुसतं आईचं

नि मुलाचं नव्हे, पण त्यापूर्वीच्या चार पिढ्यांचं विवरण त्या दगडावर खोदलं होतं. रायबहादूरच्या कुलाचा तो वंशवृक्षच होता म्हणायचा.

सरकारच्या राज्यांत रायबहादूर व्हायला हा गृहस्थ अगदीं पूर्णपणें लायक होता यांत शंका नाहीं. पैसे उधळायच्या बाबतींत त्यानं मुळींच कदर केली नसावी. विटा, लाकडं नि विलायतेंतून आणलेले लोखंडी कडीबर्गे यांचं बील चुकवल्यावर जें कांहीं शिल्लक राहिलं त्यांतून साहेब शिल्पकाराकडून आपला वंशवृक्ष लिहून घेण्यांत त्यानं सारं खर्ची घातलं असावं. डॉक्टर, रोगी नि औषधपथ्याची वगैरे व्यवस्था करायला कदाचित् पैसा शिल्लक नसावा—कदाचित् फुरसतही नसावी.

मी विचारलं, ' रायबहादूरांचं घर कुठंय् ? '

तो म्हणाला, ' जवळच आहे. फारसं दूर नाहीं. '

' आतां गेलों तर भेट होईल ? '

' जी नाहीं. घराला कुलूप लागलंय्. तीं माणसं कलकत्याला रहातात.'

मी विचारलं, ' केव्हां येणार माहीत आहे ? '

तो माणूस परमुलखांतला होता. त्याला नीटशी माहिती नव्हती. डॉक्टरकडून त्याला कळलं होतं, कीं तीन एक वर्षांपूर्वी ते गृहस्थ एकदां आले होते. त्यानंतर पत्ता नाहीं.

जिकडे तिकडे एकच दशा — अर्थात् वाईट वाटायचं कांहीं कारण नव्हतं.

जागा अपरिचित, संध्याकाळ उलटून गेलेली, अर्थात् रायबहाद्दूरचा ठावठिकाणा काढीत बसण्यापेक्षां इतर जरुरीच्या गोष्टीकडे लक्ष देणं भाग होतं. त्या माणसाला थोडे पैसे दिले तेव्हां त्यानं सांगितलं, कीं जवळच चक्रवर्ती नांवाचा एक ब्राह्मण रहातो. तो फार दयाळू आहे. तिथं आसरा मिळायचा संभव आहे. तो स्वतःच मला वाट दाखवायला आला, म्हणाला, 'वाण्याच्या दुकानीं जायचंच आहे—जरा थोडं वळण घ्यावं लागेल मला. तुम्हांला घर दाखवून पुढं जाईन. ' वाटेंत चालतां चालतां तो हकिकत सांगत होता. पथ्यासाठीं लागणारे जिन्नस रात्रीच्या वेळीं त्या दयाळू ब्रह्मणाच्या घराकडून आणून तो गुजराण करीत होता. सुमारें दहा मिनिटं वाट चालल्यावर चक्रवर्तींच्या दारासामोर येऊन पोंचलों. माझ्या वाटाड्यानं हाका मारायला सुरवात केली.

कुणीच उत्तर देईना. कुणा सुखवस्तु ब्राह्मणाच्या घरीं पाहुणचार घ्यायला जातोंय असा माझा समज होता. पण घरादाराची कळा पाहून एकदम खचून

गेलों. तिकडे कुणी उत्तर देत नव्हतं, पण माझा सोबती चांगलाच मख्ख होता–तो मुळींच हटला नाहीं. त्याच्या अंगीं एवढी चिकाटी नसती तर त्याचा रोगी आत्मा त्यापूर्वीच खतम् झाला असता. मोठ्या चिकाटीनं तो हाकांवर हाका टाकीत होता.

एकदम उत्तर मिळालं, " जा—जा—आज जा पाहूं ! '

या उत्तरानं तो हटला नाहीं. तो म्हणाला, ' बाहेर कोण आलंय् तें पहा तर खरं. '

मी मात्र अगदीं घाबरून गेलों होतों. चक्रवर्तींचा परमपूज्य गुरुदेव त्याच्या घरीं पायधूळ झाडायला उपस्थित झाल्याचा आव त्यानं आणला होता.

आंतला आवाज क्षणभऱ्यानं जरा मुलायम झाला. ' कोण रे भीम ? ' असं म्हणत घरचा मालक येऊन दारीं उभा राहिला. गुडघ्यापर्यंत पोंचणारा एक मळका पंचा नेसलेल्या त्या गृहस्थाचं वय काळोखांत अंदाजतां आलं नाहीं खरं पण तो फारसा म्हातारा नसावासं वाटलं. त्यानं पुन्हां विचारलं, कोण रे भीम ? '

माझ्या सोबत्याचं नांव भीम असावं. भीम म्हणाला, ' गृहस्थमाणूस आहेत—ब्राह्मण आहेत. रस्ता चुकून इस्पितळांत आले. मीं म्हटलं, भीतां कशाला ?—चला ना, ठाकूरमहाशयांच्या घरीं नेऊन पोंचवतों तुम्हांला. तिथं चांगली सोय होईल तुमची.'

तसं पाहिलं तर भीमनं अतिशयोक्ती केली नव्हती. चक्रवर्तीनं मोठ्या आदरानं माझं स्वागत केलं. स्वतः चटई अंथरून मला बसवलं. तंबाखू ओढतों कीं नाहीं तें विचारून आंत जाऊन स्वतः गुडगुडी भरून आणून मला दिली. ते म्हणाले, " काय करायचं, सारे नोकर तापानं पडले आहेत." तें ऐकतांच मला अतिशय संकोच वाटला. एका चक्रवर्तीचा पाहुणचार खाऊन दुसऱ्या चक्रवर्तीच्या घरीं येऊन पोंचलों होतों. इथं कशी संभावना होते याची काळजी होती. हातीं गुडगुडी घेऊन ओढूं लागलों तोंच आंतून एकदम कडक आवाजांत प्रश्न आला, ' काय हो, कोण आलंय बाहेर ? '

मी अंदाज केला ती गृहिणी असावी. मला धडकी भरली. पण चक्रवर्तींचा आवाज एवढासुद्धां कांपला नाहीं.

त्यांनीं एकदम उत्तर दिलं, ' मोठे माणूस आहेत ग मोठे माणूस !—अतिथी—ब्राह्मण—नारायण ! रस्ता चुकून इथं आले. रात्रींपुरते रहाणार आहेत. भल्या पहांटे उठून जाणार आहेत.'

आंतून उत्तर आलं, ' हो ! जो येतो तो रस्ता चुकून येतो. या मेल्या पाहुण्यांनीं भंडावून सोडलंय. घरांत मुठभर तांदूळ नाहींत कीं चिमुटभर डाळ नाहीं—मग काय चुलींतली राख खायला घालूं ? '

माझ्या हातची गुडगुडी हातींच राहिली.

चक्रवर्ती म्हणाले, ' छे. छे. असं म्हणूं नये. आमच्या घरांत काय डाळतांदळांची वाण आहे ? चल चल, सारं ठाकठीक करून देतों.

चक्रवर्तींची गृहिणी बाहेर आली होती ती कांहीं आंत जाण्यासाठीं नव्हे. ती म्हणाली, काय ठाकठीक करून देणार आहांत ? मूठभर तांदूळ आहेत ते उकडून पोरांना घातले पाहिजेत ना ? पोरं उपाशीं ठेवून या चोरांना खायला घालूं ? विसरा तें ! '

आई धरित्री दुभंग हो ! मीं कांहीं तरी बोलायचा प्रयत्न करीत होतों पण उसळून उठलेल्या चक्रवर्तींच्या समोर कांहीं बोलायची छाती होईना. प्रसंग शिवीगाळीवर आला. अतिथीसत्काराच्या प्रकरणांत त्या नवराबायकोंत जो झगडा सुरू झाला त्याची भाषा ऐकून मीं अगदीं गार होऊन गेलों.

खिशांत पैसे टाकून मीं निघालों नव्हतों—जे कांहीं होते तेही संपले होते. सदऱ्याला सोन्याचीं बटनं होतीं, पण इथं कोण ऐकून घेणार होतं ? मोठी धडपड करून जायला निघालों तेव्हां चक्रवर्तींनीं माझा हात धरून जोरानं मला मागं खेंचलं, अतिथी नारायण, विन्मुख होऊन गेलांत तर गळफास लावून घेईन. '

' मग सुटेन एकदांची ! ' लगेच च्यालेंज ॲक्सेप्ट करीत गृहिणी म्हणाली, ' भीक मागून पोरांना खायला घालीन. '

इकडे मला तर अगदीं वेड लागायची पाळी आली होती. मीं म्हटलं, चक्रवर्ती महाशय, मग सावकाशीनं या बाबतीचा आपण काय तो निर्णय ठरवा. यावेळीं मला सोडा. नाहींतर एक दोरी आणून द्या मला, म्हणजे गळ्याला फास लावून घेऊन तुम्हांला आतिथ्याच्या ऋणांतून मुक्त करतों ! '

चक्रवर्ती आंत पाहून ओरडून म्हणाले, ' अक्कल आली का कांहीं—काय ? धडा मिळतोय् ? '

आंतून उलट उत्तर आलं, ' हो. '

थोड्याच वेळांत आंतून बाहेर एक हात दिसला. त्या हातानं पितळेची कळशी बाहेर दणकन आपटली. त्याबरोबरच हुकूम आला, ' जा, वाण्याच्या दुकानीं–ही-

कळशी ठेवून डाळ, तांदुळ, तेल, तूप काय हवंय तें घेऊन या. हातीं मिळालं म्हणजे तो मेला सगळंच गडप करणार नाहीं एवढं ध्यानांत ठेवा म्हणजे झालं.'

एकदम खुषींत येऊन चक्रवर्ती म्हणाले, 'अरे ज्या ज्या—हा काय मुलाच्या हातचा लाडू आहे वाटतं?'

माझ्या हातची गुडगुडी घेऊन त्यांनीं दोन दम मारून म्हटलं, 'विस्तव विझाला वाटतं! अग ए, जरा एवढी चिलमी भरून दे पाहूं? दोन दम मारून मग जातों. हो—अस्सा जातों नि अस्सा येतों.' असं म्हणून चिलीम हातीं घेऊन त्यांनीं ती आंत पोंहोंचती केली.

बस्स! नवराबायकोंत एकदम तह झाला. बायकोनं तंबाखू भरून दिला, नवऱ्यानं एकदां पोटभर ओढून घेतलं. हंसत हंसत गुडगुडी माझ्या हातीं देऊन कळशी घेऊन ते निघून गेले.

तांदुळ आले, डाळ आली, तेल आलं, मीठ आलं,—योग्य वेळीं सैंपाक घरांत मला बोलावणं आलं. जेवणावर मुळींच इच्छा नव्हती. नाहीं म्हणणं चाललं नसतं—नव्हे, नाहीं म्हणायची मला छातीच होईना. माझ्या आयुष्यांत पुष्कळ ठिकाणीं किती तरी वेळां मला अयाचित अतिथी होण्याचे प्रसंग आले होते. सर्वच ठिकाणीं सदोदित सुखाचं स्वागत झालं होतं असं नाहीं, पण असलं हें स्वागत व्हायचं भाग्य यापूर्वी कधींच लाभलं नव्हतं.

आंत जाऊन पाहिलं तों चूल पेटत होती. सैंपाक तयार झाला नव्हता. केळीच्या पानावर तांदुळ, डाळ, बटाटे नि जवळच एक रिकामी तपेली होती. चक्रवर्ती मोठ्या उत्साहानं म्हणाले, 'आतां हंडी चढवा चुलीवर. हां हां म्हणतां होऊन जाईल सैंपाक. मसूरच्या डाळीची आमटी, बटाटे-भात—वाः! छान जमेल जेवण! तूप आहेच—एवढं गरम गरम खाल्लं—'

चक्रवर्तींच्या जिभेला पाणी सुटलं होतं, पण इकडे माझं धाबं दणाणून गेलं होतं. चुकून एकादा शब्द तोंडून गेला तर भलताच प्रसंग ओढवायचा, या भयानं त्यानं सांगितल्याप्रमाणं मी हंडी चढवली. गृहिणी आडोशाला उभी होती. मला सैंपाक करायचा सराव नाहीं हें तिच्या बायकी नजरेला चटकन् दिसून आलं. आतां ती मला उद्देशून बोलूं लागली. तिच्या ठायीं इतर कोणताही दोष असो पण संकोच किंवा लोकलज्जा म्हणून जे कांहीं शब्द प्रचारांत आहेत ते तिच्या एवढेसुद्धां परिचयाचे नव्हते, हें कुणा निंदकानंही सांगितलं असतं.

ती म्हणाली, ' तुला तर बाबा सैंपाकचा सराव दिसत नाहीं. '

मी बिनतक्रार कबुली दिली तेव्हां ती म्हणाली, ' इकडून म्हणायचं झालं, विदेशी लोक—कुणी सांगितलंय—कुणी ऐकलंय ! मी म्हटलं, तें कांहीं चालायचं नाहीं. एक रात्र मूठभर भात घालून मी कुणा माणसाची जात बाटवायची नाहीं. अरे बाबा, आम्हीं अग्रदानी बामण ! '

मला सारं कांहीं चालत होतं. यापेक्षां देखील किती तरी मोठीं पापं मी पूर्वी केलीं होतीं. पण तसं सांगायची सोय नव्हती—तेवढ्यामुळंच कांहीं तरी भानगड उत्पन्न व्हायची. इथं ही रात्र कशी घालवायची नि या घरच्या नागपाशांतून कसं बाहेर पडायचं तेवढीच काळजी मला लागली होती. अर्थात् तिनं दाखवून दिलं त्याप्रमाणं खिचडी शिजवली. वर तूप ओतून कसेबसे चार घास गिळायचा प्रयत्न केला. या संकटांतून कसा पार पडलों तें माझं मलाच कळलं नाहीं. खिचडीचे पिंड पोटांत जाऊन दगडांचे गोळे बनले असावेत असंच मला वाटलं.

अभ्यासानं सारं कांहीं होतं म्हणतात. पण त्यालाही मर्यादा आहे. आंचवायला देखील अवसर मिळाला नाहीं—सारं जसंच्या तसं ओकून पडलं. मी घाबरून गळाटून गेलों. हें आतां सारं माझं मलाच काढावं लागणार !—पण तें काढायची ताकद नव्हती. डोळ्यावर झांपड येत होती. कसं बसं बोलून टाकलं, ' कुठं तरी डोकं टेकायला मला जागा द्या. पांच मिनिटं सांवरून घेतों नि मग हें सारं काढून टाकतों. '

आतां माझी कांहींतरी खरडपट्टी निघणार अशी अपेक्षा होती. पण चक्रवर्ती बाईचा भयंकर आवाज एकदम थंडावलेला पाहून मला आश्चर्य वाटलं. अजूनपर्यंत ती काळोखांत होती पण आतां माझ्यासमोर येऊन म्हणाली, ' अरे बाबा, तूं कशाला हें काढायला हवं ? मी काढून टाकतें सारं कांहीं ! बाहेरचा बिछाना घालून झाला नाहीं अजून—तोंपर्यंत माझ्या खोलींत जरा आडवा पड. '

नाहीं म्हणायची ताकदच नव्हती. मुकाट्यानं तिच्या मागोमाग गेलों नि डोळे मिटून तिच्या फाटक्या वाकळीवर झोपीं गेलों.

कितीतरी वेळानं मी जागा झालों. डोकं वर करायचीसुद्धां शक्ती नव्हती. सडकून ताप भरला होता. माझ्या डोळ्यांतून सहसा पाणी येत नसे. पण एवढ्या मोठ्या अपराधाबद्दल कोणत्या शब्दांनीं क्षमा मागावी हें सुचत नसल्यामुळं मी एवढा घाबरून गेलों होतों; कीं माझे दोन्ही डोळे पाण्यानं भरून आले.

किती तरी वेळ मीं असाच कुठंही भटकत जात असें खरा पण आजपर्यंत माझी अशी विटंबना करण्याचा प्रसंग देवानं कधींच माझ्या भाग्यीं लिहिला नव्हता.

जिवाचा आटापेटा करून पुन्हां एकदां उठून बसावयाचा प्रयत्न केला पण डोकं सावरेना — तेव्हां डोळे मिटून तसाच झोंपी गेलों. आज चक्रवर्तीबाईबरोबर समोरासमोर भाषण झालं. संकटाचा काल आल्याखेरीज स्त्रीजातीच्या वात्सल्याचा परिचय मिळूं शकत नाहीं. हेंच खरं. स्त्रीच्या कसोटीचा खरा कस संकटाच्या निकर्षावरच लागतो. तिचं हृदय काबीज करायला असलं प्रभावी अस्त्र दुसरं मिळणं अशक्य.

ती माझ्या उशागत बसली होती. मी डोळे उघडले असं पाहून ती म्हणाली, ' जागा झालास बाबा ? '

मीं तिच्याकडे पाहूं लागलों. तिचं वय चाळीशीच्या सुमाराला असावं–कदाचित् थोडं जास्तही असेल. वर्ण काळासावळा, पण नाकाडोळ्यांनीं चांगली सभ्य घराण्यांतल्या बाईसारखी दिसत होती. कुठंही कठोरपणाचं लक्षण दिसत नव्हतं. दिसत होतीं काय तीं भयंकर दारीद्य नि उपासमारीचीं लक्षणं–नुसती नजर पडतांक्षणीं तीं लक्षणं सर्वत्र दिसत होतीं. ती म्हणाली. ' काल काळोखांत दिसलं नाहीं मला, पण माझा मोठा मुलगा जीवंत असता तर तुझ्याएवढाच असता. '

आतां याचं उत्तर काय देऊं ?

ती कपाळावर हात मारून म्हणाली, ' अजून ताप नुसता फणफणतोय्. ' मीं डोळे झांकून पडलों होतों. तसेच डोळे झांकून म्हणालों, ' तुम्हीं जरा हात दिला तर हळुहळू इस्पितळांत जाऊन पडेन—तसं तें फारसं दूर नाहीं. '

तिचा चेहरा जरी मला दिसला नाहीं तरी तिच्या गहिंवरलेल्या आवाजावरुन मला कल्पना आली. ती म्हणाली, ' बाबारे, जळली पोळलेली मी, रागाच्या भरांत कांहीं तरी बोललें काल, म्हणून तूं सुद्धां तो राग मनांत धरून काय त्या यमपुरींत जाऊन पडणार ? नि जाईन म्हटलंस म्हणून मी जायला देणार आहें थोडीच ! ' असं म्हणून ती क्षणभर उगीच राहिली. थोडक्या वेळानं हळुहळू म्हणाली, ' आतुर माणसाला कसलं बंधन नाहीं. इस्पितळांत गेलेल्या माणसाला कुणाच्या हातचं काय खावं लागतं हें काय सांगतां येतंय् ? पण तेवढ्यानं काय कुणाची जात जाते ? मी साबुदाण्याची लापशी करून दिली तर खाशील का ? '

मी नुसत्या खुणेनंच होकार दिला. नुसता आजारी म्हणूनच नव्हे, पण चांगला

धडधाकट असतों तरीसुद्धां मला कसली अडचण नव्हती.

अतएव मी तिथं राहिलों—मला वाटतं चांगले चार दिवस मी तिथं होतों. पण त्या चार दिवसांची आठवण सहज विसरण्याजोगी नव्हती. ताप एकच दिवसांत गेला पण बाकीच्या दिवसांत अगदीं दुबळा होऊन पडलों होतों. कुणी मला हालचाल करायलासुद्धां दिली नाहीं.

केवढ्या भयंकर दारिद्र्यांत या ब्राह्मण कुटुंबाचे दिवस जात होते? दुर्दैवापेक्षांही हजार वाटांनीं समाजाकडून निष्कारण होत असलेला छळच त्यांना जास्त जाणवत होता. बिचारी चक्रवर्तीबाई सारा दिवस राबत असे. पण त्यांतल्या त्यांत वेळ काढून मधून मधून ती माझ्याजवळ येऊन बसे, रोगी माणसाच्या पथ्यपाण्याची व्यवस्था जशी व्हावी तशी होत नाहीं म्हणून ती भरपाई करण्यासाठीं तो मधून मधून माझं डोकं चेपीत बसत असे. केवढी तिची कळकळ!

पूर्वी त्यांची सुस्थिती होती. थोडीशी शेतवाडीही होती. पण तिच्या भोळ्या नवऱ्याला लोकांनीं लुबाडून असं संकटांत टाकलं होतं. ते येऊन त्याच्याकडे कर्ज मागत म्हणत, ‘ एवढीं मोठीं माणसं आहेत, पण असा बड्या दिलाचा माणूस कोण आहे?’ अर्थात् या बड्या दिलाची शाबीती करण्यासाठीं दुसऱ्याकडून कर्ज काढून ते तिसऱ्याला देत असत. पहिल्या पहिल्यानं प्रॉमिसरी नोट करून देत असत, पण पुढं तिच्या नकळत त्यांनीं आपली शेतवाडीच गहाण टाकली. असल्या चारुदत्तीवृत्तीचं जें फळ मिळावयाचं तेंच मिळालं.

परक्यासाठीं वाटेल तें करण्याचा चक्रवर्तीच्या प्रकृतीचा पुरवठा मला पहिल्याच रात्रीं मिळाला होता. निर्बुद्धपणामुळ पुष्कळ माणसं आपला जमीनजुमला घालवून बसतात, त्याचे परिणामही अत्यंत दुःखप्रद होतात, पण समाजाच्या अनावश्यक नि अंध निष्ठुरतेमुळं या परिणामाचा पसारा कसा भयंकर होतो याची कल्पना चक्रवर्तीबाईच्या भाषणावरून मला पुरेपुर पटली.

त्या घरांत दोनच खोल्या होत्या. एकांत मुलं झोंपत नि दुसरी मी, एक अपरिचित माणूस असूनही, बळकावून बसलों होतों. माझ्या जिवाला तें लागून राहिलं होतं. मीं म्हटलं, ‘ आज आतां ताप निघालाय, आपल्यालाही फार कष्ट पडताहेत, बाहेरच्या ओटीवर जर मला बिछाना अंथरून द्याल तर तिथं जाऊन पडेन.’

गृहिणी निश्चितपणानं म्हणाली, ‘ असं कधीं झालंय् बाबा? आभाळ अगदीं

भरून आलंय्. पाऊस केव्हां पडेल याचा नेम नाहीं. नि पाऊस आला तर त्या ओटीवर डोकं टेकायला एवढीसुद्धां कोरडी जागा मिळायची नाहीं. तू रोगी माणूस—तुलां तिथं नेऊन कसा ठेवूं बाबा ? '

अंगणांत एका बाजूला गवत रचून ठेवलेलं दिसत होतं. तें दाखवून मी म्हणालों, ' वेळींच घर शाकारून कां घेतलं नाहीं ? बरसात ही अशी जवळ आलेली–' याचं तिनं जें उत्तर दिलं, त्याचं मर्म कुणाला सहज कळलं नसतं. मोठं बिकट काम होतं तें. पतित ब्राह्मण म्हणून या भागांतले शूद्र लोकसुद्धां त्याचं काम करीत नसत. दुसऱ्या गांवचे मुसलमान यायचे तेव्हां त्यांनीं घर शाकारून द्यायचं.

ती हकिकत सांगतांना तिला एकदम रडूं कोसळलं. रडत रडत ती म्हणाली, ' बाबारे, आमच्या दुःखाला काय सीमा आहे ? त्या सालीं आमची सात आठ वर्षांची मुलगी एकदम कॉलऱ्यानं वारली. नवरात्राचे दिवस, आमचे भाऊबंद गेले होते काशीला. दुसरे कुणी येईनात. धाकट्या मुलाला बरोबर घेऊन, यांना स्वतःला एकट्यानं प्रेत स्मशानांत न्यावं लागलं. ती काय उत्तरक्रिया म्हणायची ? लांकडं सुद्धां कुणी देईनात. स्वतः खड्डा खणून पोरीला त्यांत गाडून घरीं आले—'

जाग्या झालेल्या जुन्या आठवणीमुळं बोलतां बोलतां तिचा शोक अनावर झाला. डोळे पुशीत हुंदके देत तिनं जी हकिकत सांगितली ती अशी—त्यांच्या कुणी पूर्वजानं कधीं काळीं श्राद्धाचं दान घेतलं होतं, हाच काय तो त्यांचा दोष. हिंदुला श्राद्ध करण्याखेरीज गत्यंतर नाहीं नि कुणी ना कुणी तरी दान घेतल्या-शिवाय श्राद्धाचं कार्य पुरं होत नाहीं. मग हा दोष कसा ? नि जर हा दोष आहे तर श्राद्धाच्या भानगडींत माणसाला घालायचं तरी कशासाठीं ? त्या श्राद्धासाठीं दान घ्यायचं आमिष तरी दाखवायचं कां म्हणून ?

या प्रश्नांचीं उत्तरं देणं मोठं कठीण होतं. बरं हें पाप आहे म्हटलं, तर तें कुणाचं ? कुणा पूर्वजानं हें दुष्कृत्य केलं पण त्याची शिक्षा त्याच्या वंशांतल्या प्रत्येक माणसानं कां भोगावी ? एवढ्या पिढ्या गेल्या तरी त्या पापाचं निराकरण होणं असाध्य कां व्हावं ?

श्राद्धाचं दान घेणं चांगलं कीं वाईट तें मला माहीत नाहीं. वाईट असलं तरी एवढं खरं, कीं व्यक्तिगत भावनेनं कांहीं कुणी तें काम करीत नाहीं अर्थात् त्यांत दोष कसला ? एका शेजाऱ्यानं दुसऱ्या शेजाऱ्याच्या संसारयात्रेच्या वाटेंत अशा रीतीनं कां म्हणून निष्कारण कांटे पसरावे ? असला निर्दय, हृदयहीन राक्षसीपणा

हिंदु समाजाखेरीज जगांतल्या इतर कोणत्याही समाजांत असेल असं मला वाटत नाहीं.

ती पुढं म्हणाली, ' या गांवातली वस्ती घटत चालली आहे. ताप नि सांधीनं अर्धे लोक मरून गेले, आतां आहेत नुसते ब्राह्मण, कायस्थ नि राजपूत. आतां असं वाटूं लागलंय्, दुसरा कांही उपाय नाहीं—नाहींतर कुठल्यातरी मुसलमानांच्या गांवांत जाऊन रहाणं बरं. '

' पण तसं केलं तर जात जाईल ना ? मी म्हणालों.

चक्रवर्ती गृहिणीनं या प्रश्नाचं सरळ उत्तर दिलं नाहीं. ती म्हणाली, ' माझा एक दूरचा चुलत सासरा आहे. तो दूर तिकडे नोकरीला गेला होता. तिकडे क्रिरिस्तांव झाला. आतां त्याला कुणी त्रास देत नाहींत.

माझं तोंड बंद झालं. हिंदुधर्म टाकून कुणी धर्मांतर करायला निघाला आहे असं म्हटलं, तर मनाला मोठ्या यातना होतात. पण त्याचं समाधान कसं करायचं ? अस्पृश्य नि नीच जातीच्या लोकांना हिंदुसमाजाकडून छळ सोसावा लागतो असा आजवर माझा समज होता. पण आज कळलं, कीं या प्रसंगांतून कुणीच सुटला नाहीं. अर्थशून्य चर्चा करीत शास्त्रार्थ काढीत एकमेकांचं जीवन दुर्धर करून ठेवणं हाच आमच्या समाजाचा अनुवंशिक संस्कार ! पुष्कळ जण प्रश्न करतात—पुष्कळ जण कबूलही करतात, कीं हा अन्याय आहे, लांछन आहे, पण याच्या निराकरणाचा मार्ग मात्र कुणालाच दाखवतां येत नाहीं. मुकाट्यानं हा अन्याय माथीं वाहून जन्म आल्यापासून मरेपर्यंत सारे सहन करीत आले आहेत; पण प्रतिकार करण्याची प्रवृत्ति किंवा धाडस कुणाच्याच अंगीं नाहीं. कळतां सवरतां अविचाराचा प्रतिकार करण्याशी शक्ती ज्या लोकांतून नाहींशी झाली आहे, ती जात दीर्घकाल टीकून राहील असं म्हणणंच चुकीचं वाटतं.

दोन तीन दिवसांत प्रकृति जरा सुधारलीशी वाटतांच एके दिवशीं सकाळीं जायला निघालों. मी म्हटलं, ' मला आतां निरोप द्या आई. '

चक्रवर्ती गृहिणीचे दोन्ही डोळे आंसवांनीं भरून आले. ती म्हणाली, 'दुःखी माणसाच्या घरांत तुलासुद्धां दुःख भोगावं लागलं बाबा ! नि मीं तुला थोडी का टाकून बोललें ? '

याला उत्तर काय द्यावं तें मला सुचेना, ' नाहीं नाहीं ! तसं कांहीं नाहीं—मी मोठा मजेंत होतों—मोठे उपकार झाले ! ' वगैरे वगैरे सभ्य माणसाची मामुली भाषा वापरणं माझ्या जिवावर आलं.

मला वज्रानंदाचं भाषण आठवलं—तो एकदां म्हणाला होता ' घर सोडलं म्हणून काय झालं ? या आमच्या बंगाल देशांत घरोघर आईबहिणी आहेत. त्यांच्या लोभाचं बंधन तोडून जाणं सोपं का आहे ? ' किती खरे होते हे उद्गार ! भयंकर दारिद्र्य आणि भाबड्या नवऱ्याच्या भोळेपणाच्या परमावधीमुळं, गृहस्था-घरची ही गृहिणी जवळ जवळ पागल झाली होती. पण मी आजारी आहें, असहाय आहें हें नुसतं तिला दिसून आलं मात्र—पुढं तिला विचार करावा लागला नाहीं. निस्सीम मातृत्वाच्या स्नेहानं माझा राग नि परगृहवासाचं सारं दुःख तिनं दोन्हीं हातांनीं पुसून टाकलीं.

मोठ्या खटपटीनं चक्रवर्तीमहाशयांनीं एक बैलगाडी मिळवली. जेवणखाण करून मीं नंतर जावं अशी गृहिणीची इच्छा होती. पण मग उन्हाचा त्रास फार होईल असं मीं म्हटलं तेव्हां तिनं आग्रह धरला नाहीं. निघायच्या वेळीं देवदेवींचं नांव घेऊन मला आशिर्वाद देऊन डोळे पुशीत ती म्हणाली, ' बाबारे, या बाजूला कधीं आलास तर एकदां तरी भेटून जा. '

त्या बाजूला माझं जाणं झालं नाहीं नि भेट घेणंही झालं नाहीं. कांहीं दिव-सांनीं एवढं मला कळलं, कीं कुशारी महाशयांकरवीं राजलक्ष्मीनं त्या ब्राह्मणाचं बरंचसं ऋण फेडून टाकलं.

## १४

गंगामाटीच्या घरीं ज्यावेळीं येऊन पोचलों त्यावेळीं तिसरा प्रहर झाला होता. दाराच्या दोन्हीं बाजूंना केळीचे खांब उभारलेले होते नि घटस्थापना केली होती. वर आंब्याच्या पानांच्या माळा टांगल्या होत्या. बाहेर बरेच लोक बसून तंबाखू खात गप्पा मारीत होते. बैलगाडीचा शब्द ऐकून त्यांनीं वर पाहिलं. हाच शब्द ऐकल्यामुळं आणखी एकजण अकस्मात् येऊन माझ्यासमोर उभा राहिला. पहातों तो स्वतः वज्रानंद ! मला पहातांच त्यानें मारे आरडाओरडा सुरू केला.

कुणी एकानं जाऊन आंत वर्दी पोंचवली. स्वामीजी हकिकत सांगत होता—त्यानं येऊन सारी हकिकत इथं कळवल्यावर चारी बाजूंला माणसं पाठवून तपास सुरू झाला होता. सर्व प्रकारचे प्रयत्न सारखे चालले होते. घरचीं सारीं माणसं काळजीनं करपून गेलीं होतीं.

स्वामीजी म्हणाला, ' झालं काय ? एकदम कुठं दडी मारलीत सांगा तर

खरं ? गाडीवाल्याच्या पोऱ्यानं सांगितलं, कीं गंगामाटीपर्यंत तुम्हांला पोंचवून तो परत गेला —'

राजलक्ष्मी कामांत गुंतली होती. तिनं येऊन एकदम पायांवर लोळण घेतली. ती म्हणाली, 'काय शिक्षा दिलीत आम्हां लोकांना !' वज्रानंदाला उद्देशून ती म्हणाली, 'आतां पहा आनंद, आज अगदीं येणारच असं माझं मन मला सांगत होतं.'

मीं हंसून म्हणालों, 'दारावर केळीचे खांब नि घटस्थापना केलेली पाहिली त्याचवेळीं मला वाटलं, कीं मीं यायची बातमी तुला कळली म्हणून.'

रतन दाराच्या आड येऊन उभा होता. तो चटकन् पुढं येऊन म्हणाला, 'छे, छे, तसं नव्हे. आज इथं ब्राह्मणभोजन व्हायचंय् ना—वक्रनाथाहून परत आल्यावर—'

राजलक्ष्मी त्याला दरडावून म्हणाली, 'तुला कुणी सांगितलंय व्याख्या करायला रे रतन ! जा आपल्या कामाला.'

तिच्या रागानं लाल झालेल्या चेहऱ्याकडे पहातांच वज्रानंद हंसत सुटला. तो म्हणाला, 'कळलं ना दादा, कोणत्या तरी कामांत मन गुंतवलं म्हणजे मनाची काळजी त्रासदायक होत नाहीं. एवढ्यासाठींच हे सारे उपद्व्याप ! नाहीं ताई ?'

कांहींच उत्तर न देतां राजलक्ष्मी रागानं निघून गेली.

वज्रानंदानं विचारलं, 'अगदीं थकलेले दिसतां दादा. काय झालं तरी काय इतक्यांत ? घरीं न येतां कां कुठं दडी मारलीत ?'

दडी मारण्याचं कारण मी सविस्तर सांगितलं. तें ऐकून आनंद म्हणाला, 'यापुढं असं कांहीं करूं नका. अशी झुकांडी देऊं नका. एवढे दिवस त्या बिचारीनं कसे काढले तें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कळायचं नाहीं.'

मला कळलं होतं. अर्थात् प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय मी सारं कांहीं समजलों.

रतननं चहा आणून दिला नि गुडगुडी भरून दिली. आनंद म्हणाला, 'मी आतां बाहेर जातों दादा. यावेळीं तुमच्याजवळ बसून राहिलों तर एका माणसाचा राग होईल माझ्यावर—तोंडसुद्धां पहाणार नाहीं माझं—' असं म्हणून त्यानं हंसत हंसत बाहेर कूच केलं.

थोड्या वेळानं राजलक्ष्मी आली नि अगदीं सहजपणें म्हणाली, 'त्या तिकडल्या खोलींत गरम पाणी, पंचा, धोतर ठेऊन आलेंय्—नुसतं आंग पुसून धोतर

बदलायचं. तापांतून उठल्यावर डोक्यावर पाणी घालायचं नाहीं—सांगून ठेवतेंय्.'

मी म्हटलं, 'स्वामीजीनं कांहीं तरी सांगितलं. आतां तापबीप कांहीं नाहीं.'

राजलक्ष्मी म्हणाली, 'आतां नसेल — पण यायला वेळ लागायचा नाहीं.'

मीं म्हटलं, 'तें कांहीं सांगतां यायचं नाहीं. बाहेरच्या उकाड्यानं माझं सर्वांग भाजून निघालंय्. स्नान केलंच पाहिजे.'

राजलक्ष्मी म्हणाली, 'केलंच पाहिजे का? मग मीं देखील येतें बरोबरच. चला—एकट्यानं नाहीं करायचं स्नान!' असं म्हणून ती आपणच हंसत सुटली आणि म्हणाली, 'कांहीं तरी हट्ट करून मला त्रास देतां नि स्वतःलाही कां त्रास करून घेतां? या अवेळीं स्नान करायचं नाहीं बरं का!'

अशा प्रकारें गळेपडूपणाचं बोलणं करण्यांत राजलक्ष्मीचा हात कुणी धरला नसता. स्वतःच्या मर्जीनुरुप दुसऱ्यावर सक्ती गाजवतांना ती कुणाला जाणवूं नये म्हणून प्रेमळपणाच्या भाषेनं ती अशी कांहीं गोड गोड बोलत असे, कीं तिचा तो हट्ट पुरवायला विरोध करण्याची कुणालाही छातीच होत नसे.

ही बाब क्षुल्लक होती. स्नान केलं नसतं तर चाललं असतं. पण टाळतां येत नाहींत अशा कितीतरी बाबतींतसुद्धां तिच्या मर्जीविरुद्ध जाणं, मलाच काय, पण दुसऱ्या कुणालाही केव्हांही शक्य नसे.

मला तिथून घालवून ती माझ्या खाण्याची व्यवस्था करायला गेली. मी म्हटलं, 'आधीं तुझ्या ब्राह्मणभोजनाची भानगड होऊं दे ना पुरी!'

'आतां कमाल केलीत!' राजलक्ष्मी चकित होऊन म्हणाली, ती भानगड पुरी व्हायला चांगली संध्याकाळ होईल.'

'होईना का?'

'वाः वाः! राजलक्ष्मी हंसत म्हणाली, 'ब्राह्मणभोजनाचा बोजा राहूं दे माझ्या माथीं. त्यासाठीं तुम्हीं उपवास केलात तर माझी स्वर्गाची शिडी वर जाण्याच्या ऐवजीं उलटून पाताळांत जाईल.' असं म्हणून ती निघून गेली.

थोड्याच वेळानं ती माझ्याजवळ येऊन बसली. पथ्याचे जिन्नस तिनं माझ्यासाठीं आणले होते. घरांत ब्राह्मण भोजनासाठीं जो सैंपाक चालला होता त्यांतलं कांहींच नव्हतं. माझ्यासाठीं मुद्दाम स्वतः तिनं पथ्याचं करून आणलं असं मला वाटलं.

मी आल्यापासून तिची वागणूक, तिची बोलायची पद्धत बदलली होती. ती द्धत अपरिचित नव्हती किंवा अगदीं नवीनही नव्हती, याचा पुरावा जेवायला

बसलों तेव्हां स्पष्ट दिसून आला. पण तो पुरावा मला कोणत्या प्रकारें स्पष्ट दिसून आला हें जर मला कुणी विचारलं असतं, तर स्पष्ट भाषेंत मला कांहींच सांगतां आलं नसतं. कदाचित् असंही असेल, माणसाला जेव्हां एकादी गोष्ट जाणवते त्यावेळीं ती जाणीव उघडपणं सांगायची भाषा अजून कुणी शोधून काढलीच नसावी.

राजलक्ष्मी मला वाढायला बसली. पण पूर्वीप्रमाणें खाण्यावाढण्याच्या बाबतींत ती नित्याची जबरदस्ती होत नव्हती—नुसती काकुळती होती ती. सक्ती नव्हे—विनंती! बाहेरच्या दृष्टीला हें कळलं नसतं. हृदयाच्या आंत असणारे दोन डोळे ज्या कुणाला असतील, त्यालाच तें दिसलं असतं.

खाणं झालं तेव्हां राजलक्ष्मी म्हणाली, ‘मी आतां जाऊं?’

अतिथी पाहुणे बाहेर गोळा होत होते—मी म्हटलं. ‘जा.’ माझं उष्टं ताट हातीं घेऊन ती जेव्हां हळुहळू तिथून निघून गेली तेव्हां कितीतरी वेळपर्यंत मी उगीच त्या दिशेला पहात बसून राहिलों.

मला असं वाटलं, मी ज्यावेळीं गेलों त्यावेळीं राजलक्ष्मीची जी वृत्ती होती ती गेल्या कांहीं दिवसांत आतां तशीच राहिली असल्याचं दिसून आलं नाहीं. कालपासून तिनं एकप्रकारें उपास केला, असं आनंद म्हणाला होता. आजही पाण्यालासुद्धां शिवली नव्हती. उद्यां ती हा उपास केव्हां सोडणार होती याचाही कांहीं पत्ता नव्हता. कांहींच सांगतां आलं नसतं. आज कित्येक दिवस मी पहात आलों होतों, कीं धर्माचरणाची तिची तहान अनावर झाल्यामुळं वाटेल त्यावेळीं, वाटेल तसलं कृच्छ्रसाधन करायला ती मागंपुढं पाहात नसे. इथं आल्यापासून सुनंदेच्या सहवासामुळं तिची पूर्वीची निष्ठा अत्यंत बळावून उठली होती.

तिला पहायची संधि आज मला थोडीशीच मिळाली. ज्या दुर्ज्ञेय रहस्यमय मार्गानं अलिकडे ती सारखी दौड करीत होती, तें पाहून मला वाटलं, कीं तिच्या पूर्वाश्रमींचा कलंक केवढाही मोठा असो, तो आतां टिकून रहाणं शक्य नाहीं.

पण मी मात्र या तिच्या मार्गांत एकाद्या पर्वतासारखा उभा राहून तिला पदोपदीं आड येत होतों.

सारं कामकाज उरकून राजलक्ष्मी पाऊलसुद्धां न वाजवतां माझ्या खोलींत आली तेव्हां दहा वाजले असावे. दिवा बारीक करून तिनं अगदीं हळूच माझी मच्छरदाणी सोडून टाकली. ती आपल्या बिछान्याकडे झोंपायला जाते आहे असं पाहून मीं म्हटलं, ‘तुझ्या ब्राह्मणभोजनाचं अवडंबर संध्याकाळपूर्वीच संपलं. मग आतां ही एवढी रात्र कां झाली तुला?’

राजलक्ष्मी पहिल्यानं दचकली. पण लगेच हंसून म्हणाली, 'आतां काय सांगूं माझं कपाळ ? तुमची झोंप मोडेल म्हणून अगदीं भीत भीत मीं येत होतें. पण अजून तुम्हीं जागे ! झोंप आली नाहीं वाटतं ?'

'तुझी वाट पहात जागत राहिलोंय.'

'माझी वाट पहात ? मग बोलावलंत नाहीं कां मला ?' असं म्हणून मच्छरदाणीचा एक पडदा दूर करून ती माझ्या उशागत बसली. नित्याच्या संवईप्रमाणं हाताचीं दहाही बोटं माझ्या केसांत फिरवीत ती म्हणाली, 'कां बोलावलं नाहीं ?'

'बोलावलं असतं तर आली असतीस तूं ? तूं कामांत होतीस—'

'असे ना का काम ! तुम्हीं बोलावलं तर नाहीं म्हणणं शक्य आहे का मला ?'

याला कांहीं उत्तरच नव्हतं. माझ्या हांकेची उपेक्षा करणं तिला शक्यच नव्हतं हें मी जाणतों.

अगदीं खरंच आहे तें. पण या खऱ्याला खरं म्हणून चालणं आज मला कुठं साध्य आहे ?

राजलक्ष्मी म्हणाली, 'उगीसे राहिलांत ?'

'मीं विचार करतोंय् !'

'विचार ? कसला विचार !' असं म्हणून हळूच आपला हात माझ्या कपाळावर ठेऊन ती अगदीं हळुच म्हणाली, 'माझ्यावर राग करून का गेला होतां घर टाकून ?'

'राग करून गेलों हें तुला कळलं ?'

राजलक्ष्मीनं माझ्याकडे न पहातां हळुच म्हटलं, 'मीं रागावून गेलें तर तुम्हांला नाहीं का कळायचं ?'

'बहुधा कळेल.' मीं म्हटलं.

'तुम्हांला बहुधा कळेल, पण मला निश्चित कळेल. अन् तुमच्या निश्चितपणापेक्षां कितीतरी निश्चितपणें मला कळेल.'

शक्य आहे !' मी हंसत म्हटलं, 'या बाबतींत वाद घालून मला वरचढ करायची नाहीं. लक्ष्मी, स्वतःला हरवून बसण्यापेक्षां तूं जर हरवली गेलीच तर फार मोठं नुकसान होईल माझं.'

'माहीत आहे ना ?' राजलक्ष्मी म्हणाली, 'मग बोलून दाखवतां कशाला ?'

'यापूर्वी कुठं बोललों होतों ?' मीं म्हटलं, 'पण हल्लीं हें बोलून दाखवायचं

बंद केलंय् त्याचा तुला पत्ता नव्हता.'

राजलक्ष्मी उगीच राहिली. पूर्वी या बाबतींत तिनं माझी गय केली नसती. लक्षकोटी प्रश्न विचारून त्याचा निकाल लावून घेतला असता तेव्हां स्वस्थ राहिली असती!—पण यावेळीं ती मुकाट्यानं स्तब्ध राहिली. बऱ्याच वेळानं ती बोलूं लागली--तिनं विषयांतर केलं-ती विचारूं लागली, 'तुम्हांला ताप आला होता वाटतं? होतां तरी कुठं? इकडे मला वर्दी कां नाहीं दिलीत?'

वर्दी न देण्याचं कारण सांगितलं. एकतर वर्दी द्यायला कुणी माणूस नव्हता. दुसरं, जिच्याकडे वर्दी पाठवायची ती कुठं आहे हें माहीत नव्हतं. एकंदरींत कुठं होतों, कसा होतों, काय काय दशा झाली, तें सविस्तर तिला सांगितलं. आजच चक्रवर्ती गृहिणीचा निरोप घेतल्याचं सांगून त्या गरीब बिचाऱ्या गृहस्थाच्या घरीं कसा आसरा मिळाला, त्या तसल्या भयंकर दारिद्र्याच्या परिस्थितींत एका अपरिचित रोगग्रस्त पाहुण्याची पोटच्या गोळ्यापेक्षांही जास्त कळकळीनं तिनं कशी सुश्रुषा केली, तें सांगत असतांना त्या यातनेच्या आठवणीबरोबरच कृतज्ञतेच्या जाणिवेनं माझ्या दोन्ही डोळ्यांतून आसवांचा पूर लोटला. माझे डोळे पुशित राजलक्ष्मी म्हणाली, 'त्यांचं कर्ज फिटण्यापुरते पैसे कां नाहीं पाठवीत?'

'असते तर पाठवले असते' मीं म्हटलं, 'पण माझ्याकडे आहेत कुठं?'

मीं असं कांहीं बोललों, कीं तें राजलक्ष्मीच्या मनाला फार लागे. आज देखील तिला तसंच दुःख झालं असावं. पण आपला पैसा तो माझाच पैसा, असं पूर्वीप्रमाणं भांडून झगडून प्रस्थापित करून घ्यायला तो सरसावली नाहीं-उगीच बसून राहिली.

ही वृत्ती मला नवीनच दिसून आली. मी एवढं बोलल्यावर कांहींसुद्धां उत्तर न देतां ती गुपचूप राहिली. ही गोष्ट मलाही जाणवली.

कांहीं वेळानं एक मोठा सुस्कारा सोडून ती उठून सरळ बसली. आजूबाजूला काळवंडून टाकणारं मोहाचं आवरण या सुस्काऱ्याच्या फुंकरीनं जसं कांहीं ती उधळून लावीत होती. मिणमिणणाऱ्या दिव्याच्या प्रकाशांत तिच्या चेहऱ्यावरचा भाव मला चांगलासा दिसून आला नाहीं. पण जेव्हां ती बोलूं लागली तेव्हां तिच्या आवाजांत झालेला विलक्षण बदल माझ्या ध्यानीं आला. राजलक्ष्मी म्हणाली, 'ब्रह्मदेशांतून तुमच्या पत्राचं उत्तर आलंय्. ऑफिसचं मोठं पाकीट होतं. कांहीं-तरी निकडीची बात असेल म्हणून उघडून आनंदकडून वाचून घेतलं—'

'बरं मग?'

' तुमच्या मोठ्या साहेबानं अर्ज मंजूर केलाय्. तुम्हीं तिथं गेलां तर तुमची नोकरी पूर्वीप्रमाणेंच सुरू होईल असं त्यानं कळवलं आहे. '

' असं ? '

' हो. आणूं तें पत्र ? '

' नको, राहूं दे, उद्यां पाहीन. '

पुन्हां दोघंही उगीच बसून राहिलों. काय बोलावं, कशा रितीनं विषयाचा उपक्रम करावा तें कांहींच सुचेनासं झाल्यामुळं मनाची नुसती खळबळ उडाली होती. तितक्यांत चट्कन् डोळ्यांतला एक अश्रुबिंदु माझ्या मस्तकावर पडला. मी तिला शांतपणं विचारलं,' माझा अर्ज मंजूर झाला ही बातमी तर कांहीं वाईट नव्हे ! मग तूं रडतेस कां ? '

पदरानं डोळे पुशीत राजलक्ष्मी म्हणाली, ' पुन्हां नोकरीसाठीं परदेशीं जायची ही खटपट सुरू केलीत—कां मला कळवलं नाहींत ? मी नको म्हणेन असं वाटलं तुम्हांला ? '

' नाहीं. ' मी म्हटलं, ' उलट तूं मला उत्तेजन दिलं असतंस. पण मी जें बोललों नाहीं तें त्यासाठीं नव्हे. असल्या क्षुल्लक गोष्टींची चर्चा करायला तुला वेळ होता कुठं ? '

राजलक्ष्मी उगीच राहिली. मनांत येणारा आवेगाचा उमाळा तिनं मोठ्या कष्टानं आवरला असं मला स्पष्ट दिसून आलं. पण तें क्षणभरच !

थोड्या वेळानं ती अगदीं थंडपणें म्हणाली, ' या प्रश्नाचं उत्तर देऊन कशाला माझ्या दोषाचं माप वाढवूं ? खुशाल जा—मी मुळीं सुद्धां नको म्हणणार नाहीं' असं म्हणून पुन्हां घटकाभर स्तब्ध राहून ती म्हणाली, ' तुम्हांला मी केवढ्या संकटांत घातलंय तें इथं आलें नसतें तर मला मुळींच कळलं नसतं. या गंगा-माटीच्या आंधळ्या बावडींत बायकांचं चालेल, पुरुषांचा निभाव लागायचा नाहीं. इथलं हें कर्महीन, उद्देशहीन जीवन तुम्हांला आत्महत्येसारखं वाटलं असेल— अगदीं उघड उघड दिसतंय मला ! '

' कुणी दाखवून दिलं का तुला हें ? ' मी विचारलं.

' नाहीं. राजलक्ष्मी म्हणाली, ' मला स्वतःलाच दिसून आलं तीर्थयात्रेला गेलें पण देव तिथं दिसला नाहीं. देवाच्या बदलीं तुमचा विरस झालेला चेहरा रात्रंदिवस माझ्या नजरेसमोर दिसत होता. माझ्यासाठीं आजवर फार त्याग करावा

लागला तुम्हांला—पण बस्स झालं ! ’

या क्षणापर्यंत माझ्या मनाचा नुसता जळफळाट झाला होता. पण आतां तिचा तो केविलवाणा आवाज ऐकून मीं देहभान विसरलों. मीं म्हटलं, ‘ अन् तूं काय थोडा त्याग केलास लक्ष्मी ? हें गंगामटी गांव कांहीं तुझ्यासारखीला योग्य नव्हे ! ’

मीं बोललों खरा पण माझा मलाच संकोच वाटला—मेल्याहून मेल्यासारखं वाटलं. हें असलं भाषण नकळत माझ्या तोंडून निघून गेलं खरं पण त्या बुद्धिवान् स्त्रीच्या दृष्टींतून त्याच्या मुळाशीं असलेला उद्देश लपून राहिला नाहीं.

पण आज तिनं मला माफी दिली.

मला वाटल, त्या उद्गारांचा बरेवाईटपणा काढून रागरोषाचं जाळं विणीत बनायला तिला वेळ नव्हता. ती म्हणाली, ‘ नि मी सुद्धां गंगामाटी गांवाला शोभेशी नाहीं. सर्वांनाच कळायचं नाहीं. मला कसलाच त्याग करावा लागला नाहीं हें तुम्हांला तरी जाणवलं पाहिजे होतं. माझ्या हृदयावर जें एक मोठं दगडासारखं दडपण पडलं होतं तेवढंच एकदाचं दूर झालं. पण एवढ्यावर कुठं भागलं ? आजीवन तुम्हांला मागत होतें—तुम्हीं नुसते पुन्हां मिळालांत एवढंच नव्हे, तर कितीतरी पटीनं मी तुम्हांला बळकावून बसलें, हें का तुम्हाला कळत नाहीं ? ’

मला उत्तर देतां आलं नाहीं. हृदयांतल्या अज्ञात अशा कोपऱ्यांतून कुणी तरी मला सांगूं लागलं, ‘ चुकलास, मोठी भयंकर चूक झाली तुझी. नकळत तिचं मन दुखावलंस ! मोठा अन्याय झाला ! ’

अगदीं याच प्रकारें राजलक्ष्मीनं फटका दिला. ती म्हणाली, ‘ केव्हांच या बाबतींत बोलायचं नाहीं असं ठरवलं होतं, तें तुमच्यासाठीं. पण आज माझा नाइलाज झाला. पुण्याच्या लोभानं मी इतकी उन्मत्त होऊन गेलें, कीं तुमचीही हेटाळणी करायला सुरवात केली, असं जें तुम्हाला निष्कारण वाटूं लागलं होतं तेंच माझ्या मनाला सर्वांपेक्षां जास्त लागलं. रागावून निघून जायच्यापूर्वी तुम्ही एवढा तरी विचार करायचा होता, कीं राजलक्ष्मीला तीनत्रिलोकांत दुसरं कांहीं सुद्धां जास्त नाहीं ! ’ बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारा पाझरून माझ्या चेहऱ्यावर पडत होत्या.

तिचं सांत्वन करण्याजोगी भाषा मला सुचत नव्हती. माझ्या डोक्यावर तिनं ठेवलेला तिचा उजवा हात मीं ओढून माझ्या हातीं घेतला. डाव्या हातानं आसवं पुसून ती बराच वेळ उगीच बसून राहिली होती.

थोड्या वेळानं ती म्हणाली, 'रयत लोकांचं जेवण ठरकलं कीं नाहीं तें पाहून येतें. आतां जरा झोंप घ्या.' असं म्हणून हळूच आपला हात माझ्या हातांतून सोडवून घेऊन ती निघून गेली. बळेंच तिला राहवून घेतलं असतं तर ती गेली नसती—पण मीं तसं कांहीं केलं नाहीं—तीही फिरून आली नाहीं.

झोंप येईपर्यंत मी हाच विचार करीत होतों, कीं बळेंच तिला राहवून घेण्यांत अर्थ काय? आजपर्यंत मी कधींही कोणतीच सक्ती केली नव्हती. जी जी म्हणून सक्ती होत होती ती तिच्याकडून! आज जर ही गांठ सोडून टाकून मला मोकळा करून ती आपणही मोकळी होऊं पहात असेल, तर मी तरी उगीच्च कां तिची दिशाभूल करूं?

सकाळीं जाग येतांच पहिल्यानं तिकडच्या खाटेकडे पाहिलं. राजलक्ष्मी तिथं नव्हती. रात्रीं ती मुळीं आलीच नाहीं, कीं भल्या पहाटे उठून निघून गेली, तें कांहीं मला कळलं नाहीं.

बाहेरच्या खोलींत येऊन पाहिलं तर तिथं मोठी गडबड चालू होती. रतन किटलींतून गरम चहा भांड्यांत ओतीत होता नि जवळच बसून राजलक्ष्मी स्टोव्ह वर शिंगाडे किंवा कचोरी तळीत होती—नि आपल्या संन्याशाच्या निस्पृह नि निरासक्त दृष्टीनं त्या खायच्या पदार्थांकडे व्रजानंद आशाळभूतपणें पहात होता!

मी आंत येतों आहें असं पाहतांच राजलक्ष्मीनं आपल्या ओल्या केसांवर पदर ओढला. व्रजानंद तर ओरडतच उठला, 'अरे दादा आले. किती वेळ लागला तुम्हांला हा! मला वाटलं कीं हें सारं आतां थंडगार होऊन जातंय!'

'होय तर?' राजलक्ष्मी हंसत म्हणाली, 'तुमच्या पोटांत जाऊन पाणी झालं असतं त्याचं!'

आनंद म्हणाला, 'ताई सन्यासीफकीरांची जरा कदर करायला शीक. असं टाकून बोलूं नये.' मला उद्देशून तो म्हणाला, 'प्रकृति एकंदरींत बरी दिसत नाहीं तुमची. जरा नाडी दाखवा पाहूं?

राजलक्ष्मी अस्वस्थ होऊन म्हणाली, 'आतां पुरे झालं आनंद. पुरे झाली ही डॉक्टरी. बरी आहे आतां त्यांची प्रकृती.'

आनंद म्हणाला, 'तें ठरवण्यासाठीं नाडी पाहिली पाहिजे.'

'नाहीं.' राजलक्ष्मी म्हणाली, 'कांहीं नको नाडी पहायला! आत्तांच साबूदाण्याची व्यवस्था करतें हवी तर!'

मी म्हटलं, ' साबूदाणे आतां पुरे झाले. आतां कुणी दिले तर हात सुद्धां लावणार नाहीं. '

' नि हात लावायची जरुरीच नाहीं. ' असं म्हणून राजलक्ष्मीनं एक प्लेटभर गरम कचोऱ्या नि शिंगाडे माझ्याकडे लोटले. ती रतनला म्हणाली, ' तुझ्या बाबूंना चहा दे ना. '

संन्यास घेण्यापूर्वी व्रजानंदनं डॉक्टरीची परीक्षा दिली होती. तो हटणारा माणूस नव्हता. तो मान हालवीत म्हणाला, ' पण ताई तुम्हीं आपली जबाबदारी—'

' ऐक तर खरं,' राजक्ष्मी त्याला मध्येंच थांबवून म्हणाली, ' यांची जबाबदारी काय माझी नव्हे तर तुझी ? यांच्या जबाबदारीचा बोजा घेऊन मी त्यांना कशी उभे ठेवीत आलेंय् हें जर तुला माहीत असतं तर तूं या ताईजवळ डॉक्टरीची मिजास दाखवली नसतीस.' असं म्हणून बाकीचे सारे शिंगाडे, कचोऱ्या एका थाळींत घालून त्याच्यापुढं लोटून ती हंसत म्हणाली, ' आतां खा हे—आतां बोलूं नकोस. '

' एवढं कसं हें खायचं ? ' आनंद आ पसरून म्हणाला.

' खातां येत नाहीं तर संन्याशी कशाला झालास ? ' राजलक्ष्मी म्हणाली, ' इतर चार जणासारखं वरदार करून कां नाहीं राहिलास ? '

आनंदाचे डोळे एकदम भरून आले. तो म्हणाला, ' असं हें वहिणीचं सैन्य या बंगाल मुलखांत आहे म्हणून—नाहींतर आजच्या आज ही भगवी छाटी नदींत फेंकून देऊन घरीं निघून गेलों असतों. अगदीं तुमची शपथ ! पण मला एक सांगायचं आहे ताई. परवांपासून उपास सुरू झाला आहे तुझा. आज जें कांहीं जपजाप्य असेल तें जरा लवकर आटोपून घे. अजून या जिनसांना विटाळ झालेला नाहीं—' असं म्हणून त्यानं समोरच्या खाण्याच्या जिनसांकडे दृष्टि वळविली.

राजलक्ष्मी अगदीं घाबरून म्हणाली, ' म्हणतोस काय आनंद ? उद्यां इथं सारे ब्राह्मण यायचे नाहींत म्हणतोस ? '

मी म्हटलं, ' आधीं ते येऊन जाऊं देत, मग पाहूं ! '

मलाच जावं लागणार वाटतं. त्या लोकांचं नांव नि पत्ता द्या माझ्याकडे. हरामखोरांच्या गळ्याला पंचा बांधून इथं घेऊन येतों नि कसे जेवीत नाहींत तें पहातों.' असं म्हणून तो उठून जाण्याऐवजीं समोर थाळी ओढून ताव मारूं लागला.

राजलक्ष्मी हंसून म्हणाली, 'संन्यासी कीं नाहीं ? देवद्विजांवर केवढी भक्ति ही !'

आमच्या सकाळच्या चहाचा हा समारंभ अशा प्रकारें ज्यावेळीं संपला

त्यावेळीं आठ वाजले होते. मी बाहेर येऊन बसलों. आतां थकवा वाटत नव्हता. हंसण्याखेळण्यांत वेळ गेला त्यामुळं मन मोठं प्रसन्न झालं होतं.

राजलक्ष्मीच्या गेल्या रात्रींच्या भाषणांत, नि आजच्या भाषणांत नि आचरणांत कोणतंच साम्य नव्हतं. रागानं नि दुःखानं ती तसं बोलली असावी यांत शंका नाहीं. खरं पाहिलं तर रात्रीच्या काळोखाच्या आवरणाचा तो परिणाम होता. यःकश्चित सामान्य गोष्टीला निष्कारण मोठं स्वरूप देऊन मी उगीच मनाला त्रास करून घेतला होता. आज दिवसा उजेडीं त्याची आठवण होतांच माझी मलाच लाज वाटली—कौतुकही वाटलं.

कालच्यासारखी आज उत्सवाची गडबड नव्हती, तरीही मधून मधून आमंत्रित माणसांच्या जेवणाची गडबड सारखी सुरू होती.

बराच वेळ झाला. पुन्हां एकदां चहाचा सरंजाम घेऊन खोलींत जमिनीवरच बैठक मारून बसलों. संध्याकाळचं काम उरकून राजलक्ष्मी आमच्या खोलींत थोडा वेळ आली.

वज्रानंद म्हणाला, ‘ यावं ताई. ’

त्याच्याकडे पहात हंसत राजलक्ष्मी म्हणाली, ‘ संन्याशाची देवसेवा सुरू झाली वाटतं ? तेव्हांच एवढा खुषींत आलाहेस ! ’

‘ खोटं नव्हे ताई, ’ आनंद म्हणाला, ‘ या जगांत जे जे कांहीं आनंद आहेत त्या सर्वांत श्रेष्ठ दोन—भजनानंद नि भोजनानंद ! नि शास्त्र म्हणतं, त्यागी माणसाच्या बाबतींत दुसराच सर्वश्रेष्ठ ! ’

‘ हो ! ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ तुझ्यासारखी त्यागी माणसाच्या बाबतींत ! ’

‘ तेंही खोटं नव्हे ताई, ’ आनंद म्हणाला, ‘ घरची घरधणीन असल्यामुळंच तुम्हांला यांतलं मर्म कळलं. नाहीं तर आमची ही त्यागी लोकांची सेना मजा करीत असतांना, सारखे तीन दिवस तुम्ही दुसऱ्याला धरधरून खायला घालीत स्वतः उपास करीत मेला नसतां. ’

‘ मरतेंय् कुठं बाबा, ? ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ रोज रोज हा देह सारखा फुगत चाललाय् ! ’

आनंद म्हणाला, ‘ त्याचं कारण आहे. तेव्हांही मी तुम्हांला पाहिलं होतं, आतांही पहातोंय्. तुमच्याकडे पाहिलं कीं वाटतं, या लोकचा प्राणी नव्हे—या दुनियेच्या पलिकडचं कांहीं तरी असावं. ’

राजलक्ष्मीचा चेहरा लाजेनं तांबडा लाल झाला. मी तिला उद्देशून हंसून म्हटलं, ‘ तुझ्या आनंदच्या बोलण्याची पद्धत पाहिलीस ? ’

तें ऐकून आनंदही हंसला नि म्हणाला, ‘ ही स्तुति आहे दादा स्तुति ! डोळे पाहिजेत कळायला. ती दृष्टि असती तर चाकरीपायीं ब्रह्मदेशाला कशाला गेलां असतां ? बरं ताई, आतां मला असं सांग, कुठल्या चांडाळ देवतेनं हा असला आंधळा माणूस तुझ्या मानगुटीवर आणून बसवलाय् ? दुसरा उद्योग नव्हता का त्यां देवतेला ? ’

राजलक्ष्मी हंसत सुटली. आपल्या कपाळाला हात लावून ती म्हणाली, ‘ देवतेचा दोष नाहीं भैया, दोष या प्राक्तनाचा ! नि यांचा दोष तर फारच मोठा— वैरीसुद्धां असा नसतो ! ’ असं म्हणून ती माझा निर्देश करून म्हणाली, ‘ शाळेंत असतांना हे बडे सरदार होते. धड्यापेक्षां छड्याच ज्यास्त देत असत. बोधोदय शिकवीत असत आम्हांला ! पुस्तकांत काय होतं कोण जाणे. पण आम्हाला मात्र भलताच बोध मिळाला. किती झालं तरी पोर बुद्धि—फुलं कुठं मिळत होतीं ?— जंगलांतल्या करवंदीची माळा गुंफून यांच्या गळ्यांत घातली. आतां वाटतं, करवंदांबरोबर कांटेसुद्धां घातले असते त्या माळेंत तर बरं झालं असतं ! ’ बोलतां बोलतां रागानं चढणारा आवाज दाबलेल्या हंसण्यांत बदलून गेला.

‘ केवढा हा राग ! ’ आनंद म्हणाला.

‘ राग नव्हे तर काय ? ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ कांट्याची माळ घालायला सांपडलं असतं कुणी तर खात्रीनं घातली असती. अजूनसुद्धां घालीन. ’ असं म्हणून ती एकदम बाहेर जायला निघाली—तेव्हां आनंद तिला हांक मारून म्हणाला, ‘ पळायला काय झालं ? ’

‘ कां ? आतां कसलं काम आहे ? चहाचा पेला हातीं घेऊन भांडण करीत बसायला त्यांना वेळ असेल—मला नाहीं. ’

आनंद म्हणाला, ‘ ताई, मी आपला मोठा भक्त आहें. पण या बाबतींत मात्र तुमचं आमचं जमायचं नाहीं. एक शब्दसुद्धां बोलले नाहींत ते—भांडण काढायची चांगली संधी होती—पण मुक्या माणसाला बोलायला लावायचं कसं ? अधर्म होईल ना तो ? ’

हेंच तर संकट आहे मला ! ’ राजलक्ष्मी म्हणाली, ‘ अधर्म होईल तेवढेंच करावं लागतं मला. पेल्यांत चहा थंड होऊन गेला—मी जरा सैंपाकघरांतून

जाऊन येतें हं.' असं म्हणून ती बाहेर निघून गेली.

वज्रानंदानं मला विचारलं, 'ब्रह्मदेशांत जायचं अजूनही निश्चित आहे का दादा? पण ताई बरोबर जायचं म्हणते ना?'

'तें मला माहीत आहे.'

'मग?'

'मग काय? एकटंच गेलं पाहिजे.'

'हा काय त्रागा चालला आहे?'

वज्रानंद म्हणाला, 'नोकरी करायची तुम्हांला कांहीं जरुरी नाहीं! मग दुसऱ्याची गुलामगिरी करायला जातां कशाला?'

मी म्हटलं, 'निदान संवय तरी टिकून राहील!'

'हें रागाचं बोलणं झालं दादा.'

'नुसता रागच कां? रागाखेरीज दुसरं कांहीं असणं अशक्य का आहे?'

आनंद म्हणाला, 'असलं तरी तें दुसऱ्याला कळणं कठीण!'

दुसऱ्याला ही उठाठेव कशाला हवी असं मी म्हटलं असतं. पण बोलतां बोलतां उगीच शब्दावरून शब्द वाढत जाईल या भीतीनं उगीच राहिलों.

तितक्यांत बाहेरचं काम आटोपून राजलक्ष्मी आंत आली. पूर्वीसारखी नुसती उभी न राहतां आनंदच्या मागल्या बाजूला बैठक मारून बसली. आनंद मला उद्देशून म्हणाला, 'ताई' हे म्हणतात, निदान गुलामगिरीची संवय टिकवून ठेवण्यासाठीं म्हणून परदेशीं गेलं पाहिजे. मी म्हणतों, असंच जर आहे तर या ना, थोडीशी मला मदत करा. परदेशीं जाण्याऐवजीं देशाचीच गुलामगिरी करीत दोघेही काळ कंठू!'

राजलक्ष्मीं म्हणाली, 'पण ते डॉक्टर कुठं आहेत?'

आनंद म्हणाला, 'मी काय नुसती डॉक्टरीच करतों? शाळेंत शिकवतों, पाठ-शाळेंत शिकवतों, आमच्या या लोकांची कोणत्या बाजूनं किती दुर्दशा झालीय् तें त्यांना दाखवून द्यायचा प्रयत्न करतों.'

'पण तें कळतं कां त्या लोकांना?'

'चट्कन् कळत नाहीं. पण, माणसाची सदीच्छा अंतःकरणापासून जेव्हां बाहेर पडते, तेव्हां ते प्रयत्न फुकट जात नाहींत ताई!'

माझ्या तोंडाकडे पहात राजलक्ष्मी मान हालवूं लागली. तिला तें खरं वाटलं

नसावं—कदाचित् ती माझ्या बाबतींत घाबरली असावी—चटकन् मी होय म्हटलं तर!—कदाचित् मीं—

'मान कां हालवलीत?' आनंदानं विचारलं.

राजलक्ष्मीनं पहिल्यानं जरा हंसायचा प्रयत्न केला. पण मग ती अगदीं प्रेमळपणें म्हणाली, 'देशाची दुस्थिती केवढी भयंकर झाली आहे तें मला कळतं आनंद. पण तुझ्या एकट्याच्या प्रयत्नानं काय होणार?' माझ्याकडे बोट करून ती म्हणाली, 'अन् हे येणार तुला मदत करायला! मग झालंच. मग माझ्या सारखंच सर्वांना सोडून यांचीच सेवा करीत बसावं लागेल तुला—दुसरं कांहीं सुद्धां करतां यायचं नाहीं.' असं म्हणून ती हसूं लागली.

ती हंसते म्हणून आनंदही हंसूं लागला. तो म्हणाला, 'यांना घेऊन मी काय करूं ताई? खुशाल तुमच्या डोळींची बाहुली करून ठेवा त्यांना. पण हा एकट्या दुकट्याचा प्रश्न नाहीं. एकट्या माणसाची आंतरिक इच्छाशक्ति एवढी जबरदस्त असूं शकते कीं ती मापतां येत नाहीं. त्रिपाद भूमी मागणाऱ्या वामनाच्या पायासारखी! नुसतं पाहिलं तर एवढे लहानसे पाय—पण त्या लहानशा पायांनीं सारं विश्व व्यापून टाकलं.'

वामनाच्या उपमेमुळं राजलक्ष्मीचं अंतःकरण विरघळलं असं मला वाटलं. पण तिनं कांहींच उत्तर दिलं नाहीं. आनंद सांगत होता, 'कदाचित् तुमचंच म्हणणं बरोबर असेल. फार कांहीं करणं मला शक्य नाहीं. पण मी एक काम करतों. दुःखी माणसाच्या दुःखाचा भाग शक्य तितका उचलायचा मी प्रयत्न करतों ताई—'

अधिकच विरघळून राजलक्ष्मी म्हणाली, 'तें मला माहीत आहे आनंद. तुला पहिल्यानं पाहिलं त्याच दिवशीं तें मला कळलं.'

तिचे उद्गार न ऐकलेसे करून स्वतःच्या भाषणाचं अनुसंधान राखीत तो म्हणाला, 'तुम्हाला जशी कसली कमतरता नाहीं तसंच माझंही आहे. बाबाचं जें कांहीं आहे तें चैनींत दिवस काढून देखील मला पुरून उरणारं आहे. पण मला तें नको आहे. दुःखी जीवांच्या या देशांत सुखोपभोगाची लालसा या जीवनांत जर मला आवरतां आली तर मी पुष्कळ मिळवलं असं समजेन.'

सैंपाक तयार आहे म्हणून सांगायला रतन आला. राजलक्ष्मीनं त्याला ताटं वाढायला सांगितलं. ती आम्हांला उद्देशून म्हणाली, 'तुम्हीं लोक जरा लवकर लवकरच उरकून घ्या आनंद. मी फार थकलेय.'

ती थकली होती यांत संशयच नव्हता. पण थकल्याचं कारण आजपर्यंत तिनं केव्हांही सांगितलं नव्हतं.

कांहीं न बोलतां आम्हीं दोघेही उठलों. आज सकाळपासून मोठ्या मजेमजेनं दिवसाची सुरुवात झाली. संध्याकाळची बैठकही चांगली जमली. थट्टामस्करींत वेळ गेला—पण ती बैठक जी मोडली ती मात्र खिन्नतेच्या सुरावर! जेवायला बसायला दोघेही सैंपाक घराकडे आलों पण दोघेही कांहीं बोललों नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं वज्रानंदाची निघायची तयारी सुरू झाली. कुणीही कुठंही जायला निघाला तरी राजलक्ष्मी सदोदीत आडवी येत असे. पदोपदीं, आज नको उद्यां, उद्यां नको परवां, असं म्हणत वेळ काढीत असे—पण आज तिनं तोंडांतून अवाक्षर काढलं नाहीं.

निरोप घेण्यासाठीं जेव्हां तो आला तेव्हां अगदीं जवळ जाऊन ती मोठ्या प्रेमानं म्हणाली, 'आतां पुन्हां केव्हां येणार आनंद?'

मी जवळच होतों. त्या संन्याशाचे डोळे ओले झालेले मला स्पष्ट दिसले. पण तशा परिस्थितींत आत्मसंयमन करून तो हंसतमुखानं म्हणाला, 'येईन म्हणजे काय ताई? जोंपर्यंत या जीवांत जीव आहे तोंपर्यंत मधून मधून तुम्हांला त्रास द्यायला येणारच!'

'अगदीं खरं ना हें?'

'नक्की!'

'पण आम्हीं तर इथून लवकरच परत जाणार! आम्हीं असूं तिथं येशील?'

'हुकूम झाला कीं हजर आहें ताई!'

'ये तर'—राजलक्ष्मी म्हणाली, 'तुझा पत्ता मला लिहून दे. मी पत्र लिहीन केव्हां तरी.'

खिशांतून कागद पेन्सिल काढून आनंदनं पत्ता लिहून तिच्या हातीं दिला. संन्यासी असूनसुद्धां आम्हां दोघांना दोन्ही हात जोडून त्यानं नमस्कार केला. रतननं त्याच्या पायांवर डोकं ठेवलं त्यावेळीं त्याला आशिर्वाद देऊन हळुहळू तो घराबाहेर निघाला.

## १५

आपली औषधांची पेटी नि कॅन्वासची बॅग घेऊन संन्यासी वज्रानंद ज्या दिवशीं बाहेर निघून गेला त्या दिवशीं या घरांतला सारा आनंद गोळा करून घेऊनच

गेला. एवढंच नव्हे, तर मला वाटतं, कीं या शून्य झालेल्या जागेंत छिद्ररहीत असा निरानंद भरून टाकून तो निघून गेला. शेवाळानं व्यापलेलं तळ्यांतलं पाणी सारख्या चाललेल्या त्याच्या चळवळीमुळं मोकळं होत होतं— तें तो निघून जातांच पुन्हां तसंच झांकलेलं राहिलं.

असेच सहासात दिवस निघून गेले. बहुधा सारा दिवस राजलक्ष्मी घरीं नसे. ती कुठं जाते, काय करते तें मला कळत नव्हतं—मी विचारीतही नव्हतों. संध्याकाळीं जेव्हां केव्हां एकदां तिची भेट होई त्यावेळीं ती फारशी भानावर नसे—क्वचित् कुशारी महाशय बरोबर असत, त्यांच्या बरोबर कामकाजाच्या गोष्टी चालत.

एकटाच खोलींत बसलों असतां आनंदची आठवण येई. त्याचा माझा तेवढा लागाबांधा नव्हता हेंही पुन्हां मनांत येई. असं वाटे, एकदम तो जर येईल तर किती बहार होईल! नुसता मलाच आनंद होईल असं नव्हे, पण राजलक्ष्मी व्हरंड्याच्या त्या बाजूला बसून दिव्याच्या उजेडांत कांहीं तरी काम करीत बसली आहे ती देखील तितकीच खुषींत येईल.

असं आहे खरं! ज्याचं उन्मुख झालेलं जोडहृदय बाहेरच्या सर्व प्रकारच्या उपाधी दूर करून एकांत मीलनाच्या आकांक्षेनं एका काळीं व्याकूळ होत असे, आज वियोगाच्या दिवशीं त्याच मला बाह्योपाधीची केवढी गरज वाटते आहे! असं वाटतं कांहीं होवो, एकवार तो येऊन मधेंच उभा राहील तर माझा जीव खालीं पडेल.

अशा परिस्थितींत असेच दिवस काढीत रहाणं बरं वाटेना. एकदां रतन एकदम येऊन समोर उभा राहिला. त्याला आपलं हंसू आवरतां येत नव्हतं. राजलक्ष्मी घरीं नव्हती तेव्हां त्याला कुणाचीच भीति बाळगायची जरुरी नव्हती. तरीही मोठ्या सावधपणं चोंहीकडे नजर टाकून हळूच म्हणाला, 'तुम्हीं ऐकलंत नाहीं वाटतं?'

मी म्हटलं, 'नाहीं!'

रतन म्हणाला, 'आई भवानी बाईची बुद्धि अशीच शेवटपर्यंत कायम ठेवो! चार दिवसांत आपण इथून जाणार!'

'कुठं जाणार?'

पुन्हां एकदां दरवाजाकडे नजर फेंकून रतन म्हणाला, तें कांहीं मला निश्चित कळलं नाहीं. कदाचित् पाटण्याला, कदाचित्—काशीला, कदाचित्—पण या खेरीज बाईचं दुसरं घर कुठंच नाहीं ना?'

मी उगीच राहिलों. एवढी महत्त्वाची गोष्ट सांगितल्यावर सुद्धां मी उत्सुकता दाखवली नाहीं त्यामुळं मी त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवला नाहीं अशी शंका येऊन तो डोळ्यांत प्राण आणून मोठ्या कळकळीनं म्हणाला, 'अगदीं अक्षरशः खरं आहे. आपण सारे जाणारच! एकदां निघालों इथून कीं सुटलों! नाहीं?'

'हो.' मी म्हटलं.

रतन अगदीं खूष होऊन म्हणाला, 'एवढे चार दोन दिवस कसेबसे निभावून गेले कीं झालं. फार तर्‌एक आठवडा—त्यापेक्षां जास्त नाहीं. गंगामाटीची सारी व्यवस्था बाईंनीं कुशारी महाशयांच्या हातीं आतां शेवटची सोपवून दिली आहे. आतां बांधाबांध करून देवाचं नांव घेऊन इथनं एकदा पाय काढला कीं सुटलों. किती झालं तरी आपण शहरचीं माणसं! असल्या या जागीं काय निभाव लागायचा आहे आपला?' मोठ्या खूषींत येऊन एवढं सांगिल्यावर माझ्या उत्तराची वाट सुद्धां न पहातां तो निघून गेला.

रतनला सारं कांहीं ठाऊक होतं. राजलक्ष्मीच्या नौकरापैकीं त्याच्यासारखाच मीही एक—यापेक्षां जास्त नाहीं हें त्याला माहीत होतं. दुसऱ्या कुणाच्या खुषी-नाखुषीला किंमत नाहीं, कुणाला बरं वाटो वा न वाटो, तिची मर्जी नि तिची आवड जशी असेल तसंच सारं कांहीं व्हायचं, हेंही त्याला माहीत होतं.

रतन जी बातमी देऊन गेला तिचं मर्म त्याचं त्यालाच कळलं नव्हतं. पण त्याच्या शब्दामागून जो अर्थ निष्पन्न होत होता तो माझ्या अंतःकरणांत अगदीं उघड उडड परिस्फुट झाला होता. राजलक्ष्मीची शक्ती अमर्याद होती. त्या अमर्याद शक्तीच्या आधारावर ती स्वतःबरोबरच स्वतः खेळत राहिली होती. केव्हां तरी एकदां या खेळांत माझी जरूरी होती. तिच्या या इच्छाशक्तीच्या अमर्याद आकर्षणाला विरोध करणं मला साध्य नव्हतं—म्हणून मान वांकवून आलों, तिनं आपण होऊन कांहीं मला आणलं नाहीं. माझ्यासाठीं तिनं केवढा तरी स्वार्थ-त्याग केला. पण आज मला असं दिसून येत आहे, कीं एवढ्यावर कांहीं भागलं नाहीं. राजलक्ष्मीच्या स्वार्थाचं केंद्र अजूनपर्यंत मला दिसून आलं नव्हतं म्हणून माझा तसा समज झाला होता. पैसाअडका, ऐश्वर्य—तिनं किती तरी त्याग केला होता! पण तो काय माझ्यासाठीं? सांठलेला कचरा जसा आडवा येतो तसंच हें सारं तिच्या मार्गांत आडच येत नव्हतं का? मी नि माझा लाभ करून घेणं, या दोहोंत राजलक्ष्मीच्या दृष्टीनं केवढा मोठा प्रभेद होता तें आज मला स्पष्ट

दिसून आलं. इहलोकांतील संपादन करण्याजोग्या साऱ्या गोष्टी तुच्छ करून ती पुढं पाऊल टाकायला सरसावली होती. तिच्या मार्गांत अडथळा करायला मी का रहावं? इतर केरकचऱ्याप्रमाणंच मीसुद्धां आतां तिच्या या मार्गाच्या एका बाजूला सरकून राहिलं पाहिजे हें ध्यानीं येऊन मोठं दुःख होतं आहे.

पण आहे तें असं आहे. तें कबूल करणं शक्य नाहीं. धूर्त रतननं जी बातमी मिळवली होती ती चुकीची नव्हती हें मला दुसऱ्या दिवशीं सकाळीं कळलं. गंगामाटीसंबंधीं सर्व व्यवस्था ठीकठाक होऊन गेली होती. राजलक्ष्मीच्या तोंडूनच मला तें कळलं. सकाळची रोजची पूजाविजा झाल्यावर नित्याप्रमाणं ती बाहेर जायला निघाली नाहीं. हळुहळू येऊन माझ्याजवळ बसून ती म्हणाली, 'परवां एवढ्याच वेळीं खाणंपिणं उरकून जर आपण बाहेर निघालों तर सांईथिया स्टेशनवर पश्चिमेकडची गाडी आपल्याला मिळेल नाहीं?'

मी म्हटलं, 'मिळेल!'

राजलक्ष्मी म्हणाली,' इथली सारी व्यवस्था एक प्रकारें निश्चित करून टाकली एकदांची! कुशारी महाशयांना जसं सांगलंसवरलं आहे तसंच ते करतील.'

मी म्हटलं, 'छान झालं.'

राजलक्ष्मी क्षणभर उगीच राहिली. प्रश्नाची सुरवात चांगलीशी करतां आली नाहीं असं वाटून ती शेवटीं म्हणाली, 'एक गाडी रिझर्व करून स्टेशनवर हजर रहायला बंकूला पत्र लिहिलं आहे. पण तो येईल तेव्हां खरा!'

मी म्हटलं, 'अर्थात् येईल. तो तुझ्या हुकमाबाहेर जायचा नाहीं.'

राजलक्ष्मी म्हणाली, 'नाहीं—शक्य तेवढा जायचा नाहीं. तरीही—बरं, तुम्ही कांहीं आमच्या बरोबर येणार नाहीं?'

कुठं जायचं हा प्रश्न करावा असं मला वाटेना. शब्द तोंडांतल्या तोंडांत राहिले. मी नुसतं म्हटलं, 'मी यावं असं तुला वाटलं तर येईनही.'

राजलक्ष्मी यावर कांहीं विशेष बोलली नाहीं. किती तरी वेळ ती उगीच बसून राहिली होती. एकदम भानावर येऊन ती म्हणाली, 'हें काय? तुमचा चहा कसा आणला नाहीं अजून?'

मी म्हटलं, 'नाहीं. कामांत असतील ते.'

खरं पाहिलं तर चहाची वेळ केव्हांच टळून गेली होती. यापूर्वी नोकरांनीं असा कांहीं अपराध केला तर ती चिडून उठत असे. आरडून ओरडून घर

डोक्यावर घेत असे. पण यावेळीं ती शरमेनं अगदीं चूर होऊन गेली. एक शब्द-सुद्धां न बोलतां ती तशीच निघून चालती झाली.

ठरल्या दिवशीं ज्यावेळीं आम्हीं जायला निघालो त्यावेळीं सारी रयत येऊन आमच्या सभोंवार गोळा झाली. डोंबाची मालती एकवार भेटावी अशी माझी इच्छा होती. पण हा गांव टाकून तिनं दुसऱ्या कुठं तरी संसार थाटला होता. अर्थात् ती भेटली नाहीं. नवऱ्याबरोबर ती तिकडे सुखांत होती एवढंच मला कळलं.

दोघेही कुशारी बंधू सपरिवार आले होते. तांती घराण्याच्या इस्टेटीबद्दलच्या वादाचा योग्य निकाल लागल्यामुळं ते आतां एकत्र आले होते. राजलक्ष्मीनं ही सारी मिटवामिटव कशी घडवून आणली हें कळून घेण्याची मला उत्कंठा नव्हती—तसं कांहीं कळलंही नाहीं. सारा वाद मिटला, एवढंच त्यांच्या उभयतांच्या मुद्रेवरून मला कळून आलं. पूर्वीच्या ताटातुटीचा परिणाम आतां शिलक राहिला नव्हता.

मुलाला घेऊन सुनंदेनं मला नमस्कार केला. ती म्हणाली, ' आपण आम्हां लोकांना खचित विसरणार नाहीं. तेव्हां ओळखदेख ठेवा असं उगीच कशाला म्हणूं ?

मी हंसून म्हटलं, ' आतां काय मागणं आहे माझ्याजवळ ताई ? '

' माझ्या मुलाला आशीर्वाद द्या म्हणजे झालं.

मी म्हटलं, ' हें कांहीं सांगायला नको सुनंदा. तुझ्यासारख्या आईच्या मुलाला आशीर्वाद द्यायची पात्रता आहे कुणाला ? '

राजलक्ष्मी त्यावेळीं कांहीं तरी कामासाठीं त्याच बाजूनं जात होती. आमचं भाषण कानीं पडल्यामुळं ती आंत येऊन उभी राहिली.

सुनंदेच्या वतीनं तिनं उत्तर दिलं, ' तिच्या मुलाला असा आशिर्वाद द्या, कीं मोठा झाल्यावर तो तुमच्या सारखाच सहृदय होईल.'

मी हंसून म्हटलं, हा छान आशिर्वाद ! सुनंदा, लक्ष्मी तुझ्या मुलाची थट्टा करतेय्.'

माझे शब्द पुरे होतात न होतात तोंच राजलक्ष्मी एकदम म्हणाली, ' आपल्या मुलाची कोण कधीं असली थट्टा करतं का ? नि ती अशी निरोप घ्यायच्या वेळीं ? ' असं म्हणून ती कांहीं वेळ स्तब्ध राहून नंतर म्हणाली, ' मी देखील त्याच्या आईसारखीच देवाजवळ एवढंच मागणं मागतें. यापेक्षां जास्त कांहीं मागावं असं वाटतच नाहीं मला ! '

मी पाहिलं तों तिचे दोन्हीं डोळे भरून आले होते. आणखी एक शब्दसुद्धां न बोलतां ती बाहेर निघून गेली.

आंसवांनीं भरलेल्या डोळ्यांनीं आम्हीं सर्वांनीं गंगामाटीचा निरोप घेतला. रतनसुद्धां पुन्हां पुन्हां डोळे पुशीत होता. पुन्हां लवकर यावं म्हणून प्रत्येकजण वचन मागत होता—तें वचन दिलं नाहीं काय तें मी! या जन्मींतरी पुन्हा इथं यायचा संभव नाहीं हें मला पक्कं माहीत होतं.

म्हणूनच जात असतां या छोट्या गांवाकडे पुन्हां पुन्हां वळून पाहूं लागलों. असं वाटलं, अत्यंत मधुर नि शोकरसानं ओथंबलेल्या वियोगान्त नाटकाचा हा शेवटचा पडदा पडला. नाटकगृहांतले दिवे मालवले, आतां माणसांनीं खच्चून भरलेल्या जगांतून रस्ता काढीत मला बाहेर निघालं पाहिजे. असल्या गर्दींत पाऊल टाकतांना कसं सावध राहिलं पाहिजे हें न कळण्याइतकं माझं मन एक प्रकारें सून्न होऊन गेलं होतं.

संध्याकाळीं आम्हीं साईंथिया स्टेशनवर येऊन पोंचलों. बंकूनं राजलक्ष्मीचा आदेश नि उपदेश अमान्य केला नव्हता. सर्व ठाकठीक व्यवस्था करून तो स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर हजर होता. गाडी येतांच सामानसुमान गाडींत चढवून रतनला नोकराच्या डब्यांत बसवून तो आपल्या सावत्र आईसह गाडींत बसला. माझ्याबद्दल त्यानं फारशी कळकळ दाखवली नाहीं. आतां त्याचा दर वाढला होता. घरदार, पैसाअडका आवरून आतां तो संसारांत एक कर्तापुरुष म्हणून समजला जात होता.

बंकू मोठा हुशार होता. कोणत्या प्रसंगीं कसं वागावं हे त्याला चांगलं कळत होतं. ही विद्या ज्यानं साध्य केली आहे त्याला या जगांत कुठंच अडचण पडत नाहीं.

गाडी सुटायला पांचएक मिनिटं होतीं—पण कलकत्त्याकडे जाणारी माझी गाडी जवळ जवळ पहाटेच येणार होती. मी एका बाजूला स्वस्थ उभा राहिलों होतों. खिडकीबाहेर तोंड काढून राजलक्ष्मीनं मला हातानं खूण करून बोलावलं. मी जवळ गेलों तेव्हां ती म्हणाली, ‘जरा आंत येऊन बसा.’

मी आंत जातांच माझा हात धरून मला जवळ बसवून घेऊन म्हणाली,

‘अगदीं लवकरच ब्रह्मदेशांत जाणार का? जायच्यापूर्वी एकदां मला भेटून जाणार नाहीं का?’

मी म्हटलं, ‘जरूर असली तर येईन.’

राजलक्ष्मी अगदीं हळूच म्हणाली, ‘चार लोक ज्याला जरूरी म्हणतात ती नव्हे—एकदां येऊन भेटलंच पाहिजे मला. याल?’

‘येईन.’

‘ कलकत्त्याला गेल्यावर पत्र पाठवाल ? ’

‘ पाठवीन. ’

गाडी सुटायची शेवटची घंटा वाजली नि गार्डसाहेबानं हिरवा कंदील पुन्हां पुन्हां हालवून दाखवीत निघायचा हुकूम कायम केला. राजलक्ष्मीनं खालीं वांकून माझ्या पायाला हात लावून नमस्कार केला तेव्हां माझा हात सोडला. मी खालीं उतरून दार बंद केलं तोंच गाडी चालू झाली.

* * * *

कलकत्त्याला आल्यावर पत्र लिहिलं नि त्याचं उत्तरही आलं. इथं फारसं काम नव्हतं. जें होतं तें दहापंधरा दिवसांत संपलं. आतां फक्त परदेशीं जायची तयारी करायची.

पण त्यापूर्वी कबूल केल्याप्रमाणें एकवेळ राजलक्ष्मीला भेटलं पाहिजे होतं.

आणखी एक दोन आठवडे असेच गेले. मनांत शंका येत होती—तिनं का बोलावलं असावं ?—कदाचित् ती सहज मला जाऊं देती ना—कदाचित् असं दूरदेशीं जाण्याविरुद्ध नानाप्रकारच्या अडचणी दाखवून हट्ट धरून बसली असती —कांहींच अशक्य नव्हतं.

सध्यां ती काशीला होती. तिच्या रहाण्याचं ठिकाण मला माहीत होतं. इतक्यांत तिचीं दोन तीन पत्रेंही आलीं होती, पण येणाच्या कबूलीबद्दल तिनं इंगितानं-सुद्धां प्रश्न केला नव्हता हें स्पष्टपणें माझ्या ध्यानीं आल्यावांचून राहिलं नाहीं.

तशी आठवण तिनं कां द्यावी ? मी मनांतल्या मनांत म्हटलं, तिच्या जागीं मी असतों तर अशा रितीनं ‘ तोंड वेंगाळून एकदां येऊन मला भेटून जा ’ असं म्हणण्याइतका कमीपणा मी कधींच घेतला नसता.

तितक्यांत पहातां पहातां एकदम मन उतावीळ होऊन उठलं. माझ्या जीव-नाशीं तिचा जो संबंध एवढ्या मोठ्या प्रमाणांत जडला होता तो माझा मीच कसा विसरलों याजबद्दल माझं मलाच आश्चर्य वाटलं.

घड्याळ काढून पाहिलं, अजून वेळ होता—आतां निघालों तरी गाडी मिळाली असती. सारं घरच्या घरींच राहिलं नि मी एकदम बाहेर निघालों. इकडे तिकडे पडलेले सारे जिन्नस पहातांच वाटलं, राहुं देत हे असेच ! मला काय पाहिजे हें माझ्यापेक्षां तिलाच जास्त चांगलं कळतं. तिलाच भेटायला निघाल्यावर माझ्या आवश्यकतेचा बोजा कशाला बरोबर घेऊं ?

रात्रीं गाडींत मुळींच झोंप आली नाहीं. एक प्रकारच्या आळसावलेल्या तंद्रेच्या भरांत झांकलेल्या डोळ्यांसमोर कितीतरी कल्पना सारख्या नाचत बागडत होत्या, त्यांना आदि अंत नव्हता. बहुधा कल्पनेचा घोटाळा सुरू झाला होता. पण त्या साऱ्याच मधुरतेनं भरलेल्या होत्या.

हळुहळू उजाडलं, दिवस वर येऊं लागला, उतारू उठूं बसूं लागले. हांका-हांकी धांवदौड सारखी सुरू झाली. उन्हाचा ताप चोहीबाजूनं वाढूं लागला त्यामुळं सारं कांहीं झगझगीत झालं होतं. माझ्या डोळ्यासमोर मात्र धुकं पसरलं होतं.

गाडीला उशीर झाल्यामुळं राजलक्ष्मीच्या काशींतल्या घरीं ज्यावेळीं पोंचलों त्यावेळीं दिवस उलटून गेला होता. बाहेरच्या दिवाणखान्यासमोर एक म्हातारा ब्राह्मण धूम्रपान करीत होता. त्यानं वर माझ्याकडं पाहिलं नि विचारलं, 'काय पाहिजे?'

काय पाहिजे तें चटकन् सांगतां आलं नाहीं.

त्यानं पुन्हां प्रश्न केला, 'कुणाला शोधतांहांत?'

कुणाला शोधीत होतों तेंही चटकन् सांगणं कठीण गेलं. क्षणभर थांबून मी विचारलं, 'रतन आहे?'

'नाहीं. बाजारांत गेलाय् तो!'

ब्राह्मण सज्जन माणूस दिसला. माझे कपडे धुळीनं भरलेले दिसल्यामुळं मी कुठून तरी दुरून आलों असावा असा त्यानं अंदाज केला. मोठ्या प्रेमळपणें तो म्हणाला, 'बसा आपण–तो आतांच येईल. त्यालाच भेटायचं होतं का आपल्याला?' जवळच्याच एका चौकीवर बसलों. त्याच्या प्रश्नानं सरळ उत्तर न देतां मी विचारलं, 'बंकूबाबू आहेत का इथं?'

'आहेत तर!' असं म्हणून एका नव्या नोकराला हाक मारून त्यानं बंकूला बोलावयाला सांगितलं.

बंकू आला. मला पहातांच पहिल्यानं तो आश्चर्यचकित झाला. आपल्या खोलींत मला नेऊन बसवल्यावर त्यानं म्हटलं, 'आम्हाला वाटलं कीं आपण ब्रह्मदेशाला गेलांत!'

हे 'आम्ही' म्हणजे कोण तें विचारावं असं वाटत असूनही मी विचारलं नाहीं.

बंकू म्हणाला, 'आपलं सामानसुमान अजून गाडींतच आहे का?'

'नाहीं. सामान बरोबर आणलंच नाहीं.'

'आणलं नाहीं? रात्रीच्याच गाडीनं परत जाणार वाटतं?'

मी म्हटलं, ' जमल्यास जाणार म्हणतोंय्.'

बंकू म्हणाला, ' मग बरोबर. एवढ्यासाठीं सामान कशाला हवं ? धोतर, पंचा, हातपाय धुवायला पाणी वगैरे जिन्नस घेऊन नोकर आला. पण दुसरं कुणीच माझ्या बाजूला फिरकलं नाहीं.

जेवायचं बोलावणं आलं. जाऊन पहातों तों माझं नि बंकूचं ताट शेजार-शेजारींच वाढलं होतं.

उजवीकडचा दरवाजा उघडून राजलक्ष्मी आली नि तिनं मला नमस्कार केला. सुरवातीला मी तिला ओळखली नाहीं. ज्यावेळीं ओळख पटली त्यावेळीं माझ्या डोळयांसमोर अंधेरी आली. कुठं आहे, काय करतों आहे हें सुद्धां विसरलों. लगेच शुद्धीवर आलों. स्वत:ची मर्यादा विसरून कांहीं तरी हास्यास्पद वर्तन हातून घडण्यापूर्वींच या घराबाहेर माणसासारखा निघालों कीं मिळविली, असं वाटलं.

' गाडींत त्रास झाला नाहीं ना ? ' राजलक्ष्मीनं विचारलं.

याखेरीज ती दुसरं काय विचारणार होती ?

हळुहळू जाऊन पाटावर बसलों. कांहीं वेळ उगीच राहिलों—बहुधा एक क्षणभरच— नंतर वर पाहून म्हणालों, ' नाहीं-त्रास झाला नाहीं. '

आतां मी तिला चांगलं पाहून घेतलं--ती साधं पांढरं पातळ नेसली होती. अंगावरचे सगळे दागिने तिनं टाकून दिले होते, इतकंच नव्हे, तर आकाशांतल्या मेघाप्रमाणं पाठभर रुळणारा तिचा केशकलाप आतां तिथं नव्हता. तिनं अगदीं भुवई-पर्यंत पदर ओढून घेतला होता. त्या पदराच्या कोपऱ्यांतून कापलेल्या केसाच्या चार दोन बटा मानेच्या बाजूला बाहेर आलेल्या दिसत होत्या. कठोर आत्मनिग्रह नि उपवासामुळं तिच्या चेहऱ्यावर रुक्ष असा तजेला आलेला दिसत होता. असं वाटलं, एकाच महिन्यांत दहा वर्षांची मजल मारून ती माझ्यापलिकडे गेली असावी.

भाताचा घास माझ्या घशाखालीं उतरेना. कसाबसा आंवढा घोटून गिळून टाकला. या बाईचा नि आपला संबंध आतां कायमचा पुसून गेला. असंच मनाला वाटूं लागलं.

नि आज !—या तेवढ्या दिवशीं तरी मी कमी जेवतों म्हणून तिनं तक्रार केली नाहीं म्हणजे झालं.

जेवण झाल्यावर राजलक्ष्मी म्हणाली, ' बंकू म्हणाला कीं तुम्ही आज रात्री-च्याच गाडीनं जाणार अहांत. '

मी म्हटलं, 'हो.'

'छेः! बरं-पण तुमची आगबोट जाणार आहे येत्या रविवारीं.' तिच्या या व्यक्त नि अव्यक्त उःश्वासामुळं चकित होऊन मी तिच्या तोंडाकडे पाहिलं, त्या सरशीं ती अगदीं ओशाळून गेली. लगेच स्वतःला सांवरून घेऊन ती हळुहळू म्हणाली, 'तर मग अजून तीन दिवस अवधी आहे?'

पुन्हां राजलक्ष्मी कांहींतरी बोलणार होती. पण तितक्यांत उगीच राहिली. माझ्या प्रकृतीची चौकशी करणं तिला कठीण गेलं असावं.

कांहीं वेळ उगीच राहून नंतर ती म्हणाली, 'माझे गुरुजी आले आहेत.' मी आल्याबरोबर पहिल्यानंच जे भेटले तेच गृहस्थ असावे असं वाटलं. याच गृहस्थांना भेटण्यासाठीं मागं एकदां काशीला यायचा ती आग्रह करीत होती.

रात्र उलटल्यावर या गृहस्थाबरोबर माझं बोलणं झालं. माझी गाडी रात्रीं बाराच्यानंतरची होती. जायला बराच अवधी होता.

माणूस खरोखरच एकंदरींत बरा दिसला. स्वधर्मावर त्याची मोठी निष्ठा दिसली. मनाचा उदार असावा असंही वाटलं. आमच्या साऱ्या हकिकती त्याला माहीत असल्याचं मला दिसून आलं- राजलक्ष्मीनं गुरूपासून कोणतीच गोष्ट लपवून ठेवली नव्हती.

बऱ्याच विषयांवर बोलणीं झालीं. सहज बोलतां बोलतां त्यानं उपदेशाही कांहीं कमी केला नाहीं, पण त्यांत उग्रता नव्हती किंवा आघातही नव्हते.

साऱ्याच गोष्टी आतां आठवत नाहींत, बहुधा मी त्या मन लावून ऐकल्या नसाव्यात. पण एवढंच आठवतं, कीं राजलक्ष्मीच्या आयुष्यांत घडून येणाऱ्या या स्थित्यंतराची त्याला आधींच कल्पना होती. म्हणून दीक्षेच्या बाबतींत प्रचलित पद्धतीचं अवलंबन त्यानं केलं नव्हतं. ज्याचं पाऊल वाकडं पडलं आहे त्याला सद्गुरूची आवश्यकता इतर कुणापेक्षां जास्त आहे, असा त्याचा विश्वास होता.

याविरुद्ध मी तरी काय बोलणार होतों? पुन्हां एकदां आपल्या शिष्यिणीची भक्ति, निष्ठा नि धर्मशीलतेची तोंडभर स्तुति करीत तो म्हणाला, 'अशी कुणी पाहिली नाहीं!'

यांत कांहीं संशय नव्हता, नि त्याचा प्रत्यय माझ्याइतका दुसऱ्या कुणालाच आला नव्हता—तरीही मी कांहीं बोललों नाहीं.

गाडीची वेळ होत आली. टांगा दारासमोर येऊन उभा राहिला. गुरुजीचा

निरोप घेऊन मी गाडींत बसलों. राजलक्ष्मी बाहेर आली नि गाडींत पुन्हां पुन्हां माझे पाय धरून नमस्कार करूं लागली—पण एक शब्द बोलली नाहीं. बोलायची ताकदच तिला नसावी असं मला वाटलं. काळोखांत माझा चेहरा तिला दिसत नव्हता म्हणून बरं!

मींही स्तब्ध राहिलों होतों. काय बोलावं तें मला सुचत नव्हतं. शेवटचा निरोप घेण्याचा समारंभ बिनशब्दानं पार पडला.

गाडी चालू होतांच माझ्या दोन्ही डोळ्यांतून सारखं पाणी वाहूं लागलं. अंतःकरण पिळवटून मी म्हणालों:—

'तूं सुखी हो, शांत हो! तुझी श्रद्धा अढळ राहो! मी तुझा मत्सर करीत नाहीं पण सर्वस्वावर तिलांजली देऊन हा जो एक अभावी एका होडींत बसून एके दिवशीं होडी लोटून निघालाय् त्याला या जन्मांत तरी किनारा सांपडेलसं वाटत नाहीं.'

धडपड खडखड करीत गाडी चालूं लागली तेव्हां गंगामाटीच्या साऱ्या आठवणी पुन्हां एकदां उसळून जाग्या झाल्या. त्या दिवशीं निरोप घेतांना जें जें कांहीं मनांत आलं होतं, तें तें सारं पुन्हां जागृत झालं असं वाटलं. या एका जीवन नाटकाचा अत्यंत स्थूल नि साधासिधा असा जो उपसंहार झाला त्याच्या ख्यातीला पार नाहीं. या सर्व घटनांचा इतिहास लिहून ठेवला तरी त्याची कधींही न मावळणारी झळक केव्हांही थंडावणार नाहीं. आश्चर्यचकित होऊन मान लववणाऱ्या वाचकालाही या जगांत कधींच कसला अभाव वाटणार नाहीं—

—पण मला स्वतःला काय वाटतं तें कुणालाच सांगतां यायचं नाहीं. मी निघालोंय् भलतीकडेच. माझ्यासारखीच पापाच्या कर्दमांत रुतलेली, सज्जन बनायचा मार्ग नसलेली, अशा त्या अभयेकडे मी चाललोंय्. मनांतल्या मनांत राजलक्ष्मीला उद्देशून मी म्हणालों, 'तुझ्या पुण्यमय जीवनाचं शिखर सारखं वाढत जावो. तुझ्या हृदयांतील धर्माचा महीमा उज्वलाहून उज्वलतर होवो! यापुढं मी तुझ्यावर रागावणार नाहीं.'

अभयेचं पत्र आलं आहे. स्नेह, प्रेम नि करुणेच्या भावनेनं अढळ झालेली अभया, भगिनीपेक्षांही अधिक, बंडखोर बनलेली अभया—त्या अभयेनं मोठ्या आदरानं मला बोलावलंय्.

ब्रह्मदेश सोडून येतांनां छोट्याशा दारवठ्यांत उभी राहिलेल्या अभयेचे आंसवांनीं डवरलेले डोळे मला आठवले. तिचा भूत नि वर्तमानकालीन इतिहासही

आठवला. चित्ताची शुचिता, बुद्धीची निर्भयता नि आत्म्याची स्वाधीनता एकत्रित करून ती माझीं सारीं दुःखं एका निमिषांत झांकळून टाकून उत्तेजित करीत आहे असं मला वाटलं.

एकदम गाडी थांबली, तेव्हां भानावर येऊन पहातों तों स्टेशनवर येऊन पोंचलों होतों. गाडींतून उतरून उभा राहिलों तों कोचबॉक्सवरून खालीं उतरून कुणीतरी माझे पाय धरून मला प्रणाम केला.

'कोण ? रतन कीं काय ?'

'बाबू, आपण परदेशीं गेलांत नि आपल्याला नोकर हवा असला तर मला लिहून कळवा. कुडींत प्राण आहे तोंवर आपली मन लावून सेवा करीन.'

गाडीच्या दिव्याचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडला होता. मी आश्चर्यचकीत होऊन म्हणालों, 'तूं रडतो आहेस कां ? सांग ना !'

रतननं उत्तर दिलं नाहीं. हातानं डोळे पुसून पुन्हां एकदां धप्‌कन् खालीं पडून त्यानं मला नमस्कार केला नि पहातां पहातां तो काळोखांत झपाझप पावलं टाकीत धांवत माझ्या दृष्टीआड झाला.

का आश्चर्य ! तोच का हा रतन ?

२९४८६
पा. वा
१६५८
१-२-६१
3960
IRBK-0103187
IRBK-0103187